# श्रीनिम्बार्कदर्शन



- प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।

श्री. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराज व
श्री. प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीराज स्मारक ट्रस्ट, पुणे ४

सप्रेमभेट
2/3/92

# श्रीनिम्बार्कदर्शन

लेखक

प.पू.ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराज कवीश्वर

**प्रकाशक**

श्रीसद्गुरु प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर
समग्र लेखन समिती
श्रीवासुदेव निवास
४२/१७ एरंडवणे, कर्वे रोड, पुणे - ४.

**संपादक**

डॉ. वासुदेव व्यं. देशमुख

**प्रकाशन दिन**

माघ कृ ५ शके १९३२
मंगळवार २२ फेब्रुवारी, २०११

**मुद्रक**

प्रवरा ट्रेडर्स
हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे - ५१

**© सर्व हक्क श्रीवासुदेवनिवास विश्वस्त मंडळ यांचेकडे सुरक्षित**


**श्रीसद्गुरु प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर**
**समग्र लेखन समिती**
श्रीवासुदेव निवास
४२/१७ एरंडवणे, कर्वे रोड, पुणे - ४.

**प. पू. श्री नारायणकाका ढेकणे महाराज**
(अध्यक्ष) प्रधान विश्वस्त, वासुदेवनिवास, पुणे

**पू. श्री. मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर**
कार्याध्यक्ष

**विश्वस्त श्री. सुभाष दामले**
कोषाध्यक्ष

**सन्माननीय सदस्य**
**पू. डॉ. रा.ल.जोशी, डॉ. वा.व्यं.देशमुख,**
**पू. श्री.शरदराव जोशी, श्री.बाळासाहेब कुलकर्णी,**
**श्रीमती नीलाताई जोशी, श्रीमती सुशीलाताई मोडक,**
**श्रीमती आशाताई धारप, पू.प्र.ना.दीक्षित,**
**श्री.श्रीपादराव आघारकर, विश्वस्त, श्री.कमलाकर देशपांडे**



॥श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः॥

श्रीवासुदेवनिवास
कर्वे पथ,
पुणे ४११००४

## प.पू.योगतपस्वी श्री नारायणकाका (ना.य.) ढेकणे महाराज यांचा आशीर्वाद.

प. पू. सद्गुरु ब्रह्मश्री पं. दत्तमहाराज कवीश्वर यांनी श्रीनिम्बार्काचार्यांच्या ''वेदान्तपारिजातसौरभ''या ग्रंथाचा विवरणासह अनुवाद केलेला आहे. हा ग्रंथ सांप्रत उपलब्ध नाही. हा ग्रंथ वेदांताच्या अभ्यासकांना अतिशय मौलिक आहेच. पण त्या ग्रंथाला प.पू.श्रीदत्तमहाराजांनी लिहिलेली सविस्तर 'भूमिका' सर्वसामान्य जिज्ञासूंना आणि साधकांनाही उद्बोधक आणि लाभदायक आहे. ह्या साधारण पावणे दोनशे पृष्ठांच्या ग्रंथांत श्रीदत्तमहाराजांनी भारतीय दर्शनांचा सोप्या शब्दांत आढावा घेतला आहे आणि त्या पार्श्वभूमीवर श्रीसुदर्शनावतार, श्रीनिम्बार्काचार्यांचा द्वैताद्वैत सिद्धांत, त्यांचा वैष्णव संप्रदाय, सांप्रदायिक वाङ्मय आणि भागवत धर्माच्या पुनरुज्जीवनाचे त्यांचे कार्य यांचा परिचय करून दिला आहे.

वेदांताचे जे विविध संप्रदाय भारतीय आचार्यांनी प्रकट केले त्यांत निम्बार्काचार्यांचा भेदाभेद किंवा द्वैताद्वैत सिद्धांत हा श्रीमच्छंकराचार्यांच्या अद्वैत मताला जवळ आहे. श्रीमच्छंकराचार्यांच्या मतापेक्षां हा वेगळा असूनही आपल्या

प्रतिपादनांत श्रीनिम्बार्कांनी त्यांचे खंडन केलेले नाही हे लक्षणीय आहे. ''ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या'' हे अंतिम सत्य मानले तरी सर्वसामान्यांसाठी भक्तीचाच उपदेश श्रीमच्छंकराचार्यांनीही केला आहे. भक्तीला वेदांताची वैचारिक बैठक देण्यासाठीच श्रीनिम्बार्कांनी द्वैताद्वैत सिद्धांताची मांडणी केली असावी.

श्रीनिम्बार्काचार्यांच्या साधनपद्धतीत रागात्मिका भक्तीला विशेष महत्त्व आहे. रसस्वरूप परमेश्वरावर दास्य, वात्सल्य, मित्र आणि मधुर भावांनी प्रेम करणे हाच त्यांच्या साधनाचा गाभा आहे.यालाच ते हिततत्त्व असे म्हणतात.या भक्तियोगाचा कुंडलिनीयोगाशी जवळचा संबंध आहे. राधा हीच आल्हादिनी शक्ति आहे. हितरसाचे सर्जन ती करते. नाभीस्थित मणीपूर चक्रांत पडणारी रसधारा उलट करून अनाहतचक्रांत (वृंदावनांत) नेल्याने उत्कृष्ट हितरसाची अभिव्यक्ति होते. हितरसवाहिनी सुषुम्णाच राधादेवी आहे व इतर हजारो हितनाड्याशी वृंदावनांत तिचे संघटन झाल्याने (सखीसहस्रैः परिसेवितां सदा।) परमहिततत्त्वाचा आविष्कार होतो.

अशा रीतीने तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांना, वेदांताच्या जिज्ञासूंना आणि भक्तिमार्गाच्या साधकांना सारखाच उपयुक्त ठरावा ह्याच हेतूने 'श्रीसद्गुरु प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज समग्र चरित्रलेखन समिती' च्या माध्यमांतून हा ग्रंथ '**श्रीनिम्बार्कदर्शन**' या नांवाने प्रकाशित होत आहे. सर्वच मुमुक्षूंना हा मार्गदर्शक ठरो हीच श्रीसद्गुरुस्वामीमहाराजांच्या चरणी प्रार्थना आहे.

सर्वांचा कल्याणेच्छु

**ना.य.ढेकणे**,प्रधान विश्वस्त

# प्रास्ताविक निवेदन

**सकल धर्मांमाजी धर्म । स्वरुपी रहाणे हा स्वधर्म**
**हेचि जाणिजे वर्म । साधू लक्षणाचे** - समर्थ रामदासस्वामी

राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामीमहाराजांचे उक्तीप्रमाणे असे महान साधू शक्तिपातयोग पीठाधीश्वर, राष्ट्रीय पंडित प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर हे या पुण्य पावन नगरीत होऊन गेले. त्यांच्या कृती,प्रेरणा,आणि जीवननिष्ठा आजही सहस्रावधी भाविकांना, साधकांना,विद्वानांना अनुग्रहीतांना आणि शिष्यांना जीवनाचा आधार होऊन राहिले आहेत आणि पुढे ही दीर्घकाळ राहतील.

महाराष्ट्र ही संतांची खाण आहे. हजारो वर्षाची संतांची दिव्य परंपरा या महाराष्ट्राला लाभली आहे. त्याच परंपरेतील एक महान श्रीगणेशदत्तभक्त प.पू.श्रीदत्तमहाराज कवीश्वर आहेत. ज्यांचे वर्णन असे करता येईल -

**अक्रोध वैराग्य जितेंद्रियत्वं ।दया क्षमा शांती जनप्रियत्वं ।**
**निर्लोभ दाता भय शोकहर्ता । ज्ञानस्य चिन्हं दशलक्षणा ।।**

ज्यांना राग नाही, वैराग्य संपन्न जीवन, जितेंद्रिय आहेत, निर्लोभी आहेत, ज्यांच्या ठिकाणी दया आहे, जे क्षमाशील आहेत, अत्यंत शांत आहेत, लोकांच्या मनात त्यांच्याविषयी प्रेम आहे, ज्यांच्याठिकाणी दातृत्व आहे , त्यांना कशाचेही भय वाटत नाही, कशाचाही शोक नाही, ही ज्ञानी पुरुषाची दहा लक्षणे आहेत.

सर्वसामन्यांना परमार्थाची वाट दाखविणारे, सर्वार्थाने मार्गदर्शन करणारे, जनसामान्यांचे आध्यात्मिक जीवन उन्नत करणारे असे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जीवनकार्य ईश्वरी प्रेरणेनेच झाले असे दिसते. संतांचे चरित्र हे चित्त शुद्ध करणारे,स्थिर करणारे असे अलौकिक असते.

प.पू.ब्रह्मश्रीदत्तमहाराजांचे बृहत् चरित्र पण सध्या उपलब्ध असलेल्या चरित्रापेक्षा वेगळे असे निर्माण व्हावे, अशी इच्छा निर्माण झाली. मनाने संकल्प केला, पण एवढे मोठे कार्य कसे होणार, त्याची योजना काय करावी इ. विषयाचे चिंतन सुरु झाले. माझ्या मनातील हा चरित्र लेखनाचा विचार महान गुरुभक्त पू.दत्तमहाराजांचे सान्निध्य ज्यांना महाराजांच्या अखेरच्या क्षणापर्यंत लाभले असे अंतरंग शिष्य, पू.दत्तमहाराजांच्या आठवणीने त्या भावविश्वात रमून जातात व तो भाव ज्यांच्या नेत्रातून अश्रुद्वारा प्रकट होतो, असे आमचे डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख यांच्याशी बोललो. त्यांना ही कल्पना अत्यंत आवडली.

'आपण हे कार्य करु या, माझे पूर्ण सहकार्य राहील.' असे सांगीतल्यावर मला फार आनंद झाला. डॉ. देशमुखांप्रमाणेच गुरुभक्त नीलाताई जोशी(बोरिवली), गुरुभक्त डॉ.रा.ल.जोशी (सोलापूर), पंडित शरदराव जोशी (बार्शी), श्रीमती सुशीलाताई मोडक

(पुणे) यांच्याशी बोललो, सर्वांनाच ही कल्पना आवडली. मग सर्वांनी एक निवेदन योगतपस्वी प.पू.नारायणकाका ढेकणे महाराज (प्रधान विश्वस्त श्रीवासुदेव निवास) यांना देऊन प्रार्थना केली. पू.काका महाराजांनी याला मान्यता देऊन हे कार्य होण्याची अत्यंत आवश्यकता आहे असे सांगीतले. पू.दत्तमहाराज सर्वांना समजतील असे चरित्र व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

पू.नाराणकाका ढेकणे महाराज यांच्या अध्यक्षतेखाली श्रीसद्गुरु **'प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर समग्र चरित्र लेखन समिती'** गुरुवार दि.५.५.२००५ चैत्र व ३० प.प.श्रीनारायणस्वामी महाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी स्थापन झाली. सर्वानुमते या समितीचे कार्याध्यक्षपद पू. श्री मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर यांनी स्वीकारावे असे ठरले. कोषाध्यक्ष म्हणून विश्वस्त श्री. सुभाष दामले यांची नियुक्ती सर्वानुमते करण्यात आली. ज्येष्ठ व श्रेष्ठ विद्वान मंडळींचा या समितीत सदस्य म्हणून समावेश केला. संपूर्ण चरित्र संपादनाचे कार्य गुरुभक्त डॉ.वा.व्यं.देशमुख यांनी करावे असे ठरले व डॉक्टरांनी ते मान्य केले.

पू. श्रीनारायणकाका महाराजांनी या चरित्राचे जेवढे खंड होतील तेवढे तयार करा असे सांगून हे वासुदेव निवासाचे अधिकृत प्रकाशन असेल. समितीने पूर्ण पुस्तक तयार करुन श्रीवासुदेव निवासाला द्यावे असे सांगितले व या कार्याची सर्व सूत्रे कार्याध्यक्ष श्री मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर यांचेकडे सुपूर्त केली.

आम्हां सर्वांच्या प्रयत्नांना यश येऊन श्रीदत्तमहाराजांच्या चरित्राचा पहिला खंड 'मूर्तिमंत भागवत' २००८ या वर्षी श्रीदत्तमहाराजांच्या पुण्यतिथीच्या पर्वणीत प्रकाशित झाला. आतां दुसरा खंड 'उपायवनवसंत' हासुद्धां प्रकाशित होत आहे. यांच्याबरोबरच श्रीदत्तमहाराजांनी श्रीनिम्बार्काचार्यांच्या वेदांतपारिजातसौरभ या ग्रंथाचे भाषांतर व विवरणात्मक वेदांतपारिजातसौरभ या ग्रंथाची त्यांनी मांडलेली भूमिकेत श्रीदत्तमहाराजांनी भारतीय दर्शनांचा समावेशक आढावा घेऊन, सर्व दर्शनांचे सिद्धांत थोडक्यांत मांडलेले आहेत व शेवटी श्रीनिम्बार्काचार्यांच्या जीवन, कार्य आणि तत्त्वज्ञान यांचे संक्षिप्त विवेचन केले आहे. ही भूमिका 'श्रीनिम्बार्कदर्शन' या नांवाने आम्ही प्रकाशित करीत आहोंत. डॉ.शैलजा कात्रे पुणे विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्या प्रमुख यांची विद्वत्ताप्रचूर प्रस्तावना या ग्रंथाला लाभलेली आहे.

श्रीदत्तमहाराजांची कांही अप्रकाशित प्रवचने, ज्यांतून त्यांची जीवनदृष्टी आणि तत्त्वज्ञानाचे अभिव्यक्त होते तीही आम्ही आज 'श्रीदत्तवाक्सौरभ' या शीर्षकाखाली प्रकाशित करीत आहोंत. ह्यांतील एक प्रवचन बार्शी येथे श्रीशंकराचार्यांच्या १५००व्या जयंतीनिमित्त (१९८८) झाले होते. ते श्रीवासुदेवनिवासचे विश्वस्त पू.पं.शरद जोशी यांच्या सौजन्याने उपलब्ध झाले आहे. तसेच १९८१च्या पुणे येथील कौशिक व्याख्यानमालेत झालेली श्रीज्ञानदेव व दत्तसंप्रदाय या विषयांवरील प्रवचने श्रीवासुदेवनिवासच्या सौजन्याने उपलब्ध झाली आहेत. दोन प्रवचने बीडचे गुरुभक्त डॉ.दिलीप देशमुख यांच्याकडून मिळाली आहे.पुणे

येथे 'अनुग्रह' ह्या विषयावर श्रीदत्तमहाराजांच्या प्रवचनाच्या ध्वनिमुद्रिकेवरून शेवटचे प्रवचन केले आहे. ह्या सर्वांचे मी प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज समग्र चरित्र समितीतर्फे आणि वैयक्तिकही कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. श्रीदत्तमहाराजांचे विचार आणि उपदेश हे त्यांच्या चरित्राचेच अंगभूत आहेत या भूमिकेतून ही समिति हे वाङ्मय प्रकाशित करीत आहे. ते सर्व भक्त, साधक, अभ्यासक इत्यादींना आवडेल असा विश्वास वाटतो.

ईश्वर सेवा बुद्धीने, अत्यंत त्वरीत गतीने या चरित्राचे मुद्रण डी.टी.पी., छपाई , बायडिंग तसेच चरित्राचे मुखपृष्ठ इ. सर्व कामे श्री.प्रमोद पोटभरे व त्यांचे सहकारी यांनी अत्यंत आत्मीयतेने केले. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

तसेच चरित्र ग्रंथात छापलेली छायाचित्रे ज्या गुरुभक्तांनी उपलब्ध करुन दिली या सर्वांनी सद्गुरुंची सेवा या हेतुने हे सहकार्य केले. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करावी तेवढी थोडीच आहे.

अशा प्रकारे गेली ७ वर्षे समितीच्या अथक परिश्रमाचे फळ म्हणजे ,श्रीसद्गुरु प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे जन्मतिथीच्या पूर्वसंध्येला माघ कृष्ण ५ मंगळवार दिनांक २२ फेब्रुवारी,२०११ रोजी श्रीमद्जगद्गुरु शंकराचार्य प.प.श्रीकृष्णानंदतीर्थ स्वामी महाराज यांचे पवित्र करकमलाद्वारे तसेच योगतपस्वी प.पू.श्रीनारायणकाका ढेकणे महाराज यांचे अध्यक्षतेखाली **'श्रीनिम्बार्कदर्शन'** या ग्रंथाचे प्रकाशन पुण्यपावन क्षेत्री श्रीसद्गुरु प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर द्विवर्षीय जन्मशताब्दी महोत्सव सांगता समारंभ 'भरतनाट्य मंदिरात' संपन्न होत आहे ही एक सौभाग्याची साक्ष आहे.

विशेष म्हणजे संकल्पाप्रमाणे प.पू.श्रीनारायणकाका ढेकणे महाराजांच्या आशीर्वादाने प.पू.ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा जन्मशताब्दी महोत्सव आणि प.पू. योगीराज गुळवणीमहाराज यांच्या १२५ व्या जयंती महोत्सव या पावन कालखंडात हे प्रकाशन व्हावे अशी इच्छा होती. हा संकल्प श्रीगणेशदत्तसद्गुरु यांच्याकृपेने संपन्न झाला.

या चरित्र लेखन कार्यात ज्या ज्या भक्तांचे सहकार्य लाभले आहे, त्या सर्वांचा नामोल्लेख विस्तारभयास्तव करणे अशक्य आहे, पण त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करीत आहोत.


श्रीसद्गुरु प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे अनुग्रहित, भक्त, शिष्य इतरही जिज्ञासू सज्जनवर्ग यांचेकडून या चरित्र ग्रंथाचे वाचन व चिंतन नित्य घडत राहून त्यांना शाश्वत समाधानाचा लाभ होवो व स्वकर्तव्यतेचे समाधान श्रीवासुदेवनिवास ट्रस्टच्या विश्वस्तांना व चरित्रलेखन समितीला लाभो हीच सद्गुरुचरणी प्रार्थना.

श्रीसद्गुरुचरणरज

नागनाथतनय

**मोरेश्वर नागनाथ जोशी-चऱ्होलीकर**

माघ कृ ५ शके १९३२, मंगळवार २२ फेब्रुवारी, २०११



प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर

# प्रस्तावना

ब्रह्मस्वरूप प.पू.दत्तमहाराज कवीश्वर यांच्या विचारमंथनातून निर्माण झालेले दर्शनशास्त्रांच्या तत्त्वज्ञानाचा परिचय करून देणारे हे नवनीत भाविक आणि जिज्ञासू वाचकांना स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमाबद्दल प्रथमत:च मी या पुस्तकाच्या संपादक आणि प्रकाशक या उभयतांचे मन:पूर्वक आभार मानते. तसेच त्यांच्या या निर्णयाचे स्वागत करते. कारण यामुळे सर्वच तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांचा चांगला फायदा होणार आहे.

तत्त्वज्ञानक्षेत्रात संपूर्ण जगभर भारतीय तत्त्वज्ञानाचा आदराने उल्लेख केला जातो. उपनिषदे, ब्रह्मसूत्रे आणि श्रीमद्‌भगवद्‌गीता या प्रस्थानत्रयींनंतर दर्शनशास्त्रांचा, त्यामधील तत्त्वज्ञानाचा, ह्या तत्त्वज्ञानाचे प्रतिपादन करणाऱ्या आचार्यांचा अभ्यास हे भारतीय तत्त्वज्ञानातील प्रमुख अभ्यासविषय होत. या सर्वांचे साकल्याने आणि विद्वत्तापूर्ण विवेचन मराठी भाषेत एकत्रितपणे उपलब्ध करून देण्याचे महत्कार्य प.पू.दत्तमहाराजांच्या प्रस्तुत ग्रंथाद्वारे साकार होत आहे. तत्त्वज्ञानक्षेत्राबरोबरच अध्यात्मक्षेत्रातील मराठी भाविकांसाठी तर हा ग्रंथ म्हणजे दुग्धशर्करा-योगच म्हणावा लागेल. सर्व दर्शनांचे तत्त्वज्ञान आणि तेही मराठी भाषेत, शिवाय महाराजांच्या विदग्ध शैलीमधून या ग्रंथाद्वारे वाचकांसमोर येत आहे.

विश्वात्मक देवाचे दर्शन ज्या साधनांनी होते ती साधने म्हणजे दर्शन असे 'दर्शन' शब्दाचे विवेचन ग्रंथाच्या प्रारंभी प.पू.दत्तमहाराज करतात. यांनाच शास्त्र म्हणतात. 'हितं शास्तीति शास्त्रम्' या व्युत्पत्तीनुसार कोणतेही दर्शनशास्त्र हितोपदेशकच आहे, या दृष्टीने सर्वशास्त्रांचा मूलत: अत्यंत विरोध नसून समन्वयच आहे असे महाराज मानतात.

'आत्यंतिक दु:खनिवृत्ति' म्हणजेच मोक्ष. हा मोक्ष मिळविण्याची साधने म्हणजे निरनिराळ्या विचारी माणसांनी मानलेले विचारमार्ग यांनाच दर्शन

संज्ञा लाभली. प्रत्येक दर्शनकाराने आपणास अशी इष्ट त्या प्रमाणांचा अवलंब करून आपले विचार मांडल्यामुळे दर्शनांमध्ये भेद झालेला दिसून येतो, असे अत्यंत सोपे विवरण दर्शनभेदांबाबत महाराजांनी केले आहे.

आस्तिकदर्शने आणि नास्तिकदर्शने म्हणजे वेदाचे प्रामाण्य मानणारी व न मानणारी अशा दोन प्रमुख भागात दर्शनांची सर्वसाधारणपणे विभागणी केली जाते. सहा नास्तिक दर्शने आणि सहा आस्तिक दर्शने अशी प्रमुख बारा दर्शने याशिवाय, वेदान्त दर्शनात द्वैत, द्वैताद्वैत, विशिष्टाद्वैत, शुध्दाद्वैत, केवलाद्वैत आणि अद्वैत असे अवान्तर भेद आहेतच. या सर्वांचेच अध्ययन दर्शनशास्त्राच्या अभ्यासात आवश्यक असते. या दर्शनांचे तत्त्वज्ञान विशद करणारे अनेक ग्रंथ आज उपलब्ध आहेत. त्या त्या संप्रदायाच्या अभ्यासकांनी आपापली दर्शनपरंपरा ग्रंथाद्वारा समृध्द केली आहे. त्या संप्रदायांच्या भिन्न भिन्न तत्त्वज्ञानांमुळे प्रत्येक दर्शनाचा अभ्यास करताना विशिष्ट कष्ट घ्यावे लागतात मात्र या छोटेखानी ग्रंथामध्ये सर्वच दर्शनांची ओळख सोप्या पध्दतीने करून दिली असल्याने दर्शनशास्त्राच्या तत्त्वज्ञान प्रवेशासाठी हा ग्रंथ चांगलाच उपयुक्त ठरणार आहे.

यापूर्वी 'सर्वदर्शनसंग्रह' या ग्रंथामध्ये अशा प्रकारे सर्व दर्शनांचा विचार केला गेला आहे. पण हा ग्रंथ 'संस्कृत' भाषेत असल्यामुळे केवळ संस्कृत जाणणाऱ्यालाच तो उपयुक्त ठरतो. सर्वसामान्य जिज्ञासूंची ही अडचण लक्षात घेऊनच प.पू.दत्तमहाराजांनी मराठी भाषेतून जणू 'सर्वदर्शनसंग्रह'च साकारला आहे.

चार्वाकदर्शन, बौध्ददर्शन, जैनदर्शन, वैशेषिकदर्शन, मीमांसादर्शन, न्यायदर्शन, सांख्यदर्शन, योगदर्शन आणि वेदान्तदर्शन या ९ दर्शनांची ओळख करून देऊन या भिन्न भिन्न मतप्रणालींचा समन्वय करण्याचे महत्त्वाचे कार्य भगवान् बादरायणांनी केले आहे असे महाराज प्रतिपादितात. बादरायण व्यास हे वैदिक रहस्याचे उद्घाटक व हेच ब्रह्मसूत्राचे कर्ते. दुसरे कृष्णद्वैपायन व्यास

हे महाभारताचे कर्ते असे महाराज मानतात यासाठी त्यांनी पुराणातील मतांचा आधार घेतला आहे. २८ वेगवेगळे व्यास देवीपुराण सांगते. कृष्णद्वैपायन हे अठ्ठावीसावे व्यास असे प्रतिपादन करतानाच पुढील पानावर आचार्यांनी एकच व्यास अनेक शरीरे धारण करतात या पारंपारिक मतालाही पुष्टी दिली आहे.

नऊ दर्शनांचा थोडक्यात आढावा घेतल्यावर या दर्शनांमध्ये प्रामुख्याने चर्चिल्या गेलेल्या प्रमाणप्रमेयविचराबाबत तौलनिक व चिकित्सक अध्ययनात्मक विचार महाराजांनी मांडले आहेत. चार्वाक प्रत्यक्ष हे एकच प्रमाण मानतात तर बौध्द, जैन तसेच वैशेषिक प्रत्यक्ष व अनुमान ही दोन प्रमाणे मानतात. माध्वांनी प्रत्यक्ष प्रमाणाबरोबर शब्दप्रमाण मानले आहे. रामानुजांनी प्रत्यक्ष, अनुमान व शब्द अशी तीन प्रमाणे मानली. हीच प्रमाणे सांख्य व योगदर्शन स्वीकारतात. न्यायदर्शन प्रत्यक्ष, अनुमान, उपमान व शब्द अशी ४ प्रमाणे मानते. मीमांसा याशिवाय अर्थापत्ती व अनुपलाब्धि ही आणखी दोन प्रमाणे सांगते. पौराणिक मत या सहा प्रमाणांबरोबरच संभव व ऐतिहय अशी एकूण आठ प्रमाणे तानते तर याशिवाय चेष्टा हे नववे प्रमाण तंत्रशास्त्राकार मानतात.

प्रमाणांबाबत अशी निरनिराळी दर्शने वेगवेगळे विचार करतात हे सांगून दत्तमहाराज प्रत्यक्ष या एका प्रमाणापासून सुरुवात करून तंत्रशास्त्रातील ९ प्रमाणांचा उल्लेख करतात. प्रमाणांचे असे एका परिच्छेदात संक्षिप्त दिग्दर्शन करून प्रमेयविचाराकडे महाराज वळतात. थोडक्यात पण योग्य त्या उध्दरणांसह प्रमेयविचार महाराजांनी या ग्रंथात केला आहे. त्यानंतर जीवविचार व सृष्टयुत्पत्तिविषयक विचार मांडून निंबार्काचार्यांच्या द्वैताद्वैतसिध्दान्ताचे तौलनिक अध्ययन या विविध दर्शनांच्या पृष्ठभूमीवर महाराजांनी प्रस्तुत ग्रंथात केले आहे.

निंबार्काचार्यांच्या द्वैताद्वैतवाद किंवा भेदाभेदवाद हा महाराजांच्या मते अत्यंत वास्तविक असा सिध्दान्त आहे. जगताची उत्पत्ती स्थिती व लय

करणारे एक अद्वितीय ब्रह्म आहे असे निंबार्काचार्य सांगतात. जीव आणि जग हे ब्रह्माचे अंग व अंश आहेत. ब्रह्म हे सर्वाश्रयी आहे. जीवात्मा ब्रह्माच्याच चिदंशाचा एक प्रकार अशा प्रकारे निंबार्काचार्यांचा भेदाभेदवाद महाराजांनी सविस्तर स्पष्ट करून त्यांच्या तत्त्वज्ञानाची इतर दर्शनांबरोबर तुलना करून त्यांच्या विवरणातील वास्तवाद विशद केला आहे.

निंबार्काचार्यांचे ब्रह्मसूत्रभाष्यामधील श्रेष्ठत्व सांगतानाच त्यांचा साधनसिध्दान्त महाराजांनी स्मृतिग्रंथ व पुराणांमधील दाखले देत स्पष्ट केला आहे. निंबार्कपरंपरा विशद करताना त्यांनी उपासना व भक्तिमार्गाचे श्रेष्ठत्वही आपल्या ओघवती शैलीत स्पष्ट केले आहे.

आपल्या या विवरणाचे प्रयोजनही ग्रंथाच्या अखेरीस महाराजांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. 'भारतीय संस्कृतीच्या अनेक अंगांपैकी तत्त्वज्ञानाच्या काही भागाचे तसेच भक्तियोगाचे जे सांगोपांग विवेचन वैष्णवसंप्रदायामध्ये केले गेले आहे त्याचे अंशत: तरी खरे ज्ञान सत्प्रवृत्त जिज्ञासू वाचकांना व्हावे तसेच इतर दर्शनकारांचे विचार सामान्यत: समजावेत आणि याद्वारा भारतीय संस्कृतीचे दर्शन वाचकांना घडावे.' महाराजांचे हे प्रयोजन या ग्रंथाच्या वाचकांकडून निश्चितच सफल होईल याची मला खात्री वाटते.

वास्तविक प.पू. दत्तमहाराजांच्या विचारप्रवर्तक पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची माझी पात्रता नाही. तरीही कविकुलगुरू कालिदासाने म्हटल्याप्रमाणे 'तद्गुणै: कर्णमागत्य चापलाय प्रचोदिता' अशी माझी स्थिति झाली तरी माझ्या या धाडसाबद्दल वाचकांनी मला माफ करावे तसेच महाराजांनी आपली कृपादृष्टी माझ्यावर टाकावी हीच विनम्र प्रार्थना ! इति शम् !

**डॉ. शैलजा शशिकांत कात्रे**

विभागप्रमुख, संस्कृत प्राकृत भाषाविभाग

पत्ता - नीलकंठ अपार्टमेंटस्,

प्रभात रस्ता गल्ली क्र. ९/१, पुणे ४११ ००४

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।

# वेदांतपारिजातसौरभाची भूमिका

सत्यं ज्ञानमनन्तं सच्छक्त्येकं कारणं परम्।
वन्दे निरुपमं सूक्ष्मं श्रीदत्तं तमतीन्द्रियम्॥१॥

बृहदारण्यनिविष्टं विलुठितमाभीरवारनारीभिः।
सत्यचिदानन्दघनं ब्रह्म नराकारमालम्बे॥२॥

स्वभावतोऽपास्तसमस्तदोषमशेषकल्याणगुणैकराशिम्।
व्यूहाङ्गिनं ब्रह्म परं वरेण्यं ध्यायेम कृष्णं कलमेक्षणं हरिम्॥३॥

अङ्गे तु वामे वृषभानुजां मुदा विराजमानामनुरूपसौभगाम्।
सखीसहस्रैः परिषेवितां सदा स्मरेम देवीं सकलेष्टकामदाम्॥४॥

श्रीहंसं सनकादीन् देवर्षिं निम्बभास्करं च भजे।
कृपयैषां श्रीकृष्णे परमात्मनि नो भवतु भक्तिः॥५॥

## १. विषयोपक्रम

भगवान् पुरुषोत्तम श्रीवासुदेवाची कृति म्हणजे हें प्रमाणप्रमेयरूप संपूर्ण विश्व आहे हा विचार प्रायः सर्वही प्रेक्षावान् महापुरुषांना मान्य आहे. विश्वकर्ता श्रीवासुदेव आहे इतकेंच नाहीं तर विश्वाचा धर्ता-पालकही तोच आहे.

**'द्यौः सचन्द्रार्कनक्षत्रा खं दिशो भूर्महोदधिः।**
**वासुदेवस्य वीर्येण विधृतानि महात्मनः।'**

या श्लोकामध्यें भीष्माचार्यांनी हा विचार व्यक्त केला आहे. हा पालनकर्ता एखाद्या द्वारपालाप्रमाणे बाहेर मर्यादित जागेंतच राहाणारा नसून 'अन्तर्बहिश्च तत्सर्वं व्याप्य नारायणः स्थितः' यांत सांगितल्याप्रमाणे विश्वव्यापी आहे. म्हणूनच विष्णु या अन्वर्थ नांवानें त्याची प्रसिद्धि आहे. तो पालक व्यापक आहे तर त्याचें पाल्य असें हे प्रमाणप्रमेयात्मक विश्व काय आहे ? असा प्रश्न

उपस्थित होतो. याचें उत्तर '**विश्वं विष्णु**' या वाक्यानें भीष्माचार्यांनी सुचविलें आहे. तो नुसता पालकच नाही तर पाल्यहि तोच आहे. हाच महत्त्वाचा दुर्ज्ञेय सिद्धान्त, '**ईशावास्यमिदं सर्वमु**' '**सकलमिदमहं च वासुदेवः**' या वचनांनींही व्यक्त केलेला आहे. या सिद्धान्ताप्रमाणें सर्वच वासुदेव आहे हें ज्ञान होण्याकरितां अनेक जन्म प्रयत्न करावा लागतो, असा ज्ञानी महात्मा अत्यंत दुर्लभ आहे. तो या ज्ञानप्रभावानें मला येऊन मिळतो असें भगवान् श्रीकृष्णांनी '**बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते। वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः।**' या श्लोकांत स्पष्ट केलें आहे. हें ज्ञान जितकें महत्त्वाचे तितकेंच त्याचें फलही अत्यंत महत्त्वाचे आहे. '**निर्वैरः सर्वभूतेषु**' '**सर्वभूतहिते रताः**' '**विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः**' '**ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति**' '**तत्प्रसादात्परां शान्ति स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्**' इत्यादि वाक्यांनीं तें महत्त्वाचे ज्ञानफल सुचविलें आहे.

या विश्वात्मक देवाचें दर्शन ज्या साधनांनी होऊं शकते ती साधनें '**दर्शन**' या नांवांनीं प्रसिद्ध आहेत. यांनाच शास्त्र अशी दुसरी संज्ञा आहे. '**हितं शास्तीति शास्त्रम्**' या व्युत्पत्तीप्रमाणें; दर्शन-शास्त्र कोणतेंही घेतलें तरी तें हितोपदेशकच आहे. या दृष्टीनें, सर्व शास्त्रांचा मूलतः अत्यंत विरोध नसून त्यांचा समन्वयच आहे हें सिद्ध होतें. फक्त तशी दृष्टि बाळगून विचार झाला पाहिजे. एखाद्या दूरच्या खेडेगांवातून काशीला निघालेल्या माणसाला; बैलगाडी, मोटार, रेल्वे इत्यादि अनेक साधनें लागतील. रेल्वेही अनेक ठिकाणीं बदलावी लागेल. परंतु जाणारा मनुष्य; त्या अनेक साधनांचा उपयोग, परिस्थितीप्रमाणें करून घेऊन उद्दिष्ट स्थळीं निश्चित पोंचतो. याप्रमाणें विश्वात्म्याच्या विविध रूपांचें ज्ञान भिन्न प्रकारांनी करून देणारी सर्वही शास्त्रें उपकारकच मानणे न्याय्य ठरेल. राज्यामध्यें विविध खातीं असतात. त्या त्या खात्यांचे काम करणारे मंत्री तन्मयतेनें आपापल्या खात्यापुरतेंच काम पाहात असतात. तथापि तीं सर्व खातीं मिळून एकच राज्य असल्यानें त्या खात्यांचा

किंवा त्या मंत्र्यांचाही आत्यंतिक विरोध संभवत नाही. उलट समन्वयाची एकराज्यदृष्टि आंत बाळगूनच बाहेरून त्यांचें कार्य वेगवेगळे चालू असलेलें दिसतें.

विश्वांत दिसून येणाऱ्या चेतन व अचेतन अशा विभागांपैकी चेतनप्रधानदृष्टीनें जें विचारशास्त्र प्रवृत्त होतें त्याला दर्शन म्हणतात. आणि अचेतनप्रधानदृष्टीनें प्रवृत्त होणाऱ्या विचारशास्त्राला विज्ञान अशी परिभाषा आहे. सर्व प्राण्यांची प्रवृत्ति, दुःखनिवृत्ति व सुखप्राप्ति याकरितांच आहे, ही सर्वांची इच्छा पूर्ण व्हावी म्हणूनच वैज्ञानिकही आज प्रयत्न करीत आहेत. दार्शनिकहि चेतन आत्मतत्त्वाचा साक्षात्कार संपादून स्वतःचें व इतरांचेंहि जीवन सुखी करण्याचाच प्रयत्न करीत असतात. याप्रमाणें दोघांचा उद्देश एक असला तरी दोघांचे मार्ग भिन्न आहेत. दार्शनिक, मानसिक शक्तीच्या आधारावर आत्मतत्त्वापर्यंत जाऊन पोंचण्याचा प्रयत्न करतात आणि वैज्ञानिक, प्रयोगशक्तीच्या आधारावर विसंबून असतात. वैज्ञानिक सत्य जसें प्रयोगानें स्थूल दृष्टीलाहि गोचर होतें तसें मात्र दार्शनिक सत्य स्थूल आकारानें प्रत्यक्ष दिसत नाही. तथापि तत्त्वाचा निर्णय दर्शनानें होतो. त्यामुळें साधनांच्या द्वारानें आत्मोन्नति संपादन करतां येते आणि जीवन सुखमय बनवितां येतें. विज्ञान हें केवळ प्रयोगप्रधानच आहे. वैज्ञानिक प्रयोगाला अर्थबलाची आवश्यकता विशेष आहे. तर दार्शनिकाला मनोबलाची आवश्यकता आहे. विज्ञानाचा विकास भौतिक रूपानें आज सर्वांनाच उपलब्ध होत असल्यामुळें तिकडे प्रायः बहिर्वृत्ति समाजाची प्रवृत्ति अधिक असणें स्वाभाविक आहे. दार्शनिकानें, विशिष्ट मनःशक्ति संपादून तत्त्वसाक्षात्कार करून घेतल्यावर त्याचीं व तद्द्वारा चिरशांतीचीं जीं साधनें जगासमोर स्वानुभवानें मांडली असतील ती मात्र सर्वांना साध्य नसतात. त्यांचे फलहि विशिष्ट साधकालाच वानुभवगम्य असतें. तें विज्ञानफलाप्रमाणें सर्वगोचर होत नाही म्हणूनविज्ञानापेक्षां दर्शनाकडे सामान्य समाजाची प्रवृत्ति कमी असणें उचित आहे.

मुख्य विचारणीय विषय असा आहे कीं, सर्वांना इष्ट असणारी आत्यंतिक दुःखनिवृत्ति व पूर्णानंदप्राप्ति या फलांची सिद्धि, वैज्ञानिक सामर्थ्यानेंच केवळ होणें अशक्य आहे हें प्रायः सर्व विचारशील माणसांना आज पटलें आहे. कदाचित् भौतिक साधनांचा अभाव असतांनाहि मनुष्याचें जीवन शांतीनें चालूं शकतें. पण आध्यात्मिक सामर्थ्यावांचून मात्र जीवन अशांतिमय होत असलेलें आजही अनुभवास येत आहे. कोणताहि समाज किंवा राष्ट्र, आध्यात्मिक शक्तीशिवाय स्थिर राहूं शकत नाहीं. म्हणून दार्शनिकाच्या मार्गानें आत्मोन्नति करू घेणें यांतच जीवनाचें खरें साफल्य आहे. विज्ञान हें एक जीवनाचें गौण साधन आहे.

भारतवर्ष हें एकच राष्ट्र , अनादिकालापासून आध्यात्मिक प्रवृत्तीचें दिसून येतें. '**अध्यात्मविद्या विद्यानाम्**' अशा श्रेष्ठ अध्यात्मविद्येची आवड भारताच्या रोमारोमांतून भरलेली आहे. अध्यात्मविद्येचें प्रकाशन करणारे वेद हें भारताचें अविनाशी अमूल्य धन आहे; ज्या वेदामध्ये संपूर्ण विश्वाचें ज्ञान भरलेलें आहे. भारतीय श्रौतदर्शनकार वेदांची उत्पत्ति व नाश कधींच मानत नाहींत तर त्यांचा कालपरत्वें आविर्भाव व तिरोभाव मानतात. ज्याप्रमाणें रेडिओमधून आपल्याला दूरचा शब्द ऐकूं येतो त्याप्रमाणें सृष्टीच्या आरंभी तपःपूत [१] अशा महर्षींच्या अंतःकरणांत या वेदज्ञानाचा आविर्भाव ईशकृपेनें झाला. म्हणून त्या ऋषींना मंत्रद्रष्टे म्हणतात. कोणत्याच पदार्थाचा तत्त्वतः नाश होत नसून रूपांतर होतें हे मत आजच्या विज्ञानयुगांतही मान्य आहे. वैदिक महर्षींनीं तर हा सिद्धान्त हजारों वर्षांपूर्वींच व्यक्त करून ठेवला आहे. प्राकृतिक वस्तूचाही नाश वैदिक ऋषींच्या मतानें नसून फक्त रूपान्तर-परिणामच

[१] *तै. आ. (२.९):- 'अजानन् ह वै पृश्नीन् तपस्यमानान् ब्रह्म स्वयंभू अभ्यानर्षत् त ऋषयोऽभवेन् तदृषीणामृषित्वम्' (निरुक्त २.११)*

त्यांच्या मतें आहे. हें [१] **'सूर्याचन्द्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत्'** या वचनावरून सिद्ध होतें. संपूर्ण विश्वाचा आविर्भाव व तिरोभाव ईश्वराच्या इच्छाशक्तीनें नेहेमीं चालू आहे. याप्रमाणें, महर्षींच्या पवित्र अंतःकरणांत वेदज्ञानाचाही आविर्भाव ईश्वरेच्छेनें सृष्टीच्या आरंभीं झालेला आहे. वेद संपूर्ण दिव्य ज्ञानमय आहे. पण त्यांतही वेदांचा शिरोभाग अशा उपनिषदांमध्यें ज्ञानाचा पूर्ण विकास झालेला आहे. विश्वांतील सर्व मानवसमाजाला नवचेतना देऊन आत्यंतिक शांतीच्या मार्गाकडे नेण्यास समर्थ, फक्त उपनिषदांतील सिद्धान्तच आहेत. वेदामध्यें, कर्म, उपासना व ज्ञान अशीं तीन कांडें आहेत. तसेंच मंत्र व ब्राह्मण असे वेदाचे दोन भाग आहेत. यज्ञादि कर्मांतील देवतादिप्रकाशक मंत्रभाग म्हणजे संहिता. आणि अंगप्रधानविधिबोधक भाग म्हणजे ब्राह्मण. या ब्राह्मणभागांत कर्मकांडाचें विवेचन अधिकांशानें आहे. ब्राह्मणाचाच एक भाग आरण्यक म्हणून आहे. यांतच उपनिषदांचा अंतर्भाव झालेला आहे. उपनिषत् शब्दाचा मूळ अर्थ ब्रह्मविद्या असा आहे. **'षद्लृ विशरणगत्यवसादनेषु'** या धातुपाठाप्रमाणें सद् धातूचे अर्थ तीन- शिथिल करणें, गति व नाश. 'उप नि सादयति इत्युपनिषत्' विरुद्ध वासना शिथिल करणारी, ब्रह्माच्या समीप पोंचविणारी, विरोधि अविद्येचा नाश करणारी अशी ब्रह्मविद्या तीन अर्थांनें उपनिषत् ठरते. अशी ब्रह्मविद्या सांगणारे जे ग्रंथ त्यांनाही उपनिषत् अशी औपचारिक संज्ञा आहे. व्यवहारांत उपनिषत् शब्दाचा अर्थ ग्रंथ असाच आहे. हा वेदाचा रहस्यबोधक अंतिम भाग असल्यानें यांना वेदान्त [२] असेंहि म्हणतात. हे ग्रंथ, सरल, सुबोध भाषेनें गंभीरतत्त्वाचें प्रतिपादन करीत असून अध्यात्मविद्याप्रकाशक सर्वदर्शनांना आधार आहेत.

भारतीय प्राचीन महर्षींनीं प्रथम स्ववर्णाश्रमधर्मानुष्ठान, तप, इंद्रियसंयम, श्रद्धा, ईश्वरप्रेम, गुरुनिष्ठा इत्यादि साधनांचें पालन कटाक्षानें करून,

---

[१] *ऋ. १०-१९०.३*

[२] *मुण्डक ३.२.६ वेदान्तविज्ञानसुनिश्चतार्थाः श्वे ६.२२ वेदान्ते परमं गुह्यम्*

अंतःकरणशुद्धि करून घेतली. जिचें यथार्थ स्वरूप, '**सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखमाप्नुयात्**' अशा त्यांच्या परमोच्च, पवित्र संकल्पावरूनच कळून येणारें आहे. केवळ राष्ट्रभावनासुद्धां या उदात्त भावनेपुढें संकुचित ठरेल. ही झाली ऋषींच्या अंतःकरणाची पावित्र्यद्योतक असीम ***सद्वासनाशक्ति***. दुसरी, ***मेधा***, धारणाशक्ति. प्रत्येक दर्शनाचे, सूत्रकार, भाष्यकार, वार्तिककार यांची मेधाशक्ति किती अप्रतिम आहे हें त्यांच्या ग्रंथांचे आलोकन केल्यानेंच कळून येणारें आहे. '**मधुसूदनसरस्वत्याः पारं वेत्ति सरस्वती**' अशा अधिकाराचे, अद्वैतसिद्धिकार, सर्वतंत्रस्वतंत्र, श्रीमधुसूदनसरस्वती; प्रसंगानें मीमांसाभाष्यकार श्रीशबरस्वामींबद्दल एका ठिकाणीं लिहितात- '**सहस्रशाखाः अर्थतोऽपि वेत्ति शबरस्वामीत्यैतिह्यम्**' - वेदांतील एकदोन नव्हे तर सहस्र शाखांच्या अर्थासह शब्दानुपूर्वीचें ज्ञान शबरस्वामींना आहें अशी प्रसिद्धि आहे. तिसरी **प्रतिभाशक्ति** - या शक्तीची कांहीं कल्पना येण्याकरितां प्राचीन ग्रंथकारांचे आत्मविश्वासद्योतक ोक असे आहेत- तर्क -कर्कशबुद्धिशालि, बौद्धांचेंहि खंडन करून ईश्वरतत्त्वाची सिद्धि करणारे, आणि, '**ऐश्वर्यमदमत्तः सन् मामवज्ञाय वर्तसे। पुनर्बौद्धे समायाते मदधीना तव स्थितिः**' असें, आपल्या बुद्धीच्या जोरावर श्रीजगन्नाथालाहि खडसावणारे श्रीमान् उदयनाचार्य स्वतःबद्दल लिहितात- 'वयमिह पदविद्यां तर्कमान्वीक्षिकों वा, यदि पथि विपथे वा स्थापयामः स पन्थाः। उदयति दिशि यस्यां भानुमान् सैव पूर्वा, नहि तरणिरुदीते दिक्पराधीनवृत्तिः' - आम्ही, व्याकरण, न्याय इत्यादि शास्त्रविचारांचे, बरे वाईट जें मार्ग ठरवूं तेच सर्व लोकांनी ग्राह्य मानले पाहिजेत. सूर्य जिकडे उदयास येईल तीच सर्वांनी पूर्व समजली पाहिजे लोकांची पूर्व कोणती आहे ती समजून घेऊन कांहीं सूर्य उदयास येत नाहीं. केवढा हा स्वतःच्या बुद्धीबद्दल दुर्दम्य विश्वास! असेच तार्किकशिरोमणींचे उद्गार आहेत ते असे - '**विदुषां निवहैरिहैकमत्याद्यददुष्टं निरटंकि यच्च दुष्टम्। मयि जल्पति**

**कल्पनाधिनाथे रघुनाथे मनुतां तदन्यथैव**'-विद्वानांच्या अनेक मंडळींनीं, एकमतानें जो विषय अदुष्ट ठरविला किंवा दुष्ट ठरविला असेल तो विषय, कल्पनेचा स्वामी मी रघुनाथ बोलूं लागलों असतां निराळाच ठरेल असे सर्वांनी समजावें. म्हणजे सर्वमतानें दुष्ट ठरलेला मी दुष्ट ठरवीन आणि सर्वांनी दुष्ट ठरविलेला मी अदुष्ट ठरवीन. अशा अप्रतिहत प्रतिभाशक्तीचे राजदूत ज्या राष्ट्राला लाभतील तें राष्ट्र आपल्या सर्व आकांक्षा सर्वांना लीलेनें मान्य करण्यास लावील यांत शंका नाहीं. पण ही बुद्धीची प्रतिभाशक्ति तिसरी आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. याच्या अगोदर पावित्र्यशक्ति व धारणाशक्ति या दोन बुद्धिशक्तींचा पूर्ण विकास करून घेणें आवश्यक आहे. वरीलोकांवरून प्राचीन शास्त्रज्ञांच्या प्रतिभाशक्तीची सामान्य कल्पना येण्यासारखी आहे. त्या शक्तीचा पूर्ण साक्षात्कार मात्र, त्यांच्याशीं समानधर्म असणाऱ्या पुरुषालाच होणें शक्य आहे, इतरांना नाहीं. चौथी फलभूत **समत्वशक्ति** - जिचें स्वरूप; '**समोऽहं सर्वभूतेषु**' '**समत्वं योग उच्यते**' '**बुद्धेः फलमनाग्रहः**' '**निर्वैरः सर्वभूतेषु**' '**राखावीं बहुतांचीं अंतरें**' '**कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वरपूजनाचें**' इत्यादि अनेक वाक्यांतून व्यक्त केलें गेलें आहे. ही शक्ति फार मोठी असून ती पूर्णताद्योतक आहे. प्रथम, या शक्तीचें स्वरूप काय आहे तें पाहूं. समत्वशक्ति म्हणजे समत्वदर्शनशक्ति असा येथें अर्थ विवक्षित आहे. बुद्धीनें सर्वत्र होणारें जें समत्वदर्शन, हीच मोठी शक्ति आहे. हें समत्वदर्शन यथार्थ असेल तरच तें उपादेय व वर्णनीय ठरेल. 'ऋतम्भरा[१] प्रज्ञा' ही असामान्य आहे. तशी प्रज्ञा कदाचित् असली तरी, संशयविपर्यासादि दोषामुळें तिचें स्वरूप तिरोहित होण्याचाही संभव आहे. म्हणून तिचें परीक्षण होऊन प्रामाण्य निश्चित होण्याकरितां इतर प्रमाणांचा संवाद अपेक्षित असतो. शास्त्रप्रतीति व गुरुप्रतीति यांच्याशीं संधान असणारी आत्मप्रतीतीच, निश्चित प्रामाण्य धारण

---

[१] *यो.सू. १.४८*

करणारी ठरते. यापैकीं शास्त्रप्रतीति म्हणजे शास्त्रतात्पर्यप्रतीति व गुरुप्रतीति म्हणजे शास्त्रतात्पर्यज्ञप्रतीति. या दोनींचाही संवाद, संस्कृतात्मप्रतीतीला आवश्यक आहे. संस्कृतात्मप्रतीतिसहकृत शास्त्रप्रतीति किंवा गुरुप्रतीति अविच्छिन्न चालू राहणें हाच संप्रदायशब्दार्थ होईल. असे संप्रदाय प्राचीन शास्त्राप्रमाणें आधुनिक शास्त्रामध्येंही चालू असलेले दृष्टीस पडतात. ते संप्रदाय कोठें प्रत्यक्ष अध्ययन-अध्यापन रूपानें असतील तर कोठें ग्रंथादि रूपानेंही असतील. प्राचीन शास्त्रसंप्रदाय प्रायः अध्ययन-अध्यापन रूपानेंच पूर्वींपासून चालू आहेत. यामध्यें विशेष असा आहे कीं, गुरुप्रतीति किंवा शास्त्रज्ञप्रतीति ही संस्कृतात्म्यांच्या प्रतीतिशुद्धीला उभयरूपानें वेळोवेळीं उपयोगी पडणारी आहे.

ग्रंथादिरूपसंप्रदायामध्यें प्रत्यक्ष बुद्धिसंवाद लाभत नसल्यानें भ्रांतिप्रमादादि दोष शिल्लक राहण्याचा संभव असतो. हें संप्रदायवैशिष्ट्य लक्षांत आणूनच, चतुरधिकशतप्रबंधनिर्माता म्हणून प्रसिद्ध असणारे श्रीअप्पय्य दीक्षित सिद्धान्तलेशसंग्रहग्रंथांत शेवटीं लिहितात कीं - '**सिद्धान्तरीतिषु मया भ्रमदूषितेन स्यादन्यथापि लिखितं यदि किंचिदस्य। संशोधने सहृदयाः सदया भवन्तु सत्संप्रदायपरिशीलननिर्विशंकाः**' यांतील '**सत्संप्रदायपरिशीलन-निर्विशंकाः**' हे हेतुगर्भ विशेषण लक्षांत ठेवण्यासारखें आहे. संशोधनाचे खरे अधिकारी स्वयं निर्विशंक असावे लागतात. आणि ती निर्विशंकता, सत्संप्रदायाच्या परिशीलनानेंच लाभते' असा श्रीअप्पय्यदीक्षितासारख्यांचा दृढ विश्वास आहे. 'मुनिर्न व्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमाः' या वाक्यानें, श्रीमदाचार्यही संप्रदायाचें महत्त्व व्यक्त करीत आहेत. असे अनेक संप्रदाय प्राचीन दर्शनांचे चालत आलेले आहेत. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा व वेदान्त हे सहा दर्शनसंप्रदाय भारतवर्षांत प्रसिद्ध आहेत. वेदान्तामध्येंही द्वैत, द्वैताद्वैत, शुद्धाद्वैत, विशिष्टाद्वैत, कैवलाद्वैत असे संप्रदाय चालू आहेत. या सर्वांमध्यें समत्वदर्शन होणें ही बुद्धीची फार

मोठी अंतिम शक्ति आहे. बुद्धिविकास येथें संपतो. समत्वदर्शनानेंच पूर्णशांतीचा लाभ होतो, हें; **'सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलानिति शान्त उपासीत।'** या उपनिषद्वाक्यानें सुविलें आहे. उपासना ही शान्त राहून करावी असें येथें सांगितलें आहे आणि ती शांति राहण्याकरितां **'सर्वं खल्विदं ब्रह्म'** ही समवृत्ति उपयोगी पडते. यावरून असें अनुमान निघतें कीं, **'यत्र समत्वदर्शनं, तत्र शान्तिः, यत्र शांतिर्नास्ति तत्र समत्वदर्शनं नास्ति'** म्हणजे विश्वामध्ये दिसणाऱ्या अशांतीला प्रयोजक, समत्वदर्शनाभावच मानावा लागतो. म्हणूनच समदर्शी भगवद्भक्तांचा उल्लेख; **'सन्तुष्टः सततं योगी' 'उदासीनो गतव्यथः' 'सन्तुष्टो येन केनचित्' 'अनिकेतः स्थिरमतिः'** इत्यादि वाक्यांनीं, श्रीभगवान् करीत आहेत.

'निर्दोषं हि समं ब्रह्म' या वाक्याप्रमाणें सर्व विश्वांत सम अशा ब्रह्माचें दर्शन, हें मुख्य समत्वदर्शन आहे. **'शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः'** या वाक्यामध्यें समदर्शी पुरुषांचें महत्त्व दाखविलें आहे. हें समदर्शन यथार्थ आहे. कारण, याबद्दल शास्त्रप्रतीति, गुरुप्रतीति व संस्कृतात्मप्रतीति या तीनही प्रतीतींचा संवाद आहे. केवळ चर्मचक्षूनें होणारे, नामरूपात्मक विश्वाचें समत्वदर्शन, ही भ्रान्ति आहे. आणि तें सुखपर्यवसायी व्यवहारास अनुपयुक्तही आहे. राष्ट्रभेद, प्रांतभेद, मानवभेद, कालभेद, कारणभेद, कार्यभेद, मतिभेद, रुचिभेद इत्यादि भेद, व्यवहारांत अनादिकालापासून रूढ असतांना या सर्व ठिकाणीं आपाततः होणारें समत्वदर्शन कसें उपयुक्त ठरेल? व यथार्थ ठरेल? सर्व राष्ट्रें, सर्व मानव एकच आहेत. ही मारून मुटकून बनविलेली समत्वबुद्धि प्रमाण मानून, एखाद्या राष्ट्रनेत्यानें, आपल्या राष्ट्रांतील धनधान्यादि सर्व शत्रुराष्ट्राला देण्याचें ठरविलें तर तें व्यवहार्य ठरेल काय? महाभारतांत, अजातशत्रु म्हणून वर्णिलेल्या धर्मराजाला देखील, एके दिवशी, संपूर्ण पांडवसैन्य द्रोणाचार्यांच्या क्रोधाग्नीमध्यें दग्ध होऊन जाण्याचा प्रसंग ओढवलेला पाहून, द्रोणाचार्यांचा युद्धावेश समूल नाहींसा

करण्याकरितां, त्यांच्याजवळ '**अश्वत्थामा हतः**' अशी साक्ष देण्याचा प्रसंग आला होता. आपली एकरूप सत्यमति तो टिकवूं शकला नाही. त्याला, व्यावहारिक हिताकरितां मतिभेद मान्य करणें भाग पडलें. अनेकजन्मसंसिद्ध महापुरुषच स्थितप्रज्ञ असूं शकतो. तोच एक सर्वभेदातीत असूं शकतो. हाच उपनिषदांत वर्णिलेला मुख्य ब्राह्मण होय.

'**तस्माद्ब्राह्मणः पाण्डित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत् । बाल्यं च पाण्डित्यं च निर्विद्याथ मुनिः। अमौनं च मौनं च निर्विद्याथ ब्राह्मणः**'।[१] या बृहदारण्यकोपनिषदांतील वाक्यानें, ब्राह्मी भूमिकेवर आरूढ होणाऱ्या मुख्य ब्राह्मणाचें श्रेष्ठत्व दाखविलें आहे. जो जगांत सर्वदा अजातशत्रु असूं शकतो अशा समदर्शी मुख्य ब्राह्मणाबद्दल, धम्मपदांतील ब्राह्मणवग्गो या भागांत श्रीतथागतांनींही गौरवोद्गार काढले आहेत. तो भाग असा - '**वीतदरं विसञ्जुत्तं तमहं ब्रूमि ब्राह्मणम्। वाहितपापोतिब्राह्मणोयन्मि सच्चञ्चवम्मो च सोसुची सोच ब्राह्मणो। झायंतं तमहं ब्रूमि ब्राह्मणं। अकिंचनं अनादानं समहं ब्रूमि ब्राह्मणं। अक्कोनं वतवंतं अनुस्सयं, दंतं, अंतिशरीरं तमहं ब्रूमि ब्राह्मणं। गंभीरपज्ञं मेधावि मग्गामग्गस्स कोविद। उत्तमत्थं अंनुप्पत्तं तमहं ब्रूमि ब्राह्मणं। योघ पुण्यं च पापं च उभोसंगं उपच्चगा। असोकं विरजं सुद्धं तमह ब्रूमि ब्राह्मणं। न ब्राह्मणस्य पहरेय्य नास्य मुंच्चेथ ब्राह्मणो**' - याचा सारांश - निर्भय, अनासक्त, पापरहित, सत्य व धर्म यांनी युक्त, पवित्र, तपस्यारत, अक्रोधी, व्रती, शीलवान, बहुश्रुत, संयमी, गंभीर, प्रज्ञावान्, मेधावी, मार्ग व अमार्ग यांचा ज्ञाता, शुद्धचारित्र्यसंपन्न अशालाच मी ब्राह्मण म्हणतों. अशा ब्राह्मणावर कोणीही प्रहार करूं नये - आणि ब्राह्मणानेंही पण प्रहार करणाऱ्यावर कोप करूं नये - याप्रमाणें समदर्शी, भेदातीत, उपनिषत्प्रतिपाद्य मुख्य ब्राह्मणाबद्दल बुद्धांनींही मनापासून मान्यता दर्शविली

---

[१] *स ब्राह्मणः केन स्यात्। येन स्यात् तेन ईदृश एव। तात्पर्य येनकेन ब्राह्मणः स्यात्।*

आहे. तात्पर्य असें कीं, '**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति। भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया।।**' या भगवद्वचनास अनुसरून, सर्वांतर्यामी परमात्मा एक आहे हें समत्वदर्शन यथार्थ आहे. नामरूपात्मक विश्व हें भिन्नच आहे. त्रिगुणपरिणाम अशा विश्वाचें स्वरूप ते असेपर्यंत विषमच राहाणार. गुणांची समान स्थिति म्हणजे प्रलयावस्था आणि विषमावस्था म्हणजे विश्वाविर्भाव असें सांख्यशास्त्रकार सांगतात. '**भेदानां परिणामात् समन्वयात् शक्तितः प्रवृत्तेश्च। कारणकार्यविभागादविभागाद्वैश्वरूप्यस्य। कारणमस्त्यव्यक्तम्**' याप्रमाणें, त्रिगुणात्मक विश्वकारण प्रकृतीची सिद्धि करून, सांख्यकारिकाकार ईश्वरकृष्ण पुढें लिहितात - '**प्रवर्तते त्रिगुणतः समुदयाच्च। परिणामतः सलिलवत्प्रतिप्रतिगुणाश्रयविशेषात्**' येथें त्या प्रकृतीची परिणामरूप प्रवृत्ति, ईश्वरकृष्णांनी दोन प्रकारची दाखविली आहे. एक समुदयाने होणारी प्रवृत्ति व दुसरी त्रिगुणरूपानें होणारी प्रवृत्ति. समुदय म्हणजे उत्कर्ष. एका गुणाचा उत्कर्ष असतांना अर्थातच इतर गुणांचा अपकर्ष असणार. म्हणजे गुणांचा न्यूनाधिकभाव - विषमता ही प्रवृत्ति सृष्टिकालांत आहे. दुसरी त्रिगुणतः प्रवृत्ति म्हणजे तीनही गुण आपापल्या समरूपांतच राहातात. त्यांच्यामध्ये न्यूनाधिकता राहात नाही हाही एक प्रकृतीचा परिणामच आहे. हा होणें म्हणजे सृष्टि संपणे असा अभिप्राय आहे. म्हणजे सृष्टी असेपर्यंत साम्य असूंच शकत नाहीं. अशावेळीं होणारें समत्वदर्शन यथार्थ कसें ठरणार? याप्रमाणें विचार केला असतां निष्कर्ष निघतो कीं - चेतन, अचेतन विश्वात्मक द्वैत हेंही खरें आहे. त्या परमात्म्याच्या स्वाधीन, द्वैतात्मक विश्वाची स्थिति व प्रवृत्ति आहे म्हणून तें परमात्म्याशीं अभिन्न आहे असें '**सर्वं खल्विदं ब्रह्म**' इत्यादि वाक्यांनी वर्णिलेले आहे. म्हणजे अभिन्नत्व औपचारिक आहे. असें हें द्वैताद्वैतदर्शन, सुदर्शनावतार श्रीनिंबार्काचार्यांनी, ब्रह्मसूत्रावरील वेदान्तपारिजातसौरभ नांवाच्या स्वकृत भाष्यांतून मांडले आहे ज्याचें, मराठी भाषांतरासह प्रकाशन, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे आज केलें जात आहे.

वेदान्तदर्शनांतील विविध संप्रदायांपैकीं हा एक संप्रदाय असून तो प्रामाणिक मानण्यास प्रत्यवाय नाही. विविधरूपानें द्वैत जर भासत आहे तर तो भास असेपर्यंत तें खरें कां मानू नये? तो भासच जेव्हां बंद होईल तेव्हां द्वैत, अद्वैत सर्वच सापेक्ष विचार आपोआपच बंद पडतील. पण आज तरी विचारावस्थेंत 'द्वैताद्वैतदर्शन' हे प्रामाणिक सर्वांना पटणारें असें आहे यांत शंका नाहीं. या दर्शनांतील सिद्धान्ताचें विवरण पुढें करावयाचें आहे. आतां या उपक्रमांत फक्त याची उपयुक्तता थोडीशी दाखविली आहे. विश्व हें स्वभावानें भिन्न असलें तरी परमात्म्याच्या नियामकत्वाखाली तें निरंतर राहात असल्यामुळें तें त्याच्याशीं अभिन्नही आहे. याप्रमाणें विश्व व परमात्मा यांचा भेदाभेद संबंध, श्रीनिंबार्काचार्यांनी मानलेला आहे. ईश्वर व विश्व यांच्यामध्यें अत्यंत भेद मानला तर, भेदप्रधान दृष्टीनें आज सर्वही विश्वांत दिसून येणारी भयानक कटुता शान्त होणें कठिण आहे. समस्त कल्याण गुणांची खाण, अनंत शक्तिसंपन्न परमात्म्याशीं त्याचा अभेदही आहे ही दृष्टि बाणल्यास, व त्या सर्व नियामक परमेश्वराविषयीं पूर्ण प्रेम अंतःकरणांत निर्माण झाल्यास '**भूतां परस्परे पडो। मैत्र जीवाचें**' ही ज्ञानेश्वरांची सर्वमान्य आकांक्षा पूर्ण होणें शक्य आहे. दर्शनाची विवेचनपद्धति भिन्न भिन्न आहे. न्याय, वैशेषिक, सांख्य, मीमांसा हीं दर्शनें प्रवृत्तिपर आहेत. चार्वाकदर्शन तर पूर्णतया प्रवृत्तिप्रधानच आहे. बौद्ध, जैन, योग ही दर्शनें निवृत्तिपर आहेत. वेदान्तदर्शनच काय तें एक प्रवृत्ति व निवृत्तींचा समन्वय करणारें आहे. विश्वांत वाढणाऱ्या दौर्मनस्याचें निर्मूलन होण्याकरिता, केवळ सर्वसंगपरित्यागपूर्वक भिक्षू होऊन जंगलांत जाणेचा बौद्धांचा उपदेशहि उपयोगी पडणार नाहीं आणि सर्वसामान्य जनांना विश्व मिथ्या आहे हा तात्त्विक उपदेशहि झेपणार नाहीं. त्याकरितां सर्वांतर्यामी पुरुषोत्तमाचा भक्तियोगच एक उत्कृष्ट साधन आहे. '**अमृतस्य पुत्राः**' या उक्तीप्रमाणें आपण सर्वहि एकाच मंगलमय अनंतशक्तिसंपन्न परमात्म्याचे संबंधी आहोंत. आपलें सर्वांचें कुटुंब एकच आहे. याकरितां '**एकमेकां साह्य करूं। अवघे धरूं सुपंथ**' ही भावना

नित्य बाळगून ईश्वरसमत्वयोगानेंच विश्वामध्यें शांति निर्माण होणें शक्य आहे. श्रीनिंबार्काचार्यांच्या या प्रेमाच्या सिद्धान्तांतच जगाचें हित सांठविलें आहे म्हणून जगाच्या व्यावहारिक सिद्धान्ताला हें दर्शन अत्यंत उपयुक्त आहे. ग्रीक भाषेंत फिलासफी [१] शब्द, ज्ञान व प्रेम अशा दोनी अर्थानें वापरला जातो. श्रीनिंबार्काचार्यांची ही फिलासफी - द्वैताद्वैत दर्शन, या दोन अर्थांना द्योतित करणारें आहे. याप्रमाणे सर्वसामान्य जनांनाही पटणारें व शांतीचें साधन अशा या श्रीनिंबार्काचार्यांच्या दर्शनाचें व्यवस्थित ज्ञान महाराष्ट्रीय जनतेला व्हावें आणि यांतील प्रेममय सिद्धान्त सर्वांनी आत्मसात् करावा याच सदिच्छेनें मराठी भाषांतरासह या दर्शनाचें प्रकाशन विद्यापीठातर्फे केलें जात आहे. याचें साफल्य सुबुद्ध जिज्ञासूकडून केलें जावें हीच त्या सर्वान्तर्यामी पुरुषोत्तमाजवळ प्रार्थना आहे.

## २. दर्शनांचें सामान्य स्वरूप

जगामध्यें सर्वही प्राण्यांची इच्छा आपणांस कोणतेंही दुःख राहूं नये व आपण पूर्ण सुखी व्हावें अशी दिसून येते. पण सुख, दुःख आणि त्यांचीं साधनें यांचे ज्ञान व्यवस्थित झाल्याशिवाय तसा प्रयत्न, फलपर्यवसायी होणारा असा, करतां येणार नाही. सुखाचें किंवा दुःखाचें साधन अमुकच आहे हें ठरविणें कठिण आहे. उन्हाळ्यामध्यें गार पाण्यानें सुख होतें पण तेंच हिंवाळ्यांत दुःखदायक होतें. उंटाला बाभळीचे कांटे खाण्यानें सुख होतें, पण इतरांना तें दुःखद-त्याज्य ठरतें. यामुळें अमुक दुःखाचीं साधनें व अमुक सुखाचीं साधनें असा निर्णयच होणें कठिण आहे. याबद्दल अभियुक्तांचे वचन प्रसिद्ध आहे - '**वस्तुतस्तदनिर्देश्यं न हि वस्तु व्यवस्थितम्। कामिनीकनकेभ्योऽपि न सुखं शान्तचेतसाम्॥**' सर्वांनाही सुखाकरितां अपेक्षित असणाऱ्या कामिनी, कनक या वस्तूंपासून देखील शान्त, निर्वासन अन्तःकरणाच्या महापुरुषांना

[१] *Philo* = प्रेम, *sophi* = ज्ञान, *Philosophy* = ज्ञानाचें प्रेम

सुख भासत नाही. तसेंच, दुःखाचीं साधनें म्हणजे अप्रिय वस्तु अनेक असल्यामुळें एका अप्रिय वस्तूचा परिहार केला तरी दुसऱ्या तशा वस्तु राहिल्यामुळें दुःखाचा पूर्ण परिहार करणें अशक्य कोटींतलेंच ठरतें. या करितां भोग्य - सुखदुःखसाधन म्हणून समजल्या जाणाऱ्या, पदार्थांचे मूळ स्वरूप काय आहे ही जिज्ञासा उत्पन्न होते. त्याबरोबरच भोक्ता - सुखी, दुःखी होत राहणारा जो चेतन आत्मा, त्याचेंही खरें स्वरूप काय आहे हीही जिज्ञासा स्वाभाविकच उत्पन्न होते. म्हणजे भोक्ता व भोग्य - चेतन व अचेतन यांचें मूल स्वरूप काय आहे हें ज्ञान म्हणजेच तत्त्वज्ञान जेव्हां होईल तेव्हांच खरा योग्य प्रयत्न होऊन पूर्ण दुःखनिवृत्ति होणें शक्य आहे. आत्यंतिक दुःखनिवृत्ति - पूर्ण दुःखनिवृत्ति, म्हणजेच मोक्ष. त्याचें साधन वरील जें तत्त्वज्ञान त्यासंबंधीं जे विचारमार्ग निरनिराळ्या विचारी माणसांनीं दाखविले आहेत त्यांनाच दर्शन अशी संज्ञा आहे. दर्शनकारांनीं, आपणांस इष्ट त्या प्रमाणांचा अवलंब करून आपले विचार मांडलेले असल्यामुळें दर्शनांचा भेद झालेला दिसतो. दर्शनामध्यें आस्तिकदर्शन व नास्तिकदर्शन असे दोन भेद ग्रंथकारांनीं दाखविले आहेत. त्यापैकीं नास्तिक दर्शनें सहा व आस्तिक दर्शनें सहा असे एकंदर बारा प्रकार दर्शनामध्ये दिसतात. त्यांचे अवांतर भेद पाहिले तर ही संख्या अधिक होईल. चार्वाक, माध्यमिक, योगाचार, वैभाषिक व सौत्रान्तिक हे चार. बौद्ध, आणि जैन या सहांची दर्शनें नास्तिकदर्शनें म्हणून वर्णिलेलीं आहेत. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा व वेदान्त हीं सहा आस्तिक दर्शनें म्हणून प्रसिद्ध आहेत. बौद्ध दर्शनाप्रमाणें वेदान्तदर्शनांत द्वैत, द्वैताद्वैत, विशिष्टाद्वैत, शुद्धाद्वैत व केवलाद्वैत अथवा अद्वैत असे अवांतर प्रकार आहेत. या सर्वही आस्तिक-नास्तिक दर्शनांचे स्वरूप काय आहे याबद्दलची माहिती पुढीलप्रमाणें संक्षेपानें दिली आहे.

**१. चार्वाकदर्शन** - पृथिवी, जल, तेज व वायु हीं चारच, इंद्रियांनीं समजणारीं तत्त्वें चार्वाक मानतात. त्यांच्या मतांत प्रत्यक्ष हें एकच प्रमाण

असल्यामुळें, आकाशादि अतींद्रिय पदार्थ त्यांना मान्य नाहींत. अर्थात् वरील चार भूतांचा एकत्र संयोग होऊन बनलेलें शरीर म्हणजेच आत्मा होय. प्रत्येक भूतामध्यें चेतना नाहीं. पण त्या चौघांचा विशिष्ट संयोग होऊन तयार झालेल्या शरीरामध्यें चैतन्य निर्माण होतें, जसें विड्याचें पान, सुपारी, चुना व कात यांच्या एकत्र संयोगानें लाल रंग तेथें निर्माण होतो. तेव्हां असें चैतन्ययुक्त शरीर म्हणजेच आत्मा. याला इष्ट विषयभोगानें यावज्जीव सुख देणें हाच मुख्य पुरुषार्थ आहे. त्याकरितां पाप, पुण्य, नीति, अनीति इत्यादि विचार करण्याचें कारण नाहीं. पुण्य, पाप व त्यापासून मिळणारे स्वर्ग, नरक हें सर्व काल्पनिक आहे आणि या सर्वांचे प्रतिपादन करणारे वेदही, बुद्धि, पौरुष नसणाऱ्या कोणीतरी स्वतःच्या कल्पनेंने लिहिलेले ग्रंथ आहेत. खरे पुरुषार्थ, अर्थ व काम हे दोनच आहेत. तें संपादन करण्याचा प्रयत्न यावज्जीव सर्वांनी करावा. निग्रहानुग्रहसमर्थ राजा किंवा मुख्यमंत्री हाच परमेश्वर होय. याचें आनुकूल्य संपादून सुख भोगावें. मरण - शरीरनाश, म्हणजेच मोक्ष. असे सिद्धान्त चार्वाकदर्शनामध्यें मांडले आहेत. या मताचे प्रतिष्ठापक प्रधान आचार्य बृहस्पति म्हणून सांगितलें जातें. या मताचे प्रचारक चार्वी नांवाचे कोणी आचार्य होते. हे पूर्ण बुद्धिवादी होते. चार्वी हें नांव बुद्धीला आहे. त्यामुळें प्रत्येक बुद्धिवाद्याला चार्वाक म्हणतां येईल. (**नयते चार्वी लोकायते, चार्वी बुद्धिः तत्संबंधादाचार्योऽपि चार्वी स लोकायते शास्त्रे पदार्थान् नयते - काशिकावृत्ति सू. १।१।३६**) नवनवीन कल्पना करणारी बुद्धि असते. ज्या बुद्धीनें वेदमत देखील खाऊन टाकलें, ज्या मतामुळें वेदाचें मतही मागें पडलें. **'चर्व भक्षणे'** याप्रमाणें पाणिनींच्या धातुपाठांत चर्व धातु भक्षणार्थक दाखविला आहे. या धातूपासून चार्वाक शब्द बनविला असतां वरील अर्थ तयार होईल. तिसराही एक अर्थ चार्वाक शब्दाचा दाखविला आहे. तो असा- **'चारुवाक् यस्य स चार्वाकः'** ज्याची वाणी मनोरम आहे तो चार्वाक. वरील चार्वाकसिद्धान्त, ऐकणाऱ्याच्या मनाला, त्या वेळीं तरी आनंददायक

होतात. यामुळेंच याला लोकायतमत असेंही म्हणतात. **'लोके आयतम्'** लोकांत पसरलेलें असा त्याचा अर्थ आहे. कारण या मतांत शास्त्राला प्रामाण्य नाहीं तर तें बुद्धीलाच आहे. अर्थ आणि काम हे दोनच पुरुषार्थ मानल्यामुळेंहीं याचा प्रचार अधिक आहे. वास्तविक चार्वाकमत म्हणून एखादें स्वतंत्र मत नाही. कारण याचे प्रमाणग्रंथ स्वतंत्र असे उपलब्ध नाहींत. कांही कांही शास्त्रग्रंथांतून खंडनीय म्हणून याचा उल्लेख आला आहे. कदाचित् या मताचेही प्रमाणग्रंथ असणें संभवनीय आहे. जें प्रायः शास्त्रानुगामी समाजाकडून नष्ट केले गेले असावेत. या मतानें जीव, ब्रह्म, स्वर्ग, नरक, पाप, पुण्य इत्यादि पदार्थांविषयीं संशय निर्माण केला आहे. आणि अशी संशयात्मक वृत्ति, विचारापूर्वी सर्वत्रच असलेली दिसून येते. उपनिषदांतून सुद्धां ही वृत्ति कोठें कोठें दाखविली आहे. (**'न प्रेत्य संज्ञास्ति'** - बृहदारण्यक ४।५।१३; **'नायमस्तीति चैके'**-कठोपनिषद् १।१।२०) बुद्धिवादी लोकच प्रायः अधिक दिसत असल्यामुळें या मताचें लोकायत हें नांव सार्थ आहे. आजच्या प्रबल बुद्धिवादावर या चार्वाकांच्या भौतिकवादाचाच प्रभाव दिसतो. ज्याचा प्रसार ग्रीस देशांतील प्रसिद्ध भौतिकवादी डिमाक्रिटस (४६० ई.पू.), एपुकुरियस (३४९ ई.पू.), लुक्रोशियस (९५ ई.पू.) इत्यादि बुद्धिवाद्यांनी फार मोठ्या प्रमाणांत केला. छान्दोग्य उपनिषदांतील आठव्या अध्यायांत, प्रजापतीचा शिष्य दैत्यराज विरोचन यानें आपल्या राज्यांत देहात्मवादाचाच प्रचार केल्याची कथा प्रसिद्ध आहे. अलीकडील पॉजिटिविजम इत्यादि दार्शनिकांच्या मनावर चार्वाकमताचीच छाप पडलेली स्पष्ट दिसते. कम्युनिझम अथवा मार्क्सवादाचा सिद्धान्तही चार्वाकांच्या देहात्मवादाच्या आधारावरच उभारलेला आहे. देह सर्वांचे सारखे दिसत असल्यामुळें धनी, मजूर इत्यादि विषमता कृत्रिम आहे. ती नष्ट करून सर्वत्र समता प्रस्थापित केली पाहिजे. त्याकरितां पाप, पुण्य, सद्गति, दुर्गति इत्यादि कांहींच विचार नको. कारण हें सर्व काल्पनिक आहे. इत्यादि मार्क्सवादाचे सिद्धान्त हे चार्वाकसिद्धान्ताचेच संशोधित रूपांत मांडलेले

आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. चार्वाकदर्शन अत्यंत स्थूल दृष्टींने मांडलेलें आहे. यामुळें महर्षि श्रीवेदव्यासांनीं आपल्या ब्रह्मसूत्रांत जैन, बौद्ध, यांच्या मताबरोबर खंडनीय म्हणून सुद्धां या मताचा विशेष उल्लेख केलेला नाहीं. वास्तविक समन्वय दृष्टीनें पाहतां, चार्वाकदर्शनही, उच्छृंखल समाजाला संयम दाखवून, हळूहळू शास्त्रीय मार्गावर आणण्याकरितांच बृहस्पतींनीं निर्माण केले आहे. शरीरच आत्मा आहे असें म्हटल्यावर इतर सर्व आत्म्याकरितां आहे. आत्मा मुख्य आहे. म्हणून गृह, क्षेत्र, वित्त इत्यादि विषयांवरील आसक्ति कमी केली पाहिजे. शरीररूप आत्म्याचें रक्षण करणें हें पहिलें कर्तव्य आहे. कृपण मनुष्याप्रमाणें शरीराची उपेक्षा करून केवल धनाचा ध्यास घेतच मरून जाणें हा मूर्खपणा आहे इत्यादि विचारांनीं शरीरभिन्न अनात्मवस्तूचा तादात्म्याध्यास कमी करण्याचे दृष्टीनें चार्वाकमताचा उपयोग होणें शक्य आहे. अर्थशास्त्राला व कामशास्त्राला प्राधान्य या मतांत आहे. तथापि अर्थकामाचा बेसुमार उपभोग घेत राहिल्यास शरीर किती काळ राहील? हा विचार करून, युक्ताहारविहार, युक्तचेष्ट, युक्तस्वप्नावबोध अशा संयमाची अत्यंत अपेक्षा आहे. यांवाचून शरीररूपी आत्मा सुरक्षित दीर्घकाल राहणार नाहीं. **'यावज्जीवेत् सुखं जीवेदृणं कृत्वा घृतं पिबेत्। भस्मीभूतस्या देहस्य पुनरागमनं कुतः?'** हा सिद्धान्त चार्वाकांनी मांडला आहे. यावरून पापपुण्याची चाड न बाळगतां विषयभोग इष्ट असला तरी त्याचा अतिरेक केव्हांही इष्ट असणार नाहीं. याकरितां शरीरात्मवाद्यांनाही संयम इष्टच आहे असें मानणें भाग आहे. या मूळ उद्देशांचें स्पष्टीकरण चार्वाकांनीं केलें नाहीं. तसेंच स्वभावतःच विषयप्रवण असणाऱ्या जीवांना **'मूर्खं छन्दोनुरोधेन'** या न्यायानें प्रथम केला जाणारा उपदेश, सर्वात्मना अनर्थपर्यवसायी न होतां अंशतः तरी संयमपर्यवसायी व्हावा म्हणून एखादी विशिष्ट आचरणप्रणालीही चार्वाकांनीं समाजापुढें मांडली नाहीं. केवल उच्छृंखलतेला पोषक विचारांचाच पुरस्कार केला. त्यामुळें त्यांचा मूळ उद्देश सिद्ध न होतां ते अत्यंत स्थूल दृष्टीचे

नास्तिक ठरले. हें ओळखून जैन व बौद्धांनीं आपली विशिष्ट आचारप्रणाली तयार केली. पण भारतवर्षांत सोपपत्तिक, ज्ञानक्रियात्मक विचाराचारसंयुक् भागवत-धर्माच्या प्रबल प्रणालीमध्यें ती विलीन होऊन गेली. येथें त्या प्रणालींचें स्वतंत्र अस्तित्व विशेष टिकूं शकलें नाहीं. बौद्धांची समजली जाणारी अहिंसा, ख्रिश्चनांची भूतदया, जैनांचा संयम व चारित्र्य, यवनांचा निराकार ईश्वरवाद इत्यादिकांचा समावेश भगवंतांनीं भागवत धर्मांतील दैवी संपत्तीमध्यें पूर्वींच करून ठेवला आहे. त्यामुळें इतर मतांना येथें विशेष अवसर मिळत नाहीं.

२. **बौद्धदर्शन** - चार्वाकमतांत, सूर्यकिरणांत दिसून येणारे पदार्थच परमाणुरूप मूलतत्त्व मानले. पण तेही दिसतात म्हणून सावयव आहेत. याप्रमाणें सूर्यकिरणांत दिसणाऱ्या पदार्थांचे जे अवयव. केवल अनुमानप्रमाणानें समजणारे ते परमाणु असून त्यांचा संघात, समुदाय म्हणजे सर्व जग आहे असें बौद्ध मानतात. म्हणून ते चार्वाकांच्यापेक्षां सूक्ष्म दृष्टीचे ठरतात. या परमाणूंत किंवा त्यांच्या संघातामध्यें, सुखकारक, स्थिर, सामान्यरूप, अस्तित्वसंपन्न असें काहींच दिसत नसल्यामुळें **'सर्वं दुःखं, सर्वं क्षणिकं, सर्वं स्वलक्षणं (असामान्य) व सर्वं शून्यम्'** अशी भावना जगाविषयीं बौद्धांची आहे. बौद्धाचे कांहीं सिद्धान्त, उपनिषदाप्रमाणें असलेले दिसतात - मरणधर्मा जीवाच्या हृदयांतील संपूर्ण कामना ज्यावेळीं नाश पावतात त्यावेळीं तो अमृत होतो (**'यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिताः। अथ मर्त्योऽमृतो भवति'** (बृहदारण्यक ४।४।७). जो कोणतेंही कर्म, परोक्ष अथवा अपरोक्ष करतो त्याचें फल त्या करणाऱ्याला भोगावें लागतें. जसें कर्म करील तशीच आचरणाची त्याला सवय लागेल व तो शेवटीं तसाच बनून जातो. चांगले आचरण करणारा साधु बनतो आणि दुष्ट आचरण करणारा पापी बनतो. जशी कामना करतो तसा त्याचा संकल्प बनतो. त्या संकल्पाप्रमाणें तो कर्म करतो व कर्माप्रमाणें फल प्राप्त करून घेतो. (**यदेतदिदम्मयोऽदोमय इति, यथाकारी**

**यथाचारी तथा भवति। साधुकारी साधुर्भवति, पापकारी पापो भवति। पुण्यः पुण्येन कर्मणा पापः पापेन। अथो खल्वाहुः काममय एवायं पुरुष इति। स यथाकामो भवति तत्क्रतुर्भवति तत् कर्म कुरुते। यत् कर्म कुरुते तदभिसम्पद्यते।** (बृहदारण्यक ४।४।५)) म्हणून मानवानें आत्मशुद्धीकरितां नेहेमीं प्रयत्न केला पाहिजे. शील, समाधि व प्रज्ञा हे तीन आत्मशुद्धीचे उपाय आहेत. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व मादक द्रव्याचा त्याग हे पंचशील म्हणून प्रसिद्ध आहेत. संन्यासी आणि गृहस्थ दोघांनींहीं यांचे पालन करणें योग्य आहे. चित्तवृत्तींचा निरोध म्हणजे समाधि. या उपायाने, पूर्वजन्माचें स्मरण, जन्ममृत्यूचें ज्ञान आणि चित्तांतील दुर्वासनांचें निर्मूलन होतें. आप्त महापुरुषांच्या उपदेशाप्रमाणें तत्त्वचिंतन करणें, त्याचाच युक्तीनें विचार करणें हे दोन उपाय व समाधि या तीन उपायांनीं जें ज्ञान होतें त्यालाच प्रज्ञा असें म्हणतात. शीलसंपन्न व प्रज्ञासंपन्न व्यक्तीच योग्य रीतीनें समाधिसंपन्न होऊन, निर्वाणरूप फलाची प्राप्ति करून घेते. चित्ताची निर्मलता म्हणजेच निर्वाण होय.

संपूर्ण दृश्य जग क्षणिक, म्हणूनच नाश पावणारें आहे. जगांतील सर्व व्यवहार कर्मविपाकानुसार चालू आहेत. याला चालक नित्य, व्यापक, ईश्वर म्हणून कोणी नाहीं. कर्माप्रमाणें नामरूपात्मक अनेक देह मानवाला वारंवार धारण करावे लागतात. हें जन्ममरणात्मक संसारचक्र दुःखमय आहे. यांतून सुटण्याचा उपाय करून शांति प्राप्त करून घेणें हेंच मानवजीवनाचें ध्येय आहे. जो भिक्षु अंतःकरणांतील सूक्ष्म आकाशस्वरूपांत आपणांस विलीन करून तत्त्वचिंतनांत निमग्न राहातो तो मेघांमधून बाहेर पडलेल्या चंद्राप्रमाणें या लोकाला प्रकाशित करतो. (**'योह वै दहरो भिक्खुयुञ्जते बुद्धशासने। सो इमं लोकं पभासेति अब्भा मुत्तो व चन्दिमा'** - धम्मपदभिक्खुवग्गो २३ - ) यांतील 'दहर' हा शब्द; छांदोग्य उपनिषदाच्या आठव्या अध्यायांतील पहिल्या मंत्रांत दाखविलेल्या, अंतःकरणांतील अष्टदलकमलामध्यें

असणाऱ्या सूक्ष्म आकाशरूप अर्थाचा बोधक आहे. याच दहराकाशाचें- सूक्ष्म आकाशाचें अन्वेषण करावें असें उपनिषदामध्यें सांगितलें आहे. बुद्धही वरील श्लोकांत तेंच सांगत आहेत. ते सूक्ष्माकाश म्हणजे परब्रह्म असा उपनिषदाचा अभिप्राय आहे. तें आत्म्याचें निर्मल रूप आहे असा बुद्धांचा अभिप्राय आहे. याची प्राप्ति म्हणजे खरी आत्मशुद्धि बुद्धाभिमत आहे. उपनिषदाच्या मतानें, हें जीवात्म्याचें मूल विशुद्धरूप ब्रह्म होय. याची प्राप्ति म्हणजे ब्रह्मात्मभावाची प्राहोय. दुःखरूप संसाराचा अनुभव अज्ञानामुळें येत आहे. या अज्ञानाची निवृत्ति तत्त्वज्ञानानें होते. तत्त्व हें वाणी किंवा मनाला गोचर होणारें नाहीं. तें निर्विकल्प, आनंदरूप व शुद्धज्ञानस्वरूप आहे. त्याची प्राप्ति करून घेण्याकरितां काया, वाचा, मन, इंद्रिय यांचा संवर म्हणजे संयम आवश्यक आहे. संयमानेंच साक्षात्कार सुलभ होऊन पूर्ण सुखाची प्राप्ति होते.

बुद्धांनीं वैदिक धर्मांतील यज्ञप्रक्रिया व वर्णाश्रमव्यवस्था मानली नाहीं. अहिंसेचा पुरस्कार करण्याकरितां यज्ञप्रक्रियेचा निषेध केला गेला. सर्व पापांचा उद्गम अहंकारांतून होतो असें बुद्ध मानतात. हा अहंकार दबला गेल्यावरच आत्मसंयम पूर्णपणें होऊं शकतो आणि बुद्धत्व प्राप्त होतें. हा अहंकार फार वाढलेला आहे असें वाटून बुद्धांनीं वर्णाश्रमव्यवस्थेवर प्रहार केला. वास्तविक शास्त्रदृष्टीनें पाहिलें तर बुद्ध हा एक अवतार मानला गेला आहे. त्यांनीं हें नास्तिक दर्शन करण्याचा उद्देश काय हें पाहूं गेलें तर, '**संमोहाय सुरद्विषाम्। बुद्धो नाम्ना जिनसुतः कीकटेषु भविष्यति**' या वचनाप्रमाणें, आसुरी वृत्तीच्या लोकांना वैदिक धर्माविषयीं मोह उत्पन्न करून त्यांना त्यापासून दूर करणें हें बुद्धावताराचें प्रयोजन आहे. यज्ञप्रक्रियेचा अवलंब करून, काम्य, आभिचारिक अशा कर्मांकडे समाजाची प्रवृत्ति अधिकाधिक होत असलेली पाहून बुद्धांनीं, अहिंसा, सत्य, अस्तेय, भूतदया, आत्मौपम्यदृष्टि या सामान्य धर्मावर विशेष भर दिला. हा उपदेश वेदसंमतच आहे. रावण, इन्द्रजित यांच्यासारखे ब्रह्मकुलप्रसूत पुरुषही जेव्हां ऐहिक सुखलोलुप अहंकारी बनून,

तें सुख मिळविण्याकरितां जेव्हां यज्ञमार्गाचा आश्रय घेऊं लागले तेव्हां त्यांच्यासारख्या आसुरी वृत्तीच्या लोकांना मोहित करण्याकरितां म्हणून वेदोक्त यज्ञमार्गाची निंदा अवतारी अशा बुद्धांनाही करावी लागली व वर्णाश्रमव्यवस्थाही दूर करण्याचा प्रयत्न करावा लागला. ज्यामुळें अहंकारी असुरवृत्तीचे लोक 'अहिंसा परमो धर्मः' असें समजून आपोआपच यज्ञप्रक्रियेपासून दूर झाले. वास्तविक अहिंसेचा पुरस्कार करण्याकरितां यज्ञादि कर्मांचा त्यागच केला पाहिजे असें नाहीं. उलट यज्ञप्रक्रिया जोंपर्यंत यथाशास्त्र चालू होती तोंपर्यंत अहिंसेचें पालन कटाक्षानें होत होतें. यज्ञांतील हिंसा विहित असल्यानें ती हिंसाच नाहीं असें समजून वेदाज्ञा म्हणून यज्ञापुरतीच हिंसा होत होती. इतर हिंसा कटाक्षानें टाळली जात असे. बंगाल वगैरे प्रांतांत यज्ञप्रक्रिया लुप्त झाल्यानें मत्स्यादि आहार अनिर्बंध सुरूं झाला. पण महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादि प्रांतांत यज्ञप्रक्रिया चालू असल्यामुळेंच यज्ञाधिकारी समाजांत मांसाहार नाहीं हें आजही प्रत्यक्ष दिसत आहे. यज्ञीय हिंसा दोष आहे अशी कल्पना असणाऱ्यांना उद्देशून श्री वेंकटाध्वरींनीं विश्वगुणादर्श चंपूंत पुढीलप्रमाणें तर्कप्रधान विचार एका श्लोकांत मांडले आहेत- **'हिंसान्तरेष्विव मखे पशुहिंसनेषु जैनेतरो यदि जनो भजते जुगुप्साम्। नार्यन्तरेष्विव न निन्दति यत्सुतानां निष्पादनं किमनवेऽपि निजे कलत्रे'** याचा अभिप्राय असा कीं - 'यज्ञीय हिंसा, पापजनिका, हिंसात्वात् इतरहिंसावत्' असें जर अनुमान कोणीं मांडलें तर, 'स्वस्त्रीः, अगम्या, स्त्रीत्वात् इतरस्त्रीवत्' हेंही अनुमान बरोबर आहे असें म्हणावें लागेल. इतर स्त्रीसंग शास्त्रनिषिद्ध असल्यानें तो पापजनक आहे तशी इतर हिंसाही शास्त्रनिषिद्ध असल्यानें ती पापजनक आहे हें खरे, पण स्वस्त्रीसंग जसा शास्त्रविहित असल्यानें पापजनक नाहीं तशी यज्ञीय हिंसा शास्त्रविहित असल्यानें तीहीं पापजनक ठरत नाहीं. म्हणून हिंसात्व हा सामान्य हेतु सोपाधिक असल्यानें तो हेत्वाभास ठरतो. त्याच्या ऐवजीं 'शास्त्रनिषिद्धहिंसात्वात्' असा जर हेतुप्रयोग केला तर मात्र त्या हेतूनें

पापजनकत्व हें साध्य सिद्ध होणें शक्य आहे. पण हा हेतु यज्ञीय हिंसेंत नसल्यानें तिच्या ठिकाणीं पापजनकत्व सिद्ध होऊं शकत नाहीं. याप्रमाणें विचार करून सात्त्विक प्रकृतिच्या ब्राह्मणांनी आपली वर्णाश्रमव्यवस्था व यज्ञप्रक्रिया श्रद्धेनें चालू ठेवली. ती आजतागायत यथाशास्त्र चालूं आहे. बुद्धावताराविषयीं आदरही त्यांचा आहेच. फक्त प्रत्यक्ष धर्मसंरक्षणरूप अवतारकार्य बुद्धावतारांत दिसत नसल्यानें तो अवतार इतर अवतारांप्रमाणें भारतीय संस्कृतीमध्यें उपास्य ठरला नाहीं. सात्त्विक ब्राह्मणाबद्दल बुद्धांनींही आदर व्यक्त केला आहे. त्यांचे ते उद्गार मागें विषयोपक्रमांत दिले आहेत.

याप्रमाणें बुद्धांचा आचार व उपदेश समाजासमोर उपस्थित करणारा संप्रदाय हीनयान पंथ या नांवानें प्रसिद्ध आहे. या पंथांत दोन मतें आहेत. इंद्रियानें दिसणारे बाहेरचे पदार्थ खरे आहेत आणि आंत चित्तांत भासणारे पदार्थही सत्य आहेत. या बाह्य व आंतर पदार्थांची सत्ता पृथक् पृथक् आहे. याप्रमाणें बाह्यार्थ प्रत्यक्ष मानणारे वैभाषिक म्हणून प्रसिद्ध आहेत. दुसरे- बाह्यार्थ अनुमेयवादी सौत्रान्तिक- यांच्या मतांत बाह्य पदार्थांनाही अस्तित्व आहे. पण अंतर्बाह्य सर्वही पदार्थ क्षणिक असल्यामुळें बाह्य पदार्थांचे प्रत्यक्ष ज्ञान होणें शक्य नाहीं. समोर दिसणाऱ्या पदार्थापर्यंत इंद्रिय जाऊन त्याचें ज्ञान होईपर्यंत तो पदार्थ बदलून जातो. म्हणून बाहेरचे पदार्थ अनुमानप्रमाणानें समजतात. या प्रमाणें हीनयान पंथांतील, बाह्यार्थ प्रत्यक्षवादी वैभाषिक व बाह्यार्थानुमेयवादी सौत्रान्तिक हे दोघेही सर्वास्तित्ववादी आहेत.

बौद्धमतांत हीनयान पंथाप्रमाणेंच महायान पंथ नांवाचा दुसरा एक पंथ प्रचलित झाला. यामध्येंही दोन मतें आहेत - एक विज्ञानवाद व दुसरा शून्यवाद. विज्ञानवादी, बाह्य पदार्थांची सत्ता बिलकूल मानत नाहीं. आंत असणारें ज्ञान, हेंच फक्त खरें आहे. हें आतरविज्ञानच बाह्य पदार्थरूपानें भासतें. यांच्या मतानें बाह्य पदार्थांचें अस्तित्व नाही. यांनाच योगाचार असें दुसरें नांव आहे.

दुसरे शून्यवादी, माध्यमिक नांवानें प्रसिद्ध आहेत. हें बाह्यार्थही मानीत नाहींत आणि आंतरविज्ञानही मानीत नाहींत. फक्त शून्यतत्त्व मानतात. हें तत्त्व अभावात्मक नसून अनिर्वचनीय अज्ञेय असें आहे. याप्रमाणें महायान पंथांतील योगाचार व माध्यमिक दोघांच्याही मतानें जगताचें अस्तित्व नाहीं. प्रत्यक्ष आणि अनुमान हीं दोनच प्रमाणें बौद्ध मानतात. या प्रमाणांनी विचार करतां करतां शेवटीं शून्यत्वापर्यंत येऊन पोंचणें हेंच बौद्धांच्या साधनप्रणालीचें अंतिम फल आहे. बौद्ध मतांतील हे चारही सप्रदाय बुद्धानंतर २०० वर्षेपर्यंत चालू होते. इसवीसनापूर्वीं तिसऱ्या शतकापर्यंत यांचें महत्त्व मानलें जात होतें. (बौद्धदर्शन पृ. ७७-७८ राहुलसांकृत्ययन)

या चारही मतांचें निराकरण ब्रह्मसूत्रभाष्यांत श्रीनिंबार्काचार्यांनीं दुसऱ्या अविरोधाध्यायांत केलें आहे. वैभाषिक, सौत्रान्तिक, योगाचार आणि माध्यमिक हीं नावें; बाह्यार्थप्रत्यक्षवादी, बाह्यार्थानुमेयवादी, विज्ञानवादी व शून्यवादी यांची क्रमशः पुढें प्रसिद्ध झाली. याची कारणमीमांसा पुढीलप्रमाणें करतां येते - बुद्धाच्या नंतर ३०० वर्षांनी कात्यायनीपुत्रानें 'अभिधर्मज्ञानप्रस्थानशास्त्र' नांवाचा ग्रंथ रचला. त्याच्यावर 'अभिधर्मविभाषाशास्त्र' नांवाचा स्पष्टीकरणात्मक ग्रंथ, कनिष्काच्या युगांत तयार झाला. त्यामुळें त्याच्या अनुयायांची वैभाषिक नांवानें प्रसिद्धि झाली. हे दोन्ही ग्रंथ आज तिबेटी व चिनी भाषेमध्यें उपलब्ध आहेत. पुढें या मतांत अनेक ग्रंथ निर्माण झाले. बुद्धांचा उपदेश, सुत्तापिटक नांवाच्या ग्रंथांत सूत्ररूपानें ग्रथित केला आहे. तोच बाह्यार्थानुमेयवादाला आधार आहे. यामुळें या अनुयायांना सौत्रान्तिक हें नांव पडलें. विज्ञानवादांत पुढें पुढें सदाचाराचा योग झाल्यामुळें विज्ञानवादी, योगाचार नांवानें प्रसिद्ध झाले. नागार्जुनाच्या माध्यमिक कारिका या ग्रंथांमुळें शून्यवाद, माध्यमिक मत म्हणून प्रसिद्धि पावला.

या चारही मतासंबंधीं ग्रंथसंपत्ति विपुल आहे.

बौद्धमतांत द्वादशायतनपूजा सांगितली आहे. ती अशी -

**‘अर्थानुपार्ज्य बहुशो द्वादशायतनानि वै। परितः पूजनीयानि किमन्यैरिह पूजितैः। ज्ञानेन्द्रियाणि पञ्चैव तथा कर्मेन्द्रियाणि च। मनो बुद्धिरिति प्रोक्तं द्वादशायतनं बुधैः।’** (सर्वदर्शनसंग्रह बौ.द.)

पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रिये, मन व बुद्धि या बारा आयतनांचे उत्तम पूजन करावें असें बौद्धांना इष्ट आहे. यांचे पूजन म्हणजे निषिद्ध नसलेले त्यांचे त्यांचे योग्य विषय त्यांना देणें हेंच होय. बौद्धमताचा संक्षेप पुढील श्लोकांत आला आहे.

**बौद्धानां सुगतो देवो विश्वं च क्षणभङ्.गुरम्।**
**आर्यसत्याख्यया तत्त्वचतुष्टयमिदं क्रमात्।**
**दुःखमायतनं चैव ततः समुदयो मतः।**
**मार्गश्चेत्यस्य च व्याख्या क्रमेण श्रूयतामतः।**
**दुःखं संसारिणः स्कन्धास्ते च पञ्च प्रकीर्तिताः।**
**विज्ञानं वेदना संज्ञा संस्कारो रूपमेव च।।**

**पञ्चेन्द्रियाणि शब्दाद्या विषयाः पञ्च मानसम्।**
**धर्मायतनमेतानि द्वादशायतनानि तु।**
**रागादीनां गणो यस्मात्समुदेति नृणां हृदि।**
**आत्मात्मीयस्वभावाख्यः स स्यात्समुदयः पुनः।।**

**क्षणिकाः सर्वसंस्कारा इति या वासना स्थिरा।**
**स मार्ग इति विज्ञेयः स च मोक्षोभिधीयते।।**

**प्रत्यक्षमनुमानं च प्रमाणद्वितयं तथा।**
**चतुष्प्रस्थानिका बौद्धाः ख्याता वैभाषिकादयः।।**

अर्थो ज्ञानान्वितो वैभाषिकेण बहु मन्यते।
सौत्रान्तिकेन प्रत्यक्षग्राह्योर्थो न बहिर्मतः।।
आकारसंहिता बुद्धिर्योगाचारस्य संमता।
केवलां संविदं स्वस्थां मन्यन्ते मध्यमाः पुनः।।
रागादिज्ञानसन्तानवासनोच्छेदसंभवा।
चतुर्णामपि बौद्धानां मुक्तिरेषा प्रकीर्तिता।।
कृत्तिः कमण्डलुर्मौण्ड्यं चीरं पूर्वाह्णभोजनम्।
संघो रक्ताम्बरत्वं च शिश्रिये बौद्धभिक्षुभिः।।

(विवेकविलास ८।२६५-२७५)

या अकरा श्लोकांत बौद्धमत बहुतेक संक्षेपानें दिलें आहे. विशेष माहिती राहुल सांकृत्यायनांचे बौद्धदर्शन इत्यादि ग्रंथावरून मिळूं शकेल.

यापैकीं, माध्यमिक मताचे ग्रंथ; आचार्य नागार्जुन व आर्यदेव (ख्रिस्त तृतीय शतक) बुद्धिपालित व भावविवेक (५ वें शतक), चन्द्रकीर्ति (७ वें शतक), शान्तिरक्षित (८ वें शतक) या ग्रंथकारांनी केलेले आहेत. दुसरे योगाचारदर्शन किंवा विज्ञानवाद याचा प्रवर्तक आर्यमैत्रेय म्हणून सांगितला जातो. ज्याचे दोन ग्रंथ, अभिसमयालंकारविभाग व मध्यान्तविभाग नांवाचे संस्कृत भाषेंत प्रकाशित झालेले उपलब्ध आहेत. वस्तुतः योगाचारमताचा प्रचार असंग व वसुबंधु या दोन आचार्यांनींच केला. आचार्य वसुबंधु हा ख्रिस्ततृतीय शतकांत सुप्रसिद्ध दार्शनिक होऊन गेला. ज्याच्या परंपरेंतच सातव्या शतकाच्या प्रथमार्धांत, प्रख्यात बौद्धदार्शनिक, आचार्य धर्मकीर्ति होऊन गेला. ज्याचा प्रमाणवार्तिक नांवाचा ग्रंथ, विज्ञानवादसिद्धान्ताचा परिचायक प्रसिद्ध आहे. तिसऱ्या सौत्रान्तिकदर्शनाचे ग्रंथ येथें उपलब्ध नाहींत. चौथें वैभाषिकदर्शन म्हणजेच सर्वास्तित्ववाद. वैभाषिकसिद्धान्तांचे ज्ञान, तृतीय

शतकांत झालेल्या आचार्यवसुबंधूच्या सुप्रसिद्ध अभिधर्मकोश नांवाच्या ग्रंथावरून होऊं शकतें. आचार्य वसुबंधु प्रथम सर्वास्तित्ववादाचा म्हणजे वैभाषिकमताचा पुरस्कर्ता होता. पण पुढे, आपला अग्रज, आचार्य असंग याच्या उपदेशाप्रमाणें त्यानें योगाचारमताचा अंगीकार केला.

**३. जैनदर्शन** - जैनमत, बौद्धमतापेक्षां प्राचीन समजलें जातें. याचे प्रवर्तक पार्श्वनाथ व महावीर स्वामी आहेत. जैनमतांत अर्हत् हाच परमेश्वर आहे त्याचें लक्षण-

**'सर्वज्ञो जितरागादिदोषस्त्रैलोक्यपूजितः।**
**यथास्थितार्थवादी च देवोर्हन्परमेश्वरः'** (स.द.सं.आ.द.)

रागादि दोष जिंकणारा जो जितेंद्रिय म्हणजे जिन, याचें मत तें जैनमत अशी प्रसिद्धि आहे. या मतांत संयम व आचार यांना प्राधान्य दिलें आहे. वरील श्लोकांत सांगितलेला जो सर्वज्ञ, जितेंद्रिय तोच परमेश्वर. त्यालाच अर्हत् असें म्हणतात. याचें मत म्हणून आर्हतमत असेंहि दुसरें नांव जैनमताला आहे. जीव हा स्वभावतः ज्ञानमय, अनंत ज्ञानसंपन्न आहे. पण कर्मामुळें याचें मूळ रूप झांकून गेलें आहे. सम्यक् चारित्र्यरूप साधनांनीं जीवाला आपलें शुद्ध स्वरूप मिळवितां येतें. म्हणजे तो शेवटीं सर्वज्ञ अर्हत् होतो. या मतांत सादि असा अर्हन्मुनि, हाच ईश्वर आहे. आस्तिकांच्या मताप्रमाणें अनादि ईश्वर, या मतांत नाहीं. अर्हन्मुनीनें केलेल्या प्रवचनांचें सार असा परमागमसार नांवाचा ग्रंथ या मतांत आहे. त्यांत- **'सम्यग्दर्शनज्ञानचरित्राणि मोक्षमार्गः'** (तत्त्वार्थसूत्र १।१) असें सांगितलें आहे. सम्यग्दर्शन, सम्यगज्ञान व सम्यक्चारित्र्य ही तिन्ही मिळून मोक्षास कारण आहेत. सम्यग्दर्शन म्हणजे, **'तत्त्वार्थश्रद्धानं सम्यग्दर्शनम्'** (तत्त्वार्थसूत्र १।२) याचा अर्थ - अर्हन्मुनीनें जीवादि पदार्थांचे प्रतिपादन केलें असतां त्या उपदेशावर श्रद्धा ठेवणें म्हणजे त्या उपदेशाच्या विरुद्ध अभिनिवेश नसणें हे सम्यग्दर्शन होय. सर्व पदार्थांचे जे निःसंदिग्ध खरें ज्ञान तें सम्यग्ज्ञान. यांचें मति, श्रुत, अवधि, मनःपर्याय व केवल

असे पांच प्रकार आहेत. ज्ञानप्रतिबंधक दोष अंशतः दूर झाले असतां प्रथम जें ज्ञान होतें तें मतिज्ञान. जसें नाटकाच्या वेळीं पडदा उघडण्याचे अगोदर आतां कोणतें पात्र येणार असें उत्सुकतेनें प्रेक्षकांचे पडद्याकडे सारखे डोळे लागतात तें मतिज्ञान, हे मननपूर्वक असल्यानें याला मतिज्ञान म्हणतात. लहान मुलांना सहा महिनेपर्यंत प्रायशः हें मतिज्ञान नसतें. कारण तोंपर्यंत त्यांचे दृष्टिस्थैर्य नसतें. दृष्टिस्थैर्य हें मतिज्ञानाचें गमक आहे. मतिज्ञानानंतर होणारें स्पष्ट ज्ञान तें श्रुतज्ञान. यालाच नैयायिक निर्विकल्पज्ञान असें म्हणतात. त्यानंतर अवधिज्ञान म्हणजे ज्याचा विषय मर्यादित आहे असें ज्ञान. व्यवहारांत बद्ध जीवांना नेहेमीं हें अवधिज्ञान असतें. हेंच नैयायिकांच्या मतें सविकल्पक ज्ञान होय. मनांतील ईर्ष्या, असूया इत्यादि ज्ञानप्रतिबंधक दोषांचा निरास झाला असतां दुसऱ्याच्या मनांतील सुद्धा समजणें या ज्ञानाला मनःपर्याय ज्ञान असें म्हणतात. तपस्वी पुरुष ज्याच्याकरितां तपश्चर्येत निमग्न असतात, तें, अन्यज्ञानाचा संबंध नसलेलें तत्त्वज्ञान म्हणजे केवलज्ञान हेंच मोक्षाचे साधन आहे.

याप्रमाणें श्रद्धावान् व तत्त्वज्ञानी पुरुष पापनाशक अशा क्रियांचे जें आचरण करतो तें सम्यक्चारित्र्य, हें पांच प्रकारच्या व्रतांच्या रूपानें दाखविलें आहे-

**'सर्वथावद्ययोगानां त्यागश्चारित्रमुच्यते।**
**कीर्तितं तदहिंसादिव्रतभेदेन पञ्चधा।।**
**अहिंसासूनृतास्तेयब्रह्मचर्यापरिग्रहाः।**
**न यत्प्रमादयोगेन जीवितव्यपरोपणम्।।**
**चराणां स्थावराणां च तदहिंसाव्रतं मतम्।**
**प्रियं पथ्यं वचस्तथ्यं सूनृतं व्रतमुच्यते।।**
**तत्तथ्यमपि नो तथ्यमप्रियं चाहितं च यत्।**

**अनादानमदत्तस्यास्तेयव्रतमुदीरितम्।**
**बाह्याः प्राणा नृणामर्थो हरता तं हता हि ते।।**

**दिव्यौदरिककामानां कृतानुमतकारितैः।**
**मनोवाक्कायतस्त्यागो ब्रह्माष्टादशधा मतम्।।**

**सर्वभावेषु मूर्छायास्त्यागः स्यादपरिग्रहः।**
**यदसत्स्वपि जायेत मूर्छया चित्तविप्लवः।।**

**भावनाभिर्भावितानि पञ्चभिः पञ्चधा क्रमात्।**
**महाव्रतानि लोकस्य साधयन्त्यव्ययं पदम्।।**

(सर्वदर्शनसंग्रह आ.द.)

**अहिंसाव्रत, सूनृतव्रत, अस्तेयव्रत, ब्रह्मचर्यव्रत व अपरिग्रहव्रत** हीं पांच महाव्रतें म्हणजे **सम्यकचारित्र**. प्रत्येक व्रताच्या पांच भावना आहेत. उदाहरणार्थ-

**'हास्यलोभभयक्रोधप्रत्याख्यानैर्निरन्तरम्।**
**आलोच्य भाषणेनापि भावयेत्सूनृतं व्रतम्'**

(स.द.सं.आ.द.)

जें भाषण ऐकतांना सुखकर असून परिणामीं हितकर असेल व जें खरें असेल तें सूनृतव्रत होय. हास्य म्हणजे विनोद, लोभ, भय व क्रोध यांच्या आवेशात असत्य भाषण संभवतें म्हणून या चौघांचा परिहार करून बोलावें. तसेंच अज्ञानानेंहि असत्य भाषण संभवतें त्याचा परिहार करण्याकरितां आलोच्यभाषणरूप पांचवी भावना सांगितली. नेहेमीं विचारपूर्वकच भाषण करवें म्हणजे सहसा असत्य भाषण संभवत नाहीं. याप्रमाणें इतर व्रतांच्याही भावना आर्हतदर्शनात सांगितल्या आहेत. ही, सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र तीनही मिळून मोक्षसाधनें होतात. यांनाच रत्नत्रय म्हणतात.

जैनमताचा सिद्धान्त, अनेकान्तवाद किंवा स्याद्वाद हा होय. कोणताही पदार्थ सत्य का असत्य इत्यादि कोणताहि निर्णय करतां येत नाहीं. म्हणून सर्वच पदार्थ, विविधरूप आहेत. सत्, असत्, सदसत्, व अनिर्वचनीय याप्रमाणें जगाविषयीं विचार असणारे चार प्रकारचे वादी आहेत. तसेंच अनिर्वचनीय मतांत मिश्रित अशी पूर्वींचीं तीन मतें म्हणजे एकंदर सात प्रकारचीं मतें तयार होतात ती अशीं - स्यादस्ति, स्यान्नास्ति, स्यादस्ति च नास्ति च, स्यादवक्तव्यः, स्यादस्ति चावक्तव्यः च स्यान्नास्ति चावक्तव्यः च स्यादस्ति च नास्ति चावक्तव्यः च। हा जैनमतातील सप्तभंगीन्याय होय. अस्तित्व नास्तित्व इत्यादि सात पदार्थांचा एका पदार्थांत विरोध नसून त्याचा समुच्चय म्हणजे सप्तभंगीन्याय. जैन हे अनेकान्तवादी आहेत. बाकीचे एकान्तवादी आहेत. ते सात आहेत.

(१) **सत्कार्यवादी सांख्य** - हे नेहमीं पदार्थाचें अस्तित्वच मानतात. हे सद्वादी आहेत.

(२) **शून्यवादी माध्यमिक** - बौद्धांपैकी एक. हे पदार्थांचे नास्तित्वच नेहेमी मानतात. 'सर्वं शून्यम्' असा याचा सिद्धान्त आहे. म्हणून हे असद्वादी आहेत.

(३) **असत्कार्यवादी नैयायिक** - पदार्थांचा उत्पत्तीच्या पूर्वी अभाव असून उत्पत्तीनंतर त्यांना अस्तित्व असतें. पुनः नाशानंतर त्यांचा अभाव असतो. म्हणजे कालभेदानें पदार्थांचे सत्त्व व असत्त्व मानणारे नैयायिक सद्सद्वादी आहेत.

(४) जगाला उपादानकारण माया मानणारे **मायावेदान्ती**, पदार्थ अनिर्वाच्य आहेत असें म्हणतात. मायिक मृगजल वस्तुतः प्रतीतीच्या वेळींही नाहीं म्हणून त्याचा मागाहून बाध होतो. याकरितां पदार्थांच्या अस्तित्व कालांतच वस्तुतः त्यांना असत्त्व आहे. म्हणजे हें विरुद्ध असे सत्त्व व असत्त्व एकाच वेळी वाणीनें सांगतां येत नाही म्हणून सर्व पदार्थ अनिर्वाच्य आहेत असा त्यांचा अभिप्राय

आहे.

(५) **कांहीं मायावेदान्ती**, सांख्यांनीं सांगितल्याप्रमाणें पदार्थाचें सत्त्व मानतात. पण मायिक असल्यामुळें पदार्थ अनिर्वाच्य आहेत असेंही म्हणतात.

(६) **दुसरे कांही मायावेदान्ती**, शून्यवाद्यांनीं सांगितलेलें पदार्थांचें असत्त्व मानतात आणि मायिक असल्यामुळें पदार्थांचे अनिर्वाच्यत्वही मानतात.

(७) **माया वेदान्त्यांपैकीं आणखी कांहीं** लोक, नैयायिकांनी सांगितलेलें, पदार्थांचे कालभेदानें सत्त्व व असत्त्व मान्य करून, मायिक असल्यामुळें त्याचें अनिर्वाच्यत्वही मानतात. हे सर्वही सातजण एकान्तवादी आहेत. हे सर्व घटादि पदार्थ पाहात असतांना, घटोऽस्ति, घटो नास्ति, घटोऽस्ति च नास्ति च, घटोऽवक्तव्यः, घटोऽस्ति चावक्तव्यः च, घटो नास्तिचावक्तव्यः च, घटोऽस्ति च नास्तिचावक्तव्यः च याप्रमाणें आपापल्या मतानें प्रतिपादन करतात. जैन हे या सर्वांची मतें मान्य करून त्या ठिकाणीं केवळ 'स्यात्' या अव्ययाचा प्रयोग करतात. याचा अर्थ कथंचित् असा आहे. म्हणजे- 'स्यादस्ति' - घट आहे असें सांख्य म्हणतात तें खरें आहे पण तेंच कांही निश्चित नाहीं. त्याच्याबद्दल 'स्यान्नास्ति' असेंही प्रतिपादन करतां येईल. म्हणजे घट आहेही आणि नाहींही. सर्वहि वाद्यांची मतें भिन्न भिन्न दृष्टीनें बरोबरच आहेत असा अनेकान्तवाद जैनांनी मांडल्यामुळें ते वादी बिचारे निर्विण्ण होऊन स्वस्थ बसले आणि 'सर्वं वस्तु अनेकान्तम्' असा निर्णय जैनांनीं दिला. याच अनेकान्तवादाचा उपयोग करून ब्रह्मसूत्रभाष्यांत श्रीमच्छंकराचार्यांनीं जैनांचें खंडन केलें आहे. सर्वच जर अनिश्चित तर उपदेश करणारा, ऐकणारा, साधन, फल सर्वच अनिश्चित असेल, अशा अनिश्चित दर्शनाकडे विचारी पुरुषांची प्रवृत्ति कशी होईल? हा खंडनाचा सारांश आहे. जैनमतांत संसारी व मुक्त असे दोन प्रकारचे जीव आहेत. मुक्त हेच परमेश्वर होतात. निराळा परमेश्वर नित्यमुक्त असा कोणी नाहीं. जीवाचा आकार अणु किंवा विभु नसून मध्यम आहे. म्हणजे

जीव शरीराएवढा आहे. तसेंच धर्म, अधर्म, आकाश व पुद्गल असे चार पदार्थ जैन मानतात. पुद्गल म्हणजे परमाणु. पूरयन्ति गलन्ति च इति पुद्गलाः, पदार्थाचें स्वरूप आपल्या राहाण्यानें वाढवितात आणि नंतर गळून पडतात. धर्म व अधर्म यांनाहि परमाणू आहेत. धर्म हा गति उत्पन्न करणारा आहे आणि अधर्म हा एका ठिकाणीं थांबविणारा आहे. लोकाकाश व अलोकाकाश असे आकाशाचे दोन भेद आहेत. तेजानें भरलेलें असें जें आकाश लोकव्यवहारांत आहे तें लोकाकाश. त्याच्यावर अलोकाकाश. लोकाकाशांत, धर्म व अधर्म सर्वत्र असतात. यांचे परमाणु आत्म्यामध्यें मिसळतात. अधर्मपरमाणूंच्या संमिश्रणाने जड झालेल्या आत्म्याला ऊर्ध्वगति संभवत नाहीं. सम्यक्चारित्राभ्यासानें ते अधर्मपुद्गल नष्ट झाल्यामुळें हलका झालेला आत्मा सतत ऊर्ध्वगतिसंपन्न होऊन अलोकाकाशांत जाऊन राहातो. हीच मुक्ति होय. जसें ओल्या मातींचे आवरण बसलेला भोपळा पाण्यांत टाकल्याबरोबर प्रथम पाण्यांत बुडू लागतो.पण ती माती धुऊन गेल्यावर लगेच वर येतो त्याप्रमाणें येथें समजावें.

**‘पूर्वप्रयोगादस‘त्वाद्बन्धच्छेदात्तथा गतिपरिणामाच्च’**

(तत्त्वार्थसूत्र१०।६)

**‘आविद्धकुलालचक्रवद्व्यपगतलेपालाबुवदेरण्डबीजवदग्निशिखावच्च’**

(तत्त्वार्थसूत्र १०।७)

या दोन सूत्रांमध्ये मुक्तात्म्याची स्थिति सदृष्टान्त दाखविली आहे.

आर्हतदर्शनाचें वाङ्मय विपुल उपलब्ध आहे. प्रथम झालेल्या ग्रंथांत उमास्वातिविरचित तत्त्वार्थसूत्र, कुन्दकुन्दाचार्यकृत प्रपंचसार, समन्तभद्रकृत आप्तमीमांसा हे ग्रंथ मुख्य आहेत. यांचा समय ख्रिस्ततृतीय शतकापर्यंत आहे. मध्ययुगीन जैनदार्शनिकांच्यामध्यें, सिद्धसेन (५ वें शतक), हरिभद्र (८ वें शतक), विद्यानंद (९ वें शतक), हेमचन्द्र (११ वें शतक) यांची नावें प्रसिद्ध

आहेत.

जिनदत्तसूरींनीं जैनमत संक्षेपानें पुढील श्लोकांत दाखविलें आहे -

बलभोगोपभोगानामुभयोर्दानलाभयीः।
अन्तरायस्तथा निद्रा भीरज्ञानं जुगुप्सितम्।।१।।

हिंसा रत्यरती रागद्वेषावविरतिः स्मरः।
शोको मिथ्यात्वमेतेष्टादश दोषा न यस्य सः।।२।।

जिनो देवो गुरुः सम्यक्तत्त्वज्ञानोपदेशकः।
ज्ञानदर्शनचारित्राण्यपवर्गस्य वर्तनी।।३।।

स्याद्वादस्य प्रमाणे द्वे प्रत्यक्षमनुमापि च।
नित्यानित्यात्मकं सर्वं नव तत्त्वानि सप्त वा।।४।।

जीवाजीवौ पुण्यपापे चास्रवः संवरोपि च।
बन्धो निर्जरणं मुक्तिरेषां व्याख्याधुनोच्यते।।५।।

चेतनालक्षणोजीवः स्यादजीवस्तदन्यकः।
सत्कर्मपुद्गलाः पुण्यं पापं तस्य विपर्ययः।।६।।

आस्रवः स्रोतसो द्वारं संवृणोतीति संवरः।
प्रवेशः कर्मणां बन्धो निर्जरस्तद्वियोजनम्।।७।।

अष्टकर्मक्षयान्मोक्षोथान्तर्भावश्च कैश्चन।
पुण्यस्य संवरे पापस्यास्रवे क्रियते पुनः।।८।।

लब्धानन्तचतुष्कस्य लोकागूढस्य चात्मनः।
क्षीणाष्टकर्मणो मुक्तिर्निर्व्यावृत्तिर्जिनोदिता।।९।।

सरजोहरणा भैक्षभुजो लुञ्चितमूर्धजाः।
श्वेताम्बराः क्षमाशीला निःसंगा जैनसाधवः।।१०।।

**लुञ्चिताः पिच्छिकाहस्ताः पाणिपात्रा दिगम्बराः।**
**ऊर्ध्वाशिनो गृहे दातुर्द्वितीयाः स्युर्जिनर्षयः।।११।।**

**भुङ्क्ते न केवली न स्त्री मोक्षमेति दिगम्बरः।**
**प्राहुरेषामयं भेदो महाश्वेताम्बरैः सह।।**

४. **वैशेषिकदर्शन** - उञ्छवृत्ति भगवान् कणाद महर्षींनी वैशेषिक सूत्रांची रचना केली. धर्मानें अंतःकरण विशुद्ध झाल्यावर पदार्थतत्त्वज्ञान होऊन निःश्रेयसाची सिद्धि होते असें महर्षि कणाद म्हणतात. हें त्यांच्या पुढील सूत्रांतून त्यांनीं सुचविलें आहे-

**'१) अथातो धर्मं व्याख्यास्यामः। २)यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्म। ३) तद्वचनादाम्नायस्य प्रामाण्यम्। ४)धर्मविशेषप्रसूताद् द्रव्यगुणकर्मसामान्यविशेषसमवायानां साधर्म्यवैधर्म्याभ्यां तत्त्वज्ञानान्निःश्रेयसाधिगमः'** कश्यपगोत्रांतील हे महर्षि, कपोताप्रमाणें एकेक धान्यकण गोळा करून आहार करीत असत म्हणून यांना कणाद, कणभक्ष असें म्हणतात. उलूक ऋषींचें अपत्य म्हणून यांना औलूक्य असेंही म्हणतात. तपस्वी कणादमुनींना उलूकरूपानें परमेश्वरानें दर्शन देऊन सहा पदार्थांचा उपदेश केला म्हणून या दर्शनाला औलूक्यदर्शन असेंही म्हणतात अशी लोकप्रसिद्धि आहे. प्रमाणप्रमेयादि षोडशपदार्थज्ञानानें मोक्षप्राप्ति होते असें महर्षि गौतमांनी न्यायशास्त्रांत प्रतिपादन केलें. तें कणादानाही संमत आहे. तथापि धर्मी कोणते? ते किती आहेत? त्यांचे धर्म कोणते? व किती? इत्यादि स्पष्ट ज्ञान करून देण्याकरितां, द्रव्यगुणकर्मसामान्यविशेषसमवाय असे पदार्थांचे वर्ग पाडून सुव्यवस्थित निरूपण कणादांनीं या शास्त्रांत केलें आहे. या विशेषामुळें या दर्शनास वैशेषिक दर्शन असेंही नांव पडलें आहे. या शास्त्रांत प्रत्यक्ष व अनुमान हीं दोनच प्रमाणें मान्य केलीं आहेत. इतर प्रमाणांचा अनुमानांत अंतर्भाव होतो. अनुपलब्धि प्रमाणाचा प्रत्यक्षांत अंतर्भाव केला आहे.

या जगांत सर्वही विवेकसंपन्न जीव, निसर्गतः प्रतिकूल असणाऱ्या दुःखानें पीडित होऊन, त्याची निवृत्ति कशानें होईल हा विचार करीत असतात, परमेश्वरसाक्षात्कारच दुःखनिवृत्तीचा उपाय आहे असें त्यांनी ठरविलें याला पोषक श्रुतिप्रमाण असें- **'तमेव विदित्वातिमृत्युमेति नान्यः पन्था विद्यतेऽयनाय'** (श्वेताश्वतरोपनिषत् ३।८) ईश्वरसाक्षात्कार, श्रवण, मनन व निदिध्यासन या तीन उपायांनीं होतो. याला प्रमाण

**'आगमेनानुमानेन ध्यानाभ्यासरसेन च।**

**त्रिधा प्रकल्पयन् प्रज्ञां लभते योगमुत्तमम्।।'** (स.द.सं.वै.द.)

प्रथम वेदवाक्यांनी गुरूपासून ईश्वरस्वरूपाचे श्रवण. नंतर ऐकलेल्या अर्थाचें युक्तिपूर्वक मनामध्यें चिंतन करणें हें मनन आणि ऐकलेल्या, चिंतन केलेल्या अर्थाचें ध्यान करणें म्हणजे पुनः पुनः चित्तामध्यें त्याची भावना करणें हे तीन उपाय साक्षात्काराचे आहेत. यांपैकी मनन म्हणजे अनुमान. यालाच उदयनाचार्य उपासना असें म्हणतात. स्वतःच्या कुसुमांजलिग्रंथांत आरंभी त्यांनी तसें सुचविलें आहे.

**'न्यायचर्चेयमीशस्य मननव्यपदेशभाक्।**

**उपासनैव क्रियते श्रवणानन्तरागता।।'**

अनुमानाला व्याप्तिज्ञानाची जरूरी आहे. आणि व्याप्तिज्ञान तर पदार्थाचें स्पष्ट असंकीर्ण ज्ञान झाल्यावांचून होत नाहीं. याकरिता; द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष व समवाय या पदार्थांचा उद्देश, लक्षण व परीक्षा या पद्धतीनें श्रीकणादमुनींनी दहा अध्यायांचे वैशेषिकशास्त्र सूत्रबद्ध केलें. या कणादांच्या सूत्रावर, प्रशस्तपादांनीं लिहिलेला पदार्थसंग्रह नांवाचा ग्रंथ भाष्य म्हणून मानला गेला आहे. भाष्यावर श्रीधराचार्यांची (१० वें शतक) न्यायकंदली, उदयनाचार्यांची (१० वें शतक) किरणावली, व्योमशिवाचार्यांची (८ वें शतक) व्योमवती, वल्लभाचार्यांची (१२ वें शतक) लीलावती हे मान्य

टीकाग्रंथ आहेत. तसेंच जगदीशभट्टाचार्यांची भाष्यसूक्ति, शंकरमिश्रांचें कणादरहस्य, पद्मनाभमिश्रकृत सेतु, मल्लिनाथसूरिकृत भाष्यनिकष इत्यादि टीकाग्रंथ आहेत. उदयनाचार्यांच्या किरणावलीवर किरणावलीप्रकाश इत्यादि टीकाग्रंथ आहेत. तसेंच, न्यायकंदली, न्यायलीलावती यांच्यावर पंजिका, सार, प्रकाश, दीधिति इत्यादि अनेक टीकाग्रंथ आहेत. वैशेषिकसूत्रावरही, रावणभाष्य, भारद्वाजीयवृत्ति, शंकरमिश्रकृत उपस्कार, कणादसूत्रविवृति इत्यादि टीकाग्रंथ आहेत.

प्रथम उद्देश म्हणजे, नुसते नांवानें पदार्थ सांगणें, नंतर त्यांचें लक्षण, नंतर त्याची परीक्षा- लक्ष्यावर लक्षण संभवतें किंवा नाहीं ही चिकित्सा या तीन प्रकारांनीं शास्त्ररचना केलेली आहे. शास्त्रकार हे स्वतःच्या सिद्धांताबद्दल निर्भयपणानें स्वतःच चिकित्सा करतात. चिकित्सा ही शास्त्ररचनेमध्यें त्यांनीं घटकच मानली आहे. त्यावांचून शास्त्राची पूर्णताच नाहीं. अशी वस्तुस्थिति असतां, शास्त्रज्ञ हे बाबावाक्यं प्रमाणम् अशा विचाराचे असतात हा आक्षेप अज्ञानमूलकच ठरतो. प्राचीनशास्त्रज्ञ परप्रत्ययनेयबुद्धीचे केव्हांही दिसणार नाहींत. उलट केवल बुद्धिवादी म्हणविणारेच अंधश्रद्ध, गतानुगतिक होत असलेले दिसून येतें. **'प्रमाणैरर्थपरीक्षणं न्यायः'** हा न्याय शब्दार्थ आहे या पद्धतीचा पुरस्कार कणादादि महर्षींनीं केला आहे म्हणूनच, **'काणादं पाणिनीयं च सर्वशास्त्रोपकारकम्'** हें प्रसिद्ध वचन यथार्थ ठरतें.

**५. न्यायदर्शन** - न्यायदर्शनाचे कर्ते गौतम आहेत. यांनीं या शास्त्रावर पांच अध्याय सूत्ररचना केली आहे. गौतमांनाच अक्षपाद असेंही म्हणतात. याबद्दल आख्यायिका अशी आहे कीं- आपल्या मताचें खंडन करणाऱ्या व्यासांचें मुखावलोकनही करावयाचें नाहीं म्हणून गौतमांनीं डोळेच बंद केले. व्यासांनीं त्यांची समजूत घातल्यावर पायांतच त्यांनीं डोळे प्रकट करून व्यासांना पाहिलें म्हणून त्यांना अक्षपाद हें नांव पडलें. यामुळें या दर्शनाला अक्षपाद

दर्शन असेंही म्हणतात. तत्त्वज्ञानानें मोक्ष प्राप्त होतो हें वैशेषिकांचें मत गौतमांनाही मान्य आहे.

**‘प्रमाणप्रमेयसंशयप्रयोजनदृष्टान्तसिद्धान्तावयवतर्कनिर्णयवादजल्पवितण्डाहेत्वाभासच्छल जातिनिग्रहस्थानानां तत्त्वज्ञानान्निःश्रेयसाधिगमः’**

हे न्यायशास्त्राचें पहिलें सूत्र आहे. एकंदर सोळा पदार्थ या मतांत मानले आहेत. **‘मानाधीना मेयसिद्धिः’** या न्यायानें प्रथम प्रमाणाचा उल्लेख केलेला आहे. प्रत्यक्ष, अनुमान, उपमान व शब्द हीं चार प्रमाणें आहेत. प्रमाण शब्दाचा अर्थ यथार्थज्ञानसाधन असा विवक्षित आहे, तसेंच ज्ञाता-प्रमाता (?) हाही प्रमाणशब्दानें घेतला जातो. म्हणून, आप्त, यथार्थज्ञाता हाही प्रमाण मानला जातो व त्याचें वाक्य हेंही प्रमाण ठरतें. या दृष्टीनें ईश्वर हा सर्वज्ञ यथार्थज्ञानवान् असल्यानें तो प्रमाण आहे म्हणून त्यानें केलेले वेदही प्रमाण आहेत. ईश्वररूप कर्त्याच्या प्रामाण्यामुळे तत्कृत वेदाचें प्रामाण्य आहे असें नैयायिकांचें मत आहे.

**‘मितिः सम्यक्परिच्छित्तिः तद्वत्ता च प्रमातृता।**
**तदयोगव्यवच्छेदः प्रामाण्यं गौतमे मते’** (कुसुमांजलि ४।५)

असें याबद्दल वचन आहे.

**‘मन्त्रायुर्वेदप्रामाण्यवच्च तत्प्रामाण्यमाप्तप्रामाण्यात्’**

(गौतमसूत्र २।१।६७)

या सूत्रांत वेदप्रामाण्य हें, कर्त्याच्या, ईश्वराच्या प्रामाण्यावर अवलंबून आहे असें सुचविलें आहे.

प्रमाणप्रमेयादि पदार्थनिरूपण जरी या शास्त्रांत असलें तरी **‘असाधारण्येन व्यपदेशा भवन्ति’** या वचनाप्रमाणें, न्याय म्हणजे परार्थानुमान हें, सर्व विद्यांना उपयुक्त व सर्वकर्मानुष्ठानसाधक असल्यानें प्रधान आहे. म्हणून न्यायशास्त्र असें नांव प्रधानानुसारि असें या शास्त्राला दिलें.

(प्रतिज्ञा, हेतु, उदाहरण, उपनय व निगमन हे पांच अवयव म्हणजे न्याय किंवा परार्थानुमान. दुसऱ्याला अनुमानानें विषय पटवून देण्याकरितां याचा विशेष उपयोग आहे.) डोंगरावर अग्नि पाहून आलेला मनुष्य दुसऱ्या, गांवांतील मनुष्याला तें ज्ञान करून देण्याकरितां पांच अवयववाक्यांचा प्रयोग करून त्यालाही अग्निज्ञान करून देतो तें परार्थानुमान. १. पर्वतो वह्निमान् हें प्रतिज्ञावाक्य, २. धूमात् - हें हेतुवाक्य, ३. यो यो धूमवान् स स वह्निमान् हें उदाहरणवाक्य, ४. वह्निव्याप्यधूमवानयं हे उपनयवाक्य, ५. वह्निव्याप्यधूमवत्त्वाद्वह्निमान् हें निगमनवाक्य. या पांच वाक्यांमुळे ऐकणाऱ्याला पर्वतावर वह्नि आहे हें अनुमितिज्ञान यथार्थ होतें. अनुमानाचा विशेष पुरस्कार न्यायशास्त्रामध्यें केला आहे. याबद्दल श्रीवाचस्पतिमिश्रांचें वाक्य प्रसिद्ध आहे

**'प्रत्यक्षपरिकल्पितमप्यर्थमनुमानेन बुभुत्सन्ते तर्करसिकाः'**

न्यायविद्येलाच आन्वीक्षिकी हें नांव आहे.

**'प्रत्यक्षागमाभ्यामीक्षितस्यान्वीक्षणमन्वीक्षाप्रत्यक्षागमाश्रितमनुमानम्।**
**तया प्रवर्तत इत्यान्वीक्षिकी न्यायविद्या।।'**

(सर्वदर्शनसंग्रह टीका म.म.वासुदेवशास्त्री न्या. द.)

प्रत्यक्ष व आगम या दोन प्रमाणांनीं ज्ञात झालेल्या पदार्थांचें पुनः परीक्षण करणें हें अनुमान. याचा पुरस्कार करून प्रवृत्त होणारी न्यायविद्या आहे म्हणून हिला आन्वीक्षिकी असें म्हणतात. हिचें वर्णन न्यायभाष्यकार श्रीवात्स्यायन पुढील श्लोकांत करीत आहेत.

**'प्रदीपः सर्वविद्यानामुपायः सर्वकर्मणाम्।**
**आश्रयः सर्वधर्माणां विद्योद्देशे परीक्षिता।'**

(न्यायसूत्रभाष्य १।१।१)

परार्थानुमानरूप न्यायाचा परिवार फार मोठा या शास्त्रकारांनी

दाखविला आहे. हेत्वाभास, निग्रहस्थानें, जल्प, वितंडा, छल इत्यादि पदार्थांचे सविस्तर निरूपण या शास्त्रांत आहे. एखाद्या विषयावर वादी व प्रतिवादी यांनीं विचार कसा करावा? मध्यस्थ कसा असावा? वाद करणाऱ्यांचे कर्तव्य काय? मध्यस्थाचें कर्तव्य काय? इत्यादि विचार मुद्दाम केला आहे. जल्प, वितंडा इत्यादिकांचा अवलंब स्वतः वादीनें करूं नये. पण प्रतिस्पर्धी तसा भेटल्यास 'शठं प्रति शाठ्यम्' या न्यायानें तीही तयारी वादीची असली पाहिजे. नाहींतर स्वस्थ बसल्यास, आपला पक्ष खरा असूनही निष्कारण पराजय स्वीकारावा लागेल. आणि अज्ञानी माणसांची प्रतिवाद्याकडून फसवणूक होईल. याकरितां या सर्व पद्धति गौतमांनीं सांगितल्या आहेत. शत्रूनें हल्ला केल्यावर मित्रांचेकडून शस्त्रसाहाय्य घेण्याची सुरवात करण्यापेक्षां, प्रथमच आपली सेना सर्वविध शस्त्रसंपन्न करणें प्रशस्त ठरेल. म्हणून राजदूत म्हणून ज्याची नियुक्ति केली जाईल त्याला या सर्ववादपद्धतीचें व अनुमानाच्या इतरही सर्व परिकराचें उत्तम ज्ञान असणें अत्यंत पोषक आहे. बौद्धांच्या बरोबर वाद करून उदयनाचार्यांनीं ईश्वरसिद्धि जी केली ती या न्यायज्ञानाच्या बलावरच केली. त्यांचा याबद्दल 'न्यायकुसुमांजलि' नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

महर्षि गौतमांनीं प्रतिपादन केलेल्या प्रमाणप्रमेयादि सोळा पदार्थांपैकीं प्रमाणपदार्थाचाच विचार करण्याकरितां श्रीमान् गंगेशोपाध्यायांनी प्रत्यक्षादि चार प्रमाणांचे परीक्षणरूप बारा हजार श्लोकसंख्या होईल असा 'तत्त्वचिन्तामणि' नांवाचा मोठा निबंध रचलेला आहे. या निबंधापासूनच नव्यन्यायाची परंपरा सुरूं झाली. श्रीगंगेशोपाध्याय विक्रमशकाच्या बाराव्या शतकांत होऊन गेले. तत्त्वचिंतामणीवर पुष्कळांनीं टीका केल्या. पण त्यामध्यें श्रीरघुनाथतार्किकशिरोमणींची दीधितिटीका विशेष पुढें आली. तीच आज अध्ययनपरंपरेंत आहे. या दीधितीवर जगदीशभट्टाचार्यांची जागदीशी, गदाधरभट्टाचार्यांची गदाधारी या टीका आज अध्ययन परंपरेमध्यें विशेष प्रसिद्ध आहेत. त्यानंतरचे सर्वहि शास्त्रांतील टीकाग्रंथ प्रायः नव्यन्यायघटित भाषेमध्यें

लिहिले गेले आहेत.

महर्षी गौतमांनी मोक्षप्राप्ति कशी होते याचा क्रम पुढील सूत्रांत दाखविला आहे - **'दुःखजन्मप्रवृत्तिदोषमिथ्याज्ञानानामुत्तरोत्तरापाये तदनन्तरापायादपवर्गः'** (गौतमसूत्र १।१।२) पदार्थतत्त्वज्ञानानें मिथ्याज्ञानाचा नाश होतो. मिथ्याज्ञान म्हणजे देहादि अनात्म पदार्थांचे ठिकाणी होणारी आत्मबुद्धि. त्या मिथ्याज्ञानानें देहादिकांना अनुकूल असणाऱ्या पदार्थांची इच्छा व प्रतिकूलाविषयीं द्वेष हे दोष उत्पन्न होतात. त्या दोषांमुळे जीवाची पाप-पुण्याकडे प्रवृत्ति होते. त्या पापपुण्यामुळें जन्म येतो आणि जन्मामुळें दुःखभोग अपरिहार्य होतो. म्हणून पदार्थतत्त्वज्ञानानें मूळ मिथ्याज्ञानच नष्ट झाल्यावर रागद्वेषादि दोष नाहीसे होतात. दोष गेल्यामुळें पुण्यपापात्मक प्रवृत्ति बंद पडते. प्रवृत्ति थांबल्यामुळें जन्म येत नाहीं. जन्म नाहीं म्हणून दुःखाचाही संबंध पूर्णरीतीनें सुटतो. पूर्ण दुःखनिवृत्ति म्हणजेच मोक्ष. तत्त्वज्ञानानें मोक्ष मिळण्याचा असा क्रम या शास्त्रांत दिला आहे. तात्पर्य, धर्मानुष्ठानानें ईश्वरप्रसाद प्राप्त करून घेतला असतां तत्त्वज्ञान होऊन त्यानें इष्ट अशा मोक्षाची प्राप्ति होते असा नैयायिकांचा सिद्धान्त आहे.

६. **मीमांसादर्शन** - धर्मानुष्ठानाची आवश्यकता, न्यायवैशेषिकशास्त्रामध्यें दाखविली आहे. धर्म व अधर्म हे मूर्त पदार्थ नसल्यानें ते फक्त वेदप्रमाणानेंच कळणें शक्य आहे. त्यांचे यथार्थ ज्ञान व्हावें व धर्मानुष्ठानाची पद्धति समजावी म्हणून जैमिनी महर्षींनी बारा अध्यायांचें मीमांसाशास्त्र सूत्ररूपानें तयार केलें. धर्माचें ज्ञान अनुष्ठानाकरितां व अधर्माचें ज्ञान परिहाराकरितां करून दिलें आहे. **'ज्योतिष्टोमेन स्वर्गकामो यजेत'** या वेदवाक्यानें, स्वर्गाची इच्छा असणाऱ्यानें ज्योतिष्टोम याग करावा एवढेंच सांगितलें. पण तो याग केव्हां करावा? कोणी करावा? इत्यादि कर्तव्याचे प्रकार मीमांसाशास्त्रावांचून समजूं शकत नाहींत. म्हणून वेदवाक्यार्थ कसा करावा ही पद्धति मीमांसाशास्त्रानें दाखविली आहे. याबद्दल श्री

कुमारिलभट्टोकवार्तिकांत लिहितात-

**'धर्मे प्रमीयमाणे हि वेदेन करणात्मना।**
**इतिकर्तव्यताभागं मीमांसा पूरयिष्यति।।'**

म्हणूनच या शास्त्राला वाक्यशास्त्र असें म्हणतात. पदशास्त्र म्हणजे व्याकरणशास्त्र. प्रमाणशास्त्र म्हणजे न्यायशास्त्र आणि वाक्यशास्त्र म्हणजे मीमांसाशास्त्र. मीमांसाशास्त्रांत अधिकरणपद्धतीनें विचार केला आहे. विचार हा सहा अंगांनीं पूर्ण होऊं शकतो -

**'विषयो विशयश्चैव पूर्वपक्षस्तथोत्तरः।**
**प्रयोजनं संगतिश्च शास्त्रेधिकरणं स्मृतम्।।'**

या श्लोकामध्यें ती सहा अंगे दाखविलीं आहेत. हीच विचाराची पद्धत बहुतेक न्यायालयांतून स्वीकारलेली आहे. वाक्यतात्पर्याचा निर्णय करण्याकरितां मीमांसकांनीं सहा हेतु मानले आहेत. ते पुढील श्लोकांत दाखविले आहेत-

**'उपक्रमोपसंहारावभ्यासोऽपूर्वता फलम्।**
**अर्थवादोपपत्ती च लिंग तात्पर्यनिर्णये।।'**

या सहा लिंगांनीं सर्वत्र तात्पर्यनिर्णय करतां येतो. यापैकीं, उपक्रमोपसंहार, अभ्यास व अर्थवाद ही तीन शब्दघटित असल्यामुळें शब्दनिष्ठ आहेत. अज्ञातत्वरूप अपूर्वत्व, फलवत्व व अबाधितत्वरूप उपपत्ति ही तीन अर्थनिष्ठ आहेत. उपक्रमोपसंहार म्हणजे विचार्य वाक्य किंवा प्रकरण याचा आदि व अंतभाग एकार्थपर्यवसायी असणें. अभ्यास म्हणजे एकाच अर्थाला बोधक असा पुनः शब्दप्रयोग, अर्थवाद म्हणजे स्तुति किंवा निंदा या अर्थाचें बोधक वाक्य. त्यांपैकीं **पहिलें**, एकाच अर्थामध्ये तात्पर्यनिर्णायक आहे. प्रकरणतात्पर्य अनेक अर्थांमध्यें आहे असा संशय उत्पन्न झाला असतां, त्या प्रकरणाचें आदि व अंतभाग ज्या अर्थाचे बोधक असतील त्याच अर्थामध्यें प्रकरणाचे तात्पर्य निश्चित करतां येतें. नाहींतर एकार्थक उपक्रमोपसंहार व्यर्थ

ठरतील. **दुसरें अभ्यासलिंग** हें क्रियाबोधक वाक्यामध्यें भिन्नार्थप्रतिपादक आहे. जसें, **'समिधो यजति, तनूनपातं यजति, इडो यजति, बर्हिर्यजति, स्वाहाकारं यजति'** हे पांच प्रयाजयाग दर्शपूर्णमासप्रकरणांत त्याचें अंग म्हणून वरील वाक्यांनीं विहित आहेत. या पांचही वाक्यांत यजति यजति असा अभ्यास आहे. हा पांच वेळां केलेला यजतिप्रयोग, पाच याग भिन्न आहेत असें ठरविण्यास कारण झाला. कर्मभेदक प्रमाणामध्यें अभ्यासहि एक प्रमाण मीमांसकांनीं मानलें आहे. म्हणजे येथील अभ्यास हा अर्थभेद दाखविणारा आहे. येथें यागरूप क्रिया ही, एका वाक्यानें विहित झाल्यावर पुनः तिचें विधान दुसऱ्या वाक्यानें संभवत नाहीं. म्हणून तेथें पांच याग वेगवेगळे मानावे लागतात. पण हाच अभ्यास जर सिद्ध अर्थाविषयी असेल तर तो त्याच अर्थांत प्रकरणतात्पर्य निश्चित ठरविणारा होतो. नाहींतर पुनः त्याच अर्थाचें वाक्य व्यर्थ ठरेल. म्हणून एकाच अर्थाला बोधक अशीं जर वाक्यें असतील तर तीं त्या अर्थाविषयीं आदर व्यक्त करून तोच अर्थ तात्पर्यविषय आहे हें ठरविणारीं होतात. हेंच भामतीकारांनीं पुढील वाक्यानें सुचविलें आहे- **'अभ्यासे हि भूयस्त्वमर्थस्य भवति, यथा अहो दर्शनीया अहो दर्शनीया इति'**- या प्रमाणें दुसरें अभ्यासप्रमाणही तात्पर्यनिर्णायक ठरतें. **तिसरें अर्थवाद** हें लिंग. अर्थवादवाक्यानें ज्याची स्तुति किंवा निंदा केली असेल तो अर्थ प्रशस्त किंवा अप्रशस्त आहे असें ठरतें व तोच प्रकरणतात्पर्यविषय असलेचें निश्चित होतें. हीं शब्दनिष्ठ तीन लिंगें झालीं. **अपूर्वता हें चौथें लिंग**- प्रकृतवाक्यार्थज्ञानाचा जो विषय, तो पूर्वी अज्ञात असणें. **फल**- म्हणजे प्रकृतज्ञान सफल असणें. **उपपत्ति** म्हणजे- प्रकृतज्ञानाचा विषय अबाधित असणें. हीं तीन अर्थनिष्ठ लिंगें आहेत. म्हणजे जो पदार्थ अज्ञात व अबाधित असून ज्याच्या ज्ञानाला कांहीं तरी फल आहे तोच अर्थ प्रकृत वाक्य-तात्पर्यविषय ठरतो व त्याचेंच ज्ञान यथार्थ ठरतें. याप्रमाणें सहा लिंगांनीं मिळून तात्पर्यनिर्णय होतो.

याप्रमाणें तात्पर्यनिर्णयाकरितां शब्द व अर्थ या दोघांचेही परीक्षण

करण्याची पद्धति मीमांसकांनी स्वीकारली आहे. या पद्धतीनेंच वेदवाक्यार्थाचा विचार झाला पाहिजे. ही मीमांसापद्धति अद्वैतवेदान्त्यांनींही **'व्यवहारे भाट्टनयः'** या न्यायानें उपनिषद्वाक्यार्थविचाराकरितां अवलंबिली आहे. वाक्यार्थविचाराकरितां ऐतिहासिकपद्धति नांवाची दुसरी एक पद्धति, इंग्रजांच्या भारतप्रवेशापासून पुढें आलेली दिसते. या पद्धतीचें निश्चित स्वरूप अद्यापि व्हावें तसें स्पष्ट झालेलें नाहीं. ग्रंथकर्ता कोण आहे? तो कोणत्या भूमिकेवरून ग्रंथ लिहितो? ग्रंथनिर्मितिकालीन परिस्थिति कशी होती? इत्यादि ग्रंथबहिर्भूत विषयाच्या विचाराचें महत्त्व या पद्धतींत प्रायः मानलें जातें. हें सर्वथा अयोग्य आहे असें नाहीं. पण याचा उपयोग कोणाला कितीसा होणार हा विचार प्रथम झाला पाहिजे. सिद्ध व साधक असे जीवांचे दोन वर्ग दिसतात. यांनाच आपण ज्ञानी व कर्मी असें मानूं. कर्मरूप साधनांची ज्याला जरूरी आहे तो कर्मी, व ज्याची जरूरी त्याच्या स्वतःच्या दृष्टीनें संपली आहे तो ज्ञानी म्हणजे कृतार्थ. कर्मरूप साधनें करावींत का न करावींत असा विषय एखाद्या ग्रंथकारानें विचाराकरितां घेतला आहे असें आपण दृष्टान्ताकरितां घेऊं. तीं करावींत वा न करावींत असे दोन्ही प्रकारचे उल्लेख जर त्या ग्रंथांत असतील, तर ग्रंथकाराचें मुख्य तात्पर्य कोणीकडे आहे असा संशय उत्पन्न होऊन विचारास आरंभ होतो. ज्या विचारांचें पर्यवसान प्रत्यक्ष अनुष्ठानांत पर्यवसित होत असेल तोच विचार सफल होईल. या दृष्टीनें अनुष्ठानाची खरी जरूरी साधकालाच असल्यानें त्याच्या प्रवृत्तीला पोषक असणारा विचारच महत्त्वाचा मानला जाणें अपरिहार्य आहे. अमुक ज्ञानी मनुष्यानेंही कर्म केलें हा विचार ज्ञानी माणसाला उपयोगी पडत नाहीं. त्याची कर्माकडे कदाचित् प्रवृत्ति दिसली तरी ती वरील विचाराचें कार्य ठरणार नाहीं. त्याचें वैयक्तिक कार्य कांहींच अवशिष्ट राहिलेलें नसल्यानें सर्वभूतहितेरत असणारा ज्ञानी मनुष्य, स्वतःच्या असंमूढ स्थिर बुद्धीनेंच सर्व कार्यनिर्वाह करीत असतो, म्हणून त्याच्या दिसणाऱ्या प्रवृत्तीला कोणत्याही ग्रंथांतर्भूत अथवा बहिर्भूत विचाराची बिलकूल अपेक्षा नाहीं. आतां साधकाला

प्रवृत्तिपोषक विचार ऐकणें जरूर आहे, पण त्याला सुद्धां, अनुष्ठेय कर्माचें स्वरूप, त्याचा अनुष्ठान प्रकार, त्याचें फल, काल इत्यादि संबंधीं असलेले अंतरंग विचारच मुख्य उपयुक्त ठरणार, ज्ञानी मनुष्यानेंही कर्म केलें या विचाराचा त्यालाही खरा उपयोग नाहीं, कर्मानुष्ठान करणाऱ्याला त्याचें फळ कसें मिळालें हाच विचार त्याला विशेष उपयोगी पडेल. प्राध्यापकही अभ्यास करतात हा विचार विद्यार्थ्याला मुख्यतः उपयोगी नाहीं तर अमुक विद्यार्थ्यानें अभ्यास केला, त्यामुळें तो उत्तीर्ण चांगल्या प्रकारें होऊन त्याला पारितोषिक मिळालें इत्यादि विचारच विद्यार्थ्याच्या प्रवृत्तीला खरे पोषक ठरतात. तात्पर्य, साधकाला फलपर्यवसायी होतील असे विचार ऐतिहासिक पद्धतींत फारसे सांपडणार नाहींत. तसेंच ऐतिहासिक पद्धतीमध्यें तर्काला प्राधान्य आहे आणि तर्क तर कोणताहि प्रतिष्ठित नाहीं हें सर्वही विचारी माणसांना संमत आहे. मीमांसाशास्त्र हें, वेदवाक्यार्थ निर्णयाकरितांच प्रवृत्त झालें असल्यानें, मीमांसा पद्धतींत शब्दप्रमाणालाच प्राधान्य आहे व तेंच उचितही आहे. म्हणून मीमांसक हे खरे श्रौतदर्शनकार म्हणून समजले जातात. यांचें शब्दप्रामाण्य इतकें बलिष्ठ आहे कीं, त्याकरितां त्यांनीं वेद अपौरुषेय ठरविले. आणि त्याकरितां ईश्वरतत्त्वही अमान्य केलें. याकरतांच उपक्रमादि सहा लिंगांचा सविस्तर विचार वर दिला आहे. शब्दापासून यथार्थज्ञान संपादन करण्याकरितां त्यांचाच मुख्य उपयोग आहे. अज्ञातत्व, फलवत्व व अबाधितत्व हीं अर्थनिष्ठ तीन लिंगें तर प्रत्यक्ष, प्रामाण्य शरीरामध्यें घटकच आहेत. शब्दनिष्ठ लिंगाचा उपयोग, संदेह दूर करून तात्पर्यनिर्णयाला कसा होतो हें वर त्यांचे उपपादनामध्यें दाखविलें आहे. या एकंदर विवेचनाचा उद्देश इतकाच कीं, वेदवाक्यांचा अर्थ करीत असतांना त्यांच्याविषयी प्रामाण्य, विचारानंतर कांहींतरी प्रवृत्तिपर्यवसायी फल आणि परंपरेशीं आत्यंतिक विरोध न येतां तिचें संरक्षण या गोष्टी मुख्यतः लक्षांत ठेवून भारतीयांनीं तरी, वेदवाक्यार्थविचाराची ही पद्धति स्वीकारणें श्रेयस्कर आहे. केवल एक वाङ्मय ही दृष्टी आणि परंपराप्राप्त वाङ्मय ही दृष्टी

यांच्यामध्यें महदंतर आहे. पहिली यथाकथाचित त्याच्या संरक्षणाला कदाचित् उपयोगी पडेल. पण दुसरी दृष्टि, पारंपारिक वाङ्मयाधिष्ठित असणाऱ्या राष्ट्राच्या संरक्षणास उपयोगी पडणारी आहे. बाह्यवेषभूषादिकांनीं व आंतर विचारांनीं परिपूर्ण परदेशीय बनून राहाणाऱ्यांचा स्वदेशाभिमान फक्त वाच्विवीर्यरूपानेंच, तो सुद्धां कांही काळच राहाणार, बलवत्तर परचक्र आल्यावर तो अभिमान केव्हांच विलीन होऊन जातो. पारंपारिक वाङ्मयदृष्टिसंपन्न प्रेक्षावान् हे केवळ जिज्ञासू वा केवलवाग्मी न बनतां, कोणत्याही मोठ्या प्रतिस्पर्ध्यापुढें प्रसंगी प्राणार्पणही करून, उत्तर कालांतही उज्ज्वल देशाभिमानी तयार करीत राहाणारा आपला आदर्श ठेवणारे अविनाशी राष्ट्रपुरुष होऊन राहातात. राजा मानसिंग आणि राणाप्रताप ही दोनच निदर्शनें या दोन दृष्टीकरितां पुरेशी होतील.

वेदांचा बराच भाग कर्मप्रतिपादक आहे. या कर्माचें सोपपत्तिक विवेचन करणें हें मीमांसाशास्त्राचें उद्दिष्ट आहे. वेदवाक्यार्थविचार व धर्मशास्त्रार्थनिर्णय मीमांसेमुळेंच योग्य प्रकारें होऊं शकतो. कर्मासंबंधीच विशेष विचार या शास्त्रानें केल्यामुळें याला कर्ममीमांसा असेंही नांव आहे. शब्द नित्य आहे व अर्थही नित्य आहे. यामुळें वेदाला पुरुषबुद्धीचा संबंध नाहीं असें या शास्त्रांत तर्कपुरःसर सिद्ध केलें आहे. यांच्या मतानें सृष्टि व प्रलय नसून विश्व हें अनादि अनंत असें आहे. शास्त्रविहित कर्मांनी जीवाला मोक्षापर्यंत जातां येतें असें मीमांसक म्हणतात. हें शास्त्रीयप्रयत्नवादाचा पुरस्कार करणारे असल्यानें खरे कर्मयोगी व आशावादी आहेत.

पूर्वमीमांसा किंवा कर्ममीमांसाशास्त्रांतील ग्रंथरचनाही विपुल आहे. या शास्त्रांतील सूत्ररचना महर्षि जैमिनिमुनीनीं केली आहे. विक्रमसंवत्सरापूर्वीं पांच सहाशे वर्षे हा काल जैमिनींचा आहे असें पं. बलदेवोपाध्यायांचें मत आहे. आचार्य जैमिनींची सूत्रें, इतर सर्व दर्शनांतील सूत्रांपेक्षां अधिक आहेत. या सूत्रावर श्रीशबरस्वामींनीं केलेलें अत्यंत विस्तृत, प्रामाणिक असें भाष्य

आहे. विक्रम संवत्सराच्या तिसऱ्या शतकांत शबरभाष्य निर्माण झालें. या भाष्याच्या आधारानें मीमांसाशास्त्रांत, भाट्टमत, गुरुमत व मुरारिमत अशीं तीन मतें प्रचलित आहेत. जैमिनीसूत्रावर आचार्य उपवर्ष व भवदास यांचे वृत्तिग्रंथ असल्याचा उल्लेख सांपडतो. पण ते ग्रंथ सांप्रत उपलब्ध नाहींत. भट्टमताचे प्रधानाचार्य श्रीकुमारिलभट्ट हे, विक्रमशकाच्या सातव्या शतकांत होऊन गेले. या महानुभावांचें अलौकिक पांडित्य आणि विलक्षण तार्किकत्व; शाबरभाष्याच्या प्रथमाध्याय प्रथमपादाचें व्याख्यान म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्लोकवार्तिक नांवाच्या श्लोकात्मक ग्रंथावरून तसेंच, प्रथमाध्याय द्वितीय पादापासून तृतीयाध्यायापर्यंत शाबरभाष्याचें गद्यात्मक व्याख्यानरूप तंत्रवार्तिक म्हणून प्रसिद्ध असलेल्या ग्रंथावरून कळून येण्यासारखें आहे. श्रीकुमारिलभट्टांचे प्रसिद्ध शिष्य मंडनमिश्र यांनीं, विधिविवेक, भावनाविवेक, विभ्रमविवेक इत्यादि ग्रंथांची रचना करून भाट्टमताचें पोषण केलें. यांच्याच विधिविवेक नांवाच्या ग्रंथावर श्रीवाचस्पतिमिश्रांनीं, न्यायकणिका नांवाची टीका लिहिली असून तत्त्वबिंदु नांवाचा शब्दार्थविचारपर स्वतंत्र ग्रंथही लिहिला आहे. श्रीकुमारिलभट्टांच्या उम्बेक नांवाच्या शिष्यानें श्लोकवार्तिक व भावनाविवेक यांवर तात्पर्यविवृति नांवाची टीका लिहिली आहे. भाट्टमतांतील आचार्यांच्या पैकीं श्रीपार्थसारथिमिश्र हे एक प्रसिद्ध आचार्य होऊन गेले. यांनीं श्रीकुमारिलभट्टांच्या टुपटीकेवर (तंत्रवार्तिकाच्या पुढील शाबरभाष्याची संक्षिप्त टीका) तंत्ररत्न ही टीका, श्लोकवर्तिकावर सर्वमान्य अशी न्यायरत्नाकर नांवाची टीका, शास्त्रदीपिका नांवाचा भाट्टमतांतील विशेष प्रमाणभूत असा मौलिक ग्रंथ याची रचना केली. सुप्रसिद्ध वेदभाष्यकार सायणाचार्य यांचे ज्येष्ठ बंधु जे माधवाचार्य, यांनीं, जैमिनीयसूत्रव्याख्यानरूप असा जैमिनीयन्यायमालाविस्तर नांवाचा ग्रंथ केला आहे. विक्रमशकाच्या अठराव्या शतकांत श्रीखंडदेवमिश्रांनीं केलेला भाट्टदीपिका नांवाचा ग्रंथ आज मीमांसाशास्त्राच्या अध्ययनपरंपरेमध्यें आहे. या श्रीखंडदेवांचे गुरु श्रीविश्वश्वरभट्ट यांनीं मीमांसासूत्रावर, भाट्टचिंतामणि

नांवाची सरल टीका निर्माण केली. यांच्या समकालीन असणाऱ्या श्रीअप्पय्यदीक्षितांनीं, विधिरसायन, उपक्रमपराक्रम इत्यादि ग्रंथ केले. आपोदेवांनीं मीमांसान्यायप्रकाश नांवाचा ग्रंथ व त्यावरील त्यांच्या पुत्रानें केलेली भाट्टालंकार नांवाची टीका अध्ययनपरंपरेंत प्रसिद्ध आहे. गुरुमत ज्यांच्यामुळें प्रकाशित झाले ते आचार्य प्रभाकरमिश्र हे विक्रमशकाच्या सातव्या शतकांतच कुमारिलभट्टांच्याही पूर्वी झाले असें विद्वानांचें मत आहे. यांची शाबरभाष्यावर बृहती नांवाची टीका आहे. या टीकेवर, विक्रमशकाच्या दहाव्या शतकांतील शालिकनाथाचार्यांनीं ऋजुनिर्मला नांवाची टीका केली असून, प्रकरणपंचिका नांवाचा एक स्वतंत्र श्रेष्ठ ग्रंथही केला आहे. यांचें मत 'मुरारेस्तृतीयः पन्थाः' (?) या उक्तिप्रमाणें भाट्टमतापेक्षां कांहीं विशिष्ट रूपानें प्रसिद्ध आहे. गंगेशोपाध्यायांच्या तत्त्वचिंतामणि ग्रंथांत यांच्या मताचा उल्लेख दिसतो. यांचा काल विक्रमशकांतील बारावें शतक हा आहे.

**७. सांख्यदर्शन** - सांख्यदर्शनाचे सूत्रकार महर्षि कपिल हे होत. यांनीं एकंदर सहा अध्याय मिळून ५२४ सूत्रें रचलेलीं आहेत. या शास्त्रावर महर्षि कपिलांच्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या सूत्रांचा समय वैक्रमपंचमशताब्दी हा विद्वानांनीं मानलेला आहे. कपिल मुनींचे शिष्य आसुरि, यांचे शिष्य पंचशिख यांनीं केलेला षष्टितंत्र नांवाचा ग्रंथ सांप्रत उपलब्ध नाहीं. सांख्यसिद्धान्तप्रतिपादक असा सध्यां उपलब्ध असलेला प्रामाणिक ग्रंथ ईश्वरकृष्णकृत सांख्यकारिका म्हणून प्रसिद्ध आहे. याचा काल विक्रमप्रथमशताब्दी आहे. यावर, आचार्य माठरांची माठरवृत्ति (विक्रम द्वितीय शतक) आचार्य गौडपदांचे भाष्य (विक्रमपंचमशतक) श्री वाचस्पतिमिश्रांची तत्त्वकौमुदी, श्रीशंकराचार्यांची जयमंगला हे टीकाग्रंथ उपलब्ध आहेत. सांख्यसूत्रावर विज्ञानभिक्षूंनीं केलेलें सांख्यप्रवचनभाष्य (विक्रमशक १६ वें शतक) प्रसिद्ध आहे.

सांख्यमतांत, त्रिगुणात्मक मूलप्रकृति, ही मूलतत्त्व असून तिचाच क्रमानें झालेला परिणाम, रूपांतर म्हणजे हें जग आहे हा सिद्धान्त पुढील कारिकेंत दाखविला आहे-

**'प्रकृतेर्महांस्ततोहंकारस्तस्माद्गणश्च षोडशकः।**

**तस्मादपि षोडशकात्पंचभ्यः पंचभूतानि'**

(-सांख्यकारिका २)

सांख्यांनीं सत्कार्यवाद मानला आहे. हाच तार्किकांच्या आरंभवादापेक्षा संयुक्तिक असून तो विवर्तवादाला जवळचा आहे. सांख्यांच्या मतें, प्रत्यक्ष, अनुमान व शब्द हीं तीनच प्रमाणें आहेत.

**'अजामेकां लोहितशुक्लकृष्णां बह्वीः प्रजाः सृजमानां सरूपाः'**

(श्वेताश्वतरोपनिषत् ४।५)

इत्यादि श्रुतिवाक्यानें त्रिगुणात्मक मूलप्रकृति दाखविली आहे असें सांख्यांचें मत आहे. या प्रकृतिलाच, अव्यक्त, प्रधान अशीं नांवें आहेत. सांख्यमतांत, अचेतन प्रकृतीच पुरुषाला भोग व अपवर्ग देण्याकरितां परिणाम पावते. तिचा प्रेरक, अधिष्ठाता ईश्वर वगैरे कोणीं नाहीं. प्रकृति व पुरुष यांचा संबंध, पंगु व अंध यांच्याप्रमाणें परस्परापेक्षेनें घडून आल्यानें सृष्टि झाली. बुद्धि व पुरुष यांचा भेदग्रह असल्यामुळें बुद्धिनिष्ठ संसार पुरुषाचे ठिकाणी भासूं लागला. तो शेवटीं विवेकग्रह झाला असतां दूर होतो. यांच्या मतांत सत्त्वपुरुषान्यताख्याति म्हणजे बुद्धि व आत्मा यांचें भेदज्ञान हेंच तत्त्वज्ञान होय. हें ज्याला होतें त्याला ऐकान्तिक, आत्यन्तिक दुःखध्वंसरूप मोक्षाची प्राप्ति होते. बाकीचे आत्मे संसारीच राहातात. याप्रमाणें हे अनेकात्मवादी व परिणामवादी असल्यानें द्वैतीच आहेत. यामुळें यांच्या मताचें प्रामुख्यानें खंडन, प्रधानमल्लनिबर्हणन्यायानें श्रीशंकराचार्यांनीं सूत्रभाष्यांत वेळोवेळीं केलें आहे.

या मतांत जन्म व नाश या शब्दांचा अर्थ आविर्भाव व तिरोभाव असा आहे. कोणताही पदार्थ जगांत अगदीं नवीन नाहीं व कोणाचाही नाश नाहीं. फक्त व्यक्त व अव्यक्त अशा अवस्था पदार्थांच्या होत राहातात. अणूमध्यें असणारीच शक्ति, शास्त्रज्ञांनीं फक्त व्यक्त केली. ती कांहीं त्यांनीं नवीन निर्माण केली नाहीं. हा यांचा फार महत्त्वाचा सिद्धान्त आहे. तसेंच आत्मस्वरूप यांनीं श्रुतिसंमत असें दाखविलें आहे. असंग, उदासीन, कूटस्थ, बोधरूप आत्मा आहे असें सांख्य सांगतात. याप्रमाणें निरीश्वर सांख्यांचें हें मत संक्षेपानें दिले आहे.

**८. योगदर्शन** - योगदर्शन किंवा पातंजलदर्शन हे पतंजलींनीं केलें आहे. योगशास्त्राचे आद्य प्रवर्तक हिरण्यगर्भ हे असल्यानें पतंजलि हे त्याचे प्रचारक, संकलन करणारे ठरतात. यांची सूत्ररचना विक्रमशकाच्या पूर्वीं दुसऱ्या शतकांत झाली असावी असें विद्वानांचें मत आहे. याच्यावर व्यासभाष्याची रचना विक्रमतृतीय शताब्दींत झाली. तिचे कर्ते पौराणिक व्यासापेक्षां कोणी निराळे असावेत असे संशोधक मानतात. तसेंच राघवानन्दसरस्वतीकृत पातंजलरहस्य, विज्ञानभिक्षुकृत योगवार्तिक, हरिहरानंदकृत भास्वती इत्यादि व्याख्यानग्रंथही योगसूत्रावर उपलब्ध आहेत. तसेंच भोजांची भोजवृत्ति, भावागणेशांची योगसूत्रवृत्ति, रामानंदयतींची मणिप्रभा, अनन्त पंडितांची योगचंद्रिका, सदाशिवेन्द्रसरस्वतींचा योगसुधाकर, नागोजीभट्टांची लघ्वी व बृहती असे टीकाग्रंथही, योगसूत्रावरील प्रसिद्ध आहेत. या शास्त्रांत, समाधि, साधन, विभूति व कैवल्य असे चार पाद आहेत. प्रथम पादांत, **'योगश्चित्तवृत्तिनिरोधः'** (पातंजल योगसूत्र १।२) या सूत्रानें योग म्हणजे काय तें दाखवून, पुढें सविस्तर समाधींचे निरूपण केलें आहे. दुसऱ्या पादांत; **'तपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि क्रियायोगः'** (योगसूत्र २।१) इत्यादि सूत्रांनीं व्युत्थितचित्त पुरुषाकरितां, क्रियायोग आणि यम, नियम, आसन, प्राणायाम व प्रत्याहार हीं पांच बहिरंग साधनें सांगितलीं आहेत. तिसऱ्या पादांत

**'देशबंधश्चित्तस्य धारणा'** (योगसूत्र ३।१) इत्यादि सूत्रांनीं धारणा, ध्यान व समाधि हीं तीन अंतरंग साधनें, ज्यांना संयम असें म्हणतात तीं सांगून त्यांचें आनुषंगिक फल सर्वविभूति म्हणजे सिद्धी सांगितल्या आहेत. चवथ्या पादांत; **'जन्मौषधिमन्त्रतपःसमाधिजाः सिद्धयः'** (पा. योगसूत्र ४।१) इत्यादि सूत्रांनीं, पांच प्रकारच्या सिद्धींचें सविस्तर निरूपण करून मुख्यफल कैवल्यरूप दाखविलें आहे. सांख्यशास्त्रांतील प्रकृत्यादि पंचवीस तत्त्वें योगशास्त्रकारांनाही मान्य आहेत. सव्वीसावें ईश्वरतत्त्व एक यांनीं जास्ती मानलें आहे. यांमुळें यांना सेश्वरसांख्य असेंही म्हणतात. कापिलसांख्याला निरीश्वरसांख्य असें म्हणतात. अविद्यादि पांच क्लेश, विहित प्रतिषिद्धकर्म, त्याचें जन्म, आयुष्य व भोगरूप फल व संस्कार यांचा ज्याला कालत्रयांत स्पर्श नसतो तो ईश्वर असें योगी मानतात. तो आपल्या इच्छेनें एक अथवा अनेक शरीरें एकदम धारण करून, लौकिक, वैदिक सर्व संप्रदायांचा प्रवर्तक होतो आणि दुःखी जीवांना अनुग्राहकही होतो.

हें शास्त्र प्रत्यक्ष अनुष्ठान करण्याचें म्हणजे प्रयोगशास्त्र आहे. तप इत्यादि क्रियायोग जरी यांच्यामध्यें सांगितला असला तरी तो बहिरंग साधन म्हणून सांगितला आहे. मुख्य लक्षण योगाचें, चित्तवृत्तिनिरोध हेंच येथें आरंभीच सांगितलें आहे. तसेंच योगी, मीमांसकांचेप्रमाणें प्रयत्नवादी आहेत.

**'शुभाशुभाभ्यां मार्गाभ्यां वहन्ती वासनासरित्।**
**पौरुषेण प्रयत्नेन योजनीया शुभे पथि।।'**

हा यांचा महत्त्वाचा सिद्धांत व्यवहारपोषकही आहे. साधकाकडून होणारे प्रयत्न निर्विघ्नपणें यशस्वी होण्याकरितां **'ईश्वरप्रणिधान'** हें साधन या शास्त्रांत सांगितलें आहें. यामुळें प्रयत्नांत शैथिल्य न येतां, खंबीर सेनापतीच्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या सैनिकाप्रमाणें उलट उत्साही वृत्ति, साधकाची नेहेमीं राहूं शकते. प्रायः सर्वच लोक परप्रत्ययनेयबुद्धि असल्यानें त्यांना कोणातरी

मार्गदर्शकाची नेहमीं जरूरी आहे हें आजच्या विसाव्या शतकांतही, वेगवेगळे पक्ष, उपपक्ष पाहून मान्य करावें लागतें. त्यांतच एखादा पक्षनेता गेल्याबरोबर त्या पक्षाची दिङ्मूढ स्थिति होते. तसेंच तो नेता चुकीच्या मार्गानें नेणारा, आग्रही भेटल्यास त्या पक्षाची फारच अनुकंपनीय स्थिति होते. या दृष्टीनें जर सर्वज्ञ व नित्य असणारा असा नेता कोणी भेटल्यास त्याची जरूरी नाहीं असें कोणता विचारी मनुष्य म्हणूं शकेल? आणि तो नेता जर, कर्तुं अकर्तुं अन्यथाकर्तुं समर्थ, न्यायी असेल तर त्याच्याबद्दल कोणाचीही कितीही विरोधबुद्धि असली तरी तिचा कांहींच उपयोगही नाहीं. प्राचीन काळीं व्यवहारांतही ईश्वरनिष्ठापूर्वक योगाभ्यास असलेला दिसून येतो. अश्वत्थामा खरोखरच मृत झाला किंवा जिवंत आहे हें पाहाण्याकरितां श्रीद्रोणाचार्य, शस्त्रसंन्यासपूर्वक वृत्तिनिरोध करून बसले होते असें वर्णन महाभारतांत आहे. म्हणजे सेनापति किंवा राजा कोणालाही अप्रतिहत सामर्थ्यशाली व्हावयाचें असेल तर त्याला योगाभ्यास अपरिहार्य होता. '**अकार्यचिन्तासमकालमेव प्रादुर्भवंश्चापधरः पुरस्तात्। अंतःशरीरेष्वपि यः प्रजानां प्रत्यादिदेशाविनयं विनेता**' हे कविकुलगुरूंनी केलेलें प्राचीन नेत्याचें वर्णनही योगाचें महत्त्व व्यक्त करणारे आहे. या शास्त्राचा अभ्यास सामुदायिकरूपानें होणें शक्य नाहीं. एक तर मानसिक शक्तिविकास हें योगाचें फल फक्त त्या त्या अभ्यासी पुरुषाला स्वसंवेद्य आहे आणि कदाचित् साधक जर रसास्वादादि दोषांत अडकून चांगदेवाप्रमाणें अहंकारदोषग्रस्त होईल तर ते दोष दूर करण्यास समर्थ अशा शास्त्रज्ञांच्या सान्निध्याची पदे पदे जरूरी, या शास्त्राच्या अभ्यासकांना लागणारी आहे. भौतिक शक्तीपेक्षां मनःशक्ति मोठी आहे आणि त्या शक्तीपेक्षांही मनोवृत्तिप्रचोदकाची शक्ति अमर्याद आहे ही धारणा, ज्या राष्ट्रांतील लोकांच्या मनांत नित्य राहूं शकते तेंच राष्ट्र खरें स्वतंत्रप्रज्ञ व दुष्प्रधर्ष बनूं शकेल. ही धारणा आपल्या राष्ट्रांतून नाहींशी झाल्यामुळेंच अशा अबोधोपहत समाजापुढें येण्याची खऱ्या योगशास्त्रज्ञांना इच्छाच होत नाहीं. चिरंजीवी अश्वत्थाम्याची

भेट, नर्मदाकिनारीं शूलपाणीच्या झाडींत भिल्ल वेषांत श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामीमहाराज यांना झाली होती असा उल्लेख त्यांचे चरित्रांत आहे. प्रत्यक्ष कांहीं कार्य दिसून आलें तर श्रद्धा वाढेल व प्रवृत्तीही होईल. असें जरी गृहीत धरलें तरी आज अणुशक्तीचें प्रात्यक्षिक होऊनही त्या ज्ञानाकडे आकृष्ट होणारे खरे विद्यार्थी कितीसे सांपडतील? आणि असे जिज्ञासू भेटल्यांवांचून ते शास्त्रज्ञ; आपण प्रयत्नानें मिळविलेलें विद्याधन वाटेल त्याच्या हातांत कसें देतील? आणि तें दिलें तरी त्याचा कल्याणपर्यवसायी उपयोग निश्चित कसा होईल? अस्तु. हें दर्शन अत्यंत उपयुक्त असल्यामुळें यांतील बराच अंश श्रीमच्छंकराचार्यप्रभृति सर्व शास्त्रज्ञांनीं मान्य केला आहे. सांख्याप्रमाणें यांचें खंडन जडवादापुरतें केलें आहे.

याप्रमाणें दर्शनांचे सामान्यतः दिग्दर्शन केलें आहे. भारतवर्षांत विचारक्रम कसा आहे हें समजण्याकरितां याचा उपयोग अंशतः होईल असें वाटतें. स्थूल दृष्टीच्या चार्वाकांपासून उत्तरोत्तर सूक्ष्म दृष्टीचे दर्शनकार होऊन गेले. यामध्यें रामानुज, माध्व, माहेश्वर, पाणिनीय यांच्या दर्शनांचा उल्लेख विस्तारभीतीमुळें केला नाहीं.

## वेदान्तदर्शन

आस्तिक दर्शनामध्ये वेदान्तदर्शन श्रेष्ठ मानलें आहे. यासंबंधी विवेचन आतां करावयाचें आहे - दुःखाची आत्यंतिक निवृत्ति व्हावी अशी प्रायः सर्व दर्शनकारांची इच्छा आहे. न्याय, वैशेषिक व सांख्य हे, दुःखाची पूर्ण निवृत्ति म्हणजेच मोक्ष असें मानतात. वेदान्ती, अविद्यानिवृत्ति म्हणजे मुक्ति असें म्हणतात. **'तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम्' 'वृत्तिसारूप्यमितरत्र'** असे म्हणणारे योगसूत्रकार, जीवानें आपल्या मूल स्वरूपानें राहाणें ही मुक्ति म्हणतात. याप्रमाणें आस्तिक, नास्तिक सर्व दर्शनकारांची, मुक्तिस्वरूपाबद्दल भिन्न भिन्न मतें दिसतात. तसेंच जीव, जगत्

यांच्या स्वरूपाबद्दलही भिन्न भिन्न विचार आहे. ईश्वरतत्त्वाबद्दल बरींच दर्शनें संशयित आहेत. न्याय, वैशेषिक यांनीं ईश्वर मानला आहे. पण तो फक्त जगताचा निमित्तकारण आहे असें ते म्हणतात. सांख्यांनीं तर **'ईश्वरासिद्धेः'** (अ. १।९२) या सूत्रांनी त्यांचे खंडनच केलें आहे. मीमांसकांना ईश्वराबद्दल विशेष आस्था नाहीं. वेदान्तदर्शनांतच फक्त, ईश्वरतत्त्व हें सर्वश्रेष्ठ असून तेंच जगाचें कारण आहे असें सांगितलें आहे. या भिन्न भिन्न विचारप्रणालींचा समन्वय करण्याचें महत्त्वाचे कार्य, भगवान् बादरायणांनीं केलें आहे. बादरायण हे व्यास म्हणजे वैदिक रहस्याचे उद्घाटक होते. हेच ब्रह्मसूत्रांचे कर्ते आहेत. अठ्ठावीस व्यासांचें वर्णन देवी भागवत (१।३।२६-३४) मध्यें आलेलें आहे. त्यापैकीं कृष्णद्वैपायन हे अठ्ठावीसावे व्यास आहेत. यावरून व्यास अनेक असावेत असें दिसतें. **'द्वैपायनोऽस्मि व्यासानाम्'** (भागवत ११।१६।२८) हा उल्लेखही याला पोषक दिसतो. याच द्वैपायन व्यासांनीं वेदांचें तात्पर्यनिरूपण करण्याकरतां, **'भारतं पंचमो वेदः'** अशा महाभारताची रचना केली. महाभारतांत पौराणिक अंशही असल्यानें तें पूर्णरूपानें इतिहास ठरत नाहीं. पुराणांचे अस्तित्व सर्वकालांत आहे. वेदाप्रमाणेंच त्यांचाहि वेळोवेळीं आविर्भाव व तिरोभाव होत असतो. अनेक सृष्टिप्रलयांचा वृत्तांत नवीन रूपानें मांडण्याकरितां पुराणांची रचना झाली आहे. ब्रह्मदेवसुद्धां सृष्टीच्या आरंभीं प्रथम पौराणिक रहस्याचें स्मरण करून नंतर वेदाचें उच्चारण करतात.-

**'पुराणं सर्वशास्त्राणां प्रथमं ब्रह्मणा स्मृतम्।**

**अनन्तरं च वक्त्रेभ्यो वेदास्तस्य विनिर्गताः।'** (मच्छपुराण ५३।३)

यावरून असें दिसतें कीं, पौराणिक रहस्याचें उद्घाटन वेदांनीं करावयाचें आणि वैदिक रहस्याचें उद्घाटन पुराणांनी करावयाचें. याप्रमाणें परस्परांस पोषक अशीं हीं दोनही प्रमाणें आहेत. **'विश्वसृष्टेरितिहासः पुराणम्'** अशी पुराणाची व्याख्या श्रीमधुसूदनसरस्वती करतात.

**'कृष्णद्वैपायनं व्यासं विद्धि नारायणं प्रभुम्।**
**को ह्यन्यो भुवि मैत्रेय महाभारतकृद्भवेत्।।'**

(विष्णुपुराण ३।४।५)

या वचनावरून कृष्णद्वैपायन व्यास हे महाभारताचे कर्ते असावेत असें ठरतें. तसेंच

**'आख्यानैश्चाप्युपाख्यानैर्गाथाभिः कल्पशुद्धिभिः।**
**पुराणसंहितां चक्रे भगवान् बादरायणः।।'**

या पद्मपुराणवचनावरून बादरायणव्यास हे पुराणाचेही कर्ते ठरतात. वर्तमानकालांतील पाहिलेल्या वृत्तांताला आख्यान म्हणतात. आपण न पाहिलेल्या वर्तमानकालीन वृत्तांताला उपाख्यान म्हणतात. परंपरेनें कानावर येणाऱ्या गोष्टी, ज्याचा मूलवक्ता माहीत नसतो त्यांना गाथा असें म्हणतात. आणि, ऐतिहासिक विषयाशीं संबद्ध, पौराणिक विभागांत अनुवादरूप असणाऱ्या, धर्मशास्त्रादिकांनीं वर्णिलेल्या ज्ञान व कर्म यांच्याविषयीं असणाऱ्या वचनांना कल्पशुद्धि असें म्हणतात. या चार प्रकारांचें अवलंबन करून भगवान् बादरायणांनीं पुराणसंहिता केल्या. या संहितांमध्यें तीन प्रकारच्या भाषा आहेत.

**'समाधिभाषा प्रथमा लौकिकीति तथापरा।**
**तृतीया परकीयेति शास्त्रभाषा त्रिधा स्मृता।।'**

समाधिपूर्वक केलेलें लेखन, रूपकादिद्वारा आलंकारिक पद्धतीचें लेखन व सदृष्टान्त लेखन अशी तीन भाषा पुराणसंहितांच्या आहेत. याप्रमाणें संशोधकांच्या मतानें कृष्णद्वैपायनव्यास व बादरायण दोन असावेत असें ठरतें. प्राचीन संप्रदायाच्या दृष्टीनें वेदव्यास अवतार मानले गेले आहेत.

**'ब्रह्मसूत्रकृते तस्मै वेदव्यासाय वेधसे।**
**ज्ञानशक्त्यवताराय नमो भगवतो हरेः।।'**

असें मंगलाचरण श्रीवाचस्पतिमिश्रांनीं भामतीच्या आरंभीं केलें आहे.

**'द्वापरे द्वापरे विष्णुर्व्यासरूपेण सर्वदा।**
**वेदमेकं स बहुधा कुरुते हितकाम्यया।।**
**अल्पायुषोऽल्पबुद्धींश्च विप्राञ्ज्ञात्वा कलावथ।**
**पुराणसंहितां पुण्यां कुरुतेऽसौ युगे युगे।।'**

(देवी भागवत १।२।१९-२०)

या वचनावरून वेदविभग व पुराणसंहिता करणारे व्यास एकच दिसतात. अवतारी पुरुष वेगवेगळीं शरीरें धारण करूं शकतात. देवतांचे बरोबरही व्यवहार करूं शकतात, असें श्रीशंकराचार्यांनींही सांगितलें आहे.

**'अस्तिहि ऐश्वर्ययोगाद्देवतानां ज्योतिराद्यात्मभिश्चावस्थातुं यथेष्टं च तं तं विग्रहं ग्रहीतुं सामर्थ्यम्।' 'तथा व्यासादयो देवादिभिः प्रत्यक्षं व्यवहरन्ति।'** (शांकरभाष्य १।३।३३)

या सर्व वचनांचा विचार केला असतां, कृष्णद्वैपायन व बादरायण हीं शरीरें जरी संशोधकांच्या मतानें भिन्न ठरत असलीं तरी तीं धारण करणारे व्यास एकच आहेत हें सांप्रदायिकमतहि चुकीचें ठरणार नाहीं. सूत्रें, गीता, महाभारत व भागवत हीं सर्व करणारे व्यास एकच आहेत याबद्दल भागवतामध्यें पहिल्या स्कंधाच्या पांचव्या अध्यायांत आलेले तिसरा व चौथा हे श्लोक पोषक ठरतात-

श्रीनारदजी व्यासांना सांगत आहेत-

**'जिज्ञासितं सुसंपन्नमपि ते महदद्भुतम्।**
**कृतवान् भारतं यस्त्वं सर्वार्थपरिबृंहितम्।।**
**जिज्ञासितमधीतं च यत्तद्ब्रह्म सनातनम्।**
**तथापि शोचस्यात्मानमकृतार्थ इव प्रभो।।'**

हें मत लोकमान्यांनाही संमत आहे. ते गीतारहस्यांत लिहितात कीं- 'ज्यानें ब्रह्मसूत्रांची रचना केली त्यानेंच मूलभारत आणि गीता यांना वर्तमान स्वरूप दिलें आहे' - याप्रमाणें भगवान् बादरायणांनीं ब्रह्मसूत्रांची रचना प्रथम केली. जिच्यामुळें भिन्न भिन्न ऋषींच्या आध्यात्मिक सिद्धान्तांचा सुव्यवस्थित समन्वय घडून आला. ब्रह्मसूत्रांचा रचनासमय, प्रायः सर्व आधुनिक संशोधकांच्या मतानें, इसवी सनापूर्वी चौथे शतक हा निश्चित केला गेला आहे.

ब्रह्मसूत्रावर विविध संप्रदायाचार्यांनीं आपापलीं भाष्यें रचलेलीं आहेत तीं पुढीलप्रमाणें आहेत-

१. श्री शंकराचार्य (७ वें ख्रिस्तशक) शारीरकभाष्य- अद्वैतमत
२. श्री भास्कराचार्य (१० वें ख्रि.) भास्करभाष्य - भेदाभेद मत
३. श्री रामानुजाचार्य (११४० ख्रि.) श्रीभाष्य - विशिष्टाद्वैत मत
४. श्री मध्वाचार्य (१२२८ ख्रि.) पूर्णप्रज्ञभाष्य - द्वैतमत
५. श्री निंबार्काचार्य (१२५० ख्रि.) वेदान्तपारिजातसौरभ - द्वैताद्वैतमत
६. श्री श्रीकंठाचार्य (१२७० ख्रि.) शैवभाष्य - शैवविशिष्टाद्वैतमत
७. श्री श्रीपति आचार्य (१४०० ख्रि.) श्रीकरभाष्य - वीरशैवविशिष्टाद्वैतमत
८. श्री वल्लभाचार्य (१५०० ख्रि.) अणुभाष्य - शुद्धाद्वैतमत
९. श्री विज्ञानभिक्षु आचार्य (१६०० ख्रि.) विज्ञानामृतभाष्य - अविभागाद्वैतमत
१०. श्री बलदेवाचार्य (१७२५ ख्रि.) गोविदभाष्य - अचिंत्यभेदाभेदमत

## प्रमाणप्रमेयविचार

आतांपर्यंत एकंदर दर्शनांचें संक्षिप्त विवेचन झालें. यानंतर या दर्शनांनीं ज्या विचारपद्धति निर्माण केल्या आहेत त्यांना अनुसरून झालेले निर्णय कसे आहेत याचें संक्षेपात्मक निरूपण करून श्री निंबार्काचार्यांच्या मताचा विचार करावयाचा आहे. विचारांचें फल विचार्यनिर्णय किंवा सिद्धि हें आहे. '

**मानाधीना मेयसिद्धिः**' या न्यायास अनुसरून प्रमाणपुरःसरच तो विचार होणें आवश्यक आहे. याकरितां थोडा प्रमाणविचार प्रथम करावयाचा आहे.

चार्वाकदर्शनकार प्रत्यक्ष हें एकच प्रमाण मानतात. बौद्ध व जैन हे; प्रत्यक्ष व अनुमान हीं दोन प्रमाणें मानतात. वैशेषिकही हीं दोनच प्रमाणें मानतात. शब्दाला स्वतंत्र प्रामाण्य जरी ते मानीत नसले तरी अनुमानद्वारा, शब्दाचें प्रामाण्य विशिष्टस्थळीं मानून शब्दप्रमाणसिद्ध अर्थाची सिद्धि ते करीत असतात. माध्वमतांत प्रत्यक्ष व शब्द हीं दोन प्रमाणें मानतात. अनुमान हें शब्दप्रमाणानुसारि असल्यास प्रमाण होईल. म्हणून त्याला स्वतंत्र प्रामाण्य नाहीं. रामानुजमतांत, प्रत्यक्ष, अनुमान व शब्द हीं तीन प्रमाणें आहेत. सांख्य व योग या दर्शनांतही हींच तीन प्रमाणें मानली आहेत. याबद्दल, '**प्रत्यक्षानुमानागमाः प्रमाणानि**' (योगसूत्र १।७) असें योगसूत्र आहे. नैयायिक, प्रत्यक्ष, अनुमान, उपमान व शब्द हीं चार प्रमाणें मानतात. शैवदर्शनकारांचेंही मत प्रायः असेंच दिसतें. हीं चार प्रमाणें आणि, अर्थापत्ति व अनुपलब्धि हीं दोन अशीं सहा प्रमाणें भाट्टमीमांसक मानतात. 'व्यवहारे भाट्टनयः' या उक्तीप्रमाणें अद्वैतवेदांत्यांचेंही हेंच मत आहे. वरील सहा व संभव आणि ऐतिह्य हीं दोन अशीं आठ प्रमाणें पौराणिक मतांत आहेत. यापेक्षांही चेष्टा नांवाचें नववें प्रमाण तंत्रशास्त्रकार मानतात. या प्रमाणें प्रमाणाबद्दल संक्षिप्त, दिग्दर्शन केलें आहे. या प्रमाणांचा परस्पर उपकार्योपकारकभाव, बाध्यबाधक भाव, गुणप्रधानभाव इत्यादि विचार येथें अनावश्यक वाटल्यावरून दिला नाहीं.

## प्रमेयविचार

प्रमाणानें सिद्ध होणाऱ्या पदार्थाला प्रमेय म्हणतात. तें, चेतन व अचेतन असें दोन प्रकारचें आहे. चेतनाकरितांच अचेतन वर्गाचा उपयोग असल्यानें चेतन पदार्थ मुख्य आहे. चेतनामध्यें जीव व ईश्वर असे दोन भेद

आहेत. यापैकीं ईश्वर; सर्वज्ञ सर्वशक्तिसंपन्न असल्यामुळें जीवापेक्षां श्रेष्ठ आहे. म्हणून त्याच्या स्वरूपाबद्दल एकंदर दर्शनकार काय म्हणतात तें पाहूं - चार्वाकमतांतहि ईश्वर आहे. पण तो प्रत्यक्ष दिसमारा राजा, अध्यक्ष, नेता हाच ईश्वर त्या मतांत आहे. बीजापासून अंकुराची उत्पत्ति; मृत्तिका, जल इत्यादि सहकारिकारणांच्या सान्निध्यांत स्वभावतःच होत असल्यानें, त्याकरितां कोणी स्वतंत्र कर्ता मानण्याची आवश्यकता नाहीं असें चार्वाक म्हणतात. लौकिक कर्माचें फल राजा वगैरे जो कोणी शासक असेल तो देतो. अलौकिक, शास्त्रीय, यज्ञ, दान, तप इत्यादि कर्मांना भोगसाधनत्व हें प्रामाणिक नसून तें अंधश्रद्धेनें मानलें गेलें आहे. कारण वेदप्रामाण्यच मुळीं सिद्ध होत नाहीं. जन्माला येण्याबरोबर सुखदुःखाचा अनुभव येत असेल तर तो काकतालीयन्यायानें येतो. त्याकरितां पूर्वकर्म व त्याचें फल देणारा ईश्वर मानण्याची आवश्यकता नाही असें चार्वाकांचें मत आहे. म्हणजे स्वभाववाद मानून चार्वाकांनीं, कार्यकारणभाव डावलला आहे. तो सिद्ध करून कुसुमांजलिकारांनीं ईश्वरसिद्धि केली आहे.

बौद्धमतांत, सर्वज्ञ बुद्धमुनि हा ईश्वर मानतात. तर जैन, सर्वज्ञ अर्हत हा ईश्वर मानतात. सांख्यमतांत, चेतन फक्त जीवात्मा मानतात. त्याच्याहून भिन्न ईश्वर ते मानीत नाहींत. मीमांसक; कर्मालाच फलदातृत्व मानीत असल्यानें, त्यांच्या मतांत फलदाता स्वतंत्र ईश्वर नाहीं. शब्दब्रह्मवादी वैयाकरण

**'परा वाङ्मूलचक्रस्था पश्यन्ती नाभिसंस्थिता।**
**हृदिस्था मध्यमा ज्ञेया वैखरी कण्ठदेशगा।।'**

या चार वाणींपैकीं मूळ परावाणी हाच ईश्वर मानतात. रामानुजांच्या मतांत; जीवापेक्षां निराळा, त्यांचा अंतर्यामी नियामक, असा ईश्वर मानतात. सर्व जीव व जड वर्ग हें त्याचें शरीर आहे. तोच, जीवांच्या बऱ्यावाईट कर्मांचे फल देतो. तो ज्ञानगुणवान् असून ज्ञानरूपही आहे. तोच जगताचें तीनही प्रकारचें कारण आहे.

**'बहु स्यामिति संकल्पविशिष्टो निमित्तकारणम्। नामरूपविभागानर्हतया स्वविशेषणीभूतसूक्ष्मचिदचिद्विशिष्टः सन्नुपादानकारणम्। ज्ञानशक्त्यादिविशिष्टः सन् सहकारिकारणं च भवति।'** (-तत्त्वत्रयभाष्य पृ. १०९)

याप्रमाणें वेगवेगळ्या रूपानें ईश्वरच जगाचें त्रिविध कारण बनतो. तसेंच जसा सूक्ष्म जीव, शरीराचे आत राहून त्याचें नियमन करतो तसा अत्यंत सूक्ष्म ईश्वरही जीवाच्या आंत राहून त्याचें नियमन करतो. जीव व ईश्वर यांच्यामध्यें अंतर असें कीं, जीवाची शक्ति अल्प आहे तर ईश्वराची पूर्ण आहे. जीवांची कर्में पाहून, त्यांना अनुसरून जीवांचें नियमन ईश्वर करतो असें रामानुजांचें मत आहे. नैयायिक, वैशेषिक, माध्व व माहेश्वर यांच्या मतांत ईश्वर, जगाचें उपादानकारण नसून केवल निमित्तकारणच आहे. कर्माचें फल देणाराही तोच आहे. माहेश्वरांपैकीं नकुलीशपाशुपत यांच्या व प्रत्यभिज्ञावादींच्या मतांत, ईश्वर हा कर्मनिरपेक्ष जग निर्माण करतो असें मानलें आहे. इतर माहेश्वर, नैयायिक, वैशेषिक आणि माध्व हे, कर्मसापेक्ष ईश्वर जग उत्पन्न करतो असें मानतात. पातंजलयोगी हे, जीवापेक्षां निराळा ईश्वर मानतात. पण त्यांचा ईश्वर, निर्गुण, निर्विशेष असल्यानें तो जगाचें उपादानकारणही नाहीं व निमित्तकारणही होत नाहीं.

अद्वैतवादी श्रीशंकराचार्य, निर्गुण, निर्विशेष, सच्चिदानन्दघन असें पारमार्थिक एकच परमात्मतत्त्व मानतात. त्याचा जगाशीं वास्तविक कांहींच संबंध नाहीं. आणि जगालाही पारमार्थिक सत्यत्व नसल्यानें त्याच्या कारणाचा विचार उपस्थित होत नाहीं. तथापि व्यावहारिक दृष्टीनें मायाविशिष्ट परमात्मा हा जगाचें कारण होतो. हाच ईश्वर होय हा स्वतःच्या प्राधान्यानें निमित्तकारण व मायाप्राधान्यानें जगाचें परिणामी, उपादानकारण होतो. आणि माया सोडून केवल जगाचें विवर्तोपादानकारण होतो. हाच ईश्वर, जीवांनीं केलेल्या कर्माप्रमाणें त्यांचीं फलें देतो. याप्रमाणें ईश्वरस्वरूपाविषयीं असणारीं भिन्न भिन्न

मतें, हीं दाखविलीं आहेत.

## जीवविचार

चेतन पदार्थपैकीं दुसरा जीव, याच्या स्वरूपाबद्दल दर्शनकार काय म्हणतात तें पाहूं. चार्वाकांच्या मतांत- चैतन्यविशिष्ट देह म्हणजे जीव तोच कर्ता व भोक्ता आहे. त्याचें मूलस्वरूप, चार भूतांचें परमाणु, हे आहेत. चार भूतांच्या परमाणूंचें देहरूपानें रूपांतर झालें म्हणजे तेथें चैतन्य उत्पन्न होतें. म्हणजे चैतन्य हें बोधरूप व देह हा जड असा जडबोध उभयरूप जीवात्मा चार्वाक मानतात. प्रत्येक देह वेगवेगळा असल्यानें देहरूप जीव अनेक आहेत. व देह विनाशी असल्यानें ते विनाशी आहेत हें चार्वाकांचें प्रमुख मत. त्यांच्यापैकीं कांहीं इंद्रियांनाच जीवात्मा समजतात. कांहीं प्राणाला आत्मा समजतात तर कांहीं मनालाच जीवात्मा समजतात. बौद्धांपैकीं माध्यमिकांच्या जीवाचें स्वरूप शून्य हें आहे. तर इतर बौद्धांच्या मतांत; अहं, अहं अशा क्षणिक विज्ञानांचा प्रवाह म्हणजे जीवात्मा आहे. पूर्व पूर्व विज्ञानाचे संस्कार उत्तरोत्तर विज्ञानांत संक्रांत होत असल्यामुळें पूर्वोत्तर व्यवहार, स्मरण इत्यादिकांची व्यवस्था लागू शकते. जैन मतांत, जीवात्मा देहापेक्षां निराळा असून तो देहाच्या आकाराचा आहे. देह मोठा असेल तर तो मोठा होतो. लहान असेल तर लहान होतो. म्हणजे जीवस्वरूपांची ऱ्हासवृद्धि होत असल्यामुळें जैन मतांतील जीवात्मा विकारी, बदलणारा आहे. निर्विकार नाही. आस्तिक दर्शनकारांच्या मतानें जीवात्मा निर्विकार आहे. म्हणजे जीवाच्या स्वरूपांत बदल होत नाहीं. यालाच कूटस्थनित्य असें म्हणतात. नैयायिकांच्या मतांत जीव, बुद्धि, सुख, दुःख इत्यादि गुणविशिष्ट मानला आहे. त्यामुळें त्या गुणाच्या उत्पत्तिविनाशानें तद्विशिष्ट जीव विकारी होईल अशी कदाचित् शंका येईल. तिचें समाधान असें की. - नैयायिकांनीं जीवाचे सुखदुःखादि गुण त्याच्या स्वरूपांतर्गत मानले नसून ते निराळेच मानले आहेत. म्हणून त्या गुणांच्या येण्याजाण्यानें तद्विशिष्ट

जीवाच्या स्वरूपांत कांहीं बदल होत नाहीं. यामुळें ज्ञानभिन्न असा जीवात्मा नैयायिक मतांत जड ठरतो.

**'उष्णत्वमग्न्यातपसंप्रयोगाच्छैत्यं हि यत्सा प्रकृतिर्जलस्य'**

या उक्तीप्रमाणें, मनाचा संयोग झाल्यावर जीवात्म्यामध्यें ज्ञान उत्पन्न होतें. तो सुटल्यावर आत्मा ज्ञानरहित जड होतो. असें सर्वज्ञानरहित पाषाणासारखें होणें हीच त्यांच्या मतांत मुक्ति मानलेली आहे. मीमांसकांपैकीं प्रभाकरांचेंही असेंच मत आहे. जैन मात्र, ज्ञान व आत्मा यांचा भेद व अभेद मानतात. शैव, सांख्य, पातंजल हे जीवात्मा ज्ञानरूप मानतात. तर भाट्टमीमांसक खद्योताप्रमाणें बोध अबोध उभयरूप मानतात. सांख्यमतांत, जीवाच्या स्वरूपांतर्गत किंवा बहिर्भूत असा त्याचा एकही गुण नसल्यानें तो निर्गुण आहे. योगी व अद्वैत वेदान्ती असेंच मानतात. द्वैत वेदान्ती माध्व, रामानुज आणि नैयायिक व वैशेषिक हे जीवात्मा सगुण मानतात. जीवाच्या आकाराबद्दलही मतभेद आहेत - बौद्ध हे विज्ञानप्रवाह म्हणजे आत्मा मानतात. ज्ञानाचा आकार कोणता हें सांगतां येण्यासारखें नाहीं म्हणून बौद्धमतांत क्षणिक विज्ञानरूप जीवाचा आकार तसा निश्चित ठरत नाहीं. रामानुज, माध्व, वल्लभ यांच्या मतांत जीव अणु आकाराचा आहे. चार्वाक, बौद्धांपैकीं माध्यमिक आणि जैन यांच्या मतांत जीवाचा आकार मध्यम म्हणजे देहाएवढा आहे. नैयायिक, वैशेषिक, सांख्य, पातंजल व अद्वैतवेदान्ती यांच्या मतांत जीव हा विभु म्हणजे सर्वव्यापक आहे.

जीवाचें कर्तृत्व कसें आहे याबद्दलचा विचार असा- नैयायिक व वैशेषिक जीवात्म्याचें कर्तृत्व खरें आहे असें मानतात. रामानुज, माध्व हे जीवकर्तृत्व स्वाभाविक नसून नैमित्तिक आहे असें मानतात. अद्वैतवेदान्ती, ते औपाधिक मानतात. सांख्य व पातंजल यांच्या मतांत प्रकृतीलाच खरें कर्तृत्व आहे. प्रकृतीच्या संबंधामुळें कर्तृत्व व भोक्तृत्वही जीवात्म्याचे ठिकाणीं भासतें म्हणजे तें खरें नसून प्रातिभासिक आहे.

याप्रमाणें भोक्ता जो जीव, त्याला भोगसाधन म्हणजे सुखदुःखानुभवाचें साधन होणाऱ्या भोग्य जडपदार्थाबद्दल विचार असा- पृथिवी, जल इत्यादि भूतें व त्यांच्यापासून उत्पन्न होणारे भौतिक पदार्थ, यांच्या अस्तित्वाबद्दल कोणाचाही वाद नाहीं. खिडकींतून आंत येणाऱ्या सूर्यकिरणांत जो सूक्ष्म रजःकण दिसतो तो परमाणु होय. याच परमाणूंपासून सर्व दृश्य जड पदार्थांची उत्पत्ति झाली. ते परमाणु; पृथिवी, जल तेज व वायु अशा चार प्रकारचें आहेत. आकाश दिसत नसल्यानें त्याचें अस्तित्व नाहीं असें चार्वाकांचे मत आहे. बौद्ध मतांत; सूर्यकिरणांत दिसणाऱ्या रजःकणांचे अवयव परमाणु मानतात. त्यांच्यापासून हा सर्व दृश्य कार्यप्रवाह होतो. हेही आकाशतत्व न मानणारे आहेत. जैन मतांत; चार प्रकारचे परमाणु नसून ते एका जातीचेच आहेत. यांच्यापासून सर्व जड वर्ग उत्पन्न होतो. तसेंच आकाशही स्वतंत्र तत्त्व आहे असें मानतात. नैयायिक व वैशेषिक यांचें मत असें- सूर्यकिरणांत दिसणाऱ्या रजःकणांचे जे अवयव ते द्व्यणुक व त्यांचे अवयव म्हणजे परमाणु ते विजातीय परमाणु, पृथिवी, जल, तेज व वायु या चौघांना कारण आहेत. दोन परमाणूंचा संयोग होऊन द्व्यणुक तयार होतो व तीन द्व्यणुकांचा संयोग होऊन त्र्यणुक बनतो. हा सूर्यकिरणांत दिसून येतो. आकाश हें स्वतंत्र पांचवें भूत आहे. तें व चार प्रकारचे परमाणु हीं नित्य द्रव्यें आहेत. यांना कोणी कारण नाहीं. मीमांसक आणि वैयाकरण हे; परमाणूंनाही अनित्य समजतात. पृथिवी, जल, तेज, वायु व आकाश यांच्यामध्यें पूर्व पूर्व भूताला उत्तरोत्तर भूत कारण असून शेवटीं आकाशालाही कारण शब्दतत्त्व आहे. म्हणून तेंच सर्व जगाचें मूलकारण आहे असें मीमांसक व वैयाकरण यांचें मत आहे. सांख्य व पातंजल यांच्या मतांत; शब्दालाही कारण अहंकार. त्याला कारण महत्तत्त्व आणि महत्तत्त्वाला कारण त्रिगुणात्मक प्रकृति किंवा प्रधान हेंच सर्व जड वर्गाचें मूलकारण आहे. हें सांख्यमतसिद्ध प्रधानही जगत्कारण नाहीं असें अद्वैतवेदान्ती मानतात. कारण; **'तम आसीत्तमसा गूढमग्रे प्रकेतम्। तुच्छेनाभ्यपिहितम्'**

(तैत्तिरीयब्राह्मण २।८।९) या श्रुतिवाक्यांत तम नांवाचें कोणीतरी मूलकारण दाखविलें आहे. तें तम, असत्- शशशृंगासारखें मानतां येत नाहीं. कारण; **'कथमसतः सज्जायेत'** (छांदोग्योपनिषत् ६।२।२) या श्रुतिवाक्यांत असत्कारणवादाचें खंडन केलें आहे आणि, **'सदेव सोम्येदमग्र आसीत्'** (छांदोग्योपनिषत् ६।२।२) या वाक्यानें सत्कारणवादाची स्थापना केली आहे. **'आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत्'** (ऐतरेयोपनिषत् १।१) हें, वरील छांदोग्यश्रुतिवाक्यांशीं समानार्थक वाक्य आहे. या वाक्यांत आत्मशब्द व एकशब्द आहे. म्हणून आत्मशक्तीच जगाचें मूलकारण आहें असें वेदप्रामाण्यवाद्यांना मान्य करावें लागतें. याप्रमाणें निरनिराळ्या दर्शनामध्यें दिसून येणारा मूलकारणाचा भेद दाखविला.

## सृष्टीच्या उत्पत्तिविषयीं विचार

निरनिराळ्या दर्शनकारांच्या मतानें मूलकारणापासून ही सृष्टि उत्पन्न झाली ती कशी हा विचार करावयाचा आहे - याबद्दल संक्षेपशारीरककारांनीं चार पक्ष दाखविले आहेत-

**'आरम्भवादः कणभक्षपक्षः संघातवादस्तु भदन्तपक्षः।**
**सांख्यादिपक्षः परिणामवादो वेदान्तपक्षस्तु विवर्तवादः॥'**

(-संक्षेपशारीरक २।६३)

नैयायिक व वैशेषिक, प्रत्येक कार्याला, समवायिकारण, असमवायिकारण व निमित्तकारण अशीं तीन कारणें मानतात. या तीन कारणांनीं, पूर्वीं नसलेल्या आपल्यापेक्षां भिन्न अशा नवीन कार्याचा आरंभ म्हणजे उत्पत्ति केली जाते असें नैयायिक, वैशेषिक, मानतात. पट हा पूर्वीं नसतो. तो तंतु, तंतुसंयोग व कोष्टी, माग इत्यादि कारणांपासून नवीनच तयार होतो असें नैयायिकांचें मत आहे. यालाच आरंभवाद किंवा असत्कार्यवाद म्हणतात. असमवायिकारण व निमित्तकारण यांच्यापेक्षां कार्य निराळें आहे हें

सर्वांना मान्य आहे पण समवायिकारण किंवा उपादानकारण याच्यापेक्षांसुद्धां कार्य निराळें आहे. पटाला समवायिकारण त्याचे अवयव तंतु. त्यांच्या समुदायापेक्षां पट निराळाच उत्पन्न होतो असें नैयायिक मानतात. समवायिकारणाहून कार्य वेगळे नाहीं असें इतर दर्शनकार मानतात. समवायिकारणतंतूंचा समुदाय म्हणजेच पट असें बौद्धापैकीं सौत्रान्तिक व वैभाषिक दोघे मानतात. यालाच संघातवाद असें म्हणतात. हें संघातरूपकार्य प्रत्येक क्षणाला नवीन उत्पन्न होतें. सर्वही पदार्थ क्षणिक आहेत असा एक बौद्धांचा सिद्धान्त आहे. बौद्धांपैकीं शून्यवादी माध्यमिकांच्या मतांत मूलकारण शून्य आहे. म्हणजे कार्याला सद्रूप असें कोणी नाहीं म्हणजे अभावापासूनच भावोत्पत्ति होते. पेरलेलें बीज कुजून नष्ट झाल्यावर अंकुररूप कार्य उत्पन्न होतें. यालाच असत्ख्याति असें म्हणतात. हें माध्यमिक बौद्धांचें मत आहे. विज्ञानवादी बौद्धांच्या मतांत विज्ञानरूप आत्माच, बाह्यघटादिपदार्थरूपानें तयार होतो. यालाच आत्मख्याति असें म्हणतात. उपादानकारणाचें तात्त्विक रूपांतर होणें म्हणजे परिणामवाद. हा, सांख्य, पातंजल, रामानुज यांना मान्य आहे. आडव्या उभ्या पद्धतीनें तंतु एकत्र होणें म्हणजेच पट हें कार्य होय. तें तंतुहून भिन्न नाहीं. उपादानकारणाचें अतात्त्विक रूपांतर म्हणजे विवर्तवाद. जसें दोरीवर साप भासणें. तो दोरीचा विवर्त आहे. तसेंच संपूर्ण विश्व परमात्म्याचा विवर्त आहे असें श्रीशंकराचार्यांच्या अनुयायी असणाऱ्या अद्वैतवेदान्ती लोकांचे मत आहे.

यäप्रमाणें आतांपर्यंत, जग, जीव व परमात्मा यांच्याबद्दल विविध दर्शनकारांचीं मतें संक्षेपानें मांडून झालीं. यानंतर श्रीनिंबार्काचार्यांच्या मताचा विचार करावयाचा आहे-

# श्रीनिम्बार्काचार्य व द्वैताद्वैतसिद्धान्त

श्रीनिंबार्काचार्यांनीं भागवत धर्माचा प्रसार व्हावा या हेतूनें ग्रंथरचना केली असल्यामुळें प्रथम भागवतधर्माबद्दल व भागवतधर्माच्या प्रवर्तक आचार्यांबद्दल विचार करणें क्रमप्राप्त आहे.

## भागवत धर्म व त्याचे प्रवर्तक आचार्य

उपनिषदें व त्यांचा अर्थनिर्णय करण्याकरितां रचलेलीं ब्रह्मसूत्रें याच्या द्वारानें ब्रह्माची सिद्धि झाली. त्याला मूर्त स्वरूपाची असलेली आवश्यकता, श्रीभागवत निर्माण करून श्रीव्यासांनी पूर्ण केली.

**'तेनेयं वाङ्मयी मूर्तिः प्रत्यक्षा वर्तते हरेः।**
**सेवनाच्छ्रवणात्पाठाद्दर्शनात्पापनाशिनी।।'**

(-पद्मपुराण उत्तर खंड ३।६२)

याप्रमाणें भागवताचें माहात्म्य वर्णिलेलें आहे. सर्व अनर्थाचें उपशमन करणारा उज्ज्वल भक्तिमार्ग, लोकांना अज्ञात असलेला, तो समजावून सांगण्याकरितां भागवताची रचना श्रीव्यासमहर्षींनीं केली.

**'अनर्थोपशमं साक्षाद्भक्तियोगमधोक्षजे।**
**लोकस्याजानतो विद्वांश्चक्रे सात्वतसंहिताम्।।'**

(-भागवत प्रथम स्कंध ७-६)

या श्लोकांत वर उल्लेखिलेलें भागवतरचनेचें प्रयोजन सांगितलें आहे. नराचा अयन-आधार नारायण याची उपासना हा भागवतधर्माचा विशेष आहे. नराला आत्मचिंतन करण्याचा सल्ला बौद्ध देऊन राहिले होते. अशा वेळीं नराचा सखा व रक्षक नारायण, भागवतधर्मानें दाखवून दिला. या धर्माची परेरणा श्रीहरीच्या हंसावताराच्या द्वारानें झाली आहे. सत्त्वाचा म्हणजे अंतःकरणाचा खरा विकास झाल्याशिवाय हा सात्वतधर्म, भक्तिधर्म उत्पन्न होत नाहीं. असें श्रीहंसांनीं सांगितलें आहे. तो श्लोक असा-

**'सत्त्वाद्धर्मो भवेद् वृद्धात्पुंसो मद्भक्तिलक्षणः।**
**सात्त्विकोपासया सत्त्वं ततो धर्मः प्रवर्तते॥'**

(-भागवत ११।१३।२ हंसोपाख्यान)

मन, बुद्धि, चित्त व अहंकार या अंतःकरणचतुष्ट्यांत मन प्रधान आहे. सनक, सनंदन, सनातन व सनत्कुमार हे चार ब्रह्मदेवाचे मानसपुत्र, अंतःकरणचतुष्ट्याचे प्रतीक आहेत. श्री हंसांच्या द्वारानें यांनाच तत्त्वोपदेश झाला. त्याचाच प्रसार मनाचें प्रतीक असणाऱ्या श्री नारदांच्या द्वारानें संसारांत सर्वत्र झाला. नारदपांचरात्र ग्रंथांत श्री नारदांनीं हाच सात्त्वत धर्म प्रकट केला आहे. अशांत बादरायण व्यासांना श्री नारदांनींच या भक्तिधर्माचा उपदेश करून त्यांना भागवताची रचना करण्यास प्रवृत्त केलें. श्री नारदांच्या उपदेशानें समाहितचित्त झालेल्या श्री व्यासांनीं भागवतसंहिता केली. म्हणून भागवताला 'समाधिभाषा व्यासस्य' असें म्हणतात. वेद, भगवद्गीता, ब्रह्मसूत्रें व भागवत ही भागवतधर्माचीं चार प्रमाणें पुढील श्लोकांत दिलीं आहेत-

**'वेदाः श्रीकृष्णवाक्यानि व्याससूत्राणि चैव हि।**
**समाधिभाषा व्यासस्य प्रमाणं तच्चतुष्टयम्॥'**

(-शुद्धाद्वैतमार्तण्ड ७९)

वरील विवेचनावरून असें ठरतें कीं, हंसद्वारा भागवतधर्माचा उपदेश सनकादिकांना झाला. पुढें सनकादि आणि नारद यांनीं त्याचा प्रसार विश्वामध्यें केला. भागवतामध्यें; अनेक मतमतांतराबरोबर मोठ्या कौशल्यानें भक्तिरसाची ही मांडणी सर्वत्र केली आहे. प्राचीन सांख्यमत निरीश्वरवादी असून, तें योगाशीं संलग्न करून, कपिलमुनींच्या द्वारा सेश्वरसांख्याचा उपदेश देवहूतीला झालेला भागवताच्या तृतीयस्कंधांत दाखविला आहे. अणुकारणवादही घेतला. पण ईश्वरच परमाणुरूपानें सर्वकारण असल्याचें दाखविलें. भवाटवी आणि ऋषभदेवांचें चरित्र वर्णन करून त्याच्या द्वारा जैन धर्माला वैष्णव धर्माचें रूप दिलें आणि त्यांतील केशोल्लुचनादि प्रकार अज्ञानमूल असल्याचें सांगितलें.

ऐल राजा म्हणजे पुरूरवा, याच्या आख्यानामध्यें, बौद्धभिक्षूंच्या आत्मनिष्ठेची आवश्यकता सूचित करून तिला भक्तीमध्यें समाविष्ट केलें. अत्यंत व्यापक अशा चार्वाक मताचे प्रचारक; हिरण्याक्ष, हिरण्यकश्यपु, रावण, कुंभकर्ण, शिशुपाल, दंतवक्त्र, कंस इत्यादिकांचें दमन ईश्वराकडूनच झाल्याचें वर्णन भागवतांत आलें आहे. विशेषतः वेन राजा जो पूर्णपणें नास्तिक, चार्वाक मताचें प्रतीकच असा होता त्याचा नाश ब्राह्मणांच्या द्वारा करवून त्याच्यापासूनच ईश्वरांश पृथुराजाला प्रकट केलें. कपिल, ऋषभ, बुद्ध, पृथु या सर्वांना ईश्वरावतार ठरवून त्यांना पूज्य बनविलें. याप्रमाणें सर्वांचा समन्वय भागवत धर्मामध्यें भागवतानें केला आहे. संपूर्ण भागवत ग्रंथ, एक मोठा, समन्वय ग्रंथरूपानें प्रगट झाला आहे.

बौद्ध धर्मानें वैदिक कर्मकांडाचें निराकरण केलें. पण याचा परिणाम असा झाला कीं, सर्व समाज, कर्मत्याग करून जंगलांत जाऊन आत्मचिंतन करणेंच श्रेष्ठ समजूं लागला. भागवत धर्मानें त्याचें खंडन प्रत्यक्ष न करतां, अनासक्तीनें कर्माचरण व भगवद्भक्ति हा मार्ग प्रकट केला. त्यामुळें बौद्धाच्या उपदेशामुळें वाढणाऱ्या अकर्मण्यतेचा प्रवाह रोखला गेला आणि अनासक्त कर्मसहित भक्तिमार्गाकडे समाजाची प्रवृत्ति झाली. कर्मवासनांनी त्रस्त झालेल्या जनसमूहाला, गीता, ब्रह्मसूत्र व भागवत या भागवत धर्माच्या प्रस्थानत्रयीनें भिक्षु होण्यापासून वांचविलें. ब्रह्मवादाची स्थापना करून; सांसारिक वासनांचें परिवर्तन ईश्वरविषयक वासनांत करण्याचा सल्ला दिला आणि अशा सात्त्विक वासनांची मूर्ति बनणाऱ्या आनंदघन वासुदेवाच्या स्वरूपचिंतनांत जीवानें रमून निर्दुःख व्हावें असा प्रयत्न केला.

श्री भागवतामध्यें अनेक ठिकाणीं सनकादिकांचें व नारदांचें दर्शन होतें. द्वेषवासना व रागवासना, ज्यांना आसुरीसंपत्ति व दैवीसंपत्ति म्हणतां येईल. या वासनांचे प्रतीक भागवतामध्यें दाखविलें आहे. सनकादिकांच्या शापानें ज्या जय व विजय या विष्णुपार्षदांना आसुरीसंपत्तियुक्त केलें ते जय विजय

द्वेषवासनेचे प्रतीक आहेत. अंतःकरणचतुष्ट्याचें प्रतीक जे सनकादि ऋषी यांची समष्टि असणारा प्रह्लाद हा रागवासनेचें प्रतीक आहे. याला उपदेश, गर्भांत असतांनाच नारदांच्या द्वाराच झालेला आहे. प्रह्लादाची रागात्मक वासना म्हणजेच भक्ति आहे. श्री व्यासांना भागवताचा संक्षिप्त उपदेश नारदांच्या द्वाराच झालेला आहे. युधिष्ठिराला ज्ञानकर्मसमन्वित भक्तीचा उपदेश नारदांनींच केला आहे. ध्रुव, प्रचेतस, चित्रकेतु, वसुदेव इत्यादिकांना नारदांनींच उपदेश करून भक्तिरहस्याचें उद्घाटन केलें आहे. पृथुराजाला सनकादिमहर्षींनीं उपदेश केला आहे. याप्रमाणें भागवत धर्माची उपदेशपरंपरा या सर्व महर्षींच्या द्वारेच भारतवर्षांत अविच्छिन्न राहिली आहे.

भागवत धर्माच्या प्रवर्तक आचार्यांच्या उल्लेख पुढील सूत्रांत केला आहे-

**'इत्येवं वदन्ति जनजल्पनिर्भया एकमताः**
**कुमारव्यासशुकशाण्डिल्यगर्गविष्णुकौडिण्य-**
**शेषोद्धवारुणिबळिहनुमद्बिभीषणादयो भक्त्याचार्याः'**

(नारदभक्तिसूत्र ८३)

नारद हे स्वतः भक्तिरहस्याचे व्याख्यातेच आहेत. वरील सूत्रोक्त आचार्यांपैकी शेष, उद्धव, बलि, हनुमान् आणि बिभीषण हे पांच पौराणिक भक्तकोटींतील आहेत. कुमार, व्यास, शुक व नारद हे नित्यमुक्त व आलोकदेहधारी (साक्ष्मसिद्ध देहधारी) असून वेळोवेळीं भक्तीचा उपदेश करीत असतात. शाण्डिल्य, गर्ग, विष्णु, कौण्डिण्य व आरुणि हे पांच भागवत धर्माचे प्रत्यक्ष प्रवर्तक आचार्य आहेत. ज्यांनीं आसेतुहिमाचल भारत वर्षांत भक्तिरसाची लयलूट केली.

१. **शांडिल्यांनीं** ही एक भक्तिसूत्रांची रचना केली आहे. ती ब्रह्मसूत्रांच्या शैलीस अनुसरणारी आहे. ही रचना नारदभक्तिसूत्रांच्या नंतरची असावी. कारण त्यांत, **'द्वेषादयस्तु नैवम्'** या सूत्रामध्यें, **'कामक्रोधाभिमानादिकं तस्मिन्नेव करणीयम्'** (नारद भक्तिसूत्र ६५)

यांचें निराकरण केलें आहे. नारदभक्तिसूत्र भागवताला अधिक निकटचें आहे आणि शांडिल्यसूत्र ब्रह्मसूत्राशीं अधिक संबद्ध आहे. नारदसूत्रामध्यें, व्यास, गर्ग, शांडिल्य यांचे मत आणि शांडिल्यसूत्रामध्यें, बादरायण, जैमिनि, कश्यप इत्यादिकांचें मत त्या त्या नांवांचा उल्लेख करून दाखविलेलें आहे. शांडिल्य, बादरायणाचार्यांचे शिष्य आहेत. स्कंदपुराणांतील भागवतमाहात्म्य शांडिल्यांच्या द्वाराच सांगितलें गेलें आहे. पद्मपुराणांतील भावतमाहात्म्य सनकादि महर्षींनीं नारदांना सांगितलें आहे. हेंच विशेष मान्य व प्रसिद्ध आहे.

२. **गर्गाचार्य** हे पुराण सांगणारे व्यास म्हणून प्रसिद्ध आहेत. गर्गाचार्यांचा कृष्णलीला वर्णनपर गर्गसंहिता नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ एक रसपूर्णकाव्य म्हणून सांगतां येईल. याचें भाषालालित्य सुंदर आहे. गर्गाचार्यही बादरायणांचेच शिष्य आहेत अशी प्रसिद्धि आहे. गर्गसंहितेंत वर्णिलेल्या कथांवर, पद्मपुराण व ब्रह्मवैवर्तपुराण यांची छाप विशेष पडली आहे. यांतूही प्रक्षिप्त भाग, इतर पुराणांप्रमाणें असल्यामुळें याच्या प्रामाण्याबद्दल संशय आहे असा काहीं लोक आक्षेप घेतात. पण सर्वत्र प्रक्षिप्त भाग संभवतो ही कल्पनाच पुराणाविषयीं चुकीची आहे. कारण भिन्न भिन्न कालांतील पुराणरचना असल्यामुळें; एखाद्या पुराणांत न आलेला कथाभाग दुसऱ्या पुराणांत आलेला दिसला कीं तो प्रक्षिप्त आहे असा शिक्का मारून मोकळे होणें विचारीपणाचें लक्षण ठरणार नाहीं.

३. **विष्णुस्वामी** हे मोठे भक्त आहेत. हे शुद्धाद्वैतवेदान्तमताचे प्रवर्तक आचार्य म्हणून सांगतात. यांचें तसें वेदान्तावर स्वतंत्र भाष्य दिसत नाही. शुद्धाद्वैतमताचे भाष्यकार श्रीवल्लभाचार्यच प्रसिद्ध आहेत. श्रीविष्णुस्वामींनीं उपासनामार्गांत वैधी अर्चेचें सुंदर निरूपण केलें आहे.

४. **कौण्डिण्याचार्यां** च्याबद्दल विशेष वृत्त कांहीच ज्ञात नाहीं. यांनाही बादरायणांचे शिष्य समजलें जातें. यांचा कोणता ग्रंथही मिळत नाहीं. हे नेहेमीं गोपीभावांत निमग्न असत असें श्रीवल्लभाचार्य लिहितात.

नारदभक्तिसूत्रानुसार, हे तन्मयाशक्तिकोटींतील तन्मयभक्त होते. श्रीनिंबार्कांनीं दाखविलेल्या प्रेमभक्तीचे, हे मूर्तिमान् स्वरूप होते.

५. **श्रीनिंबार्काचार्य** - हेच आरुणि म्हणून प्रसिद्ध आहेत. यांच्या कालाबद्दलचा निर्णय सर्वमान्य असा, आजपर्यंत होऊं शकला नाहीं. प्राचीन सांप्रदायिक मंडळींच्या मतें, हे श्रीकृष्णांच्या वेळीं द्वापारयुगांत होऊन गेले असावेत. आधुनिक चिकित्सकांच्या दृष्टीनें, यांचा काल चार वैष्णव संप्रदायामध्यें सर्वांच्या शेवटी आहे. डॉ. रोमाबोस. एम्.ए., डी.फिल. यांनीं श्रीनिंबार्क वेदान्तावर मोठा निबंध लिहिला आहे. त्याचे दोनतीन भाग आहेत. त्यांत त्यांनीं या काळाबद्दल पुढील विचार मांडले आहेत- श्रीनिवास, पुरुषोत्तम, देवाचार्य, सुंदरभट्ट, केशवकाश्मीरी, हरिव्यासदेव इत्यादि निंबार्क संप्रदायांतील प्रसिद्ध विद्वानांपैकीं कोणीही आचार्यांच्या काळाबद्दल कांहीं लिहून ठेवलेलें नाही. आणि थोडेफार कोणी याबद्दल लिहिलें असलें तरी तें नुसत्या परंपरेनें ऐकलेल्या गोष्टीवरूनच लिहिलेलें असल्यानें त्यांत अतिशयोक्ति फार आहे. या लेखकांचें मत असें आहे कीं, निंबार्काचार्य हे फार प्राचीन असावेत. कांहींच्या मतें ब्रह्मसूत्रकार व्यासांच्या काळीं निंबार्काचार्य झाले असावेत. कांही दुसरें म्हणतात कीं- निंबार्काचार्य म्हणजे ब्रह्मवैवर्तपुराणांतील हरिप्रिय किंवा भागवतांतील आरुणि किंवा सुदर्शन असावेत. सारांश निंबार्क हे अत्यंत प्राचीन असले पाहिजेत. पण हीं सर्व विधानें केवळ परंपरेच्या कथनावरच आधारलेलीं दिसतात. ऐतिहासिक दृष्टीचा यांत कांहीं संबंध येत नाहीं. हरिप्रिय, आरुणि या सामान्य नांवावरून ते निंबार्कच आहेत असें मानण्यासारखा पुरावा मिळत नाहीं.

असेंही एक मत आहे कीं- ब्रह्मसूत्रावरील सर्वभाष्यकारांत निंबार्क अगदीं पहिले असले पाहिजेत. कारण त्यांच्या भाष्यांत इतर कोणत्याही भाष्यकारांच्या मताचें खंडन आलेलें नाही. यावरून निंबार्काचार्य शंकराचार्यांच्याही अगोदर झाले असावेत. कांहींचें म्हणणें असेंही आहे कीं-

गौडपादांच्या कारिकेमध्यें निंबार्कांच्या द्वैताद्वैतमताचा उल्लेख आहे. ती कारिका अशी-

**अद्वैतं परमार्थो हि द्वैतं तद्भेद उच्यते।**

**तेषामुभयथाद्वैतं तेनायं न विरुध्यते।।** (मांडूक्य उ. ३।१८)

आतां, हें तर खरेंच आहे कीं, आपल्या वेदान्तपारिजातसौरभामध्यें निंबार्कांनीं शांकरमताच्या खंडनाचा कोठेंही प्रयत्न केला नाहीं. पण त्यांच्याच **'सविशेषनिर्विशेष श्रीकृष्णस्तवराज'** या पंचवीस श्लोकांच्या स्तोत्रांत, निघुणवाद, दृष्टिसृष्टिवाद यांचे भरपूर उल्लेख आहेत. तसेंच, अहमर्थ हाच आत्मज्ञानाचा गाभा आहे असें नाहीं. ब्रह्म हें अज्ञानाचा आश्रय व विषय असूं शकतें असेंही प्रतिपादन त्यांत आलेलें आहे.

गौडपादकारिकांमध्यें निर्गुणवादाचें प्रतिपादन कोठेंच आढळत नाहीं. अर्थात्, आत्म्यांचा भेद नाहीं. आत्मा, अज, अमर, अविकार्य आहे या मुद्द्यावर गौडपादांनीं भर दिला आहे. पण आत्मा निर्गुण असतो असा स्पष्ट उच्चार गौडपादांनीं केलेला नाहीं. शंकराचार्यांनीं मात्र वारंवार तसें सांगितलें आहे. तसेंच, आत्मा हा, अज्ञानाचा आश्रय व विषय असूं शकतो याचाही उच्चार गौडपादांनीं एकदांसुद्धां केलेला नाहीं.

म्हणून निंबार्क जेव्हां ह्यासारख्या विषयांना स्पर्श करतात तेव्हां शंकराचार्य आणि त्यांचा संप्रदाय हेच त्यांना अभिप्रेत असतात असें मानलें पाहिजे. गौडपादांपूर्वीच्यां एखाद्या आचार्यांना उद्देशून निंबार्कांनीं विवेचन केलें असें म्हणून चालणार नाही.

श्रीनिवास हे निंबार्कांचे अगदीं जवळचे शिष्य ते तर प्रतिबिंबवादाचा अगदीं स्पष्ट उच्चार करात. गौडपाद, या सिद्धांताला स्पर्शसुद्धां करीत नाहींत. आपल्या सिद्धान्ताच्या विवरणासाठीं त्यांनीं तीन प्रकारचे दृष्टान्त वापरले आहेत. प्रथम ते रज्जुसर्प दृष्टान्त सांगतात. आणि असें प्रतिपादन करतात कीं, मंदांधकारांत ज्याप्रमाणें दोरीवर सापाचा भास होतो त्याप्रमाणें आत्म्यावर

अनात्म्याचा भास होतो. नंतर ते घटाकाशाचा दृष्टान्त सांगतात. घटाकाश ज्याप्रमाणें महाकाशाहून भिन्न नसतें त्याप्रमाणें जीवात्मा परमात्म्याहून भिन्न नाहीं. आणि सगळ्यांत शेवटीं ते, अलातचक्राचा दृष्टांत देतात. एका कडेला जळणारी काठी जर वेगानें फिरविली तर आगीच्या चक्राचा (अलातचक्राचा) आभास निर्माण होतो त्याप्रमाणें विविधरूप जग म्हणजे निव्वळ आभास आहे असें ते प्रतिपादन करतात. पण शंकराचार्य जसें सांगतात कीं, सूर्याच्या पाण्यांत पडलेल्या प्रतिबिंबाप्रमाणें आत्म्याचें अज्ञानांत पडलेलें प्रतिबिंब म्हणजे जग आहे त्याप्रमाणें गौडपाद एकदांसुद्धां सांगत नाहींत.

म्हणून प्रतिबिंबवादाचा उल्लेख करणारे श्रीनिवास हे शंकराचार्यांच्या अगोदर होऊन गेले असें म्हणतां येणार नाहीं. श्रीनिवासांचे समकालीन आणि गुरु असणारे निंबार्क अर्थातच शंकराचार्यांच्या अगोदर झालेले असणें शक्य नाहीं.

गौडपादांच्या वर उद्धृत केलेल्या कारिकेंत भेदाभेदवादाचा संबंध दिसत नाहीं. 'तेषामुभयथाभेदः' एवढ्या उल्लेखावरून द्वैताद्वैत सिद्ध होत नाहीं. त्याचा अर्थ इतकाच होतो कीं, द्वैत्यांच्या दृष्टीनें द्वैत हे, पारमार्थिक आणि अपारमार्थिक अशा दोन्ही अर्थांनी सत्य आहे. शंकराचार्यांचे मत असेंच आहे. ते म्हणतात- अद्वैत सत्य आहे आणि द्वैत त्याचे कार्य आहे. म्हणजे द्वैत मनोव्यापारामुळें निर्माण होतें. आणि तो थांबतांच नष्ट होतें. सुषुप्ति, मूर्च्छा यामध्यें असेंच असतें, हें आमचें मत आहे. परंतु द्वैत्यांचें म्हणणें असें कीं, पारमार्थिक आणि अपारमार्थिक अशा दोन्ही दृष्टींनीं द्वैत हेंच सत्य आहे. पण आमच्या मताचें कशानेंही खंडन होत नाहीं. कारण आम्ही अद्वैती शत्रूलाही अभिन्नच मानीत असतों.

अशा रीतीनें या कारिकेंत फक्त द्वैताचाच उल्लेख दिसतो. द्वैताद्वैताचा उल्लेख असता तर, शंकराचार्यांनीं वर सांगितल्याप्रमाणें अर्थ केलाच नसता. आणि **'तेषामुभयथाद्वैतम्'** या वाक्यानें द्वैताद्वैताचा उल्लेख जरी होत असला

तरी त्यामुळें निंबार्काचेंच मत गौडपादांना उल्लेखावयाचें आहे असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. **'स्वसिद्धान्तव्यवस्थासु द्वैतिनो निश्चिता दृढम्'** (मांडूक्य उ. ३।१७) या कारिकेंत गौडपादांनीं द्वैताचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. पण त्यावरून, मध्वाचार्य गौडपादांच्या अगोदर होऊन गेले असें कोणीतरी म्हणेल का ? याच पद्धतीनें द्वैताद्वैताचा नुसता उल्लेख, शंकराचार्य आणि गौडपाद यांचे लिखाणांत आला एवढ्यावरून निंबार्क त्यांच्यापेक्षां जुने ठरविणें हें हास्यास्पद ठरेल.

'मध्वमुखमर्दन' या नांवाचा एक हस्तलिखित ग्रंथ, निंबार्कांच्या नांवावर मोडणारा मध्वमठांत आहे असें समजतें. तो जर खरोखर निंबार्कांचा असेल तर निंबार्क मध्वाचार्यांनंतर झाले असें मानावें लागेल. याप्रमाणें निंबार्कांच्या ग्रंथादि पुराव्यावरून, ते शंकराचार्यांच्या अगोदर झाले नाहींत एवढे निश्चित ठरतें. आणि हस्तलिखिताच्या आधारें आम्हांला असें वाटतें कीं, इसवी सनाच्या तेराव्या शतकांत होऊन गेलेल्या मध्वाचार्यांच्या सुद्धां अगोदर निंबार्कांचा काळ नेतां येत नाहीं. (Vedanta Parijat Saurabha, edited by Dr. (Mrs.) Roma Bose, M.A., D. Phil. Vol. III पृष्ठें - १४ ते १७)

याप्रमाणें निंबार्काचार्यांच्या काळाबद्दल प्राचीन व नवीन दोघांचींही मतें वर दिलीं आहेत. यापैकीं योग्य मत कोणतें याचा विचार करणें आवश्यक आहे. नवीन चिकित्सकांनीं आपल्या विचारास पोषक म्हणून श्रीनिंबार्काचार्यांच्या रचनेचें साहाय्य घेतलेलें नाहीं. ज्यांनीं थोडेफार घेतलें आहे त्यांनींही अवश्य उल्लेखनीय संदर्भ सोडला आहे. म्हणून नवीन विचारपद्धति सर्वांशानें प्रमाण मानतां येत नाहीं. प्राचीन विचार म्हणजे श्रीनिंबार्काचार्य द्वापारयुगांत झाले. हाही विचार संयुक्तिक ठरणार नाहीं. कारण ब्रह्मसूत्रकार बादरायणसुद्धां जर द्वापारयुगांत झाले कीं नाहीं हें संदिग्ध आहे तर भाष्यकार त्यावेळीं झाले असें कसें मानतां येईल? पौरणिक कथांच्या विविधतेप्रमाणें फार तर ही गोष्ट प्रामाणिक मानतां येईल. काहीं पाश्चात्य

लेखकांनीं तर, एक गीतेंतील कृष्ण व दुसरा भागवतांतील कृष्ण असे दोन कृष्ण मानले आहेत. आधुनिक थिऑसोफिस्टही असेंच मानतात. पण वास्तविक कृष्ण दोन नसून एकच आहे. भागवत ही कृष्णाची वाङ्मयमूर्ति आहे. आणि ती कृष्णानंतर प्रगट झाली आहे. महामुनि श्रीनिंबार्क, श्रीवासुदेवाची वाङ्मयमूर्ति जी भागवत, त्या काळांत झाले आहेत. तें युग श्रीकृष्णांच्या परिचर्येची स्थापना करण्याचें होतें. त्यावेळीं श्रीवासुदेवाच्या प्रतीकोपासनेचा प्रचार जोरांत होऊन राहिला होता. याकरितां **'द्वापरे परिचर्यायाम्'** या वचनास अनुसरून ते कलियुगांतर्गत द्वापरयुग होते. जशा एका ग्रहाच्या महर्दशेंत इतर ग्रहांच्या अंतर्दशा चालू असतात तसा एका महायुगांत इतर युगांचाही काल शास्त्रसंमत आहे. आरुणि हे द्वापरयुगांत कृष्णांच्या काळीं झाले या कथेचें रहस्य हें आहे.

दक्षिणेंत गोदावरीच्या तीरावर पंढरपूर गांवांत अरुणमुनींची पत्नी जयंतीदेवी, हिच्यापासून कार्तिक पौर्णिमेस सायंकाळीं श्रीनिंबार्काचार्यांचा जन्म झाला. डॉ. भांडारकर इत्यादिकांच्या मतें, यांचा जन्म, हौदराबादजवळ बेलारी गांवांत झाला. त्या गांवांत निंबकर तीर्थ म्हणून एक तीर्थ आहे. त्या तीर्थावरील लोक आपल्या नावांपुढें निंबकर ही उपाधि लावतात. या कारणामुळें बेलारी गांवांत जन्म झाला असें मानलें गेलें असेल. कांही का असेना पण यांचें मूळचें नांव निंबार्क हें नव्हतें. हें नांव पुढें यांच्या एका अलौकिक चरित्रामुळें पडलें. यांचें मूळ नांव नियमानंद म्हणून होतें. अत्यंत सौंदर्यामुळें लोक यांना सुदर्शन असेंही म्हणत असत. हे वेदशास्त्रामध्यें प्रकांड पंडित होते. यांच्या उपनयन संस्कारसमयीं देवर्षि नारदांनीं साक्षात् प्रकट होऊन यांना गायत्रीमन्त्र, अष्टादशाक्षरी ब्रह्मविद्या व भक्तिसूत्रें यांचा उपदेश केला अशी प्रसिद्धि आहे. श्री नारदाशिवाय दुसरे कोणीतरी यांचे गुरु असल्याचें आजपर्यंत सिद्ध झालें नाही. श्री निंबार्काचार्यांनीं आपल्या ब्रह्मसूत्रभाष्यांतील प्रथमाध्याय तृतीयपादांतील आठव्या सूत्रांत श्री नारदांचाच गुरुरूपानें उल्लेख केला आहे.

तें वाक्य असें- **'परमाचार्यैः श्रीकुमारैरस्मद्गुरवे श्रीमन्नारदायोपदिष्टो भूमा त्वेव विजिज्ञासितव्यः'**

## वेदान्त पारिजात सौरभ

ब्रह्मसूत्रावर श्रीनिंबार्काचार्यांनीं 'वेदान्तपारिजातसौरभ' या नांवाचें भाष्य लिहिलें आहे. मागे सांगितल्याप्रमाणें बौद्धाच्या अनीश्वरवादाचा प्रभाव संपूर्ण भारतवर्षावर पडला होता. जवळ जवळ तीनशें वर्षेपर्यंत बौद्धमताचें प्राबल्य टिकून होतें. लोकांचा ब्रह्मावरील विश्वास उडून गेला होता. अशा वेळीं पुराणांत सांगितल्याप्रमाणें, प्रत्यक्ष भगवंतांनीं बादरायण व्यासरूपानें प्रकट होऊन ब्रह्मसूत्राची रचना करून ब्रह्मवादाची स्थापना केली. आरुणि त्याच कालांतील आचार्य आहेत. त्यांनीं बदरीवनांत बादरायणांच्या जवळच ब्रह्मसूत्रवाक्यार्थ लिहिला त्यालाच 'वेदान्तपारिजातसौरभ' हें नांव आहे. अभिधावृत्तीनें सूत्रांचा होणारा जो मुख्यार्थ तोच या वाक्यार्थामध्यें दिला आहे. लक्ष्यार्थ किंवा व्यंगार्थ नाही. एक एक विषयाचें प्रतिपादन ब्रह्मसूत्रामध्यें एक् किंवा अधिक सूत्रांतूनही केलेलें आहे त्याला अधिकरण असें म्हणतात-

**विषयो विशयश्चैव पूर्वपक्षस्तथोत्तरः।**
**संगतिश्चेति पंचांगं शास्त्रेधिकरणं स्मृतम्।।**

विषय, संशय, पूर्वपक्ष, सिद्धान्त व संगति या पांच अंगांनीं युक्त अधिकरण असतें. श्री निंबार्काचार्यांनी आपल्या भाष्यांत, जीव व जग यांचा ब्रह्माशी भेदाभेद संबंध असल्याचें सांगितलें आहे. यालाच द्वैताद्वैत असें म्हणतात. या आपल्या द्वैताद्वैत मताला पोषक अशा उपनिषद्वाक्यांचाही आधार त्यांनीं घेतला आहे. सूत्रकारांनीं ज्या प्राचीन वेदान्ताचार्यांचा उल्लेख सूत्रांतून केलेला आहे ते सर्वही द्वैताद्वैतवादी होते.

## द्वैताद्वैतवादी प्राचीन आचार्य

१. **आश्मरथ्याचार्य**- ब्रह्मसूत्र १।२।३० व १।४।२० यामध्यें यांचें मत दिलें आहे. यांच्या मतांत जीव व परमात्मा याचा भेदाभेदसंबंध आहे. पूर्वमीमांसेंतील जैमिनीसूत्र ६।५।१६ यामध्येंही यांचा उल्लेख केला आहे.

२. **औडुलोमि**- यांचें मत, ब्रह्मसूत्र १।४।२१-३।४।४५ व ४।४।६ या सूत्रांतून आलें आहे. यांच्या मतांत; जीव व ब्रह्म यांचा संसारावस्थेंत भेद असून मुक्तावस्थेंत अभेद आहे. वाचस्पतिमिश्रांनीं भामतीमध्यें या मताचे विवरण करीत असतांना याबद्दल प्रमाण लिहिलें आहे- 'यथाहुः पांचरात्रिका':-

**'आमुक्तेर्भेद एव स्याज्जीवस्य च परस्य च।**
**मुक्तस्य तु न भेदोऽस्ति भेदहेतोरभावतः॥'** इति

३. **बादरि**- ब्रह्मसूत्रामध्यें यांचा उल्लेख आलेला आहे (४।३।६-४।४।१०) हे बादरायणांचे शिष्य बदरीवनांत राहाणारे कोणी महानुभाव होते. आचार्य जैमिनीही व्यासाश्रमांतच राहात होते. म्हणून त्यांनींही आपल्या मीमांसासूत्रांत बादरींचा उल्लेख केला आहे. उपास्य-उपासकभावरूपानें जीवब्रह्माचा भेदाभेद संबंध बादरि मानतात. भगवदुपासनेमध्यें सर्व वर्णांचा अधिकार हे मानीत होते.

४. **कार्ष्णाजिनि**- हे बादरिमताचे समर्थक आचार्य आहेत. यांचा उल्लेख ब्रह्मसूत्र ३।१।९ मध्यें आलेला आहे. मीमांसासूत्र ४।३।१७ व ६।७।३५ यांमध्यें जैमिनि, यांचें खंडन करतात.

या आचार्यांशिवाय,काश्यप, असित, देवल, गर्ग, जैगीषव्य,पराशर, भृगु इत्यादि बरेच वेदांताचार्य पुराणांतून आलेले आहेत. हे प्रायः वैष्णवमताचे असून भेदाभेदवादी आहेत.

**'तत्तुसमन्वयात्'** (१।१।४)
**'प्रकृतिश्च प्रतिज्ञादृष्टान्तानुपरोधात्'** (१।४।२३)

'योनिश्चहिगीयते' (१।४।२७)
'तदनन्यत्वमारम्भणशब्दादिभ्यः' (२।१।१४)
'उभयव्यपदेशात् त्वहिकुण्डलवत्' (३।२।२७)

तसेंच २।३।४३-४४।४५ इत्यादि सूत्रावरून बादरायणही भेदाभेद संबंध मानतात असें दिसतें.

## श्री निंबाकाचार्यांचा द्वैताद्वैतवाद किंवा भेदाभेदवाद

भेदाभेदासंबंधीं अनेक विद्वान प्राचीन कालापासून अनुकूल विचार मांडत असलेले दिसतात. बादरायणांच्या पूर्वींही औडुलोमि व आश्मरथ्य हे दोघे आचार्य भेदाभेद मानणारे होते, ज्यांचा उल्लेख बादरायणांच्या ब्रह्मसूत्रामध्यें आलेला आहे. शंकराचार्यांच्या पूर्वीं भर्तृप्रपंच नांवाच्या विद्वानांनीं हे मत मांडलें होतें. ज्याचें खंडन श्री शंकराचार्यांनीं बृहदारण्यकभाष्यांत केलें आहे. त्यानंतर प्रमुख भेदाभेदवादी, भास्कर, यादव व निंबार्क हे पुढें येतात. भेदाभेद मानणारे हे सर्वच भेद व अभेद यांचें समान महत्त्व मानणारे नाहींत. परंतु भेदसहित अभेद सर्वांचे मतें संभवतो. श्री निंबार्काचा भेदाभेदवाद मात्र इतर भेदाभेदवाद्यांचेपेक्षां पृथक असल्यानें तो स्वाभाविक भेदाभेद या नावानें प्रसिद्ध आहे. श्रीनिंबार्काचे मतांत, ब्रह्म हें, जीव व जग यांच्याहून भिन्न व अभिन्न आहे आणि हा ब्रह्माशीं जीव जगताचा भेदाभेद, आरोपानें किंवा उपाधीमुळें नसून स्वाभाविक आहे.

ब्रह्माला उपादान कारण मानणारा अद्वैत सिद्धान्त व ब्रह्माला निमित्तकारण मानणारा द्वैतसिद्धान्त या दोघांचाही समन्वय श्रीनिंबार्कसिद्धान्तांत झालेला आहे. कारण भेद व अभेद दोन्हीही समबल दाखविणारे विचार उपनिषदांतून आलेले दिसतात. उपनिषदामध्यें; ब्रह्माची स्वतंत्र सत्ता व जीव जगताची परतंत्र सत्ता दाखविली आहे. जीव व जग हे दोन्ही ब्रह्मांच्या नियंत्रणाखालीं आहेत. दक्षिण भारतांत निघालेल्या चार वैष्णवसंप्रदायांपैकीं

सनकादिसंप्रदायाचे संस्थापक श्रीनिंबार्काचार्यांच्याद्वारा, भक्त व भगवान् यांचें पृथक् अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न झाला. कारण भक्तिभावनेकरितां कोणत्या तरी प्रकारानें द्वैताची आवश्यकता आहे. म्हणून श्रीरामानुजांच्या प्रमाणें श्रीनिंबार्कांनींही अनेकत्वाची सत्यता स्वीकारून, ब्रह्म, जीव व जग हे तीनही पदार्थ सत्य मानले. श्रीरामानुजाचार्यांचे मतें, जीव व जगत्, ब्रह्माचें शरीर, अवयव ठरत असल्यानें त्यांना अत्यंत पृथक् अस्तित्व नाही. म्हणून द्वैत अद्वैतापेक्षां हीन दर्जाचें आहे, हे विचार श्रीनिंबार्कांना मान्य नाहीत. त्यांच्या मतें, कारण ब्रह्माहून; कार्य, जीव व जगत् हें अभिन्न असूनही भिन्न आहे. यामुळें भेद व अभेद दोन्हीही समान आहेत. यापैकीं कोणीही हीन किंवा श्रेष्ठ नाहीं. एक व अनेक यांचा हा भेदाभेद संबंध; संसार, प्रलय, मुक्ति सर्व अवस्थांतून कायम आहे. यामुळें श्रीनिंबार्क; आपल्या सिद्धान्ताला स्वाभाविक भेदाभेदवाद असें म्हणतात. या दृष्टीनें; अत्यंत प्रामाणिक अशा उपनिषदांतील भेद व अभेद प्रतिपादन करणाऱ्या वाक्यांच्या आधारें श्रीनिंबार्कांनीं जी विचारधारा प्रवृत्त केली आहे तिच्यामध्यें द्वैत व अद्वैत दोन्हीही मतांचा समावेश झाला आहे.

श्रीनिंबार्कांच्या मतांत तिघांच्या सत्ता मानलेल्या आहेत. १. **ब्रह्म - नियंतृ**, २. **जीव (चेतन)** भोक्ता, ३. **जग (अचेतन)** भोग्य. आतां येथें प्रश्न असा कीं या तिघांचा परस्परसंबंध कोणता आहे? श्रीनिंबार्कांनीं यांच्या संबंधाला स्वाभाविक भेदाभेद ही संज्ञा दिली आहे. त्यांचा अभिप्राय असा - ब्रह्म हें, जगाचें उपादानकारण व निमित्तकारण आहे. आणि चेतन, अचेतन सर्व त्याचें कार्य आहे. म्हणून ब्रह्म आणि जीव जगत् सर्वथा अभिन्न नाहीं. तसें मानल्यास उपनिषदांत सांगितलेल्या यांच्या भेदाचें खंडन होईल. तसेंच या तिघांचा अत्यंत भेदही मानतां येत नाही. कारण उपनिषदांमध्यें यांचा अभेदही मानला आहे. ब्रह्मसूत्र २।३।४२-४३-४४ यामध्यें श्रीनिंबार्कांनीं जीव हा ब्रह्माचा अंश असल्याचें सिद्ध केलें आहे. अर्थात् जीव ब्रह्मामध्यें भेदाभेदसंबंध सिद्ध

होतो. ब्रह्मसूत्र ३।२।२७-२८ यामध्यें श्रीनिंबार्क स्पष्टच लिहितात कीं- **'मूर्तामूर्तादिकं विश्वं ब्रह्मणि स्वकारणे भिन्नाभिन्नसम्बन्धेन स्थातुमर्हति, भेदाभेदव्यपदेशादहिकुण्डलवत्' 'जीवपुरुषोत्तमयोरपि तथासम्बन्धो ज्ञेयः। उभयव्यपदेशात्, प्रभातद्वतोरिव'** जीव व जगापेक्षां ब्रह्म जर अत्यंत भिन्न मालें तर तें सर्वव्यापक व सर्वांचे नियामक ठरणार नाहीं. तें जगाप्रमाणें मर्यादित होत जाईल. म्हणून भेद व अभेद समानरूप मानणें उचित आहे.

भास्कराचार्यांनीं या तिघांचा औपाधिक भेदाभेद मानला आहे. संसारावस्थेंत शरीर, इंद्रिय इत्यादि उपाधिसंबंधामुळें जीव ब्रह्माहून पृथक् होतो. जेव्हां जीव मुक्त होतो, तेव्हां सर्व उपाधि नष्ट होत असल्यामुळें जीव, ब्रह्माशीं पूर्णपणें अभिन्न होऊन जातो. म्हणजे सृष्टीच्या वेळीं उपाधीमुळें भेदाभेद दिसतो आणि प्रलयावस्थेमध्यें सर्व उपाधि नष्ट झाल्यामुळें भेदाभेद राहात नाहीं. केवळ अभेदच राहतो, असे भास्कराचार्यांचे मत आहे. श्रीनिंबार्काचार्यांनी कारण (ब्रह्म) व कार्य (चित्, अचित्) यांचा भेद व अभेद दोन्हीही शाश्वत, स्वाभाविक मानले आहेत. मग ती अवस्था, सृष्टीची, प्रलयाची अथवा मुक्तीची कोणतीही असो. ब्रह्म निरपेक्ष मानून तें, शरीर, इंद्रिय इत्यादि उपाधींच्या अपेक्षेनें जीव बनते. अर्थातच त्या उपाधि नष्ट झाल्यावर जीवब्रह्मांचा पूर्ण अभेद राहतो असें भास्कराचार्य म्हणतात. पण हें, श्रीनिंबार्कांना पसंत नाहीं. कारण, तसें मानल्यास निरपेक्ष ब्रह्मामध्यें, उपाधिजन्य अपूर्णतेचा स्वीकार करावा लागेल. श्री निंबार्कांचे मत असें कीं, निरपेक्ष ब्रह्म कारण नसून ब्रह्म हें शक्तिमत् आहे व त्याच्या शक्तीचा विक्षेप, म्हणजे सर्व विश्वरूप कार्य आहे. त्यामुळें त्यांच्यामध्यें दिसणारा भेद, सूर्य व त्याची प्रभा यांच्याप्रमाणें आहे. तथापि, शक्ति ही, कार्य करतांना नेहेमीं शक्तिमानाच्या आधीन राहात असल्यानें शक्ति व शक्तिमान् यांचा अत्यंत भेद न मानतां भेद व अभेद दोन्हीही मानणें उचित आहे. हा विषय श्री निंबार्काचार्यांनीं ब्रह्मसूत्र १।४।२६ याच्या भाष्यामध्यें मांडला आहे तो असा- **'ब्रह्मैव निमित्तमुपादानं च। कुतः?' 'तदात्मानं**

**स्वयमकुरुत' इत्यात्मकृतेः। ननु कर्तुः कुतः कृतिविषयत्वम्? परिणामात्। सर्वज्ञं सर्वशक्ति ब्रह्म स्वशक्तिविक्षेपेण जगदाकारं स्वात्मानं परिणमय्य, अव्याकृतेन स्वरूपेण शक्तिमता कृतिमता परिणतमेव भवति'** - याप्रमाणें ब्रह्मशक्तिचा परिणाम श्रीनिंबार्काचार्य मानत असल्यानें त्यांचे मतें स्वाभाविक भेदाभेदवाद सिद्ध होतो.

याप्रमाणें ब्रह्म हें अद्वैत व द्वैत दोन्हीही आहे. **'सर्वभिन्नाभिन्नो भगवान् वासुदेवो विश्वात्मैव जिज्ञासाविषयः'** (श्रीनिंबार्कभाष्य सू. १।१।४) असें श्रीनिंबार्क स्पष्टच सांगत आहेत. ब्रह्म हें, अंशी, उपास्य, जिज्ञास्य व नियंतृ आहे. तर जीव हा, अंश, उपासक, जिज्ञासु व नियम्य आहे. ब्रह्म हें, नवीन सृष्टि करण्याचे वेळीं, जीवांना त्यांच्या त्यांच्या अनादि कर्माशीं संयुक्त करून करमणुकीकरीतां ही सृष्टि करतें. हेंच पुढील वाक्यांत सांगितलें आहे- **'परस्यैतद्रचनादि, लोकप्रसिद्धनृपत्यादिक्रीडामात्रमिव युज्यते'** (श्री निंबार्कभाष्य ब्र.सू. २।१।३२) याप्रमाणें जीव हे आपल्या कर्माचें फल भोगणारे असल्यामुळें ते ब्रह्मापेक्षां निराळे आहेत. ब्रह्म हें, सुखदुःखरूपकर्मफलरहित, निर्दोष, सृष्टिस्थितिसंहारशक्तिसंपन्न, असें आहे. यामुळें जीव व ब्रह्म यांचा स्वाभाविक भेद आहे.

जीव व ब्रह्म यांचा भेद जसा सिद्ध होतो तसा त्यांचा अभेदही सिद्ध होतो. याबद्दल श्रीनिंबार्काचार्यांचा अभिप्राय अशा आहे - कार्याची स्थिति व प्रवृत्ति कारणाच्या आधीन असते, तशीच जीवाचीही स्थिति व प्रवृत्ति ब्रह्माच्या आधीन आहे या अभिप्रायानें जीव व ब्रह्म यांचा अभेद श्रीनिंबार्काचार्य मानतात.

चेतन जीवाप्रमाणें अचेतन विश्वाचाही ब्रह्माशीं भेदाभेदसंबंध आहे. अचेतन विश्व हें ब्रह्माच्या शक्तीचा परिणाम आहे. श्रीनिंबार्काचार्यांच्या मतांत ब्रह्मशक्तीचा विक्षेपरूप परिणाम मानलेला असल्यानें निरवयव, सर्वव्यापी ब्रह्माचा परिणाम कसा होतो हा आक्षेप संभवत नाहीं. हा विषय वेदान्तरत्नमंजूषेमध्यें पुरुषोत्तमाचार्यांनीं मांडला आहे तो असा -

'तस्मान्निरवयवस्यापि विभोर्ब्रह्मणः परिणामेऽति
तादृशशक्तियोगादेवाविकारित्वमपीति बोध्यम्। वस्तुतस्तु
आत्मकृतेः परिणामादित्यादौ
परिणामशब्दःशक्तिविक्षेपवाचकः। ब्रह्मस्वरूपे
परिणामानभ्युपगमा- न्नोक्तदूषणगन्धस्पर्शनावकाशः।
तथाचाप्रच्युतस्वरूपस्यैवौर्णनाभ्यादेः
स्वशक्तिविक्षेपलक्षणपरिणामवत्त्वेऽपि नोक्तदोषयोगः'

(वेदान्तरत्नमंजूषा पृ. ६५)

ब्रह्मामध्यें अनंत शक्ति आहेत त्यांचा परिणाम हें चेतनाचेतनात्मक विश्व आहे असें मानलें म्हणजे ब्रह्म विकारी होण्याची भीति नाहीं. श्रीनिंबार्कांच्या मतांत आणि सांख्यमतांत फरक काय? असा एक प्रश्न उपस्थित होतो. याबद्दल विवेचन श्रीनिवासाचार्यांनीं वेदान्तकौस्तुभ नांवाच्या आपल्या सूत्रभाष्यांत केलें आहे तें असें-

'ननुशक्तिविक्षेपलक्षणपरिणामांगीकारे
स्वरूपपरिणामाभावात्सांख्यादिभ्यः को विशेषः इति चेत्।
श्रूयताम्ते हि कुलालान्मृत्पिण्डवत् पुरुषाद्भिन्नमतदात्मकं
स्वाधीनस्थितिप्रवृत्त्यादिमद् द्रव्यं जगदुपादानकारणमीचक्रुः।
औपनिषदं ब्रह्म तु एकमेव भोग्यशक्तिं विक्षिप्याकाशाद्यचेतनरूपेण
परिणामयते। भोक्तृशक्तिं चेतनां देवादिरूपेण विक्षिप्य
तदन्तर्यामितयाऽनुप्रविष्टं सत्तत्तत्कर्मफलं भोजयति, उपसंहरति च
प्रलयसमये कूर्मोङ्.गानीव सूर्यो रश्मीनिव'

(वेदान्तकौस्तुभ पृ. १६९-१७०)

वरील विवेचनाचें तात्पर्य असें कीं, जसा कोळी घरांतील कोपऱ्यांत बसून जाळे तयार करतो व पुनः तें आवरून घेतो, तें जाळें त्याच्यापेक्षां निराळें दिसलें तरी सर्वस्वी त्याच्या इच्छेवरच आवलंबून असल्यामुळें निराळें नाहीं

तसाच ब्रह्म व जग यांचा संबंध आहे.

श्रीनिंबार्काचार्यांचा हा भेदाभेद शाश्वत स्वरूपाचा आहे म्हणजे तो सृष्टि, प्रलय, मोक्ष सर्वही अवस्थांतून राहाणारा आहे. सृष्टि व प्रलयाचे वेळीं भेदाभेदाचा विचार पूर्वी झालेला आहे. आतां मुक्तीच्या वेळींही तो कसा असतो हें पाहाण्याकरितां प्रथम या मतांत मुक्तीचें स्वरूप काय आहे तें पाहिलें पाहिजे - पापपुण्यात्मक सर्व कर्मांचा नाश होऊन, ब्रह्मस्वरूप व आत्मस्वरूप दोन्हीचीही प्राप्ति जीवाला होते त्याला ब्रह्मानुभव अखंड येऊ लागतो. ही स्थिति म्हणजे मुक्ति श्रीनिंबार्कमतांत आहे. हीच, भगवद्भावापत्ति, सायुज्य, साम्य इत्यादि शब्दांनीं सांगितली आहे. श्रीपुरुषोत्तमाचार्यांनीं वेदान्तरत्नमंजूषेमध्यें असेंच मुक्तिस्वरूप दाखविलें आहे तें असें -

**'भगवत्कृपायाःफलं मोक्षलक्षणं**
**सर्वकर्मध्वंसाभावपूर्वकसमस्तनिःशेषाविद्यानिवृत्त्यात्मक**
**परिपूर्णयावदात्मभाविब्रह्मत्वरूपादि-**
**विषयकानुभूतिसन्ततिर्मुक्तिरिति, तदेव**
**भगवद्भावापत्तिसायुज्यसाम्यादिशब्दैरभिधीयते'**

(वेदान्तरत्नमंजूषा पृ. १३२)

याप्रमाणें मुक्तिस्वरूपही भेदाभेदयुक्त आहे. मुक्त जीव जरी अविद्यादिदोषरहित, सत्यसंकल्प असा झाला तरी तो सर्व कार्ये भगवंताचे इच्छेप्रमाणें त्याचे नियंत्रणाखालीं राहूनच करीत असतो. तसेंच त्याचा आकार अणु व ब्रह्माचा विभु, व्यापक आहे. ब्रह्म हें, सृष्टि, स्थिति, संहार करण्यास समर्थ आहे. मुक्त जीव तसा नाहीं या कारणांनीं मुक्तिसमयींही जीव व ब्रह्म यांचा भेद राहातो म्हणून या मतांत भेदाभेद शाश्वत स्वरूपाचे आहेत.

याप्रमाणें श्री निंबार्काचार्यांच्या भेदाभेदवादाबद्दल विचार झाला. भास्कराचार्य व निंबार्क यांच्यामध्यें काय अंतर आहे तें पूर्वीं संक्षेपानें दाखविलें आहे. भेदाभेद मानणारे प्राचीन आचार्य आणि निंबार्क यांच्या विचारामध्यें

काय अंतर आहे तें थोडक्यांत पाहूं - ओडुलोमींचे मतें, जीव मुक्त होईपर्यंत ब्रह्मापेक्षां भिन्न असतो. मुक्तीनंतर तो ब्रह्माभिन्न होतो. श्रीनिंबार्क मतांत सर्वदा भेद व अभेद आहे. काशकृत्स्न आचार्यही शेवटीं जीवब्रह्माचा अभेद मानतात. मुक्तीच्या पूर्वीं त्यांच्यामध्यें नियम्यनियामकभाव असल्यामुळें त्यांचा भेदच आहे. तात्पर्य, इतर भेदाभेदवादी आचार्यांचा कल अभेदाकडेच अधिक दिसतो. अभेदच भेदापेक्षां स्थायी दिसतो. निंबार्कमतांत मात्र द्वैत व अद्वैत दोघांचेंही महत्त्व सारखेंच असून दोन्हीही शाश्वत, बरोबर राहणारे असे आहेत.

श्री निंबार्कांच्या या स्वाभाविक द्वैताद्वैताचें सयुक्तिक विवेचन त्यांच्या संप्रदायांतील पुढील आचार्यांनी केलेलें आहे. त्यांपैकी निंबार्कांच्या नंतर तृतीय आचार्य श्री पुरुषोत्तम, यांनीं निर्गुण ब्रह्मवादाचें खंडन, वेदान्तरत्नमंजूषा (पृ. ६०) या ग्रंथामध्यें केलें आहे. जीवस्वरूपासंबंधीं असलेले, प्रतिबिंबवाद, अवच्छेदवाद, सर्वगतात्मवाद, एकजीववाद यांचा परामर्श पुरुषोत्तमाचार्यांनीं घेतला आहे. शेवटीं जीव, जगत्, ब्रह्म यांचा भेदाभेद सिद्ध केला आहे. जीव व जग म्हणजे चित् व अचित् हें, यामुळें ब्रह्माशीं अभिन्न आहे कीं - ब्रह्म हेंच चित् व अचित् यांचें सार आहे. दुसरी गोष्ट ; चित् व अचित् यांचें अस्तित्व व कार्य ब्रह्माच्या नियंत्रणाखालीं आहे म्हणून त्यांचा अभेद आहे. तिसरें अभेदाचें कारण म्हणजे चित् व अचित् ब्रह्मानें व्याप्त आहे - तसेंच, चित् व अचित् हें ब्रह्माहून भिन्नही आहे. कारण तिघांच्या स्वरूपांत मोठेंच अंतर आहे. ब्रह्म हें नियामक आहे व चित्, अचित् हें नियम्य आहे. म्हणजे ब्रह्म नियंतृ, चित् - भोक्ता व अचित् - भोग्य अशी त्रिविध सत्ता दिसते. वस्तुतः सत्ता दोन प्रकारची आहे. एक स्वतंत्र सत्ता व दुसरी परतंत्र सत्ता. याबद्दलचें विवेचन श्री पुरुषोत्तमाचार्यांनीं केलें तें असें -

**‘सत्ता तावद् द्विविधा, स्वतन्त्रपरतन्त्रभेदात्।**
**तत्र स्वतंत्रसत्ता नाम आत्माश्रितत्वे सति स्वायत्तस्थितिप्रवृत्तिकता।**
**सा परब्रह्मविश्वात्मनिष्ठा।......**

**परतन्त्रसत्त्वं च परायत्तस्थितिप्रवृत्तिकत्वम्।**
**तच्च चेतनाचेतनात्मकनियम्यवर्गवृत्ति'**

(वेदान्तरत्नमंजूषा पृ. ८९-९०)

या दोन सत्तांच्या दृष्टीनें वेदान्तांतील भेद व अभेद प्रतिपादन करणाऱ्या वाक्यांची संगति लागू शकते. अभेदप्रतिपादक वाक्यांचा संदर्भ ब्रह्माकडे लागतो व भेदप्रतिपादक वाक्यांचा संदर्भ परतंत्रसत्तात्मक चित् अचित् यांच्याशीं लागतो. ब्रह्म हें निरपेक्ष आहे. त्याला इतर कोणाचीही आवश्यकता नाहीं. म्हणून ब्रह्मदृष्टीनें पाहिलें तर अभेदच दिसून येतो. चित् व अचित् मात्र सापेक्ष आहे. म्हणून त्यांना दुसऱ्या कोणाची तरी आवश्यकता आहे. तेव्हां त्यांच्या दृष्टिकोणांतून पाहूं लागलें तर भेदाचाच साक्षात्कार होतो. याप्रमाणें स्वतंत्र ब्रह्मसत्ता व परतंत्र चित् अचित् सत्ता या दोन्ही दृष्टीनें भेद व अभेद समान व सत्य ठरतात.

श्रीपुरुषोत्तमाचार्यांचें नंतर श्रीनिंबार्कांपासून बारावे आचार्य श्रीदेवाचार्य, यांच्या विचारांचा परिचय त्यांच्या ग्रंथावरून मिळतो. त्यांच्या पूर्वींचे मधले आचार्य, यांच्या कृति उपलब्ध नसल्यानें त्यांचे विचार कळत नाहींत. श्रीदेवाचार्यांनीं सिद्धान्तजाह्नवी नांवाच्या ब्रह्मसूत्रांवरील टीकेमध्यें स्वाभाविक भेदाभेदवादाचा पुरस्कार केला आहे व त्याकरितां, औपाधिक भेदाभेद, अद्वैत, द्वैत, विशिष्टाद्वैत या सर्व मतांचें विस्तृत समालोचन करून खंडन केलें आहे त्याचा सारांश पुढीलप्रमाणें आहे -

भास्कराचार्य, जीवब्रह्माचा भेद औपाधिक मानतात. त्यांचा सिद्धान्त असा कीं, **'सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम्'** (छांदोग्य उ. ६।२।१) **'आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत्'** (ऐतरेय उ. १।१।१) **'एको ह वै नारायण आसीत्'** इत्यादि श्रुतिवाक्यें पाहिलीं असतां मुळांत एकच ब्रह्म अभिन्न असें असलेलें दिसतें. अनादि अशा उपाधिमुळें भेद झालेला आहे. तो शेवटीं, **'तत्त्वमसि'** (छांदोग्य, ६।७।८) इत्यादि अभेदप्रतिपादकवाक्यापासून

अभेदज्ञान झाल्यावर नाहींसा होतो. याप्रमाणें भास्कराचार्यांचें मत मांडून श्रीदेवाचार्यांनीं यांचें खंडन असें केलें आहे कीं, - उपाधीनें जीव हा ब्रह्मापेक्षां भिन्न झाला या म्हणण्याचा अर्थ काय? असा प्रश्न आहे. ब्रह्म सर्वव्यापक आहे. त्याचा एक तुकडा उपाधीनें निराळा काढला तो जीव असें मानलें तर ब्रह्म हें अच्छेद्य असल्यानें त्याचा तुकडा काढणें शक्य नाहीं. आणि असा तुकडा म्हणजे जीव असें मानल्यास तो जन्य ठरेल. (२) अणु उपाधीनें संबद्ध असा ब्रह्माचा अच्छिन्न एक प्रदेश म्हणजे जीव असें मानले तर, ब्रह्माच्या एका प्रदेशांत उपाधीचा संबंध झाल्यामुळें उपाधीचे सर्व दोष ब्रह्मावरच येऊन आदळतील. तसेंच, उपाधि दुसरीकडे गेल्यास तेथें पूर्वीच्या ब्रह्मप्रदेशाचें आकर्षण होणें शक्य नसल्यानें उपाधिसंबद्ध ब्रह्मप्रदेश दुसरा होणार. म्हणजे प्रत्येक क्षणाला जीव तयार होतो व नाहींसा होतो. याप्रमाणें क्षणोक्षणीं बंध व मोक्ष होतात असें मानण्याचा प्रसंग येईल. उपाधीच्या जाण्यानें त्या प्रदेशाचेंही आकर्षण होते असें मानल्यास, तो प्रदेश अच्छिन्न असल्यानें संपूर्ण ब्रह्माचेंच आकर्षण होतें असें मानावें लागेल. ब्रह्माचें आकर्षण असंभाव्य मानल्यास पूर्वीचा दोष कायमच राहिला. तसेंच सर्व जीव ब्रह्माचें अच्छिन्न प्रदेश ठरल्यानें सर्वांचें ऐक्य कां भासूं नये? प्रदेश भिन्न झाल्यामुळें जीवांना एकत्वज्ञान होत नाही असें मानल्यास, स्वतःचा उपाधि दुसऱ्या प्रदेशांत गेला असतां त्या जीवाला देखील स्वतःचें अनुसंधान राहणार नाहीं. (३) उपाधिसंयुक्त ब्रह्मस्वरूप म्हणजे जीव. या पक्षांत पूर्वीची प्रदेशकल्पना सोडल्यामुळें पूर्वीं दाखविलेले दोष येणार नाहींत हें खरें. पण उपाधीच्या संबंधामुळें ब्रह्मालाच जीवत्व आल्याकारणानें उपाधिरहित शुद्ध ब्रह्माची सिद्धी होणार नाहीं. (४) उपाधिसहित दसराच कोणीतरी चेतन म्हणजे जीव म्हणावा तर ब्रह्माहून भिन्न दुसरा चेतन, औपाधिकभेदवाद्यांनीं मानलेला नाहीं. जर तो मानला तर औपाधिक भेदवाद सुटला व परपक्षांत प्रवेश झाला. (५) उपाधि म्हणजेच जीव. असें मानल्यास भौतिक देहादि पदार्थांनाच जीव समजणाऱ्या

चार्वाकादिनास्तिकमताचा अंगीकार केल्याप्रमाणें होईल. याप्रमाणे पांच युक्तींनीं औपाधिकभेदवादाचें खंडन श्रीदेवाचार्य करतात. (सिद्धान्त जाह्नवी पृ. ३०-३१) याचप्रमाणें द्वैतवादींचें मतही मांडून त्याचेंही खंडन विशिष्टाद्वैतवाद्यांच्या द्वारें श्रीदेवाचार्य करतात. तें असें - वेदामध्यें अभेदाप्रमाणें भेद सांगणारीही वाक्यें दिसत असल्यामुळें जीव व ईश्वर यांचा भेद प्रामाणिक आहे. भेद सांगणारी वाक्यें अनुवादक आहेत. अभेदच खरा आहे हें अद्वैतवाद्यांचें म्हणणें बरोबर नाहीं. कारण, जीव व ईश्वर दोघेही अतींद्रिय असल्यानें त्यांचा भेद प्रत्यक्षप्रमाणानें सिद्ध होत नाहीं. त्यामुळें त्यांचा भेद दाखविणारीं श्रुतिवाक्यें अनुवादक ठरत नाहींत. अभेदवाक्याप्रमाणें भेदवाक्याबद्दलही तात्पर्यनिर्णायक षड्विध लिंगें उपलब्ध होत असल्यानें भेदवाक्यांचें प्राबल्य मानण्यास हरकत नाहीं. याबद्दल बृहदारण्यकोपनिषदांतील अंतर्यामीब्राह्मण प्रमाण आहे. म्हणून अभेदप्रतिपादकवाक्यें हीं जीवेश्वराचें साम्य दाखविणारीं आहेत असें मानून प्रबलभेदवाक्यांनीं दाखविलेला भेदच प्रामाणिक मानणें उचित आहे. तेव्हां ब्रह्म हें, 'चेतन, अचेतन' सर्व पदार्थाहून अत्यंत भिन्न आहे, हें सिद्ध झालें. प्रसिद्ध **'तत्त्वमसि'** हे वाक्यही भेद दर्शविणारें आहे. 'तत्' हें पद षष्ठ्यंत आहे. म्हणजे 'तस्य त्वं' असा तेथें अर्थ आहे. **'सुपां सुलुक्'** इत्यादि सूत्रानें तेथील षष्ठीचा लुक् झाला असला तरी षष्ठ्यर्थाचें अनुसंधान होऊं शकतें. त्यामुळें जीव व ईश्वर यांचा भेद, या वाक्यानेंही सिद्ध होऊं शकतो असे द्वैतवाद्यांचे मत आहे. (सिद्धांत जाह्नवी पृ. ३६-३७)

याचें खंडन विशिष्टाद्वैतवादी करतात तें असें - भेदवाक्येंच जर केवळ विचारांत घेतलीं तर अभेद सांगणाऱ्या वाक्यांचा अत्यंत बाध होऊं लागेल. म्हणून चेतन, अचेतन सर्व विश्व, ब्रह्माचें विशेषण मानून, चेतनाचेतनविशिष्ट एक ब्रह्म वेदान्तांत दाखविलें आहे. याप्रमाणें मानलें असतां भेद व अभेद दोन्हीही दाखविणाऱ्या वाक्यांचे प्रामाण्य अबाधित राहाते. चेतन व अचेतन पदार्थ ब्रह्माचें विशेषण असलें तरी तें त्याच्याहून भिन्न असल्यानें त्याचे

गुणदोषसांकर्य ब्रह्मांत होण्याची भीति नाही. याप्रमाणें विशिष्टाद्वैत मत मांडून त्याचें खंडन श्रीदेवाचार्य असें करतात - 'व्यावर्तकत्वं विशेषणत्वम्' असें विशेषणाचें लक्षण सर्वसंमत आहे. विशेष्य हे इतरांपेक्षां भिन्न आहे असें विशेषणानें दाखवायचें असतें जसें शुक्लः पटः या ठिकाणीं, शुक्ल हें विशेषण ज्या पटाचें आहे तो पट, इतर, नील, रक्त इत्यादि पटाहून निराळा आहे असें शुक्ल या विशेषणावरून सिद्ध होते. विशिष्टाद्वैत मतांत, चित् व अचित् हे ब्रह्माचे विशेषण मानले आहेत. त्यांनीं ब्रह्म हें कोणाहून भिन्न आहे असें दाखवावें? चित् व अचित् यांचाच भेद ब्रह्मामध्यें आहे असें त्या विशेषणापासून समजतें असें म्हणावें तर तें असंभवनीय आहे. कारण व्यावर्त्य व व्यावर्तक हे दोन्ही भिन्न असावे लागतात. लाल चेंडू आहे या ठिकाणीं लाल हे विशेषण इतर चेंडूंहून हा चेंडू निराळा असल्याचें दाखवितें. लाल रंगापेक्षां चेंडू निराळा आहे असें कांही लाल हें विशेषण दाखवित नाही. बरें, चित्, अचित् या विशेषणांनीं इतर कोणत्यातरी पदार्थापासून ब्रह्माची व्यावृत्ति (भेद) करावी तर, चित्, अचित् व ब्रह्म या तिघांपेक्षां निराळा असा पदार्थच नाहीं कीं ज्याच्याहून ब्रह्म भिन्न आहे असें ठरवावें. तसेच, चेतनाचेतनविशिष्टब्रह्माद्वैत मानलें तरी त्या चेतन व अचेतन पदार्थापेक्षां ब्रह्म भिन्न आहे. ते चेतन व अचेतन पदार्थही परस्परभिन्न आहेत असें मानलें पाहिजे. नाहीं तर सर्वांच्या स्वभावाचा संकर होईल. याप्रमाणें भेद मानून पुनः विशिष्टाद्वैत मानणें ही कल्पना करण्यापेक्षां भेद व अभेद दोन्हीही स्वाभाविक आहेत ही कल्पना समंजस ठरेल. (सिद्धांत जाह्नवी पृ. ४२-४३)

श्रीदेवाचार्यांच्या नंतर या संप्रदायाचे मोठे आधारस्तंभ असणारे केशव काश्मीरि भट्ट होऊन गेले. त्यांनीं प्रस्थानत्रयीवर टीका केलेलीच आहे. तसेंच स्तोत्रें व कर्मदीपिकेसारखे ग्रंथ तयार करून, संप्रदायाचा दार्शनिक व धार्मिक आचारासंबंधीं दृष्टिकोणही सुस्पष्ट केला आहे. यांनींही नियंता, भोक्ता व भोग्य या तिघांचीही सत्ता मान्य केलेली असून यांचा भेदाभेदसंबंधही मानला

आहे. या सर्वांपेक्षांही यांचें वैशिष्ट्य असें आहे कीं - अद्वैतवादाचें समीक्षण यांनीं सविस्तर केलें आहे. तसेंच, ब्रह्मासंबंधी निर्विशेषवाद, जीवासंबंधी प्रतिबिंबवाद, अवच्छेदवाद, उपाधिवाद, एकजीववाद इत्यादि; अचेतन जगाबद्दल विवर्तवाद, इत्यादि विचारांचें सविस्तर समालोचन केलें आहे. याप्रमाणें केशवकाश्मीरि भट्टांनीं द्वैताद्वैत संप्रदायाचा प्रचार मोठ्या प्रमाणांत केला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

याच केशवकाश्मीरि भट्टांचे प्रशिष्य हरिव्यास यांचा उल्लेख आवश्यक आहे. हे वास्तविक निंबार्क संप्रदायातील असून यांचा कल अचिंत्यभेदाभेदवादी बलदेवांच्या मतांकडे असलेला दिसतो. बलदेवांचे मतानें, ईश्वर, जीव प्रकृति, काल व कर्म या पाचांची सत्ता मानली आहे. निंबार्काचे अनुयायांनीं कर्माचे स्थानीं अप्राकृत पदार्थ मानला आहे. तोच हरिव्यासांनींही मानला आहे हें मोठें आश्चर्य आहे. सर्वांत मोठें आश्चर्य हें कीं, हरिव्यास जेव्हां भेदाभेदाचें आलोचन करतात तेव्हां ते अभेदाचें खंडन करतात. ते म्हणतात कीं - ब्रह्म व चिदचित् यांच्यामध्यें जर अभेद मानला तर ब्रह्म, चिदचितांच्या सर्व दोषांनीं युक्त होईल आणि चिदचितही ब्रह्माच्या चांगुलपणानें पूर्ण होतील. याप्रमाणें हरिव्यासदेव हे, ब्रह्म व चिदचित् यांच्यामध्यें स्वाभाविक भेद मानतात आणि निंबार्क, शुद्धद्वैतवादी आहेत असें सांगतात. - **'निंबार्कस्य शुद्धं द्वैतमेवाभिमतम्'** (सिद्धान्तकुसुमांजलि पृ.२२) या ग्रंथातच शेवटीं त्यांचा असा उल्लेख आहे कीं -

**'ब्रह्म सत्यं जगत् सत्यं सत्यं भेदमपि ब्रुवन्।**
**निम्बार्को भगवान् विद्भिः सत्यवादी निगद्यते।।'**

निंबार्कसंप्रदायांतील एका मोठ्या आचार्यांच्या द्वारें शुद्धद्वैतवादाचें प्रतिपादन ही मोठी आश्चर्यपूर्ण समस्या आहे. कारण निंबार्क व त्यांचे इतर अनुयायी यांनीं तर द्वैताद्वैताचेंच प्रतिपादन केलें आहे. हरिव्यासदेवांच्या या प्रतिपादनामुळें मध्व व चैतन्य संप्रदायावर मात्र उपकार झाले आहेत. तात्पर्य

हरिव्यासदेवांचें हें प्रतिपादन, निंबार्कसंप्रदायांतील महत्त्वाचा सिद्धान्त जो स्वाभाविक भेदाभेद, याला असंगत दिसतें.

याप्रमाणें निंबार्कांचा स्वाभाविक भेदाभेद मान्य करणाऱ्या त्यांच्या संप्रदायांतील आचार्यांच्या मताचें समीक्षण झालें. भेदाभेद मानणारे, रामानुज, भास्कर व बलदेव हे तिघे आचार्यही आहेत. पण त्यांच्या व निंबार्कांच्या भेदाभेदांत फरक काय आहे हें पाहिलें पाहिजे. म्हणजे निंबार्कांचा स्वाभाविक भेदाभेदसिद्धान्त अधिक स्पष्ट होईल - रामानुजांचें विशिष्टाद्वैत आणि निंबार्कांचा स्वाभाविक भेदाभेद यामध्यें अंतर असें आहे कीं - रामानुज, चिदचित् हे ब्रह्माचे विशेषण आहेत असें सांगून त्यांना ब्रह्माचें अंश मानतात. तर निंबार्क, चिदचित् हे ब्रह्माचे शक्तिरूप असल्यामुळें त्यांना ब्रह्माचे अंश मानतात. रामानुज; ब्रह्म आणि चिदचित् यांचा परस्पर संबंध शरीर व आत्मा किंवा विशेष्य व विशेषण यांच्याप्रमाणें असल्याचें सांगतात. आत्मा व शरीर, विशेष्य व विशेषण परस्परभिन्न आहेत. तथापि, पृथक् न होतां संयुक्त होऊन एक समष्टि निर्माण करतात. असें रामानुजांचें मत आहे - निंबार्क; ब्रह्म आणि चिदचित् यांचा संबंधही शक्तिमान् व शक्ति यांच्याप्रमाणें सांगतात. रामानुजांनीं, भेदापेक्षां अभेदाला महत्त्व दिलें आहे.

निंबार्कांनीं, भेद व अभेद दोघांचीही स्थिति-सारखीच महत्त्वाची मानली आहे.

भास्करांचा औपाधिक भेदाभेद व निंबार्कांचा स्वाभाविक भेदाभेद यामध्यें अंतर असें आहे कीं - भास्कर, अभेदाबरोबर भेद राहातो व तो सत्य आहे असें मानतात. पण तो भेद सत्य असला तरी शाश्वत किंवा सर्वकालीन नाहीं तर तो औपाधिक, उपाधि असेपर्यंतच असणारा म्हणजे अस्थिर आहे असें भास्करांचें मत आहे. अभेदापेक्षां भेदाची सत्ता, भास्कर कमी मानीत नाहींत हें खरें. पण, अविद्या, कर्म इत्यादि उपाधि गेल्याबरोबर तो भेद नाहींसा होतो. जसें घट फुटल्याबरोबर घटाकाश नाहींसें होतें. म्हणजे भास्करमतांत

भेद अशाश्वत आहे. निंबार्कमतांत, भेद व अभेद समान आहेत म्हणजे ते दोन्हीही शाश्वत आहेत. शुद्ध भेद किंवा शुद्ध अभेद त्यांचे मतानें केव्हांच संभवत नाहीं. तर दोघांची सहस्थिति नित्य आहे.

बलदेवांचा अचिंत्य भेदाभेद व निंबार्कांचा स्वाभाविक भेदाभेद यामध्यें अंतर असें कीं - बलदेव; भेद व अभेद दोन्हीही सत्य मानतात पण, बुद्धि आणि तर्क यांनीं त्यांचें चिंतन होऊं शकत नाहीं असें मानतात आणि सांगतात कीं, भेद व अभेद दोघांचा निश्चित समन्वय, बुद्धिशक्तीच्या पलीकडचा आहे. फक्त आप्तवाक्य प्रमाण मानूनच भेदाभेदाचा स्वीकार करावा लागतो. ब्रह्म हें; आपलें दिव्य रूप व पावित्र्य नष्ट केल्यावांचून अनेक प्रपंचरूपानें परिणत होतें पण हा सिद्धान्त आमच्या बुद्धिशक्तिला आकलन होऊं शकत नाहीं. केवळ तर्कांनींही सिद्ध होऊं शकत नाहीं. एकच अनेक होतें हें संपूर्ण मान्य आहे. पण त्या एक व अनेक यांचा संबंध मात्र एक अचिंत्य रहस्य आहे. असें असलें तरी आप्तवाक्यानें (वेदानें ) भेद व अभेद दोन्हीही दाखविले असल्यानें ते दोन्हीही सत्य असल्याचें मान्य करणें भाग पडतें असें बलदेवाचार्यांचें म्हणणें आहे. निंबार्क; भेद व अभेद दोन्हीही बुद्धिगम्य, चिंत्य असल्याचें मानून तोच एक व अनेक यांचा संबंध असल्याचें सांगतात. बलदेव हे, एक तर मध्वाचार्यांचे अनुयायी आहेत आणि दुसरी गोष्ट, ते भक्त आचार्य आहेत. भक्तीला भक्त व भगवान् यांच्यामध्यें भेदाची अपेक्षा आहे. म्हणून बलदेवाचार्य; जीव व ब्रह्म यांच्यामध्यें अभेदापेक्षां भेदावरच जास्ती भर देतात. परंतु ते, मध्वाचार्यांप्रमाणें जीवब्रह्मामध्यें पूर्णतया भेद मानण्यास असहमत आहेत. कारण; कार्य हें, कारणापेक्षां अत्यंत भिन्न असू शकत नाहीं. आणि तसें तार्किकांच्या प्रमाणें मानलें तर असत्कार्यवाद मानण्याचा प्रसंग येईल. म्हणून भेद व अभेद दोन्हीही सत्य आहेत. तथापि ते अचिंत्य आहेत असें मानावें लागतें. निंबार्क मात्र; अभेदापेक्षां भेदाला अधिक महत्त्व न देतां, दोन्हीही समान रूपानें सत्य व चिंत्य असल्याचें मानतात.

# श्री निंबार्काचार्यांचें कार्य

'श्री निंबार्कवेदान्त' या ग्रंथाचे कर्ते श्री ललितकृष्ण गोस्वामी यांचे असें मत आहे कीं, श्रीशंकराचार्य, श्रीरामानुजाचार्य इत्यादिकांनीं ज्यांचा मोठ्या आदरानें आपल्या ग्रंथांत उल्लेख केला आहे ते द्रविडाचार्य म्हणजेच श्री निंबार्काचार्य आहेत. कारण श्री निंबार्काचार्यांचा जन्म द्रविड देशांत झालेला आहे. इतकेंच प्रमाण त्यांनीं दिलेलें आहे. याबद्दल माननीय महामहोपाध्याय श्री गोपीनाथजी कविराज, आपल्या पुरस्कारांत लिहितात कीं - 'ग्रंथकार'; श्रीनिंबार्काचार्यांना द्रविडाचार्य समजतात. हें जर सत्य ठरेल तर चार वैष्णव संप्रदायामध्यें श्रीनिंबार्कभाष्य सर्वांपेक्षां प्राचीन मानावें लागेल. पण सर्व लोक हें मान्य करतील कीं नाहीं याचा संदेह आहे. श्री शंकराचार्यांच्या संप्रदायांत द्रविडाचार्य प्रसिद्ध आहेत. श्रीरामानुज संप्रदायांतही त्याच नांवानें एक आचार्य प्रसिद्ध आहेत. हे दोन्हीही एकच आहेत कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. पण हें एक असणेंही असंभवनीय नाहीं. अलवार शठकोपांचाही उल्लेख वैष्णवग्रंथांतून द्रविडाचार्य नांवानें कोठें कोठें आलेला आहे हाही विचारणीय विषय आहे. याप्रमाणें 'निंबार्क' हेच द्रविडाचार्य आहेत याबद्दल विद्वानांचा मतभेद आहे. भारतेंदूजींनीं आपल्या भक्तिमाल ग्रंथांत श्रीनिंबार्कांच्याबद्दल लिहिलें आहे तें असें -

**द्राविड भुव में अरुन गेह द्विज व्है प्रकटाए।**
**तम परखंडदल मलन सुदरसन वपु कहवाए।।**
**सकल वेदको सार कह्यौ दसही छंदन मह।**
**सुखमुखसो भागवत सुनी नृप देवरात तहें।।**
**बनि अरकवृच्छ चढि दरसदे तिथि संक सब हरलई।**
**श्रीनिंबादित्य स्वरूप धरि आपुतुंग विद्या भई।।**

(-उत्तरार्ध भक्तिमाल भातेन्दु हरिश्चन्द्र)

भागवत धर्माच्या उदयकालीं असणाऱ्या ज्या पांच आचार्यांचीं चर्चा पूर्वीं केली आहे त्यापैकीं श्रीनिंबार्क द्रविड देशांतील, श्रीविष्णुस्वामी आंध्र-कर्नाटकांत, कौंडिन्य महाराष्ट्रांत, तसेंच शांडिल्य आणि गर्ग वज्रमंडलाच्या निकट प्रदेशांत असलेले दिसतात. विष्णुस्वामीबद्दल भारतेंदुजी लिहितात कीं -

**'श्रीसुकसोलहिज्ञान आंध्रभुविपावन कीनी'**

शांडिल्य हे नंदवंशाचे पुरोहित होते. ते वज्रमंजलाच्या जवळच झोपडी बांधून राहात होते. **'नंदादीनां पुरोहितं, शांडिल्यम्'** (स्कंदपुराण वैष्णव खंड १।१६) त्यावेळीं म्हणजे इसवी सनापूर्वी चौथ्या शतकांत, मथुरामंडलाचा राजा चंद्रवंशातील वज्रनाभ नांवाचा होता आणि इंद्रप्रस्थ व दिल्लीचा राजा विष्णुरात होता. मथुरामंडल संपूर्ण जैन व बौद्ध यांचें केंद्र बनून राहिलें होतें. पण महर्षि शंडिल्यांच्या कृपेनें राजा वज्रनाभानें विषणुराताच्या साहाय्यानें पुनः तें वैष्णवकेंद्र केलें. **'वज्रस्तु तत्सहायेन शांडिल्यस्याप्यनुग्रहात्'** (स्कंद पु. वै. खं. २।४) असा याबद्दल उल्लेख दिसतो. गर्ग हे वज्रनाभाचे पुरोहित असून मथुरा मंडलांतच राहात होते. **'गर्गो हं यदुवंशानां चिरकालं पुरोहितः'** (ब्रह्मवैवर्त पुराण ४।१३) असा उल्लेख दिसतो. पद्मपुराणांतील श्रीमद्भागवतमाहात्म्यांत भक्ति व नारद यांच्या संवादरूपानें भागवतधर्माच्या उदयाची कथा भक्तिच्या द्वारा सांगितली गेली आहे. त्यावरून कांहीं प्रकाश पडतो. भक्ति, श्रीनारदजींना सांगत आहे -

**'उत्पन्ना द्रविडे चाहं वृद्धिं कर्णाटके गता। क्वचित्क्वचिन्महाराष्ट्रे गुर्जरे जीर्णतां गता।। वृन्दावनं पुनः प्राप्य नवीनेव सुरूपिणी।'**

भक्ति म्हणते - मी द्रविड देशांत उत्पन्न झालें. कर्णाटकांत माझी वाढ झाली. महाराष्ट्रांतही कोठें कोठें माझी वृद्धि झाली. आणि जातांजातां गुजराथेत मी जीर्ण झाले. वृंदावनांत आल्याबरोबर मला माझें यौवन पुनः प्राप्त झालें. या

संवादावरून असें ज्ञात होतें कीं - श्रीआरुणीनें त्या कालांत, ज्यावेळीं जैन आणि बौद्ध धर्म, भारतामध्यें हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत प्रभावशाली होते अशा वेळीं भक्तीला प्रकट केलें. आंध्र, कर्णाटकांत विष्णुस्वामींनीं भक्तीची वाढ केली. महाराष्ट्रामध्यें कौंडिन्यांनीं भक्तीचा प्रचार केला. वृंदावनामध्यें श्रीनिंबार्कांनीं, गोवर्धनाच्या समीप आपला आश्रम तयार केला. वज्रनाथ, शांडिल्य आणि गर्ग यांनींही वज्रमंडल कृष्णमय बनविलें. याप्रमाणें वृंदावन हें, भारतवर्षांत भक्तीचें केंद्र झाले. त्यावेळीं बौद्ध जैन धर्मांच्या प्रभावानें वैदिक धर्म जवळ जवळ लुप्त झाल्यासारखाच होता. पराजित ब्राह्मण; धर्म, ईश्वर व प्रारब्ध यांच्यावर हवाला ठेवून दिवस कंठित होते. त्यांच्या ताब्यांत कोणीही नव्हतें. बौद्ध भिक्षु, ईश्वराला न मानतां, स्वतःच आत्मोद्धाराचा उपदेश करीत फिरत होते. जैनांचा मुख्य भर, कर्मशुद्धीवर होता. असा मतामतांचा गलबला त्यावेळीं झाला होता. भारताच्या शासकांना, राजधर्मास अनुसरून जैन, बौद्ध यांनाही मान्यता द्यावी लागत होती. अशा अनेक भिन्न मतांचा समन्वय भागवत धर्मानें केला. त्याचाच प्रचार राजधर्मरूपानें संपूर्ण भारतवर्षांत विष्णुरातानें करण्याचा प्रयत्न केला. आणि कलि म्हणजे वादविवादाचें उच्चाटन करून एकता स्थापन केली. विष्णुराताच्या भेटीकरितां गंगातटावर शेवटीं अनेक ऋषि जमले असतां, राजानें त्यांच्यापुढें असा प्रश्न मांडला कीं - मृत्युपंथाला लागलेल्या जीवांनीं कोणतें शुद्ध कर्म करावें ? **'सर्वात्मना म्रियमाणैश्च कृत्यं शुद्धं च तत्रामृशताभियुक्ताः'** (भागवत १।१९।२४) या प्रश्नाचें उत्तर, शुकरूप आरुणींनीं, भागवत रूपानें सांगितलें आहे. आरुणिरूप निंबार्कांनीं जो भक्तिरस बादरायणसूत्रांच्या वाक्यार्थरूपानें प्रवाहित केला तोच बादरायणांनीं भागवतरूपानें प्रकट करून शुकरूप आरुणींना पढविला. तोच भक्तिरस; कालसर्पाचा ग्रास बनलेल्या प्राण्यांना त्यांतून मुक्त करण्याकरितां शुकरूप आरुणीनीं प्रकट केला.

**'कालव्यालमुखग्रासत्रासनिर्णाशहेतवे।**
**श्रीमद्भागवतं शास्त्रं कलौ कीरेण भाषितम्॥'**

(-पद्मपुराण उत्तरखंड १।११)

आरुणि म्हणजेच शुक कसे याबद्दल श्री ललितकृष्ण गोस्वामी यांचें म्हणणें असें कीं - भागवतकारांनीं कृष्णद्वैपायनपुत्र शुक व आरुणि यांचें चरित्र संमिश्रित करून भागवतधर्माचे उपदेष्टे शुक या रूपानें मांडलें. श्री आरुणि, एकांतसेवी, मौनी ब्रह्मचारी होते. तेंच रूप भागवतशास्त्राचा उपदेश करणाऱ्या शुकाचेही आहे. महाभारत, देवीभागवत यांतील शुक तर गृहस्थ होते. तसेंच आरुणि व निंबार्क यांचें ऐक्य असल्याबद्दल भारतेंदुजी सांगतात -

**'सकल वेदको सार कह्यौ दसही छंदन महं।**
**शुकमुखसो भागवत सुनी देवरात तहं॥'**

श्रीनिंबार्काचार्यांचे दशोकी म्हणून स्तोत्र प्रसिद्ध आहे. दहा श्लोकांमध्यें आरुणीनें जें उपास्य, उपासक, भक्तिरस, ब्रह्मविद्या आणि माया यांचें रहस्य सर्व वेदांचें सार सांगितलें तेंच विष्णुरातानें भागवतामध्यें शुकमुखांतून ऐकलें. यावरूनही शुक, आरुणि, निंबार्क एक असल्याचें ठरतें.

श्रीमद्भागवतांतील अनेक स्थळांतून श्रीनिंबार्कांच्या सिद्धान्तांचें निरूपण केलें गेलें आहे. भागवत दशमस्कंध ८९ व्या अध्यायांतील कथा पाहिली असतां हें लक्षांत येईल. जीवरूप अर्जुनाला मृत ब्राह्मणपुत्रांचें अमृतत्व जाणण्याची इच्छा उत्पन्न झाली. भगवान श्रीकृष्ण जीवाचा सहचारी सखा आहे. (**द्वा सुपर्णा सयुजा सखाया** - श्वेताश्वतर ४।१६) त्यानें अर्जुनासह आपल्या चार घोड्यांच्या दिव्य रथावर बसून पश्चिम दिशेला प्रयाण केलें-

**'इति संभाष्य भगवानर्जुनेन सहेश्वरः।**
**दिव्यं स्वरथमास्थाय प्रतीचीं दिशमाविशत्।'**

(-भागवत १०।८९।४७)

त्या मार्गांत मोठा अंधार पसरलेला होता तेव्हां त्या मार्गाला प्रकाशित करण्याकरितां श्रीकृष्णांनीं आपलें सहस्र सूर्यासारखें सुदर्शनचक्र पुढें पाठविलें-

**'सहस्रादित्यसंकाशं स्वचक्रं प्राहिणोत् पुरः'** (भा. १०।८९।५०)

त्या प्रकाशित मार्गानें पुढें जाऊन जीवरूप अर्जुनानें, भोगरूप (**अहेः शरीरं भोगः स्यात्**) आसनावर सुखानें बसलेल्या श्री पुरुषोत्तमाला पाहिलें. हीच जीवालां परंज्योतिरूपाची प्राप्ति आहे. त्या प्रकाशमान् स्थानांत सुदर्शन मूर्तिमान विराजमान झालेलें आहे. परब्रह्म श्रीकृष्णप्रभूनें तेथें जाऊन आपल्याच अनंत भूमा (व्यापक) स्वरूपाला वंदन केलें. त्या पुरुषोत्तमाला सुदीर्घ आठ बाहू होते. - या कथेचें रहस्य श्री निंबार्कांचा मोक्षसिद्धान्त आहे. अंधःकारपूर्ण पश्चिम मार्गांत शेवटी जें ज्योति दिसलें तें म्हणजे श्रीनिंबार्कांचा ज्ञानमय साक्षात् भगवानच होय. असें भागवताचे टीकाकार श्रीधरस्वामी लिहितात - **'परं श्रेष्ठं भागवतं ज्योतिः'** (श्रीधरी टीका भागवत १०।८९।५२) तो पश्चिममार्ग म्हणजे जीवाचा भोगमार्ग आहे -

**'पश्चिमे इत्यधोद्वारे गुद शिश्नमिहोच्यते'** - (भाग. ४।२९।१०)

या भोगमार्गांत जीव आनंदाचा उपभोग घेतो. पण त्याला त्या वेळीं कळत नाहीं कीं - हा भोगमार्ग अंधकारपूर्ण, अल्पसुखाचा आहे. याकरितां या अंधकाराच्याही पलिकडे प्रकाशमय स्थानांत जाण्याचा प्रयत्न जीवानें करणें आवश्यक आहे. प्रकाशमय स्थानांत घेऊन जाणारे, एक, भगवद्भक्त सद्गुरूच समर्थ आहेत. म्हणून त्यांनाच शरण गेल्यानें त्या प्रकाशाची प्राप्ति जीवाला करून घेतां येते. अंधकारांत बुडून गेलेला जीव श्रीगुरूंना प्रार्थना करीत आहे की. - **'तमसो मा ज्योतिर्गमय'** मला अंधकारापासून प्रकाशाकडे घेऊन चला. त्यावेळीं गुरूरूप भागवतचक्रच अंधकारांत सुंदर प्रकाशाचें दर्शन करवितें. म्हणूनच तें सुदर्शन आहे. संसारचक्र तोडून टाकून, सुदर्शनचक्र प्रकाश करतें. संसारचक्र लिंबाच्या झाडाप्रमाणें कडू आहे. त्या कटुतेंतही, अनंत

सुखाचा प्रकाश करणारे ब्रह्मचक्र श्रीनिंबार्क हे आहेत. त्या ब्रह्मचक्राच्या प्रकाशांत हा जीव निर्मल हंसरूप होऊन जातो-

**'सर्वाजीवे सर्वसंस्थे बृहन्ते तस्मिन् हंसो भ्राम्यते ब्रह्मचक्रे।**
**पृथगात्मानं प्रेरितारं च मत्वा जुष्टस्ततस्तेनामृतत्वमेति।।'**

(-श्वेताश्वतर १।६)

सर्वांना आश्रयभूत अशा विस्तीर्ण ब्रह्मचक्रांत (सुदर्शन चक्रांत) ज्यावेळीं हा ज्ञानस्वरूप हंस - जीवात्मा, फिरूं लागतो, त्यावेळीं, तो स्वतःला व आपणांस प्रेरक अशा परमात्म्याला जाणून त्याचें साम्य प्राप्त करून घेतो व अमृतत्वप्राप्ति करून घेतो.

**'यदा पश्यः पश्यते रुक्मवर्णं कर्तारमीशं पुरुषं ब्रह्मयोनिम्।**
**तदा विद्वान् पुण्यपापे विधूय निरंजनः परमं साम्यमुपैति।।'**

(-मुंडक ३।१।३)

ज्यावेळीं जीवात्मा; सर्वकर्ता अशा परमात्म्याचा साक्षात्कार करून घेतो त्यावेळीं पुण्यपापांतून मुक्त होऊन परमात्म्यासारखा प्रकाशसंपन्न होतो. या दोन मंत्रांमध्यें जीवब्रह्माचा द्वैताद्वैतभाव दाखविला आहे. श्रीनिंबार्कांचा हाच सिद्धान्त आहे, यांची मुक्ति म्हणजे, भगवद्भाव, परमसाम्य, साधर्म्य इत्यादि शब्दांनीं सांगितलेलें तें हेंच होय. हाच सिद्धान्त भागवतांतील वरील कथेंत रहस्यरूपानें दाखविला आहे. जीव जेव्हां आपण स्वतःला जगाचा भोक्ता मानूं लागतो तेव्हां सांसारिक विषयभोगामध्यें त्याला आसक्ती निर्माण होते. ही आसक्तीच अंधकार आहे. हीच आसक्ती, परमात्म्याबद्दल निर्माण करणें हाच प्रकाश होय. विषयभोग जर परिमित, मर्यादितच घेतले जातील आणि मन, बुद्धि, चित्त व अहंकार हें अंतःकरणचतुष्ट्य विषयभोगांत निमग्न होणार नाहीं तर प्रकाशप्राप्ति निश्चित होणारी आहे.

**'सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा**
**सम्यग्ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम्।**

**अंतःशरीरे ज्योतिर्मयो हि शुभ्रो**

**यं पश्यन्ति यतयः क्षीणदोषाः।।'** (-मुंडक ३।१।५)

या अंतःकरणांतच विहार करणाऱ्या ज्योतिर्मय शुभ्र परमात्म्याला; सत्यभाषण, तप, यथार्थज्ञान, ब्रह्मचर्य या साधनांनीं संपन्न असणारे संयमी महापुरुष पाहूं शकतात. अंतःकरणांत, शुभ्रकांतिमान् हंसरूप ईश्वराचा निवास आहे. त्याची प्राप्ति करून घेण्याकरितां, अंतःकरणाची प्रवृत्ति, निरंतर अंतस्थ ब्रह्मामध्येंच संलग्न झाली पाहिजे. सांसारिकभोग केवल शरीरधर्म आहेत. अंतःकरणाचा धर्म म्हणजे; हृदयांतील अत्यंत उज्ज्वल अशा नित्य वृंदावनांत नेहमीं राहणाऱ्या श्रीराधाकृष्णयुगलहंसांच्या भावमयलीलारसांत नित्य निमग्न राहणें हाच आहे. त्या स्थलामध्यें श्रीनिंबार्क मूर्तिमान् उपस्थित राहतात. **'उपासनीयं नितरां जनैः सदा'** (- श्रीनिंबार्कदशोकी ६) या श्रीनिंबार्कांच्या आदेशाचें हेंच तात्पर्य आहे. श्रीनिंबार्काचार्य सख्यभावानें श्रीराधाकृष्णयुगलमूर्तीच्या उपासनेमध्यें निरंतर निमग्न होते म्हणूनच ते नैष्ठिक ब्रह्मचारी होते.

**'नवद्वारे परे देही हंसो लेलायते बहिः।**

**वशी सर्वस्य लोकस्य स्थावरस्य चरस्य च।।'**

(- श्वेताश्वतर ३।१८)

संपूर्ण स्थावर जंगम जगताला ताब्यांत ठेवणारा हंसरूप परमात्मा, या नऊ द्वारानीं युक्त शरीराच्या आंत आणि बाहेर जगांत लीला करून राहिला आहे. त्याचें नित्य अनुसंधान करणें हेंच जीवाचें मुख्य कर्तव्य आहे हा आपला सिद्धान्त श्रीनिंबार्काचार्यांनीं ब्रह्मसूत्र वाक्यार्थांत चौथ्या अध्यायांत सविस्तर सांगितला आहे.

श्रीमद्भागवत दशमस्कंध, ८७ अध्याय, श्लोक १८ मध्यें आरुणि श्रीनिंबार्कांची, हृदयामध्यें ब्रह्माची उपासनापद्धति स्पष्ट रूपानें सांगितली आहे-

**'उदरमुपासते य ऋषिवर्त्मसु कूर्पदृशः।**

**परिसरपद्धतिं हृदयमारुणयो दहरम्।।**

**तत उदगादनंत तव धाम शिरः परमम्।**

**पुनरिह यत् समेत्य न पतन्ति कृतान्तमुखे।।'**

श्रुति, परमात्म्याची स्तुति करीत आहेत - श्रुति म्हणतात, हे प्रभो! कांहीं स्थूल दृष्टीचे ऋषि, आपली उपासना, उदरांतील मणिपूरक चक्रामध्यें करीत असतात. मेधावी श्रीआरुणींनीं हृदयांत दहराकाशरूपानें आपली उपासनापद्धति सांगितली. वस्तुतः तोच उत्तम मार्ग आहे. हृदयापासूनच शरीरांतील सर्व नाड्यांचा उगम आहे. त्यांच्यामध्यें प्रधान सुषुम्णा नाडी आहे. जी मस्तकांत ब्रह्मरंध्रापर्यंत गेली आहे. त्या नाडींतून बाहेर पडणारा उपासक, जन्ममरणचक्रांत पुनः पडत नाहीं. हा भागवतांत सांगितलेला श्रीआरुणींचा सिद्धान्त वाचूनही जर श्रीनिंबार्कांचा समय १२ वे शतकच दाखविण्याचा प्रयत्न केला जाईल तर तो एक प्रकारचा हठवाद म्हणावा लागेल. हें मत व श्रीनिंबार्कांचा ब्रह्मसूत्रवाक्यार्थ यामध्यें अक्षरशः साम्य आहे असें श्रीललितकृष्णगोस्वामींचें निश्चित मत आहे.

श्रीनिंबार्क, सुदर्शनचक्रदेवतेचे अवतार होते असें त्यांच्या पुढील सर्व टीकाकारांनीं लिहिले आहे. पुराणांतून असा प्रसंग आला आहे कीं - जेव्हां वैदिक परंपरेचा लोप होऊन राहिला होता त्यावेळीं सर्व सनातन वैदिक संप्रदाय व्याकुल स्थितींत होता. त्याचें समाधान करण्याकरितां भगवंतांनीं सुदर्शनाला आज्ञा केली की तूं वैष्णव मार्गाचा प्रकाश कर -

**'सुदर्शन महाबाहो कोटिसूर्यसमप्रभ।**

**अज्ञानतिमिरान्धानां विष्णोर्मार्गं प्रदर्शय।।'**

या भगवंतांच्या आज्ञेप्रमाणें, श्रीसुदर्शनजींनीं बादरायणांच्या कालां अवतार घेऊन वैष्णव मार्ग प्रकाशित केला. हीच गोष्ट, श्रीनिंबार्कांच्या दशोकीवरील टीकाकार श्रीपुरुषोत्तमाचार्यजी, यांनीं आपल्या वेदांतरत्नमंजूषाटीकेच्या भूमिकेंत स्पष्ट सांगितली आहे. -

**'श्रीवासुदेवेन विष्णुना आत्मसंस्थापितवेदमार्गसंरक्षणाय नियुक्तो निरतिशयात्मप्रिय आत्मशक्त्युपबृंहितानन्तशक्तिः स्वहस्ताधारको निजायुधः कोटिसूर्यसमप्रकाशो भगवान् सुदर्शनोऽवनितलावतीर्णस्तैलंगद्विजवरात्मना तस्मिन्नेउव देशे, नियमानन्दाभिधो भगवदीयां सनातनीं कलौनष्टां वेदान्तसन्ततिं प्रवर्तयिष्यन शारीरकमीमांसावाक्यार्थरूपवेदान्तपारिजातसौरभाख्यादिग्रंथरचनाव्याजेन सर्ववेदान्तार्थं संग्रहणेन संदर्भयामास'**

(-वेदान्तरत्नमंजूषा पृ. १)

श्रीपुरुषोत्तमाचार्य प्राचीन आचार्य आहेत. त्यांचा हा ग्रंथ श्रीनिंबार्कानंतर श्रीनिवासाचार्यांच्या भाष्यापाठोपाठ झालेला आहे. त्यामुळें त्यांचें हें लेखन विशेष प्रामाणिक ठरते. श्रीनिंबार्क, नष्ट झालेल्या वेदान्तपरंपरेचे प्रवर्तक आचार्य आहेत असा उल्लेख वरीलप्रमाणें श्रीपुरुषोत्तमाचार्य करतात. यावरून, श्रीनिंबार्क हेच सर्वप्रथम वेदान्तसूत्रांचे व्याख्याकार असल्याचें ठरतें. श्रीशंकराचार्यांच्या नंतर जर श्रीनिंबार्क मानले तर, वेदान्तपरंपरा लुप्त होण्याची गोष्ट सुसंगत ठरणार नाहीं.

नैमिषारण्याबद्दल पुराणामध्यें अशी एक कथा आहे कीं, त्या अरण्यामध्यें सुदर्शनानेंच कथायज्ञाचा आरंभ करून दिला जो निरंतर हजार वर्षेपर्यंत चालू राहिला. त्या अरण्यांत सुदर्शनचक्राचा नेमि म्हणजे फाळ पडला म्हणून त्याला नैमिषार्य हें नांव प्राप्त झालें. भगवान ऋषींना सांगतात कीं, या अनुपम चक्राच्या पाठीमागून तुम्ही चला. जेथें या धर्मचक्राचा नेमि गळून पडेल तो पुण्यदेश समजून तेथें तुम्ही धार्मिक संमेलन करावें.

**'अनौपम्यमिदं चक्रं वर्तमानमतंद्रिताः।**
**पृष्ठतो यात नियमात् पदं प्राप्स्यथ तद्धितम्॥**

**गच्छतो धर्मचक्रस्य यत्र नेमिर्विशीर्यते।**
**पुण्यः स देशो मंतव्य इत्युवाच स्वयं प्रभुः॥'**

(-पद्मपुराण १।१।७-८)

श्रीनिंबार्कांचें धर्मचक्र संपूर्ण भारतांत चालू झाले. त्यांनीं भारतात अनेक स्थानांमध्यें धार्मिक संघटनेचीं केद्रें स्थापन केलीं. श्रीनिंबार्कांनीं स्वतः आपली तपोभूमि, वज्रमंडलांत गोवर्धनाच्या समीप निवडली होती. ती वज्रभूमि त्यांच्या उपास्याची लीलाभूमि होती; जिच्यावर जैनांनीं आक्रमण करून आपला अधिकार स्थापन केला होता. ती पवित्र भूमी श्रीनिंबार्कांनीं आपल्या ताब्यांत घेतली. त्यांवेळीं एक विशेष घटना घडून आली. जिच्यामुळें आरुणि श्रीनियमानंदांना निंबार्क बनविले गेले. ती अशी -

आरुणि किंवा नियमानंदांनीं गोवर्धन पर्वताजवळ निर्जन स्थानांत एका कडूलिंबाच्या झाडाखालीं आपला आश्रम बनविला होता. मथुरा, जैनांचें प्रधानक्षेत्र होते. त्यावेळीं जैनांचे प्रधान आचार्य मथुरेंतच राहात होते. ते एक दिवस आरुणींच्या आश्रमांत गेले व त्यांच्याशीं त्यांनीं वादविवाद केला. त्यामध्यें जैनाचार्य पराजित झाले. ज्याचा पराजय होईल त्याने तें स्थान सोडून जावें या ठरलेल्याशर्तीप्रमाणें जैनाचार्यांनीं मथुरामंडल सोडून देणेचें ठरविलें. वादविवाद समाप्त होईपर्यंत रात्रीचे बारा वाजले. नंतर भारतीय आतिथ्यशीलतेस अनुसरून त्यावेळीं आरुणींनीं जैनाचार्यांना आपल्या आश्रमांत भोजन करून जाण्याचा आग्रह केला. परंतु जैन, सूर्यास्तानंतर जेवीत नाहींत. ही अडचण जाणून आरुणींनीं आपलें कोटिसूर्यसम सुदर्शनरूप त्या निंबवृक्षावर प्रकाशित केले आणि जैनाचार्यांचें साग्रह आतिथ्य पार पाडलें. त्या वेळेपासून आरुणींना निंबार्क हें नांव प्राप्त झालें. आजही वज्रमंडलांत नीमगांव म्हणून जें गांव प्रसिद्ध आहे तेथें चक्रतीर्थही आहे. तें नियमानंद, नेमानंद, नीमानंद असें अपभ्रंश रूपांत आज आहे.

श्रीनिंबार्क, धर्मचक्राचे प्रवर्तक होते. त्यांचे धर्मचक्र पुढील समन्वयवादी सम्राट अशोकाचें (२७० इ.पू.) धर्मचक्र बनलें. शिवाय, सुदर्शनचक्र, देवतारूपानें वैष्णवांचें उपास्य आहे. सुदर्शनचक्र सर्व मंत्रांना आधार असल्याचें तंत्रशास्त्राचें मत आहे. सर्वही मंत्र सुदर्शनचक्राच्या मध्यें लिहून त्यांची पूजा केली जाते. बौद्धांची विहारभूमि बनलेली जगन्नाथपुरी वैष्णवांचें केंद्र बनविण्याचें महत्कार्य, चक्रावतार श्रीनिंबार्कांचेंच आहे. यामुळेंच जगन्नाथ मंदिराच्या शिखरावर आजही चक्ररूपानें त्यांचें पूजन, दर्शन केलें जातें. नारदपांचरात्रामध्यें सुदर्शनचक्राच्या उपासनेविषयीं विस्तृत विवेचन आलेलें आहे. सुदर्शनांनींच श्रीनिंबार्करूपानें अवतार धारण करून वैष्णवधर्माचा प्रचार केल्यामुळें सुदर्शनायुध वैष्णव समजलें जातें. मथुरामंडलांतून जो भक्तिप्रवाह सुरू झाला तो संपूर्ण उत्तरप्रदेशांत व्यापून राहिला आहे. आजही उत्तर प्रदेश भक्तीचें प्रधानस्थान आहे. स्कंदपुराणावरून पाहिलें असतां, मथुरा ही वैष्णवांनीं आपली केंद्र बनविली तेव्हां राजा विष्णुरातानें दिल्लीच्या पुंजीपतींना मथुरेंत निवास करण्याकरितां पाठविलें.

**'ततस्तु विष्णुरातेन श्रेणीमुख्याः सहस्रशः।**
**इन्द्रप्रस्थात्समानाय्य मथुरास्थानमापिताः॥'**

त्यावेळीं बौद्धांचे जें प्रधानस्थान पाटलिपुत्र (पाटणा) त्यापेक्षांही मथुरा अधिक समृद्ध बनली होती हें **'माथुराः पाटलिपुत्रेभ्य आढ्यतराः'** या त्यावेळच्या वैयाकरणांच्या उद्गारांवरून सिद्ध होते.

इसवी सनाच्या चौथ्या शतकांत चीन देशांतून फाहियान नांवाचा एक प्रवासी, भारतवर्षांत बौद्धग्रंथ पाहण्याकरितां आला होता. त्यानें आपल्या प्रवासवर्णनांत, उत्तर प्रदेशांतील प्रभावी वैष्णव धर्माचें विशेष वर्णन केले आहे. तो लिहितो कीं - **'भारतांत सर्वांत समृद्ध प्रदेश उत्तर प्रदेश आहे. तेथील प्रजा अत्यंत सुखी आहे. व्यवहारांकरितां लेखपत्र वगैरे केलें जात नाहीं. राजाच्या भूमीमध्यें धान्य पिकवून त्यांतील अंश, प्रजा राजाला देते.**

**सर्वांना कोणत्याही स्थानांत राहण्याचा अधिकार आहे. प्राणदंड किंवा शरीरदंडाचें विधान येथें नाहीं. येथील लोक, हिंसा, मद्य, लसूण इत्यादिकापासून अलिप्त आहेत. सर्वही भक्त आहेत.'**

याचप्रमाणें चंद्रगुप्त मौर्याच्या (इ.पू. ३२२) दरबारांतील परकीय वकील मेगॅस्थनीज लिहितो कीं - **'सौरसेनी मथुरेमध्यें हेरेक्लीज (हरेकृष्ण) ची पूजा होत असते. जो आपला पूर्वज डायोनिसस (दक्ष) पासून पंधराव्या पिढीचा आहे.'** महाभारताच्या अनुरोधानें पाहिलें असतां दक्षाच्या (डायोनिससच्या) पंधराव्या पिढींतलाच हरेकृष्ण (हेरेक्लीज) आहे.

श्रीनिंबार्कांनीं; ब्रह्म, जीव, मन व अहंकार यांचें प्रतीक असणाऱ्या, वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरुद्ध यांच्या मूर्तीची उपासना प्रचलित केली. या चतुर्व्यूहावताराचें प्रतीक म्हणून, भगवान राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न, मानले गेले आहेत. श्रीनिंबार्क हे, अनिरुद्ध, शत्रुघ्न यांचे अवतार समजले जातात. ही गोष्ट अर्थपूर्ण आहे. सुदर्शन आणि अहंकार हे दोघेही अनिरुद्ध म्हणजे कोणाकडूनही रोखले न जाणारे, तसेंच शत्रुघ्न म्हणजे शत्रूंचा संहार करणारे आहेत. श्रीनिंबार्कांनीं; वैदिक धर्माच्या विरुद्ध असणाऱ्या संप्रदायाचें निराकरण करून अप्रतिहत भागवत धर्माची स्थापना केली. ही त्यांची शत्रुघ्न व अनिरुद्धांवताराचीच लीला म्हटली पाहिजे.

श्रीनिंबार्काचार्यांनीं ज्योतिःशास्त्रदृष्टीनेंही आपलें स्वतंत्र मत स्थापन केलें होतें असें १७ व्या शतकांतील प्रसिद्ध निबंधग्रंथकार कमलाकरभट्ट, यांच्या निर्णयसिंधूवरून कळून येतें. कमलाकरभट्टांनीं श्रीनिंबार्कांचें ज्योतिःशास्त्रीय मत निर्णयसिंधूमध्यें, एकादशीनिरूपण, जन्माष्टमीनिरूपण या प्रकरणांत सूचित केलें आहे व त्याबद्दल ब्रह्मवैवर्तपुराण, भविष्यपुराण, पातंजलभाष्य इत्यादि प्रमाणांची उद्धरणें दाखविलीं आहेत - **'निम्बादित्योपासकास्तु जन्माष्टमीरामनवमीशिवरात्र्यादौ पूर्वेऽह्नि कर्मकालीनां तिथिं त्यक्त्वा द्वित्रिमुहूर्तापरैव तिथिर्ग्राह्या.....' इत्याहुः' 'हेमाद्रिस्तु**

**केषांचिदर्धरात्रेऽपि दशमीवेधमाह अर्धरात्रे तु केषांचिद्दशम्या वेध इष्यते। कपालवेध इत्याहुराचार्या ये हरिप्रियाः॥' .. ... इति ब्रह्मवैवर्तात्।**

अस्यार्थः

**'अनद्यतने लङ्' (पाणिनीय सूत्र ३।२।१११) इत्यत्र, 'अतीताया रात्रेः पश्चिमयामद्वयमागामिन्या रात्रेः पूर्वयामद्वयं दिवसश्च सकल एषोऽद्यतनः कालः' इत्युक्तं महाभाष्ये।' 'स एष वर्तमानः काल एकादश्यहोरात्र उपोष्यः'**

**'उदयव्यापिनी ग्राह्या कुले तिथिरुपोषणे।**
**निंबार्को भगवान् येषां वांछितार्थफलप्रदः॥'**

या सर्व निरूपणावरून असें सिद्ध होतें कीं, श्रीनिंबार्काचार्य हे केवल दार्शनिक आचार्य नसून सर्व वैष्णवांना अत्यंत आदरणीय उपास्यदेवतारूप होते. श्रीनिंबार्कांच्या मतांत रात्रीं १२ वाजतां तिथि बदलते. हेंच मत ख्रिश्चनांनींही स्वीकारलें आहे. त्यांचीही तारीख रात्रीं १२ वाजतांच बदलते. कमलाकरभट्टांच्या कालापासूनच, अन्य कांहीं वैष्णवांनींही श्रीनिंबार्कांच्या या सिद्धान्ताचा स्वीकार केलेला दिसतो. उत्तर प्रदेशांतील अन्य वैष्णवांनीं श्रीनिंबार्कसंप्रदायानुसार आपली संघटना त्यावेळीं केलेली होती. श्रीनिंबार्कांच्या या ज्योतिःसिद्धांतास अनुसरूनच वैष्णवांच्या एकादशीव्रतादिकांचा निर्णय केला जातो. कमलाकरभट्टांच्या वरील संदर्भावरून असें ज्ञात होतें कीं, श्रींनिंबार्कांचा उल्लेख पुराणांतून हरिप्रिया म्हणून केला गेला आहे. हें नांव सखीभावानें प्रभूच्या सेवेंत निमग्न राहाण्याचें द्योतक आहे. श्रीनिंबार्क हे भगवंताच्या सान्निध्यांत निरंतर राहात असल्यामुळें रंगदेवी सखीचे अवतार मानले जातात. रंगदेवी हीच हरिप्रिया सखी असल्याचें पुराणांत सांगितलें आहे. हरिप्रिया, श्रीकृष्णसन्निध नेहेमीं राहाणारी आहे -

**'संमुखे ललितादेवी श्यामला वायुकोणके।**
**उत्तरे श्रीमती धन्या ऐशान्यां श्रीहरिप्रिया॥**

**विशाखा च तथा पूर्वे शैव्या चाग्नौ ततः परं।**
**पद्मा च दक्षिणे पश्चान्नैरृते क्रमशः स्थिता।।**
**योगपीठे केदाराग्रे चारुचंद्रावली प्रिया।**
**अष्टौ प्रकृतयः पुण्याः प्रधानाः कृष्णवल्लभाः।।'**

(- पद्मपुराण ५।७०।५-६-७)

हृदयांतील सूक्ष्माकाशस्थ अष्टदलकमलाच्या मध्यें श्रीराधाकृष्णांची युगलमूर्ति नित्य विराजमान आहे. त्यांच्या सन्मुख असलेल्या दलावर ललिता, वायव्य कोणावर श्यामला, उत्तरेला धन्या, ईशान्य कोणांत हरिप्रिया, पूर्वेला विशाखा, अग्निकोणांत शैत्या(?),दक्षिणेस पद्मा, नैरृत्येला चंद्रावली क्रमानें विराजमान आहेत. श्रीकृष्णांच्या या आठ सखी; पृथिवी, जल, तेज, वायु, आकाश, मन, बुद्धि व अहंकार या आठ प्रकृतींच्या प्रतीक आहेत. हरिप्रिया रंगदेवी, अहंकाराची प्रतीक आहे. तीच श्रीनिंबार्क आहे. योगदर्शनानुसार अष्टदल कमलाच्या आठ दलामध्यें पद्मा इत्यादि आठ प्रधाननाडी आहेत. नाड्यांच्या मध्यभागीं मुख्य सुषुम्णा नाडी आहे. श्रीनिंबार्कमतानुसार सुषुम्णाच श्रीराधा आहे. ललिता, पिंगला नाडी आहे. तसेंच रंगदेवी इडानाडी आहे. पिंगला चंद्रनाडी असून इडा सूर्यनाडी आहे. चंद्रनाडी पोषण करते तर इडानाडी उन्मीलन - प्रेरणा करते. **'उन्मीली तु सा ज्ञेया विशेषेण हरिप्रिया'** (- पद्मपुराण ६।३६।३४) श्रीनिंबार्क हेच, उपासकांना भागवततत्त्वाचें उन्मीलन करणारे हरिप्रिया आचार्य आहेत. श्रीनिंबार्कांच्या या सखीभावाच्या रहस्याचें प्रतिपादन, पद्मपुराणातील पातालखंडांत ८४ व ८५ अध्यायांत अर्जुन व नारद यांना सखीभावाची प्राप्ति झालेल्या प्रसंगांत केलें गेलें आहे. वृन्दावनांतील लीलेमध्यें जीवानें प्रियावत् भावानें उपस्थित झालें पाहिजे हेंच सखीभावाचें रहस्य आहे.

# द्वैताद्वैतमत आणि अन्य मतें

श्रीनिंबार्काचार्यांनीं, जीव, जग, ब्रह्म व माया यांच्याबद्दल जे विचार व्यक्त केले आहेत ते असे - जगताची सृष्टि, स्थिति व लय करणारें एक अद्वितीय ब्रह्म आहे. जीव व जग हें ब्रह्माचें अंग व अंश आहेत. ब्रह्म हें चिदानंदरूप, मायाशक्तियुक्त, सर्वज्ञ, सर्वशक्तिसंपन्न व सर्वाश्रय आहे. ब्रह्माच्या अंगभूत असणाऱ्या मायेच्या द्वारा, त्याच्याच स्वरूपानंदरूप उपादानापासून हें दृश्यमान विश्व नामरूपानें प्रकाशित होऊन राहिलें आहे. जीवात्मा, ब्रह्माच्याच चिदंशाचा एक प्रकार आहे. यामुळें तो ज्ञ (ज्ञाता-द्रष्टा) आहे. जीव व जग ब्रह्माचे अंश आहेत तसेंच ब्रह्म हें, त्या दोघांना आश्रय आहे. म्हणून, ब्रह्म, सगुण व निर्गुण दोन्ही प्रकारांनीं वर्णिलेले आहे. ब्रह्म सर्वव्यापी आहे. तर जीव आणि जग त्याचे व्याप्य आहेत. यामुळें जीव, जग व ब्रह्म यांच्यामध्यें अत्यंत भेद नाहीं व अत्यंत अभेदही नाहीं तर त्यांचा परस्पर भेदाभेद संबंध आहे.

श्रीनिंबार्काचार्य; ब्रह्मसूत्र २।३।४२-४४ मध्यें भाष्यांत जीव हा ब्रह्माचा अंश म्हणून सांगत आहेत. ब्रह्मसूत्र २।३।१६-१७-१८ मध्यें जीव, अजर, अमर, ज्ञाता असल्याचें सांगतात. ब्रह्मसूत्र २।३।४५-४६ मध्यें ब्रह्म जीवाचे अंशी असलें तरी निर्दोष व जीवापेक्षां श्रेष्ठ असल्याचें सुचवीत आहेत. ब्रह्मसूत्र २।३।१९ मध्यें जीव अणुपरिमाणाचा असल्याचें सांगत आहेत.

वरील सूत्रांतून श्रीनिंबार्काचार्यांनीं व्यक्त केलेल्या मताप्रमाणेंच श्रीरामानुजाचार्य, श्रीमध्वाचार्य, श्रीवल्लभाचार्य यांनींही आपलीं मतें दर्शविली आहेत.

श्रीशंकराचार्यांनींही, ब्रह्मसूत्र ३।२।२७ यावरील भाष्यांत भेदाभेद मत दाखविलें आहे. पुढें त्यांनीं ३।२।२९ या सूत्रामध्यें स्वतःचें मत दाखविलें आहे. या सूत्रभाष्यावरील भामतीमध्यें श्रीवाचस्पतिमिश्रांनीं, भेदाभेदमताला सयुक्तिक

विरोध दर्शविला आहे तो असा - 'अयमभिसन्धिः - **यस्य मतं वस्तुनोऽहित्वेनाभेदः कुण्डलत्वेन भेद इति। एवं स ब्रवाणः प्रष्टव्यो जायते, किमहित्वकुण्डलत्वे वस्तुनो भिन्ने उताभिन्ने इति। यदि भिन्ने, अहित्वकुण्डलत्वे भिन्ने इति वक्तव्यं न तु वस्तुनस्ताभ्यां भेदाभेदौ। न ह्यन्यभेदा भेदाभ्यामन्यद्भिन्नमभिन्नं वा भवितुमर्हति। अतिप्रसंगात्। अथ वस्तुनो न भिद्येते अहित्वकुण्डलत्वे, तथा सति को भेदाभेदयोर्विषयभेदः? तयोर्वस्तुनोऽनन्यत्वेनाभेदात्। न चैकविषयत्वेऽपि सदानुभूयमानत्वाद्भेदाभेदयोरविरोधः। स्वरूपविरुद्धयोरप्यविरोधे क्व नाम विरोधो व्यवतिष्ठेत्। न च सदानुभूयमानं विचारासहं भाविकं भवितुमर्हति। देहात्मभावस्यापि सर्वदानुभूयमानस्य भाविकत्वप्रसंगात्। प्रपंचितं चैतदस्माभिः प्रथमसूत्र इति नेह प्रपंचितम्। तस्मादनाद्यविद्याविक्रीडितमेवैकस्यात्मनो जीवभावभेदो न भाविकः। तथा च तत्त्वज्ञानादविद्यानिवृत्तापवर्गसिद्धिः। तात्विकत्वे त्वस्य न ज्ञानान्निवृत्तिसम्भवः। न च तत्त्वज्ञानादन्यदपवर्गसाधनमस्ति। यथाह श्रुतिः- 'तमेव विदित्वातिमृत्युमेति नान्यः पन्था विद्यतेऽयनाय' इति।**

वरील भामतीकारांच्या लिहिण्याचा भावार्थ असा कीं - जीव व ब्रह्म यांचा भेद व अभेद स्वाभाविक मानतां येत नाहीं. भेद व अभेद हे परस्परविरोधी असल्यानें एका ठिकाणीं दोन्ही कसे राहातील? एकच सर्प, सर्परूपानें नेहेमीं अभिन्न आहे. पण कुंडलाकृति, वेटोळा घालून बसला म्हणजे भिन्न आहे. या भेदाभेदवाद्यांच्या दृष्टान्ताप्रमाणें भेद व अभेद यांचा अविरोध मानला तर विरोध म्हणून कोठें शिल्लकच राहाणार नाहीं. भेद व अभेद सर्वदा अनुभवास येतात म्हणून ते खरे असा एक युक्तिवाद, भेदाभेदवाद्यांचा आहे. पण त्याप्रमाणें मानल्यास, देहात्मभावही सर्वदा अनुभूयमान असल्यानें तोही खरा समजण्याचा प्रसंग येईल. म्हणून एकाच परमात्म्याला जीवरूपानें आलेली अनेकता

अविद्येमुळें आलेली आहे. असें मानलें म्हणजे, तत्त्वज्ञानानें अविद्यानिवृत्ति होऊन मोक्ष मिळतो हा सिद्धान्त योग्य ठरतो. जीवरूपभेद खरा मानल्यास तत्त्वज्ञानानें त्याची निवृत्ति होणार नाही. तत्त्वज्ञानाखेरीज तर दुसरें मोक्षाचें कोणतेंही साधन नाहीं असें श्रुति सांगत आहे. याप्रमाणें भामतीकारांनीं स्वाभाविक भेदाभेदवादाबद्दल आपला स्पष्ट विरोध युक्तिपुरःसर दर्शविला आहे.

श्रीरामानुजांचें श्रीभाष्य, श्रीनिंबार्कांच्या वाक्यार्थाचें अनुकरण करीत आहे. श्रीनिंबार्कांच्या वाक्यार्थाचा विस्तार त्यांचे शिष्य श्रीनिवासाचार्य यांनीं केला आहे त्यामध्यें व श्रीभाष्यामध्यें मोठें साम्य आहे. श्रीभाष्यांतील प्रतिपाद्य विषय, विचार्य श्रुतिवाक्य, त्याचा समन्वय, परमतनिराकरण प्रायः श्रीनिम्बार्कांच्या पद्धतीप्रमाणेच असलेलें दिसते. श्रीनिंबार्कांनी पुरुषोत्तम वासुदेव श्रीकृष्ण हेच परब्रह्म असल्याचे सांगितले आहे. ब्रह्माची स्वरूपशक्ति व गुणशक्ति या दोनींची संयुक्तरूप पराशक्ति श्रीराधा श्रीकृष्णांचे वामांगीं विराजमान असून तिचा त्यांच्याशी नित्य संबंध आहे असें श्रीनिंबार्कांचे मत आहे. श्रीराधेची उपासना तर श्रीनिंबार्कांनीच प्रकट केलेली आहे.

श्रीरामानुज, वासुदेव श्रीकृष्णांना विष्णुरूपाने उपास्य मानतात. त्यांच्या मतांत स्वरूपशक्ति लक्ष्मी व गुणशक्ति सरस्वती आहे. त्यांनाच ते, श्रीशक्ति व भूशक्ति असे म्हणतात. श्रीनिवासाचार्यांनी, श्रीशक्ति रुक्मिणी व भूशक्ति सत्यभामा मानली आहे. हें रामानजुंनाही मान्य आहे. श्रीनिवास, चिदचिच्छक्तिसंपन्न् ब्रह्म श्रीकृष्ण मानतात, तर श्रीरामानुज चिदचिच्छक्तिसंपन्न् ब्रह्म विष्णु मानतात. श्रीमध्वाचार्यही असेच सांगतात. श्रीवल्लभाचार्य, ज्ञानशक्ति व क्रियाशक्ति यांनी पुष्ट श्रीकृष्ण ब्रह्म समजतात. श्रीशंकराचार्यांच्या मतांत जें वस्तुतः सच्चिदानंदरूप ब्रह्म तेंच व्यावहारिक दृष्टीने सगुण, सर्वज्ञ, सृष्टिस्थितिलयकर्तृ असें उपास्य आहे.

श्रीनिंबार्कमतांत, कोणत्याही गुणविशिष्ट गुणीचा त्याच्या गुणांशी जो संबंध आहे ब्रह्म आणि जग यांचा आहे. ब्रह्म विश्वाचा आत्मा असून तोच जिज्ञासाविषय आहे. **(सर्वभिन्नाभिन्नो भगवान् वासुदेव विश्वात्मैव जिज्ञासाविषयः;** ब्र.सू. १।१।४) तोच जगाचे उपादानकारण व निमित्तकारण आहे. (**प्रकृतिरुपादानकारणं चकारान्निमित्तकारणं च परमात्मैव**,ब्र.सू. १।१।१३) म्हणून ते भिन्न व अभिन्न आहे. ब्रह्म हेच मुख्य तत्त्व आहे. हे जग म्हणजे ब्रह्माचीच, एका अपेक्षेने स्थूल व अनुभवयोग्य साकार अभिव्यक्ति आहे. जगाची तीन कारणे दिसतात. चैतन्य, गति किंवा शक्ति आणि जड. जड, शक्तीचा परिणाम आहे आणि शक्ति, चैतन्याचे रूपांतर आहे. आजचे वैज्ञानिक जड, गतीचे रूपांतर आहे हे सिद्ध करून राहिले आहेत. त्यांचे संशोधन चालूंच आहे. त्यावरून कल्पना येते की निकटच्या भविष्यकाळांत गति किंवा शक्ति, चैतन्याचे रूपांतर आहे हेंही वैज्ञानिक दृष्टीने सिद्ध होऊं शकेल. सांप्रतच्या वैज्ञानिक प्रगतीकडे पाहून असे वाटते की द्वैताद्वैतदर्शन, वैज्ञानिकांच्या कसोटीस पूर्ण उतरणारे असे ठरेल. भागवताच्या प्रथम श्लोकांत, हेच वैज्ञानिक तथ्य, **'तेजोवारिमृदां..यथा विनिमयो यत्र त्रिसर्गो मृषा।'** याप्रमाणे सांगून जग हे ब्रह्माचा विनिमय आहे असें सिद्ध केलें आहे.

श्रीनिंबार्कांनी, सृष्टींतील भिन्न भिन्न दिसणारे सर्व पदार्थ स्रष्ट्याचे- परमात्म्याचे रूप आहेत असे दाखवून हें सिद्ध केलें की, कोणीही कोणाचा द्वेष, स्पर्धा, हिंसा, इत्यादि भावना करणें म्हणजे परमात्म्याचाच द्वेष इत्यादि केल्याप्रमाणें होणारें आहे. हा त्या प्रभूचा मोठा अपमान आहे. म्हणून निरहंकारवृत्तीनें, सर्व जीव परमात्म्याचे अंश आहेत असें समजून सर्वांशी अविरोध राखल्यानेंच आत्मशांति मिळूं शकते. या दृष्टीनें हें दर्शन उच्च कोटींतील ठरतें.

श्रीनिंबार्कांनीं, निष्कामकर्मरूप वैराग्यच श्रेष्ठ साधन मानलें आहे.

ईशकृपेनेंच तें साध्य होणारें आहे. भक्तीनेंच ज्ञान व कर्म यांचें पोषण होतें. व्यावहारिक क्रिया देखील ज्ञान व प्रेम या दोघांच्या समन्वयानें सुफल होते असें दिसून येतें. भक्ति, ज्ञान व कर्म यांची बरोबरीनें साधना द्वैताद्वैतभावाची द्योतक आहे. या श्रीनिंबार्कांच्या रहस्याचें आविष्करण, श्रीजीवगोस्वामींनीं आपल्या 'भागवतसंदर्भ' व 'परमात्मसंदर्भ' या ग्रंथांत केलें आहे. तसेंच श्रीबलदेवविद्याभूषणांनींही आपल्या गोविंदभाष्यांत अचिंत्यभेदाभेदरूपानें केलें आहे.

याप्रमाणें सर्वही वेदान्ताचार्यांचे विचार पुष्कळच बाबतींत समन्वय होण्यासारखे आहेत असें दिसून येईल. प्रत्येक आचार्यांची प्रतिपादनशैली विलक्षण असली तरी साध्यसाधनांचे बाबतींत, समन्वयदृष्टीनें पाहिलें असतां त्यांची एकवाक्यता पाहाण्यास फारसा विरोध राहाणार नाही.

## श्रीनिंबार्कांचा साधनसिद्धान्त

श्रीनिंबार्काचार्यांनीं मोक्षप्राप्तीकरितां ब्रह्माची उपासना प्रवर्तित केली आहे. यांच्या मतांत, अमूर्त उपासनेपेक्षां, प्रकाशमान मूर्तस्वरूपाची उपासना, जीवाला विशेष कल्याणकारक व सुलभ आहे. म्हणून साधकाला सत्त्वगुणाधिपति भगवान् श्रीकृष्णांची उपासना प्रशस्त असल्यानें श्रीनिंबार्कांनीं, श्रीराधिका व श्रीकृष्ण या युगलमूर्तींच्या उपासनेचेंच विधान केलें आहे.

श्रीनिंबार्काचार्य, ब्रह्म चतुष्पाद मानतात. संपूर्ण दृश्य प्रपंच ब्रह्माचा प्रथम पाद; विश्व भिन्न भिन्न रूपानें पाहणारा जीवात्मा द्वितीयपाद; अनंत विश्वाचा एकसमयावच्छेदेन द्रष्टा ईश्वर तृतीयपाद; या तिघांपेक्षांही विशिष्ट, केवल आनंदाचा अनुभविता अक्षर ब्रह्मरूप चतुर्थपाद आहे. या सिद्धान्तदृष्टीनें संपूर्ण विश्व व जीवसमूह ब्रह्माचे अंश आहेत. ब्रह्माचा स्वरूपगत आनंद भूमा, अनंतसुखरूप आहे. या आनंदाची प्राप्ति म्हणजेच मुक्ति होय. हीच, साधकांनी साधनांचे द्वारा प्राप्त करून घ्यावयाची आहे. ज्याप्रमाणें सूर्य; आपले अनंत

तेजोमय किरण पसरून सर्व विश्व प्रकाशित करतो त्याप्रमाणें ब्रह्माचा आनंदच संपूर्ण विश्वांत विखुरलेला आहे. **'एतस्यैवानन्दस्यान्यानि भूतानि मात्रामुपजीवन्ति'** (बृ. उ. ४।३।३२) या श्रुतिवाक्यानें हेंच दर्शविलें आहें. जीव हा परमात्म्याचा अंश असल्यानें तो परिमित आनंदाचाच अनुभव घेतो आणि परमात्मा, संपूर्ण आनंदाचा एकाच वेळीं अनुभव घेऊं शकतो. यामुळें ईश्वर सर्वज्ञ व जीव अल्पज्ञ आहे. अल्पज्ञ असल्यामुळेंच जीव, ब्रह्माच्या आधीन आहे. जीव व जग यांचा नियंता असल्यामुळें ब्रह्माला ईश्वर म्हटलें आहे. जीव, जग व ईश्वर तिघांचाही समावेश, अक्षरब्रह्मांत होतो. हे निर्गुण ब्रह्म जगाचें निमित्त व उपादानकारण असल्यानें सगुणही आहे. या अखंड पूर्ण आनंदरूप ब्रह्माची प्राप्ति करून घेण्यास भक्ति हें एकच साधन आहे. जगामध्यें, प्रत्येक अणूरेणूमध्यें ब्रह्मदर्शन हें भक्तीचें पहिलें रूप आहे. सर्व जीव ब्रह्माचें अंश समजून सर्वांबद्दल सद्भावना ठेवणे व यथाशक्ति त्यांची सेवा करणें हें भक्तीचें दुसरें रूप आहे. त्या ब्रह्माच्या अनंत, पूर्ण सुखस्वरूपाची अंतःकरणामध्यें धारणा करणें हें भक्तीचें तिसरें रूप आहे. याप्रमाणें भक्ताच्या दृष्टीनें ब्रह्म, सगुण व निर्गुण उभयरूप आहे. जग व जीव यांचे ठिकाणी ब्रह्मभावना करणें ही साधनभक्तीची प्राथमिक अवस्था आहे. यानें साधकाचें चित्त पूर्ण निर्मल झाल्यावर भक्तीची दुसरी अवस्था, पराभक्ति किंवा प्रेमाभक्ति, ही प्रकट होते. ही सिद्धावस्था आहे. ही अवस्था साधक भक्ताला दैन्यभावानें व भगवत्कृपेनें प्राप्त होते.

**'मैत्रीकरुणामुदितोपेक्षाणां सुखदुःखपुण्यापुण्यविषयाणां भावनातश्चित्तप्रसादनम्'** (योगसूत्र १।३।३) या सूत्रांतील; सच्चरित्र सुखी माणसाबद्दल मैत्री, अज्ञानी दुःखी जनाबद्दल करुणा, पुण्यशील प्राणिमात्राबद्दल मुदिता, आणि पातकी जनाबद्दल उपेक्षा या चार भावनांनी साधकाचें अंतःकरण प्रसादपूर्ण होतें. हाच दैन्यभाव आहे. यानेंच पूर्णभगवत्कृपा होते. **'कृपास्य**

**दैन्यादियुजि प्रजायते**' (दशोकी ९) हेंच श्रीनिंबार्कही सांगतात.

निग्रह व अनुग्रह अशा दोन ब्रह्माच्या शक्ति आहेत. ब्रह्म हें, स्वतः लीलेकरितां, जीवाला बंधनांत टाकण्याचे हेतूनें आपली निग्रहशक्ती प्रकट करतें. ही शक्ति जीवगुणांना आच्छादन करते. आकार झाकल्यामुळें जीवाला अणुत्व येतें. ज्ञानाचें आच्छादन केल्यामुळें अज्ञता व ऐश्वर्याचें आच्छादनामुळें जीवाला नियम्यता प्राप्त होते. साधनभक्तीचें निरंतर अनुष्ठान जीवानें सुरू केलें असतां, ब्रह्माची अनुग्रहशक्ति प्रकट होते. त्यामुळें जीवात्मा सर्व बंधनांतून मुक्त होऊन त्याला परमात्म्याचें साम्य प्राप्त होतें. अनुग्रहशक्ति हीच भगवंताची कृपा आहे. अनुग्रहशक्तीलाच स्वरूपशक्ति व निग्रहशक्तिला गुणशक्ति असें म्हणतात.

भगवान् श्रीकृष्ण हे परब्रह्म आहेत. हेच आपल्या प्रकृतिनामकशक्तीच्या सत्त्व, रज व तम या तीन गुणांच्या आश्रयानें ब्रह्मा, विष्णु, महेश बनून जगताची सृष्टि, स्थिति व प्रलय हीं कार्यें करून राहिले आहेत. श्रीकृष्णप्रभु; मूर्त व अमूर्त या दोन्हीही रूपांचे मध्यवर्ती आधार असून त्यांच्याच उपासनेनें जीवात्मा; भगवत्साम्य व अपरिच्छिन्न भूमानंद प्राप्त करून घेतो. भगवान् श्रीकृष्ण हे, कर्मबंधनरहित, निर्मलविज्ञानरूप आहेत. हेच साक्षात् सच्चिदानंदघन परमेश्वर आहेत. श्रीराधादेवी, यांचीच आह्लादिनीशक्ति आहे. जीव जेव्हां सांसारिक बंधनांतून मुक्त होण्याकरितां अत्यंत तळमळीनें प्रयत्न करूं लागतात त्यावेळीं त्यांचा उद्धार करण्याकरितां प्रभूला अवतार धारण करावे लागतात. प्रभूचे सर्व अवतार जीवांना उपास्य आहेत. निर्व्याज प्रेमपूर्वक प्रभूच्या त्या त्या अवतारस्वरूपाचें ध्यान, त्या त्या मंत्राचा स्थिरतेनें जप, प्रभुनामसंकीर्तन, प्रभुलीलास्मरण हेंच साधकाला कल्याणकारक आहे. या साधनांनीं तन्मयता प्राप्त होऊन चित्तशांति प्रकट होऊं लागते. भगवंताच्या इष्ट त्या प्रतिमेचे ठिकाणीं ब्रह्मबुद्धि धारण करण्यानें साधकाचें अंतःकरण

पवित्र होतें. त्यामुळें हळूहळू संपूर्ण विश्वच त्याला ब्रह्ममय भासूं लागतें. सर्व जीव ब्रह्मरूप भासूं लागल्यामुळें, द्वेष, स्पर्धा, असूया, हिंसा इत्यादि वृत्ति मावळून अहंकाररहित झालेला जीव प्रेमपूर्ण हृदयानें भगवंताचे ध्यान करण्यांत निमग्न होऊन जातो. या महापुरुषाला उद्देशूनच श्रीतुकाराममहाराज सांगत आहेत -

**'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेदभ्रम अमंगळ।।**
**कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वरपूजनाचें।।'**

या भूमिकेवर गेलेला महापुरुषच भेदाभेदरहित होऊन खरें भगवत्पूजन करूं शकतो. हाच श्रीनिंबार्काचार्यांच्या उत्तम साधनापद्धतीचा सारांश आहे.

## आचार्योपासना

मोक्षप्राप्तीकरितां साधकाला सद्गुरूचा आश्रय आवश्यक आहे. तत्त्वज्ञानाच्या साधनामध्यें आचार्योपासन हें एक साधन भगवद्गीतेमध्यें सांगितलें आहे.

**'आचिनोति च शास्त्रार्थमाचारे स्थापयत्यपि।**
**स्वयमप्याचरेद्यस्तु स आचार्य उदाहृतः।।'** (- भामती)

शास्त्रार्थज्ञानसंग्रह करून स्वतः त्याप्रमाणें आचरण करणारा आणि इतरही अधिकारी साधकाला योग्य तें मार्गदर्शन निश्चितपणें करणारा महापुरुषच सद्गुरु किंवा आचार्यपदवीचा अधिकारी असूं शकतो. गुरु हे, अमूक वर्णाचे किंवा आश्रमाचेच असले पाहिजेत असा निर्बंध मानण्याचें कारण नाहीं असें कांहीं बुद्धिवादी म्हणतात याबद्दल थोडा विचार करणें प्राप्त आहे. श्रुति, स्मृति, पुराण या प्रमाणग्रंथांमध्यें वर्णाश्रमव्यवस्था व तिचे हेतु दाखविले आहेत. या व्यवस्थेचें स्वरूप आजही कांहीं प्रमाणांत चालू असलेलें दिसतें. ब्राह्मण, संन्यासी यांच्याबद्दलचा अनादर समाजांत कांहींसा दिसून येत असला तरी त्यांच्याकरितां शास्त्रकारांनीं सांगितलेल्या कर्मांचे महत्त्व हें सर्वांना मान्य आहे.

**'उत्तमांगोद्भवाज्ज्यैष्ठ्याद्ब्रह्मणश्चैव धारणात्।**
**सर्वस्यैवास्य सर्गस्य धर्मतो ब्राह्मणः प्रभुः॥'** (मनुस्मृति १।९३)

**'विप्राणां ज्ञानतो ज्यैष्ठ्यम्।'** (- मनुस्मृति २।१५५)

इत्यादि वाक्यांनीं ब्राह्मणांची प्रशंसा मनुराजानें केली आहे हें खरें आहे. तथापि त्याबरोबरच -

**'योऽनधीत्य द्विजो वेदमन्यत्र कुरुते श्रमम्।**
**स जीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वयः॥'**

(मनुस्मृति २।१६८)

**'अनभ्यासेन वेदानामाचारस्य च वर्जनात्।**
**आलस्यादन्नदोषाच्च मृत्युर्विप्राञ्जिघांसति॥'** (- मनुस्मृति ५।४)

इत्यादि वाक्यांनीं, कर्तव्यभ्रष्ट ब्राह्मणाची त्यानेंच निंदाही केलेली आहे. स्तुतीबरोबरच ब्राह्मणजांतीवर, अनेक निर्बंध व जबाबदारीही शास्त्रकारांनीं टाकलेली आहे. ते निर्बंध झुगारून स्वेच्छाचारी बनलेले हिरण्यकश्यपु, रावण इत्यादिक, ब्राह्मण असूनही पुराणांतून राक्षस म्हणूनच दाखविले आहेत. ब्राह्मणांचें महत्त्व तप व विद्या यामुळेंच आहे -

**'तपो विद्या च विप्रस्य निःश्रेयसकरं परम्।**
**तपसा किल्बिषं हन्ति विद्ययामृतमश्नुते॥'** (मनुस्मृति १२।१०४)

**'तपः स्वधर्मवृत्तित्वम्' इति भारतदर्शनात् आश्रमविहितं कर्म आत्मज्ञानं च ब्राह्मणस्य मोक्षसाधनम्'** असें यावर टीकाकार स्पष्टीकरण करतात. कुलपरंपरेनें जन्मापासून अनेक संस्कारकर्मे सांगितलीं असल्यानें जन्मतः जातीचें महत्त्व शास्त्राभिप्रेत आहे. परंपरागत संस्कारामुळें रक्तामध्यें सुद्धां कांहीं वैशिष्ट्य असणें स्वाभाविक आहे. या सर्व विवेचनावरून असें दिसतें कीं - **'वर्णानां ब्राह्मणो गुरुः'** या मनुवचनास अनुसरून, गुरु किंवा आचार्य पदवीचा मुख्याधिकारी ब्राह्मणच आहे.

**'तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्।'** (मुंडक १।२।१२)

या वाक्यामध्यें सामान्य गुरुशब्दाचा उल्लेख केला असल्यामुळें, ब्राह्मणच गुरु होतो. दुसरा तसें आचरण करणारा गुरु होत नाहीं असें सिद्ध होत नाहीं. असें कांहीं विचार आहेत. पण वरील वाक्यांतील श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ हीं दोन विशेषणें पाहिलीं असतां वरील विचार तितकेसे सयुक्तिक ठरणार नाहींत. कांहीं ठिकाणीं, ब्राह्मणाला ब्राह्मण गुरु असावा, क्षत्रियाला क्षत्रिय इत्यादि सांगितलें आहे -

**'ब्राह्मणो ब्राह्मणैः श्राव्यः क्षत्रियः क्षत्रियैस्तथा।**
**वैश्यो वैश्यैस्तथा श्राव्यः शूद्रः शुद्रैः परंतप।।'**

परंतु ही व्यवस्था, वैदिक ब्रह्मविद्येकरितां नसून तांत्रिक दीक्षेकरितां मानलेली आहे. जी, इसवी सनापूर्वी चौथ्या किंवा पांचव्या शतकापासून सुरू झाली असावी. वैदिक ब्रह्मविद्येच्या उपदेशाचा अधिकार, ब्राह्मणालाच दिला गेला आहे. शूद्राला तर वैदिकब्रह्मविद्या श्रवण करण्याचा सुद्धां अधिकार नाहीं हें; ब्रह्मसूत्र १।३।३४ ते ३९ पर्यंत असलेल्या श्रीनिंबार्कांच्या वाक्यार्थावरून [illegible]सून येतें.

श्रीसमर्थांनींही दासबोधांत पांचव्या दशकांतील दुसऱ्या समासांत गुरुलक्षण सांगत असतांना इतर जातीचा गुरु ब्राह्मणांनीं कां करूं नये याचें सयुक्तिक विवेचन करून व गुरूंचे अनेक प्रकार दाखवून शेवटीं, मोक्षसाधक गुरु हे वेगळेच असल्याचें सांगितलें आहे.

**'नीचयातीचा गुरु। तोही कानकोंडा विचारु। ब्रह्मसभेसी जैसा चोरु। तैसा दडे।।५८।। ब्रह्मसभे देखतां। त्याचें तीर्थ नये घेतां। अथवा प्रसाद सेविता। प्रायश्चित्त पडे।।५९।। तीर्थप्रसादाची सांडी केली। तेथें नीचता दिसोन आली। गुरुभक्ति ते सटवली। येकायेकीं।।६०।। गुरूची**

**मर्यादा राखिता। ब्राह्मण क्षोभती तत्त्वता। तेथें ब्राह्मण्य रक्षूं जातां। गुरुक्षोभ घडे।।६१।। ऐसी सांकडी दोहीकडे। तेथें प्रस्तावा घडे। नीचयातीस गुरुत्व न घडे। या कारणें।।६२।। तथापि आवडी घेतली जीवें। तरी आपणची भ्रष्टावें। बहुत जनांसी भ्रष्टवावें। हें तो दूषणचि कीं।।६३।। आतां असो हा विचारू। स्वयातीचा पाहिजे गुरु। नाहींतरी भ्रष्टाकारू। नेमस्त घडे।।६४।। ... ... ... ... असो ऐसे उदंड गुरु। नाना मतांचा विचारु। परी जो मोक्षदाता गुरु। तो वेगळाची असे'।।७२।।** (दासबोध ५-२)

तात्पर्य, परंपरेनें मंत्ररहस्य जाणून त्याचा उपदेश करणाराच गुरुपदवीस पात्र असल्याचें शास्त्रकारांना संमत आहे-

**'संप्रदायविहीना ये मन्त्रास्ते निष्फला मताः।।**
**परंपरागता ये तु ते कृष्णकरुणान्विताः।।'** (-पद्मपुराण)

मंत्रशक्ति व उपासनेचें महत्त्व जर मान्य असेल तर गुरुसंप्रदायाचें महत्त्वही मान्य करणें भाग आहे. कारण ज्या शास्त्रांत मंत्र व उपासना यांचें महत्त्व वर्णिलें आहे त्याच शास्त्रामध्यें परंपरेनें त्यांचें महत्त्व जाणून उपदेश करणाऱ्या गुरूंचेंही महत्त्व वर्णन केलें आहे. म्हणून वाटेल त्याला गुरु करून बसविणें ही शुद्ध गुरुपदाची विटंबना आहे.

श्रीभगवद्गीतेमध्यें आचार्यपरंपरा दोन प्रकारची दाखविली आहे -

**'महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा।।**
**मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः।।'** (भ.गी.१०-६)

भृगु, वसिष्ठ इत्यादि सप्तऋषींची गृहस्थपरंपरा ही एक व दुसरी सनकादि मुनींची ब्रह्मचारि परंपरा. याच परंपरेंतील तृतीय आचार्य, श्रीनिंबार्क हे आहेत. हा संप्रदाय सनकादिसंप्रदाय नांवानें प्रसिद्ध आहे. तिसरा संन्यास संप्रदायही भारतवर्षात अद्यापि चालू असलेला दिसतो. श्रीशंकराचार्य, श्रीदत्तावतार श्रीनृसिंहसरस्वती, श्रीवासुदेवानन्दसरस्वती (टेंबेस्वामिमहाराज)

इत्यादि महानुभाव, या संप्रदायांतील प्रसिद्ध आहेत. अद्वैतवेदान्तसंप्रदायांतील बहुतेक सर्व मोठे मोठे ग्रंथकार संन्यासी असलेले दिसतात. संन्यासाश्रमाचा अधिकार फक्त विरक्त ब्राह्मणापुरताच शास्त्रनिर्णीत असल्यानें इतरांकरितां अन्य संप्रदायप्रवृत्ति, ईशसंकल्पानुसार पूर्वीपासून चालू आहे तें योग्यच आहे. बुद्धाच्या उपदेशानुसार भिक्षुसंप्रदाय फारच वाढूं लागून सर्वत्र अव्यवस्था होऊन राहिली. त्यावेळीं प्रवृत्तिधर्माच्या संप्रदायाचा विशेष पुरस्कार भागवतधर्माचार्यांनीं केला. भागवतधर्माचार्यांनीं दाखविलेला अनासक्तकर्मसहित भक्तिमार्गाचा इतका प्रचार झाला कीं, बौद्धधर्मावरही त्याचा प्रभाव पडून बौद्धांनींही भिक्षुमार्ग सोडण्यास सुरुवात केली. आणि त्यांनीं आपला सिद्धान्तही असा प्रस्थापित केला कीं, **'गृहस्थाश्रमांत राहूनही निर्वाण प्राप्त करून घेणें अशक्य नाहीं'** (नागसेन-निलिंद-प्रश्न ६।२।४)

भागवतधर्मांतील भक्तिसिद्धान्ताचा स्वीकार करून बौद्धांचा महायान पंथ निर्माण झाला व गृहस्थ संप्रदायही सुरू झाला. त्याच वेळीं बौद्ध मैत्रेयनाथांनीं वैष्णवधर्माची दीक्षा घेतली आणि भागवतधर्मसंमिश्र बौद्धधर्माच्या उपदेशासह इराण, अफगाणिस्थान, चीन, जपान इत्यादि ठिकाणी महायान बौद्धपंथाचा प्रचार केला. भागवतधर्माचार्यांनीं, गृहस्थाश्रमांत उपासनेचा सहजमार्ग जो प्रचलित केला तोच भारतवर्षांत बंगालप्रांतांत सहजिया संप्रदाय रूपानें वाढीस लागला. तसेंच चीनमध्यें सुखावती (त्सिङ्.गतु) संप्रदाय व जपानमध्येंही सुखावती (जो दोशु) संप्रदायरूपानें प्रचलित झाला. या सुखावती संप्रदायांत, भागवतधर्मांतील **'नमो भगवते वासुदेवाय'** या मंत्राप्रमाणें **'नामु अमिता बुत्सु'** (**नमो अमितबुद्धाय**) या मंत्रजपाचें विधान, महायानी बौद्धाचार्यांनीं केलें आहे. या संप्रदायांतील साधनापद्धति व मोक्षसिद्धान्त भागवतधर्मानुसारच आहे. जपानांतील **'जो दोशु'** संप्रदायांत; गुरूच्याजवळ राहून सद्विचार श्रवण करणें, मंत्रोपदेश घेऊन बुद्धाची उपासना करणें, धर्मशास्त्राचा अभ्यास व तदनुसार आचरण करणें आणि **'नामु अमिता बुत्सु'** या मंत्राचा जप

करणें हें प्रधान साधन आहे. भागवतधर्मांत; वैकुंठपति, क्षीराब्धिशायी, श्वेतद्वीपाधिपति, गोलोकपति व निर्विशेष निर्गुण ब्रह्म हीं विष्णूंचीं पांच रूपें मानलेलीं आहेत. याचप्रमाणें बौद्धांनींही; वैरोचन, अक्षोभ्य, रत्नसंभव, अमिताभ व अमोघसिद्धि हीं पांच बुद्धाचीं रूपें मानलीं आहेत. भागवतधर्मांत, एकच श्रीकृष्ण, सर्वेश्वर, सर्वज्ञ, सर्वाश्रय म्हणून सांगितलें. तर बौद्धांनींही याच्याच आधारावर, आपल्या, ईश्वरावर विश्वास न ठेवणाऱ्या बुद्धाला अवलोकितेश्वर बनविलें. तसेंच सूर्य व चंद्र हे ज्याचे नेत्र इत्यादि विराट रूपाप्रमाणें, बौद्धांनीं, बुद्धाच्या विराट् रूपाचीही कल्पना केली आहे. (सद्धर्मपुंडरीक २३८।४). सनकादि संप्रदायरूपानें ज्या दोन ब्रह्मचर्य व गृहस्थ गुरुपरंपरा सुरू झाल्या तशाच दोन परंपरा बौद्धांनींही सुरू केल्या आणि श्रीनिंबार्कांनीं पुरस्कृत केलेल्या ब्रह्मचर्याचें महत्त्वही बुद्धानें मान्य केलें आहे. ते म्हणतात -

**'अहि भिक्खु ! चर ब्रह्मचरियं सम्या दुक्खस्स अंतकिरियायाति'**

(- विनयपिटक महावग्ग)

याचा अर्थ - अरे भिक्षु ! तूं ब्रह्मचर्याचें आचरण कर. त्यामुळें सर्व दुःखांचा अंत होऊन जाईल.

## वैष्णवमत व ख्रिस्तमत

अशोकाचा पुत्र महेंद्र, यानें, वैष्णव व बौद्धधर्मांचेंसमन्वयात्मक रूप असलेल्या महायानपंथाचा परदेशामध्यें मोठा प्रचार करविला. त्यावेळीं, एसीन नांवाचा भक्तसमूह यहुदी देशांत संघटित झाला होता. मृतसमुद्राच्या किनाऱ्यावर ऐगदीमध्यें यांचा मठ होता. या संघांतील लोक, अहिंसक, एकांतवास करणारे ब्रह्मचारी व गृहस्थ होते. ईश्वरचिंतन हें यांचें प्रधानकर्तव्य होतें. हे मद्य, मांस इत्यादि पदार्थांचें सेवन करीत नव्हते. हे लोक इंग्रजीच्या U आकाराचें चिह्न मस्तकावर लावत होते. गुरुदीक्षेचें विधान यांच्यामध्यें असून स्नानानंतर तो

दीक्षेचा नियम होता. या दीक्षाविधानाला 'बप्तिस्मा' म्हणत होते. याच मताचे अनुयायी येशू ख्रिस्त होते. येशू ख्रिस्ताच्या वेळीं भारतांतील कांहीं वैष्णव साधकांचे दल जेरूसलमला गेलें होतें. त्याचे द्वारा तेथें भागवतधर्मासंबंधीं प्रेममार्गाचा प्रचार झाला होता. वैष्णवधर्म व बौद्धधर्म यांचा प्रभाव पडण्यापूर्वी यहुदी धर्मावर भारतीय यज्ञमार्गाचा प्रभाव पडलेला होता. यहुदी लोक; आपली देवता जिहोबा, हिला प्रसन्न करून घेण्याकरितां अग्निमध्यें पशूची आहुती देत होते. श्रीनिंबार्कांनीं कृपेलाच प्राधान्य दिलें आहे. येशू ख्रिस्तांनींही कृपाभावाचाच पुरस्कार केला आहे. श्रीनिंबार्कांनीं उपासनामार्गांत; सख्यभाव, वात्सल्यभाव, दास्यभाव व दांपत्यभाव हे प्रधान मानले आहेत. श्रीनिंबार्कांची वास्तविक उपासना, दांपत्यभावाची (प्रियावतभाव) होती. येशू ख्रिस्तांनीं याचा पूर्णपणें स्वीकार केला आहे. बायबलमध्यें प्राचीन संहिता नांवाचें जें स्थल आहे तेथे सुलेमान गीतभागांत जीवात्मा व परमात्मा यांचा प्रियावतभाव दाखविला आहे. या गीतांत; जीवाला पत्नि व ब्रह्माला पति मानून त्यांचा आध्यात्मिक विवाह दाखविला गेला आहे. इ.स.१०९०-११५३ या कालांतील सेन्ट बर्नर्डनें प्रियावतभावाचें वर्णन केलें आहे. हे सन्त प्रेमाभक्तीचे पुरस्कर्ते होते. ख्रिस्त संतांनीं, संयोग, ग्रंथिबंधन, विवाह इत्यादि रूपानें प्रेमाभक्तिचा क्रमिक विकास मानला आहे. श्रीनिंबार्कांनीं, ब्रह्मसूत्रवाक्यार्थाच्या चतुर्थाध्यायांत दाखविलेल्या प्रणालीच्या आधारावरच ख्रिस्तसंतांचा मार्ग अवलंबून आहे. अहंतत्त्वाचे मनस्तत्त्वाशी एकीकरण म्हणजे संयोग. या दोघांचें संमीलितरूपानें जीवात्म्याशीं संलग्न होणें म्हणजे ग्रंथिबंधन. जीवात्म्याची परमात्म्याला पूर्ण शरणागति म्हणजे विवाह. सेन्ट बर्नर्ड सांगतात कीं - 'माझ्यामध्यें जें मीपण आहे तोच परमेश्वर आहे. जो माझी सत्ता व विकास आहे.' हेंच पत्नीच्या सर्व समर्पणभावाचें रहस्य आहे. हें विवाहित पत्नीलाच करतां येणें शक्य आहे. ज्याला वैष्णव लोक स्वकीयाभाव म्हणतात. श्रीनिंबार्कांची उपासना स्वकीयाभावाचीच होती. याचा पूर्ण प्रभाव ख्रिस्तमतावर

पडलेला आहे. भागवतांत रासलीलेच्या प्रसंगांत संयोग व वियोग देन्ही लीलांचें निरूपण करून, जीवात्मा व परमात्मा यांच्या संमेलनांतील विशेष चमत्कार दाखविला गेला आहे. सेन्ट बर्नर्डच्या नंतर सेन्ट जान आफ रुइस ब्रोक (इ.स.१२९३-१३९१) यानें संयोगाबरोबर वियोगाचेंही प्राधान्य मानलें आहे. महिला सेन्ट टेरेसा, (इ. स. १५१५-१५८२) ही आपणांस प्रभूची पत्नी समजत होती. सेन्ट टेरेसाचा शिष्य सेन्ट जान आफ द क्रास (इ.स.१५४२-१५९१) यानें आपल्या आध्यात्मिक उपगाननामक ग्रंथामध्यें, विरंह व मीलन यांची सह अनुभूति असल्याचें सुंदर वर्णन केलें आहे. श्रीनिंबार्कांनीं आपल्या दशोकीमध्ये उपास्य, उपासक, कृपाफल व भक्तिरस हे चार ज्ञेयपदार्थ सांगितले ते; सेन्ट अंडर हिलनें आपल्या ग्रंथांत जसेच्या तसेच दाखविले आहेत.

इस्लाम धर्मावरही या भक्तिमार्गाचा प्रभाव पडलेला आहे. बसरा येथील प्रसिद्ध उपासिका रबिया, ही आपणांस प्रभूची पत्नी समजत होती. तिला एकदां सूफी संत हसन बसरीनें विचारलें कीं, 'तूं विवाह कां करीत नाहीस?' त्यावेळीं रबियानें उत्तर दिले कीं, 'विवाह, स्थूल शरीराचा होत असतो. तें तर मनासह स्वामींच्या चरणावर मी समर्पण केलें आहे. यामुळे माझा खरा विवाह, प्रभूबरोबरच होऊन चुकला आहे.' रबियाची प्रेमभावना, गोपींच्यासारखी होती. तिचें सर्वस्व हें, प्रभूचेंच आहे असें ती मानीत होती. सूफी सन्त बुल्लेशाह, स्त्रीवेषभूषा धारण करून पदें म्हणत फिरत होता. ज्यांतून प्रियतमाविषयीं विरह भावना पूर्णपणें व्यक्त झालेली आहे. यांचे अनुयायी स्त्रीवेष धारण करून राहातात. हा संप्रदाय गुजराथमध्यें असून याचें केंद्र अहमदाबाद शहर आहे. यांची गुरुपरंपरा गृहस्थाचीच आहे.

श्रीनिंबार्कांनीं प्रियावतभावच मानला होता. ते अंतःसाधक होते. बाह्य स्त्रीवेष वगैरे त्यांच्यामध्यें नव्हता. पण पुढें झालेल्या श्री हरिवंशाचार्यांच्या कालांत, वैष्णवामध्यें हा सखीसंप्रदाय सुरू झाला व त्याचा प्रभाव सर्वांवर पडला. या संप्रदायांतील पुरुष स्त्रीवेष धारण करणारे दिसतात. प्रियावतभावाचे

प्रथम आचार्य श्रीनिंबार्कच असल्यामुळें सखीसंप्रदायाचा संबंध त्यांच्याशीं जोडला जातो.

## श्रीनिंबार्कपरंपरेंतील सिद्ध संत

श्रीनिंबार्काचार्य, या रसिक भागवत संप्रदायांतील आदि आचार्य आहेत. यांनींच, आपले गुरु श्रीनारद यांच्या आज्ञेप्रमाणें, श्रीशुकदेवांनीं सांगितलेला निगमकल्पतरूचा भक्तिरूप रस घरोघर पोंचविला. श्रीशुकाचार्यांनीं भागवतारंभीं भाविक रसिकांना आवाहन केलें आहे -

**'निगमकल्पतरोर्गलितं फलं शुकमुखादमृतद्रवसंयुतम्।**
**पिबत् भागवतं रसमालयं मुहुरहो रसिका भुवि भावुकाः।।'**

तसेंच भक्तिदेवीचे कष्ट दूर करण्याकरितां श्रीनारदांनीं प्रतिज्ञा केली -

**'अन्यधर्मांस्तिरस्कृत्य पुरस्कृत्य महोत्सवान्।**
**तदा नाहं हरेर्दासो लोके त्वां न प्रवर्तये।।'** (प.पु.उ.खं. २।१४)

**'न हि वैष्ववता कुत्र संप्रदायपुरःसरा'** अशी श्रीनारदांना मोठी चिंता होती. याकरितां त्यांनीं वैष्णवसंप्रदायाचें संचालन केलें. याचे आदि प्रवर्तक आचार्य श्रीनिंबार्कच होते. यांनीं आपले गुरु श्रीनारदांच्या आज्ञेप्रमाणें आपल्या ब्रह्मसूत्र वाक्यार्थांत; बौद्ध, जैन, पाशुपत इत्यादि अन्य धर्मांचें निरसन करून एक भक्तिरसाचीच स्थापना केली. याप्रमाणें श्रीनारदांची वरील प्रतिज्ञा श्रीनिंबार्कांनीं पूर्ण केली. निगमकल्पतरूच्या त्या रसाचा सुगंध, श्रीनिंबार्कांनीं आपल्या ब्रह्मसूत्र वाक्यार्थांत प्रकट केला. म्हणून त्याला वेदान्तपारिजातसैरभ हें नांव दिलें गेलें. वेदान्तरूप कामधेनूपासून अमृताचें दोहन करून, वेदान्तकामधेनु नांवानें दशोकीचा उपदेश श्रीनिंबार्कांनीं केला. भगवद्गीतेवरही श्रीनिंबार्कांनीं वाक्यार्थ लिहिला असल्याचें केशव काश्मीरीभट्ट आपल्या गीताभाष्यांत लिहितात -

**'व्याख्यानमादौ तददभ्रबोधादाचार्यवर्येण हरिप्रियेण। निम्बार्कनाम्नातिगंभीरबोधम्'**

परंतु दुर्भाग्यवशात् आज श्रीनिंबार्कांचा गीतावाक्यार्थ उपलब्ध नाहीं. तसेंच 'रहस्यषोडशी', 'प्रपन्नकल्पवल्ली', 'पंचकालानुष्ठानमीमांसा' हे श्रीनिंबार्काचार्यांचे तीनहि ग्रंथ, 'रहस्यमीमांसा' या नांवानें एकत्र संकलित केले आहेत. हा ग्रंथ निंबार्कसंप्रदायांतील तंत्रग्रंथ आहे. यामध्यें युगल उपासनेचें रहस्य प्रकाशित केलें आहे. वेदान्तकामधेनूवरील श्रीपुरुषोत्तमाचार्यांच्या मंजूषाटीकेंत, 'प्रपत्तिचिंतामणि' व 'सदाचारप्रकाश' या श्रीनिंबार्कांच्या दोन ग्रंथांचा उल्लेख आलेला आहे. पण हे दोन ग्रंथ आज उपलब्ध नाहींत. बहुतेक हे दोन ग्रंथ रहस्यमीमांसा ग्रंथांपैकींच प्रकरणें असावीत.

वरील सर्व ग्रंथरचनेवरून श्रीनिंबार्क हे मोठे रसिक भक्ताचार्य होते असें दिसून येतें. ब्रह्म, चैतन्य, अक्षर, ईश्वर इत्यादि नांवानें प्रसिद्ध असणारें जें आनन्दरूप तत्त्व, त्याची चैतन्यरूपानें चमत्कारपरिपूर्ण अशी अंतःकरणांत होणारी अभिव्यक्ति म्हणजे रस होय -

**'अक्षरं परमं ब्रह्म सनातनमजं विभुम्।**
**वेदान्तेषु वदन्त्येकं चैतन्यं ज्योतिरीश्वरम्।।**
**आनन्दः सहजस्तस्य व्यज्यते स कदाचन।**
**व्यक्तिः सा तस्य चैतन्यचमत्काररसाह्वया।।'** (- अग्निपुराण)

या सहजानन्दरूप ब्रह्मरसाचा नित्य अनुभव घेणारा महात्माच रसिक मानला आहे. या कोटींतील श्रीनिंबार्काचार्य होते. यांच्या तीन शिष्यांचा उल्लेख सांपडतो. गौरमुखऋषि, उदुंबरऋषि व श्रीनिवास हे ते तीन शिष्य आहेत. गौरमुखऋषींनीं श्रीनिंबार्कसहस्रनामाची रचना केली. उदुंबरऋषींनीं वैष्णवधर्माची आचारसंहिता तयार केली. जी 'औदुंबरसंहिता' या नांवानें प्रसिद्ध आहे. याशिवाय 'श्रीनिंबार्कविक्रांति' नांवाचे एक आचार्यचरित्रवर्णनपर २२० श्लोकांचें खंडकाव्यही उदुंबरऋषींनीं केलें आहे.

श्रीनिंबार्कांचे तिसरे शिष्य श्रीनिवास, हे, नंदवंशाचे पुरोहित महर्षि श्रीशांडिल्य, यांचे पुत्र होते. हे प्रथम जैनमताच्या प्रभावामुळे फार उद्धट बनले होते. एकदां कसें तरी यांना श्रीनिंबार्कांच्याजवळ पित्यानें नेले. त्यावेळीं आपल्या दिव्य रसमय उपदोशानें श्रीनिंबार्कांनीं यांचें औद्धत्य दूर केलें. नंतर त्यांचें शिष्यत्व पत्करून, श्रीनिवासांनीं, श्रीनिंबार्कांच्या वेदान्तपारिजातसौरभाचें स्पष्टीकरण करण्याकरितां ब्रह्मसूत्रावर वेदान्तकौस्तुभ नांवाचें भाष्य रचलें. हें त्यांनीं ग्रंथांत आरंभीं नमूद केलें आहे -

**'अथ श्रीसनत्कुमारसन्ततिप्रवर्तकः परमकारुणिको मुमुक्ष्वनुग्रहाय भगवान् श्रीनिम्बार्कस्तद्व्याख्यानं शारीरकमीमांसावाक्यार्थरूपेण वेदान्तपारिजातसौरभाख्यमतिगूढं कृतवान्। अथ तु तदाज्ञया तदुक्तवर्त्मना तदनुग्रहकामेन तच्छिष्येण मया मृदुमितपदो वेदान्तकौस्तुभस्तद्भावार्थप्रकाशको विदुषामुपकाराय विरच्यते।'**

श्रीनिवासाचार्यांना, श्रीनिंबार्कसंप्रदायांत भाष्यकार म्हणून मानलें जातें. हे श्रीहरीच्या पांचजन्य शंखाचे अवतार असल्याचें सांगितलें जातें. श्रीनिंबार्कांनीं मठ वगैरे कांहीं निर्माण केला नाहीं पण श्रीनिवासाचार्यांच्यापासूनच त्यांची मठपरंपरा सुरू झाली. या संप्रदायांतील आचार्यांनीं श्रीकृष्णलीलाभूमि वज्रमंडलच आपली विहारभूमि बनविली होती. येथें राहूनच यांनीं भक्तिरसप्रवाह सर्व देशांतून पोंचविण्याचें काम केलें. त्यामुळें जैन, बौद्ध, यवन इत्यादिकांचे वारंवार हल्ले झाले तरी ही प्रभूची लीलाभूमि नेहेमीं भक्तिपूर्ण राहिली.

कनिष्ककाल इसवी सन पहिल्या शतकांत, मथुराप्रांत; काश्मीरी बौद्धांच्या सव्वथिवादा (सर्वास्तिवाद) चें केंद्र झालें होतें. कनिष्कानें येथें मोठा बौद्ध संघ जमविला होता ज्याचे आचार्य वसुमित्र होते.

अशोककाल इसवी सनपूर्व २७० मध्यें मथुरा ही बौद्धांचें केंद्र बनली होती. अशोकाचे गुरू उपगुप्त व त्यांचे शिष्य दीधिक उपगुप्त हे त्यावेळीं मथुरेंतच

राहात होते.

इसवी सन्‌पूर्व दुसऱ्या शतकांत यवन मिलिंदानें, मथुरा इत्यादि तीर्थांचा विध्वंस केला होता. याला अनुसरूनच पद्मपुराणांतील भागवतमाहात्म्यांत, 'आश्रमा यवने रुद्धाः' असा, तीर्थांवर यवनांनीं आक्रमण केल्याचा उल्लेख आला असावा.

इसवी सन चौथ्या शतकांत, भारतांत आलेल्या फाह्यान चिनी प्रवाश्यानें, आपल्या प्रवासवर्णनांत, मथुरेच्या जवळ यमुना तीरावर बौद्धांचे २० संघाराम होते असा उल्लेख केला आहे. ज्यामध्ये ३० हजार बौद्ध होते.

इसवी सन १०१७ मध्यें महमद गजनीनें मथुरेचा विध्वंस केला.

इ. स. ११९४ त मथुरा प्रांतावर मोंगलांचें साम्राज्य झालें.

इ. स. १६५८-१७०७ औरंगजेबाच्या काळांत वज्रमंडलाचा विध्वंस केला गेला.

इ. स. १७३९ मध्यें नादिरशहानें वज्रमंडलावर अत्याचार करून धनानंद कवीला ठार मारलें.

इ. स. १७५७ मध्यें अहमदशहा अब्दालीनें वज्रमंडल लुटलें.

वरीलप्रमाणें आक्रमणें येत राहिलीं तरी श्रीनिंबार्कसंप्रदायाचार्यांच्या प्रयत्नामुळें आजही वज्रमंडल पूर्ववत् भक्तिरसभूमि म्हणून प्रकाशमान आहे.

श्रीनिंबार्काचार्यांच्या संप्रदायांत; श्रीपुरुषोत्तमाचार्य (दशोकीवर वेदान्तरत्नमंजूषा टीका यांनीं केली) श्रीदेवाचार्य (ब्रह्मसूत्रावर विस्तृत समीक्षात्मक सिद्धान्तजान्हवी टीका यांनीं केली.) श्रीसुन्दरभट्ट (सिद्धान्तजान्हवीवर सेतु नांवाची विवृत्ति यांनीं लिहिली.) इत्यादि मोठे विद्वान् आचार्य होऊन गेले. केशवकाश्मीरिभट्ट नांवाचे एक प्रकांडपंडित या संप्रदायांत होऊन गेले. यांनीं ब्रह्मसूत्रावरील श्रीनिवासाचार्यांच्या भाष्यावर 'वेदान्तकौस्तुभप्रभा' या नांवाची विस्तृत टीका केली आहे. गीतेवरील

तत्त्वप्रकाशिकाटीका, मांडुक्योपनिषद्भाष्य, भागवतवेदस्तुतिभाष्य इत्यादि अनेक प्रौढ ग्रंथ यांचे आहेत. यांनीं भारतांत तीन वेळ दिग्विजययात्रा केली होती. केशव काश्मीरीजींचे शिष्य श्रीभट्ट हे फार मोठे रसिक भक्त होऊन गेले. श्रीनिंबार्कांनीं प्रतिपादिलेला अंतःकरणस्थवृंदावनोपासनेंतील रसमार्ग, श्रीभट्टजीनींच प्रथम हिंदी साहित्यामध्यें व्यक्त केला. यांनीं 'युगलशतक' नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या शंभर पदामध्यें, श्रीनंदनंदन व वृषभानुनंदिनी यांची कुंजवनांतील ललितलीला गाइली आहे. हे अंतःसाधक होते. अंतःकरणवृंदावनाच्या बाहेर कोठेंही यांचें लक्ष गेलें नाहीं.

श्रीभट्टजीचे शिष्य श्रीहरिव्यास. यांनीं युगलशतकावर महावाणी नांवाचें भाष्य लिहिलें आहे. तसेंच श्रीनिंबार्कांच्या दशोकीवरही, 'सिद्धान्तरत्नावलि' नांवाची सरस टीका लिहिली आहे. श्रीहरिव्यासदेवजींचे प्रधान शिष्य बारा होते. हे सर्वही रसोपासक व जगदुद्धारक होते. सर्वांनींही भारतवर्षांत भ्रमण करून वैष्णवमताचा प्रचार केला. या बारा शिष्यांमध्यें स्वभूदेवाचार्य व परशुरामदेवजी हे दोघे सिद्ध महात्मे होते. स्वभूदेवाचार्यांनीं भारतवर्षांत अनेक मठ स्थापन केले. आज यांच्याच परंपरेंतील शिष्य अधिक आहेत. श्रीपरशुरामदेवजी हे श्रीहरिव्यासदेवजींचे पुतणे होते. यांनाच आपल्या गादीचा अधिकार श्रीहरिव्यासदेवजींनीं दिला. श्रीपरशुरामदेवजींनीं आपला अधिकार, आपले बंधु श्रीवासुदेवजी यांना दिला. श्रीपरशुरामदेवजींचा राजस्थानीमिश्रित व्रजभाषेमध्यें असलेला उपदेशसंग्रह 'परशुरामसागर' या नांवानें प्रसिद्ध आहे. गोस्वामी श्रीतुलसीदासजींच्या समकालीन हे असल्यानें त्यांचा प्रभाव यांच्या रचनेवर असलेला दिसून येतो. यांचें भ्रमणक्षेत्र राजस्थान व वज्रमंडल हें विशेष होतें. यांची समाधि पुष्करला आहे. श्रीवासुदेवजींनीं, 'भक्तचंद्रिका' हा, भगवत्सेवाविधानप्रकाशक ग्रंथ केला. यांचे पौत्र श्रीवज्रलालशरणजीनीं 'भक्तिचंद्रोदय' नांवाचा ग्रंथ केला. जो श्रीनारदभक्तिसूत्रावरील टीकाग्रंथ आहे. हे ग्रंथ संस्कृत भाषेंत आहेत.

श्रीनिंबार्कसंप्रदायांत संगीतसम्राट् स्वामी हरिदासजी, नागादासजी उत्यादि प्रसिद्ध संत होऊन गेले. गोस्वामी हितहरिवंशजी इत्यादि प्रसिद्ध संत होऊन गेले. गोस्वामी हितहरिवंशजी यांनीं सांगितलेली साधनप्रणाली सर्व रसोपासक साधकांना उपयुक्त ठरली आहे. मठपरंपरेची व्यवस्थित माहिती मात्र श्रीहरिव्यासदेवजींच्या काळापासून उपलब्ध आहे. भागवतसंप्रदायाचे पुरातन आचार्य विष्णुस्वामी, यांनीं भगवत्सेवेमध्यें ज्या राजोपचाराचें विधान केलें त्यांचा खरा प्रचार श्रीहितहरिवंशजींनीं केला. सात आरत्या, पांच भोग व इतरही सेवोपचार यांचा क्रम श्रीहितहरिवंशजींनीं सुरू करून दिला हें सर्व सांप्रदायिकांना मान्य आहे.

## मोक्षसाधनविचार

श्रीनिंबार्काचार्यांच्या परंपरेमध्यें; कर्म, ज्ञान, भक्ति, प्रपत्ति व गुर्वाज्ञानुवृत्ति असे पांच योग मोक्षप्राप्तीचे उपाय म्हणून मानलेले आहेत. याचें विवेचन, श्रीपुरुषोत्तमाचार्यांनीं, आपल्या दशोकीवरील वेदान्तरत्नमंजूषाटीकेंत, आठव्या श्लोकांत केलें आहे -

कर्मयोग; नित्य, नैमित्तिक व काम्य याप्रमाणे तीन प्रकारचा आहे. संध्योपासन, पूजा, जप इत्यादि नित्य कर्तव्य म्हणून सांगतलेली नित्यकर्में, तसेंच यज्ञ, दान व अध्ययन हीं तीन त्रैवर्णिकांना उद्देशून सांगितलीं आहेत. याजन, आदान व अध्यापन हीं तीन ब्राह्मणाला विशेष सांगितलीं आहेत. हीं तीन निष्कामबुद्धीनें केलीं तर नित्य ठरतात व द्रव्यादिकांची इच्छा धरून केल्यास तीं वृत्तिरूप होतात. याजन व अध्यापन यांनीं देहनिर्वाहापुरताच केला जाणारा संग्रह म्हणजे आदान आणि अधिक संग्रह म्हणजे प्रतिग्रह. ब्राह्मण षट्कर्माधिकारी व क्षत्रिय, वैश्य हे त्रिकर्माधिकारी. तसेंच; इन्द्रियनिग्रह, तीर्थयात्रा, उपवास, फलाहार, देहशोषण, अन्नदान इत्यादि कर्में सर्वसाधारण असणारीं हीं देखील नित्यकर्में आहेत. हीं जर कर्तृत्वाभिमान सोडून

निष्कामबुद्धीनें केलीं तर तीं मनःशुद्धिद्वारा ज्ञान, भक्ति उत्पन्न करून मोक्षसाधक नित्य ठरतात. आणि सकामबुद्धीनें केलीं तर काम्यकोटीमध्यें अंतर्भूत होतात. हा झाला नित्यकर्मांचा विचार.

नैमित्तिक कर्मे म्हणजे, विशिष्टकालादि निमित्तांनीं सांगितलेलीं श्राद्ध, ग्रहणस्नान इत्यादिक आहेत.

स्वर्ग, पशु, पुत्र इत्यादि फलांच्या उद्देशानें विहित कर्मे तीं काम्यकर्मे होतात. हीं निषिद्धकर्माप्रमाणें संसारकारण होत असल्यानें मुमुक्षूंना त्याज्यच सांगितलीं आहेत.

नित्य व नैमित्तिक कर्में ही;आपापल्या वर्णाश्रमाधिकाराप्रमाणें ईश्वराज्ञापालनात्मक भजनरूप असल्यानें यांची अत्यंत आवश्यकता आहे. यापैकीं द्विजातींना वेदोक्त कर्मे व एकजातींना पुराणोक्त तर्पण, अन्नदान इत्यादि कर्मे आहेत. या प्रमाणें नित्यनैमित्तिक आश्रमधर्मांचा त्याग करतां येत नसल्यानें मुमुक्षूंनीं नेहेमीं कोणत्या तरी आश्रमांत राहूनच आश्रमधर्माचें अनुष्ठान केलें पाहिजे.

**'यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्।**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।।'** (भ. गी. १८-४६)

या श्लोकांत, श्रीभगवान् स्वकर्मानुष्ठानाचें महत्त्व सांगत आहेत. प्रायश्चित्तरूप कर्मे, हीं, पापनिवृत्तिरूपनिमित्तानें सांगितली असल्यानें त्यांचा अंतर्भाव नैमित्तिकामध्यें करतां येणें शक्य आहे.

२. **दुसरा ज्ञानयोग** - वरील नित्यनैमित्तिक कर्मांच्या अनुष्ठानानें निर्मल चित्त झाल्यावर, मोक्षाची इच्छा धरून श्रवण, मनन, निदिध्यासन या साधनांचें वारंवार अनुष्ठान केलें असतां, परब्रह्म श्रीपुरुषोत्तमाच्या स्वरूपगुणशक्तिवैभवाचा येणारा अनुभव म्हणजे ज्ञानयोग होय. हा ईशप्रसादमूलक साक्षात्कारद्वारा मोक्षाला कारण होतो.

३. **भक्तियोग** - वर्षाऋतूंतील गंगाप्रवाहाप्रमाणें अखंड व प्रतिदिन वाढणारा, प्राण असेपर्यंत चालू राहाणारा, भगवत्स्मरणरूप विशिष्टवृत्तिरूप भक्तियोग होय.

४. **प्रपत्तियोग** - वील सर्व योगांचें यथासांग अनुष्ठान करण्याचें सामर्थ्य वस्तुतः आपल्याजवळ नाहीं हें जाणून, करुणासागर, सर्वसमर्थ भगवान श्रीवासुदेवाचे ठिकाणीं आपला सर्व भार टाकणें. याला प्रपत्तियोग किंवा शरणागति असें म्हणतात.

५. **गुर्वाज्ञानुवृत्तियोग** - अनेक प्रतिबंधामुळें प्रपत्तीच्या अंगांचेंही अनुष्ठान करण्यास आपण असमर्थ आहोंत ही जाणीव ठेवून श्रीगुरूच सर्व समर्थ आहेत या भावनेनें त्यांच्या चरणीं एकनिष्ठेनें सर्व भार समर्पण करणें व अज्ञांनीं बालाप्रमाणें ते सांगतील तेवढेच करीत राहाणें. याला गुर्वाज्ञानुवृत्तियोग असें म्हणतात.

**'तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।**
**तत्प्रसादात्परां शान्ति स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्।।'** (भ.गी.१८-६२)
**'सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।**
**अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।।'** (भ. गी. १८-६६)
**'मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते।'** (- भ. गी. ७-१४)

इत्यादि श्लोकांतून श्रीभगवंतांनी प्रपत्ति किंवा शरणागतीचें विधान केलें आहे. शरणागतीचें लक्षण व विभाग पुढीलप्रमाणें आहे-

**'अहमस्म्यपराधानामालयोऽकिंचनोऽगतिः।**
**त्वमेवोपायभूतो मे भवेति प्रार्थनामतिः।।**
**शरणागतिरित्युक्ता सा देवेऽस्मिन् प्रयुज्यताम्।।'**

मी सर्व अपराधांचें माहेरघर आहे. म्हणून मी कोणताही उपाय करूं शकत नसल्यामुळें तूंच मला उपायरूपानें प्राप्त हो अशी प्रार्थनात्मकबुद्धि म्हणजे

शरणागति होय. येथें अगति शब्दाचा अर्थ असा आहे कीं - मी गतिरहित आहें. गति शब्दाचे दोन अर्थ होतात. उपाय व उपेय. **'गम्यते अनया इति गतिः।'** या करणव्युत्पत्तीनें भगवत्प्राप्तीचा उपाय म्हणजे गति हा एक अर्थ. **'गम्यते इति गतिः'** या कर्मव्युत्पत्तीनें प्राप्य भगवान् म्हणजे गति हा दुसरा अर्थ.

**'गतिर्भर्ता प्रभुःसाक्षी निवासः शरणं सुहृत्'** (- भ.गी. ९-१८)

येथें गतिशब्दाचा अर्थ कर्मव्युत्पत्तीनें भगवान् असा होईल. भगवानच साधन व साध्य आहे याबद्दल भगवद्गीतेमध्यें अन्वयव्यतिरेकरूपानें पुढीलप्रमाणें वर्णन आलें आहे -

**'अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्॥'** (- भ.गी. ९-२२)

**'तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्।**
**भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम्॥'** (- भ.गी. १२-७)

**'तेषामेवानुकम्पार्थमहज्ञानजं तमः।**
**नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता॥'** (- भ.गी. १०-११)

**'अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।'** ( भ.गी.१८-६६)

ही. वाक्यें, भगवानच, भक्तांच्या सर्वपुरुषार्थांचें साधन आहे असें अन्वयरूपानें सांगतात.

**'सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः।'** (भ. गी. १२-१६)

**'सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।'** (- भ.गी. १८-६६)

हीं वाक्ये व्यतिरेकरूपानें तसें सांगत आहेत. भगवानच उपेय-प्राप्य आहे असें पुढील वाक्यांत दाखविलें आहे -

**'यान्ति देवव्रता देवान् पितॄन् यान्ति पितृव्रताः।**
**भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपि माम्॥'** (भ.गी. ९-२५)

**'मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः।'** (- भ.गी. ९-३४)
**'मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते।'** (- भ.गी.१३-१८)
**'इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमाश्रिताः।'** (- भ.गी. १४-२)

प्रसिद्ध श्रीदत्तावतार श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेंबेस्वामिमहाराज यांनीं श्रीनृसिंहसरस्वतींचे, आठ श्लोकांत एक स्तोत्र केलें आहे. त्यांत प्रत्येक श्लोकांत उत्तरार्ध समानच आहे. त्यांतील शेवटचा श्लोक असा -

**'अमराख्यपुरे च योगिनीवरदो योऽखिलदोऽस्ति योगिनीः।**
**स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान् मेऽस्ति परावरा गतिः॥'**

या श्लोकांतील उत्तरार्धांत भगवानच गति असल्याचें सांगितलें आहे. पूर्वार्धांतील 'अखिलदः' या विशेषणावरून तोच गति, सर्वसाधन आहे हें सुचविलें. 'परावरा' या विशेषणाचाही अर्थ साधन व साध्य दोघांनाही उपयुक्त असा होईल. 'पराः (**पराः अपि अवराः यस्याः**' अशी व्युत्पत्ति केली असतां, श्रेष्ठ श्रेष्ठ असलोली दुसरीं सर्व साधनें ज्याच्यापेक्षां अवर कमीच ठरतात असा भगवानच गति म्हणजे सर्वोत्कृष्ट साधन आहे असा एक अर्थ. **'परेऽपि ब्रह्मादयः अवरे यस्याः'** या व्युत्पत्तीप्रमाणें मोठमोठे ब्रह्मादिक देवही ज्याच्यापेक्षां कमीच आहेत असा भगवानच सर्वोत्कृष्ट प्राप्य - साध्य आहे. या सर्व विवेचनाचें तात्पर्य असें कीं - मी साधनशून्य असल्यानें मला तूंच साधनरूपानें प्राप्त हो. अशी भगवंताची नित्य प्रार्थना म्हणजेच शरणागति किंवा प्रपत्तियोग होय. वर त्याचें लक्षण व श्रीमहाराजांच्या स्तोत्रांतील श्लोक त्याचें उदाहरण असें दोन्हीही दिलें आहे. ही शरणागति सहा प्रकारची आहे ती अशी -

**'आनुकूल्यस्य संकल्पः प्रातिकूल्यस्य वर्जनम्।**
**रक्षिष्यतीति विश्वासो गोप्तृत्ववरणं तथा॥**
**आत्मनिक्षेपकार्पण्ये षड्विधा शरणागतिः।'**

१. **आनुकूल्यस्य संकल्पः** - श्रीहरीच विश्वरूप बनलेला आहे अशी खात्री बाळगून सर्वांशीं अनुकूल वागण्याचें ठरविणें. हें शरणागतीचें पहिलें अंग आहे.

**'चराचराणि भूतानि सर्वाणि भगवद्वपुः।**
**अतस्दानुकूल्यं मे कर्तव्यमिति निश्चयः।।'**

हें याला प्रमाण. ईश्वर सर्वात्मा आहे याबद्दलचें प्रमाण -

**'अन्तःप्रविष्टः शास्ता जनानाम्'**
**'अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः'** (-भ.गी. १०-२०)

२. **प्रातिकूल्यस्य वर्जनम्** - कोणाही प्राण्याविषयीं हिंसा, मत्सर, असूया इत्यादि मनांतील विपरीत वृत्तींचा त्याग करणें.

**'परापवादं पैशून्यमनृतं यो न भाषते।**
**अनुद्वेगकरं चापि तोष्यते तेन केशवः।।**
**परपत्नीपरद्रव्यपरहिंसासु यो मतिम्।**
**न करोति पुमान् भूप तोष्यते तेन केशवः।।**
**न ताडयति नो हन्ति प्राणिनोऽन्यांश्च देहिनः।**
**यो मनुष्यो मनुष्येन्द्र तोष्यते तेन केशवः।।**
**निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव।'** (-भ.गी. ११-५५)

या प्रमाणावरून कोणाबद्दलही प्रतिकूल वर्तन नसणें हें प्रपत्तीचें दुसरें अंग समजून येतें. **'राखावें बहुतांचें अंतर। भाग्य येतें तदनंतर' 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचें'** इत्यादि वचनांनीं संतांना हेंच सांगावयाचें आहे.

३. **रक्षिष्यतीति विश्वासः** - सर्वाधार, सर्वरक्षक, करुणासागर परमात्मा, आम्हा शरणागतांचें रक्षण अवश्य करील हा निश्चय असणें. हें शरणागतीचें तिसरें अंग आहे.

**'रक्षिष्यत्यनुकूलान्न इति या सुदृढा मतिः।**
**स विश्वासो भवेच्छक्र सर्वदुष्कृतनाशनः॥'**

**'योगक्षेमं वहाम्यहम्' 'न मे भक्तः प्रणश्यति'** इत्यादि भगवद्वाक्यावरून हा विश्वास आवश्यक ठरतो.

४. **गोप्तृत्ववरणम्** - सर्वांचें रक्षण करण्यास समर्थ, दयासागर परमात्मासुद्धां प्रार्थना न करणाऱ्यांचें रक्षण करीत नाहीं. 'ये यथा मां प्रपद्यन्ते' या उक्तीप्रमाणें पराङ्मुखाला पराङ्मुख व सन्मुखाला सन्मुख असेंच ईश्वराचें वागणें आहे. नाहींतर सर्वच मुक्त होतील. आणि शास्त्रीय विधि सर्व व्यर्थ ठरतील हा विचार करून, आपण माझें रक्षण करावें अशी निरंचर प्रार्थना करीत राहाणें म्हणजे गोप्तृत्ववरण हें प्रपत्तीचें चौथे अंग आहे.

**'अप्रार्थितो न गोपायेदिति या प्रार्थनामतिः।**
**गोपायिता भवत्येव गोप्तृत्ववरणं स्मृतम्॥'**

**'तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम्।**
**ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते॥'** (- भ.गी. १०-१०)

**'आवृत्तिरसकृदुपदेशात्'** (- ब्रह्मसूत्र ४-१-१)

इत्यादि प्रमाणावरून, नित्यप्रार्थनाप्रवण असणें हें अंग सिद्ध होतें.

५. **आत्मनिक्षेपः** - भगवत्प्रसादाचें मुख्य कारण म्हणजे अहंता व ममता सोडून, मी व माझें हें सर्व ईश्वराला समर्पण करणें. सर्व भार त्याच्यावर टाकणें याला आत्मनिक्षेप म्हणतात. हें शरणागतीचें पांचवें अंग आहे. **'आत्मात्मीयभरन्यासो ह्यात्मनिक्षेप उच्यते।'** हें त्याचें लक्षणवाक्य आहे.

६. **कार्पण्यम्** - आपण केलेले उपाय सिद्धीस न जातां अपायच अकस्मात् घडतात असा वारंवार अनुभव आल्यानें कर्तृत्वाभिनिवेशरूप गर्वाचा नाश होणें हें कार्पण्य नांवाचें प्रपत्तीचें सहावें अंग आहे. याचें प्रमाणवाक्य असें

**'उपाया नैव सिद्ध्यन्तीत्यपाया विविधास्तथा।**
**इति या गर्वहानिस्तद्दैन्यं कार्पण्यमुच्यते।।'**

या वर वर्णन केलेल्या शरणागतीच्या सहा प्रकारांमध्यें, आत्मनिक्षेप हाच अंगी म्हणजे मुख्य आहे. बाकीचे पांच त्याचे सहकारि, अंगभूत आहेत.

**'अहमस्म्यपराधानामालयोऽकिंचनोगतिः'** या लक्षण वाक्यावरून, अकिंचन, अगति हा प्रपत्तीचा अधिकारी ठरतो. तो मुमुक्षू, सात्त्विक असा असावा. तात्पर्य, अकिंचन, अनन्यगति, सात्त्विक, भगवत्प्राप्तीची इच्छा करणारा, मुमुक्षू, कोणत्याही वर्णाचा, अज्ञानी अथवा ज्ञानी, या प्रपत्तियोगाचा अधिकारी आहे. अकिंचन म्हणजे - मी अमुक साधनाचें अनुष्ठान करीन, फल मिळवीन इत्यादि रूपानें कर्तृत्वाभिमान बिलकूल राहिला नाहीं तो. आणि अगति म्हणजे - भगवंताशिवाय, साधन, फल व संबंधरूपगति ज्याला नाहीं. म्हणजे भगवानच साधन, भगवानच साध्य व भगवानच, माता, पिता, बंधु, सखा, विद्या, द्रव्य इत्यादि सर्व ज्याचे आहेत असा एकनिष्ठ. प्रपत्तियोगाचा अधिकारी कोणत्याही वर्णातील असूं शकतो.

प्रपत्ति किंवा शरणागतीचा अधिकार सर्व प्राण्यांना असल्यामुळें या मार्गामध्यें इतर मार्गाप्रमाणें विवादाचा प्रसंग नाहीं. तथापि हा योग सर्वांना मोकळा आहे म्हणून सोपा आहे असें मात्र समजून उपयोगी नाहीं. यामध्यें बाह्यक्रिया कांहींच नसून फक्त मनानेंच याचें अनुष्ठान व्हावयाचें आहे. यातील सहाही प्रकार मानसिक असल्यानें ते फक्त ज्याचे त्यालाच कळणें शक्य आहे. अथवा सर्वसाक्षी परमेश्राला कळणें शक्य आहे. आपल्या मनांतील प्रपत्तिभूमिका, योग्य, स्थिर आहेत किंवा आभासात्मक आहेत याचें निरीक्षण, ज्याचे त्यानेंच वारंवार करून त्याबद्दलचा निर्णय घेतला पाहिजे. फल योग्य रीतीनें मिळतें असें दिसून आल्यास साधनानुष्ठान योग्य चालू आहे असा निर्णय घेणें शक्य आहे. प्रपत्तियोगाचें फल भगवत्कृपाद्वारा इष्टसिद्धि, पूर्ण शांति हें आहे. असें समर्थ सांगतात - **'मनीं धरावें तें होतें। विघ्न अवघेचि नासोनि जातें।**

**कृपा केलिया रघुनाथें। प्रचीत येते'** - याप्रमाणें इष्टसिद्धिवरून भगवत्कृपा समजून येते व त्या कृपेवरून आपलें साधन व्यवस्थित चालू आहे असें ठरवितां येतें. यापेक्षांही आपण खरे, प्रपत्ति भूमिकेवर दृढ आहोंत कीं नाहीं याचें गमक म्हणजे, अंतःकरणांतील काम-इच्छा कमी कमी होत जाऊन त्या पूर्णपणें नाहीशा होणें हें आहे. यानेंच पूर्ण शांति प्राप्त होते असें भगवान् सांगतात -

**'विहाय कामान् यः सर्वान् पुमांश्चरति निस्पृहः।**
**निर्ममो निरहंकारः स शान्तिमधिगच्छति।।'** (- भ.गी. २-७१)

हेंच प्रपत्तीचे माहात्म्य पुढील श्लोकांत वर्णिलेलें आहे -

**'किमलभ्यं भगवति प्रसन्ने श्रीनिकेतने।**
**तथापि तत्परा राजन्न हि वाञ्छति किंचन।।'** ( - भागवत १०)

**'या वै साधनसम्पत्तिः पुरुषार्थचतुष्टये।**
**तया विना तदाप्नोति नरो नारायणाश्रयः।।'**

**'ये च तद्भावितात्मानो ह्येकान्तित्वं समागताः।**
**एतदभ्यधिकं तेषां यत्ते तं प्रविशन्त्युत।।'**

एकान्ती होणें ही साधकाची श्रेष्ठता आहे. **'एकस्मिन् श्रीभगवति विष्णौ, अन्तः उपायोपेयसम्बन्धनिर्णयो विद्यते यस्य स एकान्ती'** एक श्रीहरीच, माझा, उपाय, उपेय (साध्य) व सर्वसंबंधी आहे असा ज्याचा पक्का निश्चय असतो तो एकान्ती भक्त होय. ही अवस्था फार श्रेष्ठ आहे -

**'तेषामेकान्तिनः श्रेष्ठा ये चैवानन्यदेवताः।**
**अहमेव गतिस्तेषां निराशीःकर्मकारिणाम्।।'**

याप्रमाणें प्रपत्तियोगाचें महत्त्व दशोकीमध्यें श्रीनिंबार्कांनीं सुचविलें आहे. त्याचेंच स्पष्टीकरण वेदान्तरत्नमंजूषेमध्यें श्रीपुरुषोत्तमाचार्यांनीं वरीलप्रमाणें केलें आहे.

# भक्तियोग

प्रपत्तियोगाप्रमाणें श्रीनिंबार्काचार्यांनीं, भक्तियोगही, वेदान्तकामधेनूच्या (दशोकी) नवव्या श्लोकांत सांगितला आहे. त्याचें विवरण श्रीपुरुषोत्तमाचार्यांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे -

**कृपाऽस्य दैन्यादियुजि प्रजायते यया भवेत् प्रेमविशेषलक्षणा।**
**भक्तिर्ह्यनन्याधिपतेर्महात्मनः सा चोत्तमा साधनरूपिका परा॥९॥**

(- वेदान्तकामधेनु)

दैन्य-कार्पण्य इत्यादि सहा प्रकारच्या प्रपत्तियोगानें भगवत्कृपा होते आणि त्या कृपेनें प्रेमलक्षणाभक्ति उत्पन्न होते असें श्रीनिंबार्काचार्य सांगतात. या श्लोकांत प्रपत्तियोग भक्तियोगाचें साधन असल्याचें दाखविलें आहे. म्हणजे प्रपत्ति ही भक्तिद्वारा भगवत्प्राप्तीचा उपाय आहे हें सिद्ध झालें. ती स्वतंत्र उपाय असल्याचें पूर्वीं सांगितलें. उभय प्रकारच्या शास्त्रवचनावरून दोन्हीही प्रकार संभवतात. यालाच मीमांसाशास्त्रामध्यें 'संयोगपृथक्त्वन्याय' असें म्हणतात. संयोग म्हणजे, साध्यसाधनसंबंध दाखविणारीं विनियोजक वाक्यें, हीं जर पृथक् म्हणजे भिन्न भिन्न असतील तर त्या वाक्याप्रमाणें भिन्नभिन्न फलाकरितांही एकाच साधनाचा विनियोग आहे असें समजण्यास हरकत नाहीं. याबद्दल, **'एकस्य तूभयत्वे संयोगपृथक्त्वम्'** हें जैमिनीसूत्र प्रमाण आहे. जसें **'अग्निहोत्रं जुहुयात्स्वर्गकामः'** 'दर्शपूर्णमासाभ्यां स्वर्गकामो यजेत' इत्यादि वाक्यांनीं, याग, होम, दान इत्यादि कर्मे स्वर्गादि फलांची साधनें असल्याचें सांगितलें. **'तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषान्ति यज्ञेन दानेन तपसानाशकेन'** या वाक्यानें तींच कर्मे ब्रह्मज्ञानाचीं साधनें असल्याचें सांगितलें. हें संयोगपृथक्त्व म्हणजे विनियोजक वाक्यांचें पृथक्त्व; कर्मांचे ठिकाणीं स्वर्गादिक व ब्रह्मज्ञान या उभयफलांचें साधनत्व व्यक्त करीत आहे. त्याप्रमाणें प्रपत्तियोग हाही, उभयविध वाक्यावरून स्वतंत्र व भक्तिद्वारा उपाय

ठरतो.

**'तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।**
**तत्प्रसादात्परां शान्ति स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्।।'**

(भ.गी. १८-६२)

हे वाक्य; शरणागति ही परंपरेनें उपाय असल्याचें सांगते.

**'मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते'** (- भ.गी. ७-१४)

हें वाक्य; ती साक्षात् उपाय असल्याचें सांगते.

निरतिशय स्वाभाविक कारुण्य, क्षमाशीलत्व, वात्सल्य, औदार्य, सौहार्द, सत्यप्रतिज्ञत्व इत्यादि अनंत गुणांचा सागर असणाऱ्या श्रीहरीची कृपा, प्रपत्तीनें होते आणि त्या कृपेनें भक्ति उत्पन्न होते. ही भक्ति दोन प्रकारची आहे. १. साधनरूप व २. फलरूप. अनेक जन्मामध्यें केलेल्या पुण्यकर्मानुष्ठानरूप साधनांनीं उत्पन्न होणारी ती साधनभक्ति.

**'जन्मान्तरसहस्रेषु तपोदानसमाधिभिः।**
**नराणां क्षीणपापानां कृष्णे भक्तिः प्रजायते।।'**
**'येषां त्वंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।**
**ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः।।'** (- भ.गी. ७-२८)

इत्यादि वाक्यें याबद्दल प्रमाण आहेत. या साधनभक्तीचेही, वैदिक व पौराणिक असे दोन भेद आहेत. मधुविद्या, शाण्डिल्यविद्या, सत्यविद्या, उपकोसलविद्या, दहरविद्या इत्यादि, उपनिषदांतून सांगितलेल्या सर्व उपासना वैदिक भक्तिरूप आहेत. या विद्यांचा अधिकार त्रैवर्णिकांना आहे असें ब्रह्मसूत्राच्या अपशूद्राधिकरणांत श्रीनिवासाचार्यांनीं प्रतिपादन केलें आहे. पुराणोक्तपद्धतीनें केली जाणारी ईश्वराराधना ही पौराणिक भक्ति होय. हिचे अधिकारी सर्वही वर्ण आहेत. साधनभक्ति म्हणजे अनेक पुण्यकर्मरूपसाधनांनीं उत्पन्न होणारी असा अर्थ पूर्वी केला. अथवा, पराभक्तीचें साधन असणारी

भक्ति ती साधनभक्ति असा दुसराही अर्थ घेता येईल.

**'सुरर्षे विहिता शास्त्रे हरिमुद्दिश्य या क्रिया।**
**सैव भक्तिरिति प्रोक्ता यया भक्तिः परा भवेत्।।'**

भक्तीचें सामान्य लक्षण नारदपांचरात्रांत पुढीलप्रमाणें आहे -

**'सर्वोपाधिविनिर्मुक्तं तत्परत्वेन निर्मलम्।**
**हृषीकेण हृषीकेशसेवनं भक्तिरुच्यते।।'**

ऐहिक, पारलौकिक कोणत्याही पदार्थाची इच्छा न ठेवतां मनःपूर्वक अखंड चालू असणारी भगवत्सेवा म्हणजे भक्ति हें भक्तीचें सामान्य लक्षण होईल.

या भक्तीचा पहिला साधनभक्तिरूप प्रकार वर दाखविला. आतां दुसरा फलभक्तिरूप प्रकार असा - आपापल्या कर्माचें अनुष्ठान करीत राहाण्यानें म्हणजेच ईश्वराज्ञापरिपालनानें, प्रसन्न झालेल्या भगवंताकडून दिली जाणारी जी भक्ति ती फलभक्ति. हिलाच पराभक्ति, प्रेमलक्षणाभक्ति असें म्हणतात. ही उत्पन्न होण्यापूर्वी जीवाला देहात्मविवेक झालेला असतो. विषयासक्त माणसांची मनोवृत्ति जशी सारखी विषयाकडेच धांव घेते त्याप्रमाणें भगवंताच्या स्वरूप, गुणांचेच सारखें चिंतन राहाणें याला फलभक्ति असें म्हणतात. याला प्रमाण पुढीलप्रमाणें आहे -

**'या प्रीतिरविवेकानां विषयेष्वनपायिनी।**
**त्वामनुस्मरतः सा मे हृदयान्नापसर्पतु।।'**

याच भक्तीला **'ध्रुवा स्मृतिः'** असें छांदोग्य उपनिषदांत शेवटीं वर्णिलें आहे. -

**'आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः सत्त्वशुद्धौ ध्रुवा स्मृतिः।'**
**सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः।**
**नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते।'**

(- भ.गी. ९-१४)

**'मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम्।**
**कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च।।'**

(-भ.गी.१०-९)

इत्यादि वाक्येंही भगवंतांची याबद्दल प्रसिद्ध आहेत.

## उपास्यस्वरूप

श्रीनिंबार्काचार्यांनीं ब्रह्मसूत्रवाक्यार्थाच्या प्रथमसूत्रांत, 'आचार्यैकदेवेन श्रीगुरुभक्त्येकहार्देन' या पदांनीं, गुरूला शरण गेल्यानंतरच ब्रह्मविद्येची प्राप्ति होते असें सुचविलें आहे. तसेंच वेदान्तकामधेनूमध्यें (दशोकी) या संप्रदायांतील उपास्य, श्रीराधाकृष्णयुगल सांगितलें आहे. ते श्लोक याप्रमाणें आहेत -

**'स्वभावतोऽपास्तसमस्तदोषशेषकल्याणगुणैकराशिम्।**
**व्यूहांगिनं ब्रह्म वरं वरेण्यं, ध्यायेम कृष्णं कमलेक्षणं हरिम्।।१।।**

**अङ्.गेतु वामे वृषभानुजां मुदा विराजमानामनुरूपसौभगाम्।**
**सखीसहस्रैः परिसेवितां सदा स्मरेम देवीं सकलेष्टकामदाम्।।२।।**

या दोन श्लोकांत युगलस्वरूप उपास्य दाखविलें आहे. योगशास्त्रांत दुसऱ्या पादांत आरंभीं पांच दोष दाखविले आहेत. अविद्या, अस्मिता, राग, द्वेष व अभिनिवेश हीं त्यांचीं नांवें आहेत. विष्णुपुराणामध्यें, यांनाच, तम, मोह, महामोह, तामिस्र व अन्धतामिस्र अशीं नांवें दिलीं आहेत -

**'तमोऽविवेको मोहः स्यादन्तःकरणविभ्रमः।**
**महामोहस्तु विज्ञेयो ग्राम्यभोगसुखैषणा।।**
**मरणं ह्यन्धतामिस्रस्तामिस्रः क्रोध उच्यते।**
**अविद्या पंचपर्वैषा प्रादुर्भूता महात्मनः।।'** (-वि.पु. १.५-५)

हे पांच दोष जीवात्म्याच्या ठिकाणीं असतात. आपल्या नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त स्वरूपाचें विस्मरण होणें म्हणजे तम होय. देह, स्त्री, पुत्र, द्रव्य

इत्यादिकांविषयीं ममत्वबुद्धि म्हणजे मोह. विषयभोगाची इच्छा-महामोह. क्रोध, द्वेष म्हणजे तामिस्र, आणि अंधतामिस्र म्हणजे मरणाची भीति हे पांचही दोष ज्याच्या ठिकाणीं बिलकुल नाहींत असे भगवान् श्रीकृष्ण आहेत. तसेंच, जन्म, अस्तित्व, वृद्धि, परिणाम, अपक्षय व नाश हे सहा विकारही दोषरूप आहेत. यांचाही संबंध भगवंताला नाहीं. हे विकार देहामध्यें असतात. ईश्वराचा देह अप्राकृत असल्यानें हे प्राकृतिक विचार त्याच्यामध्यें नाहीत. सत्त्व, रज व तम या तीन गुणांचाही संबंध परमात्म्याला नाहीं. म्हणून तो, क्लेशरहित, विकाररहित व गुणरहित (गुणातीत) असा आहे म्हणजेच अपास्तसमस्तदोष आहे. हेंच **'निर्दोषं हि समं ब्रह्म'** (-भ.गी. ५-१९) या वाक्यानें दाखविलें आहे. तसेंच भगवान् श्रीकृष्ण हे, **'अशेषकल्याणगुणैकराशि'** असे आहेत. कल्याणमय गुणांची ते खाण आहेत. भगवान् षड्गुणैश्वर्यसंपन्न आहेत असें म्हणतात. ते सहा गुण म्हणजे, ज्ञान, शक्ति, बल, ऐश्वर्य, तेज व वीर्य हे आहेत. संपूर्ण विश्वाचा प्रत्यक्ष अनुभव म्हणजे ज्ञान. अघटित घटना करण्याचें सामर्थ्य म्हणजे शक्ति. विश्वधारणाचें सामर्थ्य म्हणजे बल. सर्वांचें नियंत्रण करण्याचें सामर्थ्य म्हणजें ऐश्वर्य. वाटेल तें कठीण कार्य करूनही श्रमहीनता म्हणजे तेज. कोणाच्याही प्रभावानें दिपून न जातां सर्वांनाच आपल्या प्रभावानें दिपवून टाकणें म्हणजे वीर्य. हे सहा गुण नित्य भगवंताचे ठिकाणीं असतात.

या संप्रदायांतील उपास्यस्वरूपाचा आणखी एक विशेष **'व्यूहांगिनं'** या पदानें सुचविला आहे. संकर्षणरूप जीव, प्रद्युम्नरूप मन, अहंकाररूप अनिरुद्ध व परमात्मा वासुदेव हे चार व्यूह मानले आहेत. अविद्येचा प्रभाव, जीव, मन व अहंकार यांच्यावरच पडलेला आहे. परमात्मा, या अविद्यादोषानें रहित आहे. जीवात्म्याला या दोषांचा संबंध सुटण्याकरितां एकच उपाय आहे तो असा कीं; अहंकाराचे तम, मोह व महामोह हे तीन दोष त्यानें मनाचे स्वाधीन करावेत. मनाचे, तामिस्र व अंधतामिस्र हे दोष त्यानें जीवाचे स्वाधीन करावेत आणि जीवानें, मन व अहंकार हे परमात्म्याचे स्वाधीन करावेत म्हणजे

मोक्ष प्राप्त होतो. विष्णुपुराणाच्या सहाव्या अंशांतील सातव्या अध्यायांत 'ब्रह्मयोग' या नांवानें हें सर्व वर्णन विस्तृत केलें आहे. ब्रह्मसूत्रवाक्यार्थामध्यें, चौथ्या अध्यायाच्या दुसऱ्या पादाच्या आरंभीं मुक्तिकालांतील या योगक्रियेचें वर्णन श्रीनिंबार्काचार्यांनीं केलें आहे. यामध्यें निमग्न असणारी भगवती राधिका पूर्णानंदमय बनून राहिली आहे, हे दोघे जीवाचा उद्धार करणारे आहेत. या संप्रदायामध्यें, श्रीराधाही, उपास्यतत्त्व

म्हणून दशोकीमध्यें श्रीनिंबार्कांनीं सांगितली आहे. तो श्लोक असा -

**'अङ्.गेतु वामे वृषभानुजां मुदा विराजमानामनुरूपसौभगाम्।।**
**सखीसहस्त्रैः परिसेवितां सदा स्मरेम देवीं सकलेष्टकामदाम्।'**

वामांगाचे ठिकाणीं, श्रीराधादेवी, पत्नीरूपानें राहात आहे. पति व पत्नी हे दोघे एकरूपच आहेत असें वर्णन पुढें आलें आहे -

**'स वै नैव रेमे तस्मादेकाकी न रमते। स द्वितीयमैच्छत्।**
**स इममेवात्मानं द्वेधापातयत्ततः पतिश्च पत्नी चाभवताम्।।'**

( - बृहदारण्यकोपनिषत् १।४।३)

श्रीराधा व श्रीकृष्ण हे दोघेही एकच रससमुद्ररूप आहेत. क्रीडा करण्याकरितां दोन रूपानें भासतात असें पुढील वाक्य सांगतें.

**'येयं राधा यश्च कृष्णो रसाब्धिर्देहश्चैकः क्रीडनार्थं द्विधाभूत्।'**

( - राधिकातापनीयोपनिषत् १२)

याप्रमाणें अंगांगिसंबंधामुळें नित्यस्वकीयापत्नीभाव श्रीराधाजींचा येथें प्रकट होऊन राहिला आहे.

उपासनेमध्यें गुरूचें प्राथम्य सर्वसंमत आहे. भक्तिसंप्रदायांत मुख्य गुरुस्थान, अनन्य उपासिका भगवती श्रीराधादेवींचें आहे. श्रीनिंबार्काचार्यांचे गुरु श्रीनारदही, **'यथा वज्रगोपिकानाम्'** या वाक्यानें, उपासनेचें नेतृत्व गोपींचेंच असल्याचें सांगत आहेत. प्रेमाभक्तीचें आचार्यत्व, गोपीशिवाय दुसरा

कोणीही करूं शकणार नाहीं. गोपीश्वरी भगवती श्रीराधादेवी, गोपीमध्यें मुख्य गणली गेली आहे. श्रीराधाजीच, अहर्निश भगवच्चिंतनांत निमग्न राहाणारी आहे. म्हणून प्रेमाभक्तीची आचार्य तीच आहे. हेंच श्रीनिंबार्काचार्यांनीं या श्लोकांत सुचविलें आहे. गोस्वामी श्रीहित हरिवंशजीही श्रीराधादेवींनाच आपले गुरू मानीत होते. म्हणून त्यांनीं आपल्या राधासुधानिधीत आरंभीं श्रीराधाजींचें स्मरण केलें आहे -

**'भावोत्सवेन भजतां रसकामधेनुं तं राधिकाचरणरेणुमहं स्मरामि।'**

श्रीहित हरिवंश, श्रीहरिव्यास व श्रीहरिदास हे तिघेही श्रीराधादेवींचे गुरुरूपानें नित्यस्मरण करणारे होते. श्रीनिंबार्काचार्यांच्या प्रेमाभक्तींचे प्रतिनिधित्व या तिघांनीं पूर्णपणें केलेलें आहे. महाप्रभु श्रीचैतन्यही याच तत्त्वांत निमग्न होते. श्रीनिंबार्कांचें समानशील रसमग्न उपासकच हें रहस्य जाणूं शकतात. इतर अभक्तांना या प्रेमरहस्याची छायासुद्धां कळत नाहीं हें पुढील श्लोकांत स्पष्ट केलें आहे -

**'नमो नमस्तेऽस्त्वृषभाय सात्वतां**
**विदूरकोष्ठाय मुहुः कुयोगिनाम्।**
**निरस्तसाम्यातिशयेन राधसा**
**स्वधामनि ब्रह्मणि रंस्यते नमः॥'** (- भागवत २।४।१४)

भगवत्प्रेमानंदाची मूर्ति, अधिष्ठात्री देवी श्रीराधिका आहे. श्रीकृष्णांची ही आह्लादिनी शक्ति आहे -

**'देवी कृष्णमयी प्रोक्ता राधिका परदेवता।**
**सर्वलक्ष्मीस्वरूपा सा कृष्णाह्लादस्वरूपिणी॥**
**ततः सा प्रोच्यते विप्र ह्लादिनी मनीषिभिः।**
**तत्कलाकोटिकोट्यंशा दुर्गाद्यास्त्रिगुणात्मिकाः॥'**

(- पद्मपुराण पातालखंड)

श्रीकृष्ण व श्रीराधा हे युगलरूप नित्य असते असें पुढील श्लोकांत दाखविलें आहे -

**'कृष्णप्राणाधिदेवी सा तदधीनो विभुर्यतः।**
**रासेश्वरी तस्य नित्यं तया हीनो न तिष्ठति॥'**

(- देवीभागवत ९।५०।१७)

हें युगलस्वरूपच श्रीनिंबार्कांचें उपास्य आहे.

श्रीराधाजी, आराध्य गुरुस्वरूप आहे हें **'सखीसहस्रैः परिसेवितां सदा'** या पदानें सुचविलें आहे. मुमुक्षु जीव सखीभावानें श्रीराधाजींच्या सेवेंत उपस्थित होऊन पूर्ण ब्रह्मानंदरसाचा आस्वाद घेऊं शकतात. हेंच पुढील श्लोकांत सांगितलें आहे -

**'गोपीभावेन देवेश स मामेति न चेतरः।**
**आश्रित्य मत्प्रियां रुद्र मां वशीकर्तुमर्हसि॥'**

(- पद्मपुराण पातालखंड)

हें प्रत्यक्ष श्रीकृष्णांनीं भगवान् शंकरांना सांगितले आहे. यावरून श्रीराधाजींचें प्रेममार्गांतील गुरुत्व व्यक्त होत आहे. हेंच पुनः पुढील श्लोकांतही व्यक्त केलें आहे -

**'इमां तु मत्प्रियां विद्धि राधिकां परदेवताम्।**
**अस्याश्च परितः पश्चात् सख्यः शतसहस्रशः॥'**

(- पद्मपुराण पातालखंड ५१।७३)

परब्रह्मापासून मिळालेल्या प्रेमसुधारसाचें पान श्रीराधाजी करीत असतात. **'चखाद सस्मिता राधा हरिदत्तं सुधारसम्'** (- ब्रह्मवैवर्तपुराण ४।५०।१४२) याप्रमाणें स्वतः प्रेमरसपानानें कृतार्थ झालेले गुरूच इतर जीवांना कृतार्थ करूं शकतात. हें **'कृतार्थो ह्याचार्यो नाम भवति'** (पातंजल महाभाष्य) या वाक्यानें सुचविलें आहे. भारतवर्षामध्यें, गोपीभावानें होणाऱ्या

उपासनेचें विशेष महत्त्व आहे. या उपासनेचें आचार्यत्व श्रीराधिकाजींचेकडे आहे म्हणून प्रेमी क्त, त्यांच्या चरणरजाची कामना करीत असतात -

**'ततोऽपि गोपिका धन्या मान्या योषित्सु भारते।**
**नित्यं पश्यन्ति राधायाः पादपद्मं सुपुण्यदम्।।'**

(- ब्रह्मवैवर्त पु. ४।९४।७८)

परब्रह्म श्रीकृष्ण व भगवती श्रीराधिका हे जेव्हां आनंदभावानें रसास्वादामध्यें निमग्न असतात त्यावेळीं त्यांची परिचर्या करणारे जीव; सख्यभावानें अभिव्यक्त होणाऱ्या निरतिशय सुखाचा अंश प्राप्त करून घेऊन कृतार्थ होतात.

श्रीनिंबार्काचार्यांनीं, रहस्यषोडशी या ग्रंथांतील सोळाव्या श्लोकांत भक्तिभूमिका सुचविल्या आहेत.

**'देहेन्द्रियमनःप्राणैर्मायां हित्वा समाहितः।**
**भृत्यवत्पुत्रवत्सेवेत् प्रियावन्मित्रवत्तथा।।'**

देह, इंद्रिय, मन, प्राण इत्यादिकांनीं, कर्मासक्तिरूप मायेला दूर सारून, दास्यभाव, वात्सल्यभाव, पत्नीभाव व मित्रभाव या चार प्रकारांनीं परमात्म्याची सेवा करावी असें वरील ोकांत श्रीनिंबार्काचार्य सांगत आहेत. उपासनेमध्यें दिसून येणारें जें क्रियात्मकरूप आहे, तें मुख्य सहकारि साधन मानलें आहे. यालाच वैधीभक्ति असें म्हणतात. यानेंच चित्त निर्मल व एकाग्र होतें. हीच सगुणभक्ति होय. हिलाच गुणशक्ति, क्रियाशक्ति असें म्हणतात. ध्यान, समाधि ही रागात्मिकाभक्ति आहे. ही अंतःसाधन आहे. हिलाच स्वरूपशक्ति, ज्ञानशक्ति असें म्हणतात. वैधीभक्तिरूप साधनाच्या सहयोगानें या रागात्मिकाभक्तीचा प्रादुर्भाव होतो. हीच भक्ति, रसमय आहे. भरतमुनींच्या **'विभावानुभावसंचारिसंयोगाद्रसनिष्पत्तिः'** या सूत्राप्रमाण; भक्तियोगामध्यें; यम, नियमादि हे उद्दीपनविभावें; चित्ताची एकाग्रता अनुभाव, ध्यान, संचारिभाव आणि समाधि ही रसनिष्पत्ति आहे. साहित्यशास्त्रांत, शृंगार,

वीर, अद्भुत, बीभत्स, भयानक, रौद्र, हास्य, करुण व शान्त असे नऊ रस मानले आहेत. शेवटीं, भक्तीच्या प्रभावामुळें दहावा वात्सल्यरसही मानला आहे. भगवान् श्रीनिंबार्काचार्यांनीं भक्तियोगामध्यें मधुरभावपूर्ण चार रसच मानले आहेत. गौडीय भक्तांनीं आपल्या, भक्तिरसामृतसिन्धु , उज्ज्वलनीलमणि इत्यादि ग्रंथांतून याबद्दल विस्तृत विवेचन केलें असून या चार मधुररसामध्येंच इतर सर्व रसांचा अंतर्भाव केला आहे.

## रागात्मिका भक्तीचे चार प्रकार

श्रीनिंबार्काचार्ये; रागात्मिका भक्तीचें; भृत्यवत्, पुत्रवत्, मित्रवत् व प्रियावत् असे चार प्रकार वरील श्लोकांत व्यक्त करतात. आचार्यांच्या मतांतें; समानता हीच मुक्ति आहे. हीच, सालोक्य, सामीप्य, सारूप्य व सार्ष्टि या चार रूपांनीं मानली आहे. (१) प्रभुसेवेमध्यें दासाप्रमाणें निमग्न होणें हें सालोक्य. (२) प्रभुसमीप, पुत्राप्रमाणें आश्रित होऊन राहाणें हें सामीप्य. (३) मित्राप्रमाणें, प्रभूसान्निध्यांत समान ऐश्वर्य प्राप्त करून घेणे हें सार्ष्टि नांवाचें मुक्तिस्वरूप आहे. (४) पतीशीं अभिन्नरूप असणाऱ्या पत्नीप्रमाणें प्रभुसान्निध्यांत नित्य आह्लादित असणें हें सारूप्य. हे चार माधुर्यभाव, रागात्मक उपासनेमध्यें आहेत. श्रीनिंबार्काचार्यांचे गुरू श्रीनारदजी यांनींही आपल्या भक्तिसूत्रांत, हे चार भाव; दासासक्ति, सख्यासक्ति, वात्सल्यासक्ति व कांतासक्ति या रूपानें दाखविले आहेत.

(-नारदभक्तिसूत्र ८२)

**दास्यभाव** - नोकराचें सर्व कार्य स्वामीकरतांच होत असतें. त्याचें स्वतःचें असें कांहीं नसतें. त्याप्रमाणें, परमात्म्याबद्दल जीवात्म्याची वृत्ति असली पाहिजे. '**त्वदीयं वस्तु गोविंद तुभ्यमेव समर्पये**' असा दासभाव नेहेमीं राहिल्यास, त्याचें रक्षण स्वामी सर्वप्रकारें करतो. याबद्दल पुढील श्लोक प्रमाण आहे -

**'सकृदेव प्रपन्नाय तवास्मीति च याचते।**

**अभयं सर्वभूतेभ्यो ददाम्येतद् व्रतं मम॥'** (- वाल्मीकिरामायण)

**वात्सल्यभाव** - ज्याप्रमाणें लहान बालकाला पित्याच्या साहाय्याची नित्य अपेक्षा असते म्हणून तो विश्वासानें पित्याचा आश्रय घेत असतो त्याप्रमाणें उपासकानें बालभाव धारण करून परमपिता परमात्म्याचेंच आश्रित झाल्यास, परमात्मा; स्मरण, दर्शन, स्पर्शन अशा प्रकारानें, त्याला आपलें सामीप्य देऊन त्याचें पोषण करतो. बाल हा, प्रपंचांतील कोणतीह वस्तु जाणत नाहीं. अबोधस्थितीत तो असतो. त्याप्रमाणें कोणत्याही वस्तूकडे लक्ष न देतां बालाप्रमाणें निर्मलचित्त होऊन उपासकानें राहिलें पाहिजे म्हणजे प्रभु त्याचें सर्वप्रकारे संरक्षण करतो. हेंच पुढील श्लोकांत दाखविलें आहे -

**'स्मरणालोकनस्पर्शैः कूर्ममीनविहङ्.माः।**

**यथा पुष्णन्त्यपत्यानि तथा पुष्णाम्यहं शिशून्॥'** (- पद्मपुराण)

सर्व इंद्रियांमध्यें मन हें मुख्य आहे. त्याला अबोध, रागद्वेषादिदोषरहित करणें हा बालभाव आहे. तिष्ठन्मूत्रत्वादिरूप येथें विवक्षित नाहीं. पांडित्यप्रयुक्त असणारें आपलें माहात्म्य बिलकुल प्रकट न करतां पूर्ण निरहंकार होऊन राहाणें हेंच बाल्य होय. हेंच श्रीनिंबार्कांनीं पुढीलप्रमाणें सांगितलें आहे -

**'पाण्डित्यप्युक्तस्वमाहात्म्याद्यनाविष्कुर्वन् बाल्येन, निरहंकारभावेन वर्तेत'** (- ब्रह्मसूत्रवाक्यार्थ ३।४।४९)

सख्यभाव - याबद्दल श्रीराम सांगत आहेत -

**'मित्रभावेन संप्राप्तं न त्यजेयं कथंचन।**

**दोषो यद्यपि तस्य स्यात् सतामेतद्विगर्हितम्॥'**

(- वाल्मीकि रामायण)

सख्यभावाच्या उपासकाला परमात्मा, आपल्यासारखें ऐश्वर्य, आनंद, भोग देतो. सख्यभावामध्यें गुप्त कांहींच नसतें. दोघांमध्यें अभिन्नता असते.

परस्परांचे आहार विहार समान असतात. परस्पर एकमेकाला सांभाळतात. एकमेकांचे दोष विसरून जातात त्याप्रमाणें, परमात्माही सख्यभावाच्या उपासकाचे सर्व दोष क्षम्य समजून त्याचें नित्य रक्षण करतो. हें पुढील श्लोकांत व्यक्त केलें आहे -

**'अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्।**
**साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यसितो हि सः॥'**

(- भगवद्गीता ९-३०)

**प्रियावत् भाव** - या भावाच्या उपासकांना; परमात्मा आपल्या रसोल्लासानें पूर्ण करून व आपल्या अद्भुत महाप्रकाशानें प्रकाशित करून स्वरूपशक्तिरूप (भगवद्भावापत्ति) सारूप्यमुक्ति दतो. प्रिया आणि प्रियतम यांचा अंगांगिभाव असला तरी दोघांची योग्यता समान असते. यामध्यें गुप्त कांहींच राहात नसून स्वरूपप्रकाश पूर्णपणें झालेला असतो. या भावामध्यें; दास्यभावांतील कृपा, वात्सल्यांतील स्नेह व सख्यांतील प्रीति एकरूप होऊन गाढानुरागरूपानें प्रकट झाले असतात. रति, हास, शोक, क्रोध, उत्साह, भय, जुगुप्सा व विस्मय हे अंतःकरणांतील, रसांचे आठ स्थायीभाव एकत्र होऊन प्रेममहाभावामध्यें मिळून गेलेले असतात. या आठही भावांच्या समष्टीनें अत्यंत उल्लसित झालेल्या चित्तामध्यें प्रकट होणारा महाभाव हाच परमानंद आहे. हाच स्वरूपप्रकाश व वृंदावनरसही आहे. (वृन्द + वन, आठ भावांच्या समूहाचें स्थल) ही समष्टि श्रीराधाजींचें स्वरूप आहे. श्रीराधादेवीच प्रियावत् भावाच्या परमाचार्य आहेत. याप्रमाणें, सालोक्य, सामीप्य, सारूप्य व सार्ष्टि या चौघांचें संयुक्त रूप म्हणजेच सायुज्य, श्रीनिंबार्कमतांत आहे. कारण त्यांच्या मतांत; उपास्य व उपासक, भोक्ता व भोग्य, प्रिया व प्रियतम यांचें नित्य साहचर्य राहातें. पूर्ण अभेद कधींच नाहीं. श्रीरामानुजाचार्यजी, दास्यभावाच्या दैन्ययुक्त शरणागतीनें कृपेची आकांक्षा करीत आहेत. श्रीमध्वाचार्यजी, सख्यभावाच्या प्रीतियुक्त साहचर्यानें आनंदाची अभिलाषा बाळगत आहेत.

तसेंच श्रीवल्लभाचार्यजी, वात्सल्यभावाच्या स्नेहयुक्त सामीप्यानें पोषणाची लालसा धारण करून राहिले आहेत. श्रीनिंबार्काचार्यजींनीं सम्मीलित केलेल्या एका महाभावाचेच हे सर्व प्रकाश आहेत. याच महाभावांत निमाई श्रीगौरांग महाप्रभु नित्य निमग्न होते.

## हिततत्त्व

याप्रमाणें रसस्वरूप परमात्म्याची उपासना या संप्रदायांत सांगितली. हीच हिततत्त्वाची उपासना म्हणून या संप्रदायांत मानली आहे. ब्रह्मसूत्र १।१।२९ मध्यें इंद्रप्रतर्दनसंवादरूपानें सांगितलेली प्राणविद्याच हितोपासना आहे. कारण तेथें हिततमत्वादि गुण दाखविले आहेत. हेंच हिततत्त्व ब्रह्मसूत्र १।३।८ मध्यें भूमाशब्दानें दाखविलें आहे. हित हेंच प्रेमतत्त्व आहे. हितस्वरूप परमात्म्यानें दुःखरूप सृष्टि कां केली? या प्रश्नाचें उत्तर **'लोकवत्तु लीलाकैवल्यम्'** (- ब्रह्मसूत्र २।१।३२) या सूत्रानें दिलें आहे. ही सृष्टि म्हणजे ईश्वराची केवळ लीलाच आहे. तेथें दुःख हें मनःकल्पित आहे. या लीलेमध्यें मन निमग्न झालें तर दुःखाचा पूर्ण अभावच सृष्टीमध्यें त्या भक्ताला भासेल. भगवंताच्या लीलांमध्येच हिततत्त्व प्रकट होतें. ही लीला तीन प्रकारची आहे. नित्य गोलोकधामामध्यें होणारी लीला वास्तवलीला आहे. साधकाला, त्या लीलाध्यानामध्यें नित्यनिमग्न असतांना अंतःकरणांत होणारा त्या लीलेचा नेहमी भास ही प्रातिभासिक लीला होय. आणि बाहेर, अभिनय करून दाखविली जाणारी लीला व्यावहारिक लीला होय. गोलोकधामांतील लीलेचा येथें आपल्या अंतःकरणांतच नित्य अनुभव घेत राहाणें हेंच श्रीनिंबार्कमतांत साधनरहस्य आहे.

**योग व भक्ति यांचा समन्वय** - योगदर्शनानुसार शरीरांत ७२ हजार नाड्या आहेत. त्यापैकीं १०१ मुख्य; त्यांतही सुषुम्णानाडी मुख्य आहे. ही शरीराच्या मध्य भागांतून गेली आहे. तिच्यामध्यें सात चक्रें आहेत.

मेरूदंडाच्या खालीं मूलाधार चक्र, लिंगाच्याजवळ स्वाधिष्ठान चक्र, नाभिमध्यें मणि चक्र, हृदयांत अनाहत चक्र, कंठांत विशुद्ध चक्र, भ्रूमध्यांत आज्ञा चक्र व ब्रह्मरंध्रामध्यें सहस्रार चक्र अशीं सात चक्रें आहेत. नाभितील मणिधारचक्रांत, पराशक्ति-प्राणाची स्थिति सांगितली आहे. जिच्या, पश्यंती, मध्यमा व वैखरी अशा तीन अवस्था आहेत. यांनाच इच्छा, ज्ञान व क्रियाशक्ति म्हणतात. या सात चक्रांपैकीं मस्तकांतील सहस्रारचक्रांतून नाभींतील मणिधारचक्रापर्यन्त जी अमृतरसधारा वाहात असते तिचा प्रवाह ऊर्ध्वगति करून सुषुम्णेतून हृदयस्थ आठ कुंजयुक्त वृंदावनांत प्राणरूप पराशक्तीला नेऊन, (असुदेव-प्राणपति) वासुदेवाला समर्पण करणें ही भक्तियोगाची पश्यन्ती अवस्था आहे. प्राण म्हणजे येथें प्राणोपाधिक जीवस्वरूप घ्यावें. तो जीव नंतर प्राणपति - वासुदेवाच्या चरणामृतरसाचें पान करून तृप्त होतो. ही भक्तियोगाची मध्यमा अवस्था आहे. हीच योगशास्त्रांतील समाधीची चरमावस्था असून हिलाच निर्बीज, निर्विकल्पसमाधि असें म्हणतात. प्रभूच्या चरणामृताचें वैशिष्ट्य पुढील मंत्रांत दाखविलें आहे -

**'तदस्य प्रियमाभिपाथो अश्यां नरोयत्र देवमयो मदन्ति।**
**उरुक्रमस्य सहिन्धुरित्था विष्णोःपदे परमे मध्व उत्सः॥'**

(- ऋक्संहिता २।२।२४।५)

हृदयांतील अनाहतचक्रांत कमलासारखा एक मांसगोलक आहे. सुषुम्णानाडीमध्येंच याची स्थिति आहे. हा मांसपिंड आंतड्यांनीं वेष्टित आहे. यालाच पुरीतत असें म्हणतात. त्याच्यामध्यें जें आकाश, ब्रह्म आहे त्याचें ध्यान करण्यास सांगितलें आहे. तसेंच सुषुम्णानाडीशीं संबद्ध ७२ हजार नाड्या आहेत ज्यांना हितानाडी असें म्हणतात. यांचे वेगळे वेगळे रंगही दाखविले आहेत. (बृहदारण्यक ४।३।२०) तसेंच, कुहू, वरुणा, यशस्विनी, पिंगला, पूषा, पयस्विनी, सरस्वती, शंखिनी, गांधारी, इडा, हस्तिजिह्वा, विश्वोदरा या १२ नाड्या सुषुम्णानाडीशीं विशेष संबंधित असणाऱ्या हितैषी नाड्या आहेत.

हृदयांतील अनाहतचक्र अष्टदलकमलाकृति आहे. या अनाहतयंत्राच्या ईशान्य कोणामध्यें संबंधित असणाऱ्या नाडीमध्यें मुख्य प्राणतत्त्वाचा स्थायी निवास आहे. तेथूनच या यंत्राचें संचलन होतें. हा प्राण अंगांचा रस सार असल्यानें याला आंगिरस असेंही उपनिषदामध्यें म्हटलें आहे. भक्तिभूमिकांच्या दृढाभ्यासानें अंतःकरणाची स्थिति पूर्ण निर्मल होते त्यावेळीं अनाहतचक्राचें संचालन सुरू होते. यालाच योगदर्शनांत कुंडलिनीचक्राची जागृति असें म्हटले आहे. याप्रमाणें योगाचें फलही भक्तियोगानें प्राप्त होऊं शकतें.

वर लिहिल्याप्रमाणें, भक्तियोगानें अंतःकरणाची जी विशेष स्थिति निर्माण होते, ती परमात्म्याच्या आह्लादिनी शक्तिचा विकास आहे असें श्रीनिंबार्क मानतात. यांच्या मतांत भगवती श्रीराधादेवी हीच आह्लादिनी शक्ति आहे. जी सृजनात्मक आहे. नाभींतील मणिधारचक्रांत पडणारी रसधारा उलट करून ती वर अनाहतचक्रांत नेली असतां तेथें उत्कृष्ट हितरस अभिव्यक्त होतो. सुषुम्णानाडीच हितरसवाहिनी श्रीराधादेवी आहे. बाकीच्या हजारों नाड्या तिच्या सहयोगी हिता नाड्या आहेत असें श्रीनिंबार्कांनीं दशोकींतील **'अंगे तु वामे'** या श्लोकांतील **'सखीसहस्रैः परिसेवितां सदा'** या वाक्यानें सुचविलें आहे. या सर्व नाड्यांशीं सह अनाहतचक्ररूप वृन्दावनामध्यें संघटन झाल्यामुळें परमहिततत्त्व प्रकट होतें. हीच ब्रह्मानुभूति आहे. योगदर्शनांतील प्रक्रियांनीं प्राणवायुबरोबर ती रसधारा अनाहतचक्रापर्यंत ऊर्ध्वप्रवाहित केली असतां, त्या ठिकाणीं उत्कृष्ट रस प्रकट होतो असें श्रीकबीरजींनींही, पुढील दोह्यांत सांगितले आहे.

**'कबिरा धारा अगमकी सद्गुरु दईलखाय।**
**उलटताहि सुमिरन करौ स्वामी शब्द लगाय॥'**

ही हृदयस्थवृन्दावनांतील रसानुभूतीच, महारास, रासक्रीडालीलेची अनुभूति आहे. श्रीनंबार्काचार्य रासमय होऊन गेले आहेत. हृदयांतील अनाहतचक्र हें सुदर्शनस्वरूप आहे. नारदपांचरात्रामध्यें, सृष्टि ही ब्रह्माच्या

संकल्पशक्तींचा परिणाम असल्याचें सांगितलें आहे. तसेंच सुदर्शन हेंच संकल्पशक्ति असल्याचें सांगितलें आहे. याप्रमाणें श्रीनिंबार्कांनीं प्रवर्तित हितोपासनेचें महत्त्व भागवतांतील पुढील श्लोकामध्यें वर्णिलें आहे.

**'त्वदनुपथं कुलायमिदमात्मसुहृत्प्रियव-**
**च्चरति तथोन्मुखे त्वयि हिते प्रिय आत्मनि च।**
**न बत रमन्त्यहो असदुपासनयात्महनो**
**तदनुशया भ्रमन्त्युरुभये कुशरीरभृतः॥'**

(-भागवत १०।८७।२२)

या हितोपासनेपासून मिळणारें सुख वैषयिक सुखापेक्षां फार मोठें आहे. आणि हेंच जीवांना कल्याणकारी आहे. श्रीनिंबार्काचार्यांनीं ही हितोपासना मध्यावस्थेपर्यंतच प्रकट केली आहे. कारण ते नेहमीं अंतर्मुख, आंतच रममाण होत असत. म्हणून पूर्ण रहस्योद्घाटन त्यांच्या वाणीनें झालें नाहीं. जें थोडें त्यांनीं प्रकाशांत आणलें तेंही रहस्यभूतच आहे. त्यांचें लेखनही संक्षिप्त, गंभीर आहे. संस्कृत भाषेंतील तंत्रग्रंथांतून हें रहस्य आलें आहे. पण तेथेंही तें रूपकात्मकच प्रायः आहे.

## हितोपासना व बौद्ध

श्रीनिंबार्कांनीं प्रचलित केलेल्या या प्रेममय हितोपासनेनें बौद्धांनासुद्धां आत्मसात् केले. बौद्धांचे संस्कार भारतीयच होते. वैदिक कर्मकांडाप्रमाणें, उपासनेबद्दल त्यांचा मतभेद नव्हता. बुद्धाच्या अनीश्वरवादी मतानेंही त्यांचें पूर्ण समाधान होत नव्हते. अशा स्थितींत भागवतधर्मांतील या प्रेमाभक्तिरूप साधनाचा प्रभाव बौद्धांवर विशेष पडला व त्यांच्यामध्येही भक्तीचा प्रचार वाढला. श्रीमद्भागवतादि वैष्णव पुराणाप्रमाणें बौद्धांनींही नेपाळमध्यें 'शून्यपुराण' म्हणून एक पुराण रचलें. **'शून्यब्रह्मणे नमः'** या मंत्रजपाचें विशेष महत्त्व त्यांनी पुरस्कृत केलें. महायानी बौद्धांनीं श्रीनिंबार्कांच्या सिद्धांताचा

स्वीकार केला. इसवीसनाच्या चौथ्या शतकांत बौद्धांचा मंत्रयान संप्रदाय चालू झाला. त्यांत जीव व परमात्मा यांचें अंशांशीभावानें सहज मीलन करणें हेंच साधन म्हणून सांगितलें आहे. इसवी सन पहिल्या शतकांत कनिष्कानें या सहज संप्रदायाचा प्रचार केला. **'यज्ज्ञात्वा मत्तो भवति स्तब्धो भवति आत्मारामो भवति।'** (- नारदभक्तिसूत्र ६) या सूत्राप्रमाणें प्रेममार्गीय हितोपासकांची जी अनिर्वचनीय अवस्था दाखविली तीच अवस्था, प्रेमभक्तिरसाचें आस्वादन करून बौद्धांची सहज झाली. वैष्णवांच्या या सहज साधनाचा स्वीकार करून बौद्धांचा जो समूह भक्तिसाधनेंत निमग्न झाला तेंच सहजियामत म्हणून प्रसिद्ध झालें. याचा प्रचार बंगाल व उत्कलप्रांतांत विशेष आहे.

**वैधीभक्ती अथवा क्रियात्मकभक्ति** - श्रीनिंबार्काचार्यांच्या हितोपासनामार्गांत वैधीभक्तीला गौणस्थान आहे. क्रिया हें एक पोषक साधन असलें तरी त्याची आवश्यकता मात्र श्रीनिंबार्कांना असंमत नाहीं. साधकाला तर साधन म्हणून क्रियेची अत्यंत आवश्यकता आहे. पण सिद्धांनींसुद्धां शास्त्रोक्त क्रियेचें आचरण करीत राहणेंच उचित ठरेल. मोठ्या लोकांच्या आचरणाचा प्रभाव सामान्य जनतेवर पडत असल्यानें लोकसंग्रहाकरितां सिद्धांचा आचार चालू राहणें उचित आहे. शिवाय क्रियेमध्यें शिथिलता आल्यास पतन होण्याची भीति आहे. हेंच श्रीनारदांनीं, **'भवतु निश्चयदार्ढ्यादूर्ध्वं शास्त्ररक्षणम्। अन्यथा पातित्याशंकया।'** (श्रीनारदभक्तिसूत्र १२-१३) या सूत्रांतून व्यक्त केलें आहे. म्हणूनच प्रसिद्ध महानुभाव सद्गुरु श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामिमहाराज, यांचा आचारपरिपालनावर मोठा कटाक्ष होता. त्यांचा मुक्काम गंगातीरावर ब्रह्मावर्तक्षेत्रांत असतांना त्यांना शौचाचा उपद्रव सुरू झाला. दिवसांतून ८/१० वेळांसुद्धां शौचास जाण्याचा प्रसंग येत असे. पण प्रत्येक वेळीं शौचाहून आल्यावर गंगेमध्यें स्नान करूनच त्यांनीं यावें. 'चैत्र वैशाखांतील गंगाकांठचा उन्हाळा, नदीचें पाणीं दूर असल्यामुळें भर उन्हांत तो संतप्त वालुकानिकर तुडवीत जाणें व येणें आणि तेंही किती वेळां हें तर अनिश्चित.

पण शास्त्रमर्यादेचें परिपालन अत्यंत निष्ठेनें महाराज करीत असत. हें आम्ही प्रत्यक्ष पाहिलें आहे. '**आत्मा देहादिभ्यो भिन्नः**' हें वाक्य असें महानुभावच उच्चारूं शकतात' इत्यादि वर्णन संकेश्वरमठाधिपति श्रीशिरोळकरस्वामिहाराज वारंवार करीत असत. यावरून भक्तिमार्गांत कर्माची जरूरी नाहीं. भोळा भाव पुरे इत्यादि कांहीं लोकांचे उद्गार, आलस्यादि दोषद्योतक असल्यानें ते ग्राह्य ठरणार नाहींत. ध्रुवानुस्मृतिरूप उपासनेची भूमिका प्राप्त होण्याकरितां सात साधनांची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामध्यें क्रियायोग आहेच. असें श्रीरामानुजाचार्यांनीं आपल्या ब्रह्मसूत्रावरील प्रथमसूत्रांच्या भाष्यांत दाखविले आहे. त्यांनीं प्रमाण म्हणून दाखविलेली बौधायनवृत्ति, याप्रमाणें आहे.

'**तल्लब्धिर्विवेकविमोकाभ्यासक्रियाकल्याणानवसादानुद्धर्षेभ्यः संभवान्निर्वचनाच्च।**'

याचा अर्थ - १. **विवेक** - कांदा, लसूण इत्यादि *जातिदुष्ट;* पतित, अभिशस्त इत्यादिकांचें स्वामित्व असलेले *आश्रयदुष्ट*, वनख, केस वगैरे पडलेले *निमित्तदुष्ट* अशा तीन प्रकारच्या दुष्ट अन्नांचा परिहार करून शरीर शुद्ध ठेवणें,

२. **विमोक** - कामादि विकारांच्या आहारीं न जाणें. ३. **अभ्यास** - शुभ उपास्याचें पुनः पुनः ध्यान करणें. ४. **क्रिया** - शक्तीप्रमाणें नित्य पंचमहायज्ञादिकांचें अनुष्ठान करणें, ५. **कल्याण** - सत्य, ऋजुता, दया, दान, अहिंसा व निष्फल मनोरथांचा त्याग हे कल्याणगुण. ६. **अनवसाद** - कोणत्याही निमित्तानें मन विषण्‍ण न होणें. ७. **अनुद्धर्ष** - फाजील संतोष नसणें. या सात साधनांची आवश्यकता श्रीरामानुजाचार्य मानतात. '**सर्वापेक्षा च यज्ञादिश्रुतेरश्ववत्**' (ब्रह्मसूत्र ३।४।२६) या सूत्रावरील भाष्यांत, श्रीशंकराचार्यांनींही कर्माची आवश्यकता दाखविली आहे. श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेमहाराजही पुढील श्लोकांतून असेच सांगत आहेत-

**'ईश्वराराधनधिया स्वधर्माचरणात्सताम्।**
**ईशप्रसादस्तद्रूपः सुलभश्चात्रद्गुरुः।।**
**सद्गुरोः सम्प्रसादेऽस्य प्रतिबन्धक्षयस्तथा।**
**दुर्भावनातिरस्काराद्विज्ञानं मुक्तिदं क्षणात्।।'**

श्रीभगवानही कर्मांचें महत्त्व असें सांगतात -

**'येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।**
**ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः।।'** (- भ.गी. ७।२८)

याप्रमाणें शास्त्रसिद्ध असणारी क्रियायोगाची आवश्यकता सर्वही आचार्यांनीं मान्य केली आहे. श्रीनिंबार्काचार्यांनीं अंतःशुद्धीकरितां पांच संस्कारांचें महत्त्व दाखविलें आहे ते संस्कार याप्रमाणें आहेत -

**'तापं पुण्ड्रं तथा नाम मन्त्रो यागश्च पञ्चमः।**
**अमी हि पञ्च संस्काराः परमैकान्तहेतवः।।'** (- नारदपञ्चरात्र)

१. **ताप** - ताप किंवा तप या संस्काराचें महत्त्व सर्वांपेक्षां अधिक आहे. जैन, बौद्ध यांच्यामध्यें सुद्धां तपाचे अनेक प्रकार आहेत. भारतीय संस्कृतीमध्यें तप हें साधन मुख्य आहे. **'तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व। तपोब्रह्मेति'** (तैत्तिरीयोपनिषद् ३।३) या वाक्यानें तप हें ब्रह्मज्ञानाचें साधन असल्याचे सुचविलें आहे. प्राचीन महर्षींची प्रसिद्धि, तपोधन म्हणूनच आहे. श्रीनिंबार्काचार्यांनीं उपवास, व्रत हेंच प्रधान तप सांगितलें आहे. दीर्घकालीन व्रताचें विधान न करतां, महिन्यांतून दोन वेळ एकादशी व्रताचें वैशिष्ट्य त्यांनीं दाखविलें आहे. शरीरांतील अकरा इंद्रियांच्या संयमाला पोषक असें एकादशीव्रत आहे. श्रीनिंबार्कमतांत द्वादशीविद्ध एकादशी ग्राह्य आहे. अग्निमध्यें तापून जसें सुवर्ण शुद्ध होतें तसें व्रतसाधनानें जाठराग्निप्रदीप्त झाला असतां अंतःकरण शुद्ध होतें. इंद्रियामध्यें मुख्य जें मन त्याच्या संयमाकरितां व्रतामध्यें मौनाचा विशेष पुरस्कार केला आहे. व्रताचे तीन प्रकार, कायिक, वाचिक व

मानसिक असे पुढीलप्रमाणें आहेत -

**'एकभुक्तं तथा नक्तं उपवासमयाचितम्।**
**इत्येव कायिकं पुंसां व्रतमुक्तं नरेश्वर।।**
**वेदस्याध्ययनं विष्णोः कीर्तनं सत्यभाषणम्।**
**अपैशून्यमिदं राजन् वाचिकं व्रतमुच्यते।।**
**अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यमकल्कता।**
**एतानि मानसान्याहुर्व्रतानि हरितुष्टये।।'** (- पद्मपुराण)

एक वेळ साधा आहार घेणें, किंवा दिवसभर न खातां रात्रीं भोजन करणें, किंवा कोणाजवळ कांहीं न मागतां जें मिळेल त्यावर निर्वाह करणें, किंवा अहोरात्र भोजन न करणें हें शरीर शुद्ध करणारें व्रत आहे. सद्ग्रथांचा अभ्यास, भगवंताचें नामसंकीर्तन, भजन, सत्य भाषण आणि कोणाच्याही दोषांचा उच्चार न करणे हें वाणीचें शुद्धि करणारें तप आहे. मनाने कोणाचें अहित न चिंतून सर्वांच्या हिताचेंच चिंतन करणें, कोणाचीही वस्तु चोरण्याची इच्छा न करणें, ब्रह्मचर्य व कोणाच्याही उत्कर्षाबद्दल ईर्ष्या, मत्सर न करणें हें मानसतप आहे. भगवंताचे जसे स्वाभाविक निर्मल गुण आहेत तसे जीवात्म्याचे झाले पाहिजेत याकरितां साधनांचा उपदेश आहे. नुसते निराहार राहाणें म्हणजे उपवास नसून इंद्रियसंयमानें हरिसन्निध राहाणें हा उपवास शब्दाचा खरा अर्थ आहे -

**'उपावृतस्य पापेभ्यो यो हि वासो गुणैर्हरेः।**
**उपवासः स विज्ञेयो नोपवासस्तु लङ्‌घनम्।'**

अशा पद्धतीनें एकादशीव्रत नित्य केलें पाहिजे. वर्षांतून चोवीस एकादशीचे दिवस हे, शरीरांतील चोवीस तत्त्वांच्या शुद्धीचें स्मरण करून देणारे दिवस आहेत. वर्षांतून चोवीस दिवसही जर नियम पालन करतां आलें नाहीं तर मनुष्य व पशु यांत अंतर तें काय? निष्ठापूर्वक वरील नियमांचें पालन केल्यानेंच जीवन, सच्चरित्र बनणारें आहे. निराहारव्रतानें इंद्रियवृत्ति आपोआप

शांत होऊं लागतात. हें वैज्ञानिक रहस्य आहे. म्हणून तप हें आत्मशुद्धीचें साधन असल्यानें तें अवश्य केलें पाहिजे.

२. **पुंड्र** - मस्तकादि स्थानावर गोपीचंदनादिकांचा टिळा लावणें म्हणजे पुंड्र संस्कार होय. नाभींतील मणिधारचक्रापासून वर मस्तकांतील सहस्रारचक्रापर्यंत पांच चक्रें व यांच्याशीं संबद्ध असणाऱ्या, इडा, पिंगला, यशस्विनी, पयस्विनी, शंखिनी, सरस्वती व वरुणा या सात नाड्या, अशा बारा ठिकाणीं, गोपीचंदनाच्या दोन ऊर्ध्वरेखा लावण्याचें विधान या संप्रदायांत आहे. यांतील विशेष ज्ञान सांप्रदायिकांचेकडूनच होणारें आहे. या स्थानांवर चंदनाचा लेप केला असतां, शीतलता, कांति, तेज, स्फूर्ति इत्यादि गुणांचा आविर्भाव होतो आणि मन, भगवच्चिंतनामध्यें निमग्न होतें. मातीमध्यें असणारी शक्ति, सर्वसंमत आहे. त्यांतही गोपीचंदनाच्या मातींत विशेष शक्ति आहे. नाडींतून वाहणाऱ्या रक्ताची शुद्धि चंदनाच्या लेपानें होते. तसेंच तुळशीची माळ कंठामध्यें धारण करण्याचें विधानही भागवतधर्मामध्यें आहे. वात, पित्त, कफ यांचें समीकरण करणें, विजातीय कीटाणूंची शक्ति खच्ची करणें इत्यादि शेंकडो गुण तुलसीवृक्षांत आहेत. या सर्वांचा संग्रहरूप तुलसीचें वैज्ञानिक दृष्टीनेंही महत्त्व व वैष्णवधर्मांत त्याचें श्रेष्ठत्व या विषयांचे विवेचन करणारा 'तुलसीसंचयन' नांवाचा एक ग्रंथ आहे. पण तो अद्यापि अप्रकाशित आहे. शरीरांतील अन्य स्थानापेक्षां कंठ हें संधिस्थान अधिक संवेदनक्षम आहे. शरीरांत उद्भवणाऱ्या विकारांची प्रथम सूचना कंठग्रंथीपासून होते म्हणून तुलसीमाला कंठामध्यें धारण केल्यानें देहाची शुद्धि होते.

३. **नाम** - नाम हें, व्यक्तीची व समुदायाची प्रवृत्ति आणि संस्कृति ओळखण्याचें मोठे साधन आहे. सुसंस्कृत साहित्यिकांनीं आपल्या घरांतील ठेवलेलीं नावें आणि सामान्य ग्रामीणांनीं ठेवलेली नांवें यावरून त्यांची अभिरुचि, संस्कृति हें सर्व कळून येतें. वैष्णवामध्यें नामसंस्कार हा उपासनेचें एक अंग म्हणून मानला आहे. याचें कारण भगवन्नामाविषयीं असणारा त्यांचा गाढानुराग

हेंच होय. आपल्या वाणीनें, मनानें, शरीरानें उपास्यासंबंधीच सर्व कार्ये घडत असावींत. उपास्यव्यतिरिक्त कांहींही होऊं नये हीच विष्णुभक्तांची तळमळ असते. सांसारिक जीवन उपास्यमय होऊन जावें हेंच ध्येय असतें. देवाचीं नांवें ठेवण्याची भारतीयांची पद्धति याकरितां आहे. उपासकांचें नाम, कर्म सर्वही उपास्यमय असलें पाहिजे. अनुकरण करण्यानें मनुष्य तद्रूप बनून जातो हें; आज पाश्चात्यांच्या भाषा, वेष, आहार, विहार, विचार इत्यादि सर्वांचें अनुकरण करण्यानें, भारतामध्यें दिसून येणाऱ्या पाश्चात्यमयतेवरून स्पष्ट होत आहे. याचप्रमाणें, ब्रह्माच्या स्वरूपाचें, गुणाचें, नामाचें सर्वत्र अनुकरण करणारा उपासक, उपास्यमान कां होणार नाहीं ? श्रीनिंबार्कमतांत, भगवद्भाव म्हणजे समानता हीच मुक्ति आहे.

४. **मंत्र** - संस्कारामध्यें नाम व पुंड्र हे दोन बाह्य संस्कार आहेत. तप, बाह्य व आंतर दोन्ही प्रकारचें आहे. मंत्र व याग हे दोन्ही आभ्यंतर संस्कार आहेत. मंत्रसंस्काराचा संबंध मुख्यतः मनाशीं आहे. मंत्राचा अखंड अभ्यास म्हणजे जप आहे. हा; स्पष्ट मंत्रोच्चार करणें, अगदीं हळू करणें व केवल मनानेंच करणें असा तीन प्रकारचा आहे. भगवत्स्वरूपाचें चिंतन करीत जप केल्यानें सर्व विघ्नांचा नाश होऊन आत्मस्वरूपाचें भान होतें असें,

**'तज्जपस्तदर्थभावनम्।ततः प्रत्यक्चेतनाधिगमोऽप्यन्तरायाभावश्च'**

(योगसूत्र १।२८।२९) या सूत्रांतून सांगितलें आहे. मनाच्या शांतीनें इंद्रियांनाही शांति लाभते. मनानेंच परमात्मतत्त्व जाणलें जातें. मनामध्यें असणाऱ्या विविध शक्तींचा उल्लेख ऐतरेयोपनिषत् ३।२ या भागामध्यें आला आहे. म्हणून मंत्रजपद्वारा मनांतील सर्व शक्तींचा विकास करून घेऊन त्याला वश करण्याकरितां मंत्रसंस्काराचें विधान केलें आहे. मनांतील विविध शक्तींच्या विकासालाच सिद्धि असें म्हणतात. निष्काम भावनेनेंच मंत्रानुष्ठान करून सर्वशक्तिसंपन्न परमात्म्याची समानता प्राप्त करून घ्यावी अशी श्रीनिंबार्काचार्यांची आज्ञा आहे.

५. **याग** - इन्द्रिय, मन, अहंकार या सर्वांसह उपासकानें, भगवंताला आत्मसमर्पण करणें हा याग नांवाचा संस्कार आहे. यामध्यें उपासकाची मनोवृत्ति ईश्वरमय होऊन जाते हाच भक्तियोग होय. या आत्महवनानेंच जीव कृतार्थ होता

असें श्रीनिंबार्काचार्य मानतात.

हा तन्मययोग, प्रतीकोपासनेमुळें होऊं शकतो. भगवंतांच्या प्रतिमेच्या अर्चनानें इंद्रियवृत्ति एकाग्र होऊं लागतात. आभ्यंतर व बाह्य असे या योगाचे अभ्यास दोन प्रकारचे आहेत. त्यांपैकीं बाह्य अभ्यासाकरितां प्रतिमापूजेचें विधान आहे. आभ्यंतर अभ्यास, **'मनो ब्रह्मेत्युपासीत'** यांत सांगितल्याप्रमाणें मनालाच प्रतिमा मानून करावयाचा आहे. ही उच्च कोटींतील साधकाकरितां आहे. प्रतिमोपासना प्राथमिक साधकाकरितां आहे. वर वर्णन केलेल्या संस्कारांनीं, **'तस्य प्रशान्तवाहिता संस्कारात्'** (योगसू. ३।१०) यांत सांगितल्याप्रमाणें चित्तामध्यें शांतिसंस्कार अधिकाधिक वाढत जातो व त्यामुळें स्थिर आनंदलाभ होतो.

याप्रमाणें श्रीनिंबार्काचार्यांनीं सांप्रदायिकांना या आचाराची आवश्यकता सांगितली आहे. आचारहीन व्यक्ति किंवा राष्ट्र केव्हांही पूर्ण उन्नतीला पोचूं शकणार नाहीं. भौतिक उन्नति वाटेल तितकी झाली तरी जोंपर्यंत आचार व विचार यांची उन्नति होणार नाहीं तोंपर्यंत कष्टाचा अनुभव येतच राहाणार. श्रीनिंबार्काचार्यांनीं याकरतांच भक्तियोगाचा पुरस्कार केला आहे. सर्वही प्राण्यांना, नेहमीं, स्वेच्छेनें याचें आचरण करतां येण्यासारखें आहे. पण आचारपालन ही, उपासनेची आधारशिला आहे. सदाचारसंपन्न व्यक्तीच, ईश्वराप्रमाणें महान् गुणसंपन्न होऊं शकते हा श्रीनिंबार्काचार्यांचा सिद्धान्त आहे.

# उपसंहार

**'सुखाद् बहुतरं दुःखं जीवितें नास्ति संशयः'**

(-म.भा. शांतिपर्व १२-३३०-१६)

जीवनामध्यें सुखापेक्षां दुःखच जास्ती आहे असा एक विचार महाभारतकारांनीं दाखविला आहे. सुख व दुःख यांची व्याख्या **'अनुकूलवेदनीयं सुखम्' 'प्रतिकूलवेदनीयं दुःखम्'** (तर्कसंग्रह गुणनिरूपणम्) अशी करतात. याप्रमाणें पाहिलें असतां दुराचरणानें मिळणाऱ्या सुखाभासालाही सुख म्हणावें लागेल. विचारी पुरुषांच्या दृष्टीनें सुखाचे दोन वर्ग केले गेले आहेत. **'यच्च कामसुखं लोके यच्च दिव्यं महत्सुखम्'** तात्कालिक, काम म्हणजे इच्छेची पूर्ति झाल्यामुळें मिळणारें सुख व दुसरें ब्रह्मसुख किंवा मुक्तिसुख. सांसारिक आसक्ति कामरूप धारण करते. पण हाच काम ईश्वरासंबंधीं जर केला जाईल तर तो धर्मरूप ठरतो. **'धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ'** (-भ.गी. ७।११) हाच भक्तियोगाचा सिद्धान्त श्रीनिंबार्काचार्यांनीं मांडला आहे. धर्मयुक्तकामामध्यें पतिपत्नीसंबंध हा वासनामय न ठरतां तो क्रमानें ब्रह्ममय होतो. म्हणूनच **'ऋतौ भार्यामुपेयात्'** हा, **ऋतौ एव, भार्यामेव,** असा नियमविधि शास्त्रसंमत मानला गेला. काम हा केवल भोगाकरितांच असेल तर त्यानें पूर्ण शांति कधींच होणें शक्य नाहीं हें -

**'न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति।**
**हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते।।'** (-मनुस्मृति २।९४)

या वाक्यावरून व अनुभवानेंही सुस्पष्ट आहे. तहान लागली असतां पाणी पिणें, भूक लागली असतां भोजन करणें इत्यादि साधनें स्वयंसुखरूप नसून तीं क्षुधादिव्याधींचीं औषधरूप आहेत. पण त्यांनाच सर्व लोक सुख म्हणून, भ्रांतीनें समजतात असें पुढील श्लोकांत दाखविलें आहे -

**'तृषा शुष्यत्यास्ये पिबति सलिलं स्वादु सुरभि,**
**क्षुधार्तः सन् शालीन् कवलयति शाकादिवलितम्।**
**प्रदीप्ते कामाग्नौ सुदृढतरमाश्लिष्यति वधूम्**
**प्रतीकारो व्याधेः सुखमिति विपर्यस्यति जनः॥'**

(- वैराग्यशतक ९२)

औषधानें व्याधीची शांति तात्कालिक होते. रोगाचें मूल नाहींसें करण्याचें सामर्थ्य औषधीमध्यें नाहीं. काम म्हणजे सूक्ष्म आंतरवृत्तिरूप असल्यानें; भगवान् श्रीकृष्ण व भगवती श्रीराधादेवी यांचें नित्य साहचर्य, विहार इत्यादिकांचें श्रवण, मननपूर्वक उपासना करीत राहण्यानेंच कामरोगाची पूर्ण शांति होऊं शकते हें, रासक्रीडावर्णनाची फलश्रुति म्हणून श्रीशुकदेवांनीं पुढील श्लोकांत दाखविलें आहे

**'विक्रीडितं व्रजवधूभिरिदं च विष्णोः**
**श्रद्धान्वितोऽनुश्रृणुयादथ वर्णयेद्यः।**
**भक्तिं परां भगवति प्रतिलभ्य कामं**
**हृद्रोगमाश्वपहिनोत्यचिरेण धीरः॥'** (- भागवत १०।३३।४०)

सांसारिक जीवनांत कामावर विजय मिळविणें हाच पुरुषार्थ आहे. काम नष्ट करणें हा पुरुषार्थ नाहीं. भगवान् श्रीकृष्णांनीं रासलीला करून कामावर विजय मिळविला आहे. हेंच रासलीलेचें रहस्य आहे. हें लक्षांत न आल्यामुळें, पाश्चात्य लोक श्रीकृष्णांच्या दिव्य चारित्र्याबद्दल संशय व्यक्त करतात आणि अंधगोलांगूलन्यायानें त्यांचेंच अनुसरण करणारे भारतीय बुद्धिवादीही, त्याच संशयांधकारांत निमग्न होतात हा विलक्षण दैवदुर्विलास आहे. कामसुखाचा आरंभ स्त्री-सहवासापासून होतो आणि त्याचा शेवट श्रीकृष्णसहवासामध्यें होतो. तेंच कामसुख, श्रीकृष्णसहवासानें दिव्य महासुख बनतें. हाच श्रीनिंबार्काचार्यांचा उपासनासिद्धांत आहे. हेंच प्रियावत् भावाचें रहस्य आहे. म्हणूनच ३।४।४७ या ब्रह्मसूत्राच्या वाक्यार्थामध्यें सर्वोपकारक गृहस्थाश्रमजीवनाची सार्थकता आचार्यांनीं सुचविली आहे. आरंभीं

गार्हस्थसुखाची प्राप्ति करून घेऊन शेवटीं पूर्ण परमात्मसुखरूप मुक्ति प्राप्त करून घ्यावी हेंच त्यांना सांगावयाचें आहे. केवल सांसारिक सुखाचीच आसक्ति दुःखपर्यवसायी होते. कारण तें, स्थूलविषयांचा इंद्रियांशीं संयोग झाला असतां मिळते. ते विषय विनाशी असल्यानें अर्थातच त्यांच्या संयोगानें मिळणारे सुख विनष्ट होतें. म्हणून सांसारिक सुख ब्रह्मसुखाशीं संलग्न करणें हाच ब्रह्मयोग आहे. हा कष्टसाध्य आहे. तथापि त्यानें मिळणारें सुख अविनाशी आहे. एकदम सर्व विषयांचा त्याग होणें अशक्य आहे. तर हळूहळू अभ्यासानें वैषयिक सुख सोडून, परमात्म्यामध्यें लीन होणें हेंच मुख्य साधन आहे.

**'सुखं वा यदि वा दुःखं प्रियं वा यदि वाऽप्रियम्।**
**प्राप्तं प्राप्तमुपासीत हृदयेनापराजितः॥'**

(-म.भा.शां.१२-२५-२६)

**'भैषज्यमेतद् दुःखस्य यदेतन्नानुचिन्तयेत्।'**

(-म.भा.शां.१२-३३०-३३२)

हें त्यागाभ्यासाचें स्वरूप महाभारतकारांनीं दाखविलें आहे. श्रीनिंबार्काचार्यांच्या मतांत; आपल्या हृदयांतच महासुखरूप परमात्मा विद्यमान आहे. त्याला जाणलें असतां दुःख नांवाचा पदार्थच नामशेष होतो. याकरितां योग व भक्ति यांचा समन्वय करून श्रीनिंबार्काचार्यांनीं प्रेममार्गाचा पुरस्कार केला आहे. या प्रेममार्गामध्यें, सांसारिक राग हा, भगवच्चिंतनाचें माध्यम म्हणून मानला गेला आहे. तोच राग शेवटीं प्रेमरसामध्यें परिणत होऊन जातो.

काम, क्रोध व लोभ हे तीन दोष नरकाचें द्वार असल्यामुळें या तिघांचा त्याग करावा असें श्रीभगवद्गीतेमध्यें (१६।२१) सांगितलें आहे. श्रीनिंबार्कांच्या मतांत, या तिघांनाही परमात्म्याच्या भूमा (व्यापक) सुखांत निमग्न करणें हें उद्धाराचें साधन आहे. चार्वाकमतांत अंगनालिंगनजन्य कामसुख, पुरुषार्थ मानलेला आहे. श्रीनिंबार्कमतांत हेंच कामसुख, प्रियावतभावानें परमात्मसुखाशीं संबद्ध केलें असतां पुरुषार्थरूप आहे, या ठिकाणीं कामाची

पूर्णता आहे. लोभ टाकणें कठीण आहे पण मित्रवत् भावाचे दृढ पालनानें लोभप्रवृत्ति शांत होऊन जाते. याचप्रमाणें क्रोध अजेय असला तरी, दासवत् भावानें दैन्यवृत्तीचा अभ्यास करीत राहाण्यानें क्रोधवृत्तीही शांत होणारी आहे. परमात्म्याविषयीं सख्यभाव व दासभाव यांच्या अभ्यासानें सांसारिक जीवनांत देखील या दोन भावांचा आविष्कार होऊन क्रोधवृत्तीचा आपोआप उपशम होऊं शकेल. हाच श्रीनिंबार्कांचा प्रवृत्तिमार्गीय भागवतधर्म आहे; निवृत्ति किंवा त्याग नाहीं. ज्ञानमार्गानुसार, जें त्याज्य दोषरूप आहे तें प्रेममार्गानुसार त्याचा परमात्म्याशीं संबंध जोडला असतां तेंच श्रेय किंवा हितरूप होतें. सांसारिक जीवन न सोडतांही तें भक्तियोगमय कसें होऊं शकतें याबद्दल पुढील 'श्लोकांतून, महान् भक्त अंबरीषराजाचें भक्तिपूर्ण जीवन दाखविलें आहे -

**'सर्वं मनः कृष्णपदारविन्दयोर्वचांसि वैकुण्ठगुणानुवर्णने।**
**करौ हरेर्मन्दिरमार्जनादिषु श्रुतिं चकाराच्युतसत्कथोदये।।**
**मुकुन्दलिङ्.गालयदर्शने दृशौ तद्भृत्यगात्रस्पर्शेऽङ्.गसंगमम्।**
**घ्राणं च तत्पादसरोजसौरभे श्रीमत्तुलस्या रसनां तदर्पिते।।**
**पादौ हरेः क्षेत्रपदानुसर्पणे शिरो हृषीकेशपदाभिवन्दने।**
**कामं च दास्ये न तु कामकाम्यया यथोत्तमोकजनाश्रया रतिः।।'**

(- भागवत ६।४।१८-२०)

याप्रमाणें आतांपर्यंत श्रीनिंबार्कांच्या सिद्धान्ताचें सामान्य स्वरूप दाखविलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, एकच ब्रह्म, बहुरूप कसें झालें व कशाकरितां झालें या, सर्वांनांच विचारणीय असणाऱ्या दोन प्रश्नांचीं उत्तरें श्रीनिंबार्कांनीं आपल्या ग्रंथामध्यें तर्कानें मांडली आहेत. ब्रह्माच्या शक्तीचा विक्षेप सर्व अचेतन विश्व आहे. तें स्थूल, जड, असर्वगत असल्यामुळें ब्रह्माहून भिन्न आहे. तसेंच तें ब्रह्माच्या शक्तीचा परिणाम असल्यामुळें व प्रलयसमयीं त्यांतच लीन होत असल्यामुळें तें ब्रह्माहून अभिन्नही आहे. तसेंच चेतन जीव,

ब्रह्माचा अंश (शक्ति) आहे. त्याचा, अंशी (शक्तिमान्) ब्रह्माशीं भेद आहे. कारण, एक अंश, (कार्य) हें समष्टिरूप अंशीचें (कारणाचें) संपूर्ण रूप नाहीं. म्हणजे मर्यादित अल्यामुळें जीव हा अमर्याद ब्रह्माहून भिन्न आहे. आणि शेवटीं मातीच्या घड्यांत जसें मातीवांचून दुसरें कांहींच नाही त्याप्रमाणें जीव तरी ब्रह्माशिवाय अत्यंत वेगळा कसा असूं शकेल म्हणून अभेदही आहे. याप्रमाणें एकच ब्रह्म अनेकरूप कसें झालें या प्रश्नाचें उत्तर, कार्यकारण, अंशांशीं, भेदाभेद संबंध दाखवून श्रीनिंबार्कांनीं दिलेलें आहे. कार्याचें ब्रह्मावरच अवलंबून असणें, सर्व कार्यांतून ब्रह्म व्यापून असणें हाच येथें अभेदशब्दाचा अर्थ आहे. पूर्ण साम्य म्हणजे अभेद नाहीं तसेंच भेद सुद्धां सृष्टि व ब्रह्म यांचा परस्पर स्वाभाविक धर्मभेदामुळें आहे व ब्रह्म हें सर्वातीत असल्यामुळें आहे. तात्पर्य, ब्रह्माच्या स्वाभाविक शक्तीमुळें ही सृष्टि झाली, एकच ब्रह्म अनेकरूप होऊं शकलें हें पहिल्या प्रश्नाचें उत्तर आहे. तें अनेकरूप कशाकरितां झालें? या प्रश्नाचें उत्तर, सृष्टि म्हणजे नित्यतृप्त ब्रह्माची लीला आहे. असा लीलासिद्धान्त प्रस्तुत करून श्रीनिंबार्काचार्यांनीं दिलें आहे. जो, सृष्टी करण्याचें निमित्त होऊं शकतो. अनेक जीवांना त्यांच्या अनादिकालीन कर्मफलांशीं संयुक्त करणें ही हरीची लीला चालू आहे. म्हणजे आत्मक्रीडेकरितां सृष्टिरचना केली हें दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर आहे. या सिद्धांतालाही कठोर तर्काचा प्रतिबंध होतोच. ईश्वर कर्मसापेक्ष मानल्यास त्याचें स्वातंत्र्य काय राहिले? जीवांच्या आदिकर्मांचें उत्तरदायित्व कोणाकडे? नल, राम, युधिष्ठिर इत्यादि महापुरुषांनासुद्धां दुःख कां भोगावें लागलें? इत्यादि कठोर तर्काचें समाधान पूर्णपणें, केवल तर्कानें होऊं शकत नाही. म्हणून शेवटीं कविकुलगुरूंनीं पुढील श्लोकांत प्रकट केलेल्या भावनेचाच आश्रय समाधानाकरितां घ्यावा लागतो -

**'बहुधाप्यागमैर्भिन्नाः पन्थानः सिद्धिहेतवः।**
**त्वय्येव निपतन्त्योघा जाह्नवीया इवार्णवे॥'**

श्रीनिंबार्काचार्यांच्या ब्रह्मसूत्रवाक्यार्थाचें भाषांतर, विवरण, भूमिका हें मोठें कार्य त्यांच्याच कृपेनें पूर्ण झालें आहे. श्रीनिंबार्काचार्यांची लेखनशैली संक्षिप्त आहे. शिवाय त्यांच्या वाक्यार्थामध्यें इतर मतांचें खंडन तर्कपुरस्सर करण्याचाच प्रयत्न केला आहे. उगीच, **'शेषं कोपेन पूरयेत्'** असा प्रकार कोठेंही दिसून येत नाही. हा फार मोठा सात्त्विकताविशेष या ठिकाणीं दिसून येतो. भारतीय संस्कृतीच्या अनेक अंगांपैकीं भक्तियोगाचें सांगोपांग विवेचन वैष्णवसंप्रदायामध्यें केलें गेलें आहे. त्यांचें अंशतः तरी खरें ज्ञान सत्प्रवृत्तीच्या जिज्ञासू वाचकांना व्हावें; तसेंच इतरही दर्शनकारांचे विचार सामान्यतः समजावेत; भागवतधर्म व त्याचे प्रवर्तक आचार्य, यांनीं, अनेक परचक्रांच्या आपत्तींतही आपल्या निष्ठाबलानें भारतीय संस्कृतीची प्राणभूत अशी ईश्वरनिष्ठा सर्वत्र कशी सुरक्षित ठेवली; विवेकी जिज्ञासूंना जिज्ञासापूर्ति व निश्चित सन्मार्गदृष्टि लाभावी याकरितां, सत्तर्कपूर्ण विपुल ग्रंथसंपत्ति निर्माण करून भारताचें वाङ्मयवैभव किती वाढविलें आहे; ज्याची स्पृहा व अभ्यास, पाश्चात्यांनाही आवश्यक वाटून राहिला आहे; हेंही सद्वाचकांना अवगत व्हावें; प्राचीन, अर्वाचीन सत्पुरुषांच्या पुण्यप्रभावानें व निर्हेतुक त्यागपूर्ण प्रयत्नानें आजहि भारतामध्यें आस्तिक्यबुद्धि समाजामध्यें सर्वत्र दिसून येते. हा भारताचा स्थायीभाव आहे. तिची कार्यक्षमता प्रतिरुद्ध करण्याकरितां; आज, राजसत्ता, वारंवार पुढें येणारे शास्त्रीयतर्कसंस्पर्शशून्य उच्छृंखल वाङ्मय, त्यामुळें, परकीय सर्व श्रेष्ठ व आपलें सर्व हीन, ही बनून राहिलेली न्यूनगंडवृत्ति इत्यादि विविध कारणें असलीं तरी मुख्य कारण भारतीय संस्कृतिस्वरूपाचें अज्ञान हेंच आहे. तें दूर करण्याकरितां आपल्या संस्कृतीच्या सोपपत्तिक, सप्रमाण ज्ञानाची आवश्यकताही अंशतः पूर्ण व्हावी इत्यादि अनेक उद्देश डोळ्यांसमोर ठेवून ही सविस्तर भूमिका लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व लेखनाकरीतां झालेलें ग्रंथांचें साहाय्य पुढीलप्रमाणें आहे -

श्रीनिंबार्काचार्यांचा वेदांतपारिजातसौरभ, फारच संक्षिप्त असल्यानें त्याचें विवरण, बहुतेक, श्रीनिंबार्कांचे शिष्य श्री. श्रीनिवासाचार्य यांच्या ब्रह्मसूत्रावरील वेदान्तकौस्तुभ नांवाच्या भाष्याच्या आधारानें केलेलें आहे. तसेंच श्रीनिंबार्क संप्रदायांतील पीठाधिष्ठित श्रीराधाकृष्णजीमहाराज यांचे सुपुत्र, स्वनामधन्य आचार्य श्रीललितकृष्णगोस्वामी यांनीं हिंदीमध्यें लिहिलेला 'श्रीनिंबार्कवेदान्त' या मोठ्या प्रबंधग्रंथाचें साहाय्य या लेखनाकरीतां विशेषरूपानें झालें आहे.

तसेंच, हिंदी त्रैमासिक 'दार्शनिक' यांतील (१९५७ एप्रिल) माननीय श्रीरामअवध द्विवेदी यांच्या 'निम्बार्क का स्वाभाविक भेदाभेद' या सविस्तर लेखाचेंही साहाय्य विशेषरूपानें झालें आहे.

श्रीशांकरभाष्य, श्रीरामानुजभाष्य, अद्वैतसिद्धि, ब्रह्मानंदी (अद्वैतसिद्धीची टीका), सर्वदर्शनसंग्रह, त्यावरील; श्रीवासुदेवशास्त्रीजी अभ्यंकर यांची टीका व उपोद्धात, श्रीनिंबार्ककृत दशोकी (वेदान्तकामधेनु) व त्यावरील श्रीपुरुषोत्तमाचार्यांची टीका, संस्कृत वाङ्मयपरिचय (पं. मधुसूदनप्रसादमिश्र), पं. रोमा बोस यांचा निंबार्कमतावरील प्रबंध, परमपूज्य सद्गुरु श्रीवासुदेवानंद सरस्वती यांचें समग्र वाङ्मय (प्रकाशक श्रीगुळवणीमहाराज, नारायण पेठ २०, पुणें २), इत्यादि अनेक ग्रंथकारांचें साहाय्य या सर्व लेखनाचे वेळीं झालेलें आहे. हें सर्वही त्यांचेंच आहे. 'फोडिलें भांडार धन्याचा हा माल। मी तो हमाल भारवाही' हीच वास्तवस्थिति आहे. या सर्व ग्रंथकारांच्या ज्ञानधनाच्या ऋणांतून मी केव्हांच मुक्त होऊं शकणार नाहीं. अंतिम श्वासापर्यंत यांच्या कृतज्ञतेचा भार चित्तावर नित्य राहून, त्यांतील अनंतजन्माच्या मलौघाचें निरसन होत राहावें हीच धीप्रेरक जगच्चालकाजवळ अखंड प्रार्थना आहे.

संस्कृतमंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक काशीनाथशास्त्रीजी अभ्यंकर यांच्या निर्व्याज प्रेमऋणाचा निर्देशही यावेळीं अपरिहार्य आहे. या कार्याच्या

उपक्रमापासून अखेरपर्यंत वेळोवेळीं योग्य सूचना देणें, शेवटचें प्रत्येक प्रूफ पाहाणें इत्यादि रूपानें त्यांनीं व्यक्त केलेल्या आत्मीयतेच्या बलावरच हा ग्रंथ पूर्ण होऊन राहिला आहे हें वास्तव सत्य आहे. तसेंच प्रत्ननूत्नविद्याव्यासंगशील प्राचार्य लिमये व संस्कृतमहाविद्यालयाधिपति पं. वामनशास्त्री भागवतगुरुजी या दोघांचीही प्रेक्षावत्ता व वत्सलता वरीलप्रमाणेंच या ग्रंथाच्या पूर्णतेस कारण आहे हें सत्यकथनही अविस्मरणीय आहे.

हा ग्रंथ प्रकाशित होण्यास कांहींसा विलंब होत आहे हें खरें आहे. याला कारण; शारीरप्रकृति, मुद्रणालयप्रकृति, प्रपंचप्रकृति यांचा आकस्मिक दोषोद्भव, हा जरी झाला असला तरी, **'दैवं चैवात्र पंचमम्'** या प्रमुख कारणाचें आनुकूल्य व टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळानें, माझ्यावर टाकलेल्या या जबाबजारीबद्दल शेवटपर्यंत केलेलें विशवासप्रकटन, हींच दोन ग्रंथपूर्तीचीं अंतरंग कारणें आहेत हें आत्मसमाधानाकरितां निवेदन करणें उचित ठरणारें आहे.

विद्यापीठांतील सौजन्यशील विद्यार्थी श्री. विघ्नहरि देव, यांचेही साहाय्य; सूची तयार करणें, इंग्रजी संदर्भग्रंथांतील महत्त्वाचा भाग शोधून त्याचें स्पष्टीकरण करणें इत्यादि रूपानें झालेलें आहे याचाही उल्लेख अपरिहार्य वाटतो.

श्रीनिंबार्काचार्यांनीं प्रवर्तित केलेल्या या हंससंप्रदायाचें वैशिष्ट्य या ग्रंथावरून समजून येईल. असे अनेक संप्रदाय भारताचें भूषण म्हणून आजही आहेत. वैष्णवसंप्रदायाप्रमाणें शैवसंप्रदायांतही विपुल ग्रंथसंपत्ति आहे. त्या त्या संप्रदायांतील विवेकी पुरुषांची बुद्धि स्थिर राहून संप्रदायपोषणद्वारा राष्ट्रसंवर्धनोपयोगी कार्य घडून येण्याचे दृष्टीनें अशा ग्रंथांचें प्रकाशन अत्यंत उपयुक्त आहे. भारतीय सत्ताधीशही आज या कार्यास आनुकूल्य दर्शवीत आहेत. त्याचें चीज करण्याकरितां टिळक विद्यापीठासारख्या संस्थेचेद्वारा अशा विविध ग्रंथांचें प्रकाशनकार्य नित्य चालू राहावें व **'युवास्यात्साधुयुवाऽध्यायकः**

**आशिष्ठो द्रढिष्ठो बलिष्ठः** ' इत्यादि अनुवाकांत दर्शविलेल्या मानुषानंदादि आनंदाच्या निःश्रेणीवरून मार्गक्रमण करूं शकणारा अधिकारी वाचकवर्ग, या प्रकाशनाच्या साहाय्यानें यथार्थज्ञानवान् बनून, भारतास मिळालेलें स्वराज्य, दुष्प्रधर्ष सुराज्य बनविण्यामध्यें नित्य तत्पर राहो हीच शेवटीं जगदीश्वराजवळ प्रार्थना आहे.

**श्री. दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वर**

न्यायवेदान्ताध्यापक, टि. म. विद्यापीठ, पुणें २